# सामाजिक वाद

लेखक
विनायक सीताराम सरवटे

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

# सामाजिक वाद

लेखक
विनायक सीताराम सरवटे
बी.ए., एल्एल्. बी.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

प्रथमावृत्ती - १९२१
पुनर्मुद्रण - मे, १९८८

प्रकाशक -
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य
आणि संस्कृती मंडळ,
नवीन प्रशासन भवन,
मुंबई - ४०० ०३२.

© प्रकाशकाधीन

मुद्रक
श्री. विकास रा. म्हात्रे,
रचना प्रिंटर्स,
राऊत इंडस्ट्रियल इस्टेट,
माहिम, मुंबई - ४०० ०१६

किंमत-२७ रुपये

# निवेदन

१९ वे शतक हे विज्ञानाचे तर शतक होतेच पण सामाजिक तत्त्वज्ञानाचे पण शतक होते. या शतकात विज्ञानाचा जेवढा विकास झाला त्यापेक्षाही अधिक विकास सामाजिक तत्त्वज्ञानाचा झाला. मूळात हेगेलचा शिष्य असलेल्या कार्ल मार्क्सने सामाजिक जीवनाची नवी दृष्टी जगाला दिली. प्र. धाँ. ओवेन, इत्यादि महान विचारवंत याच काळातील. कार्ल मार्क्सने या विचारवंतांशी दोन हात करुन आपली खूण इतिहासावर उमटवली. पण मार्क्स केवळ विचारवंतच नव्हता. त्याचे तत्त्वज्ञान सामाजिक परिवर्तन घडवून आणणारे, क्रांतिकारी होते. आणि या प्रक्रीयेत मार्क्सने स्वत:पण भाग घेतला होता. १८४८ चा कम्युनिस्ट जाहिरनामा, १८ वी क्राम्युअरी क्रांतिकारी पॅरीस कम्यून, इत्यादि गोष्टीतून त्याने कामगारांना कार्याचा, कार्यक्रमाचा एक नवा संदेशच दिला. मार्क्सचे तत्त्वज्ञान हे भांडवलदारांकडून कामगारांचे कसे शोषण होते ते सांगते. पण एवढे सांगूनच मार्क्स स्वस्थ बसला नाही. "जगातील कामगारांनो एक व्हा. तुमच्या जवळचे काहीच जावयाचे नाही, जाणार असतील तर तुमचे साखळदंड" असे त्याने आपल्या जाहीरनाम्यात सांगितले. आजतागायत तत्त्वज्ञानी जग कसे आहे हेच सांगण्याचा प्रयत्न केला आपणांस मात्र जग बदलावयाचे आहे हे सांगण्यासही तो विसरला नाही. परिणामत: युरोपात एका मागून एक अशी क्रांत्यांची बरसात झाली. शेवटी २० व्या शतकाच्या सुरवातीस म्हणजे १९१४ मध्ये जे पहिले महायुद्ध झाले त्यात मार्क्सवादी तत्त्वज्ञानाच्या विचारवंताना समाजवादी क्रांती घडवून आणण्यात यश आले. १९१७ मध्ये झार विरुद्ध प्रचंड प्रक्षोभ होऊन झारशाही उलटवली गेली. आणि त्या ठिकाणी केरन्स्कीचे सरकार आले. पण हे सरकार बोल्शेविक सरकार नव्हते. आज ज्यांला कम्युनिझम किंवा साम्यवाद म्हणण्यात येतो त्या विचाराचा त्या वेळचा रशियन प्रणेता होता लेनिन. त्याने ६ महिन्यातच म्हणजे ७ नोव्हेंबर, १९१७ ला केरन्स्की सरकार उलथवून बोल्शेविक पक्षाला सत्तेवर आणले आणि समाजवादाची स्थापना केली. या घटनेस आज ७० हून अधिक वर्षे झाली आहेत. या काळात रशिया किंवा सोव्हियत युनियन जगातील एक प्रचंड शक्ती म्हणून अस्तीत्वात आली. आणि समाजवादाची प्रभा सर्व जगभर फाकली. पण रशियन क्रांतीनंतर केवळ चार वर्षात या विचाराचे लोण हिंदुस्थानात पोचले. खरे म्हणजे रशियन क्रांती होण्यापूर्वीही हा विचार मॅडम कामा यांनी या देशात रुजविण्याचा प्रयत्न केला होता असे म्हणतात. लोकमान्य टिळकांच्या आयुष्याच्या शेवटी शेवटी त्यांची मते समाजवादी विचाराची झाली होती, असेही सांगण्यात येते आणि ते बहुतांशी बरोबर पण आहे. पण सामान्य भारतीय माणसाला, मराठी माणसाला, समाजवादाची माहिती नव्हती. या विषयावर एकही ग्रंथ मराठीत

उपलब्ध नव्हता. ही उणीव कै. सरवटे यांनी भरून काढली. समाजवादावरील, मराठीतील हा पहिला ग्रंथ लिहिला श्री. सरवटे यांनी. या ग्रंथाला त्यांनी नाव दिले "सामाजिक वाद". हे सरळ सरळ सोशॅलिझम या शब्दाचे भाषांतर आहे. (समाजवाद हे सोशॅलिझमचे भाषांतर होऊ शकत नाही.)

हे पुस्तक श्री. सरवटे यांनी १९२१ मध्ये छापून प्रसिद्ध केले. होळकर सरकार मालिकेतील हे १२ वे पुस्तक. या पुस्तकांमुळे समाजवाद किंवा सामाजिक वाद हा शब्द सामान्य माणसास माहीत झाला. आज हे पुस्तक दुर्मिळ आहे. असे हे समाजवादावरील मराठीतील पहिले वहिले दुर्मिळ पुस्तक प्रसिद्ध करतांना मंडळास आनंद होत आहे.

१ मे, १९८८
४२, यशोधन,
दिनशा वाच्छा रोड

सुरेन्द्र बारलिंगे
अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

श्री. होळकर-सरकार पुस्तकमालेंतील १२ वें पुस्तक.

# सामाजिक वाद.

" From each according to his ability;
to each according to his needs. "

Marx.

लेखक
**विनायक सीताराम सरवटे**, बी. ए., एल्‌एल्. बी.

प्रकाशक
**बळवंत गणेश दाभोळकर**
५४९ नारायण पेठ, पुणे सिटी.

पुणे पेठ शनिवार घर नंबर १२१ येथें महादेव सखाराम दाते ह्यांनीं आपले
“वैद्यकपत्रिका” छापखान्यांत छापिलें.

शक वर्ष १८४२-इ. सन १९२१

# अनुक्रमणिका


| | प्रकरण | पृष्ठें |
|---|---|---|
| | प्रस्तावना ... ... ... ... | |
| १. | औद्योगिक क्रान्ति ... ... ... ... | १ |
| २. | औद्योगिक क्रान्तीचे लाभ व हानि ... ... ... | २० |
| ३. | सामाजिक वादाचा फ्रान्सांत उदय ... ... ... | ३७ |
| ४. | सामाजिक वादाचा जर्मनींत उत्कर्ष ... ... | ६१ |
| ५. | कार्ल मार्क्स ... ... ... ... | ७५ |
| ६. | अराजक पंथ ... ... ... ... | १०१ |
| ७. | संघवाद ... ... ... ... ... | १२३ |
| ८. | बोल्शेव्हिक पंथ ... ... ... ... | १४० |
| ९. | उपसंहार ... ... ... ... ... | १६१ |

# प्रस्तावना

पुढील पृष्ठांतून पाश्चात्य जगांतील एका अत्यंत जोरदार व जिवंत सांप्रदायाची व चळवळीची माहिती मराठी वाचकांना करुन देण्याचा प्रयत्न केलेला आहे. आज त्या जगापुढें सर्वांत महत्त्वाचा प्रश्न कामकरीवर्गाचा आहे. तिकडे हा वर्ग अठराव्या शतकांत यांत्रिक कारखान्यांच्या उत्पत्तीनंतर अस्तित्वांत आला. पहिल्यापासूनच त्याची स्थिति परवश, जुलुमानें गांजलेले, दीन, दरिद्री व कष्टमय राहत आली. शिक्षणाच्या व जागृताच्या अभावीं त्यानें ती बरीच वर्षें निमूटपणें सहन केली. पण पुढें जशी जशी ही स्थिति असह्य होत गेली, व त्याबरोबरच शिक्षण, जागृति, ऐक्य व सुसंघटना यांची त्याच्यांत वाढ होत चालली, तसतसा या वर्गाचा व त्याला गांजणाऱ्या भांडवलवाल्या कारखानदारवर्गाचा कलह जोरानें सुरु झाला, व आज तर या कलहाला अत्यंत उग्र रूप प्राप्त झालेलें आहे. कामकरीवर्गाचें बळ हल्लीं वाढतें असून, आतां विजयश्री त्यांस माळ घालणार अशीं चिन्हें स्पष्ट दिसत आहेत. सामाजिक वाद हा या कलहांत त्या वर्गानें आत्मोद्धारार्थ शोधून काढलेला उपाय आहे. हिंदुस्थानचा हल्लीं पाश्चात्य जगाशीं निकट संबंध झालेला असून, तिकडील भांडवलशाही यांत्रिकपद्धति येथें प्रचलित झाली आहे. तेव्हां या पद्धतीपासून तिकडे उद्‌भवलेले वर्गकलहादि दोष, व त्यांच्या निवारणासाठीं योजलेले सामाजिक वादासारखे उपाय यांची माहिती येथील लोकांनीं करुन घेणें आवश्यक व हिताचें आहे. शेजारींच रोगाची सांथ आलेली असली, व आपल्याही घरांत कांहीं मंडळी कुणकुणत असली, तर तेथें कोणत्या औषधापासून गुण येत आहे याची माहिती करुन घेणें अत्यावश्यक व उपयुक्त नाहीं असें कोणता सुज्ञ मनुष्य म्हणेल?

या पुस्तकांत सामाजिक वादाचा इतिहास देण्याचाच उद्देश असल्यानें, त्या वादांत अगदीं प्रारंभापासून आतांपावेतों होत आलेल्या निरनिराळया रुपांतरांचें व मतांतराचें केवळ विवेचन मात्र यांत करण्यांत आलें आहे. या मतांवर घेतले जाणाऱ्या आक्षेपांचा किंवा त्यांना देण्यांत येणाऱ्या उत्तरांचा यांत विचार केलेला नाहीं.

या पुस्तकांतील पहिलें प्रकरण Modern socialism नांवाच्या ग्रंथाच्या आधारानें लिहिलें आहे. दुसऱ्या प्रकरणांस Social movement या रॅमसे मॅकडोनाल्डच्या ग्रंथाचा आधार घेतला आहे. तिसरें व चौथें प्रकरण History of socialism नांवाच्या किरकपच्या प्रसिद्ध ग्रंथांतील त्या त्या भागांचा जवळ जवळ अनुवाद आहे. पांचवें, सहावें, व सातवें प्रकरण हीं किरकपचा सदर ग्रंथ व बर्ट्रंड रसेलचा Roads to Freedom नांवाचा सुंदर ग्रंथ यांच्या आधारानें लिहिलीं आहेत. आठव्या प्रकरणाला लेनिनच्या State and the Revolution या छोटेखानी

सारगर्भित पुस्तकाचा व पोम्टगेटच्या The Bolshevik theory नांवाच्या ग्रंथाचा आधार आहे. नवव्या प्रकरणांतील कांहीं विचारांबद्दल लेखक काशीचे विद्वान् तत्त्वविवेचक बाबू भगवान दास यांचा ऋणी आहे.

हीं पानें प्रथमत: सन १९१९ त येथील महाराष्ट्र-ग्रंथोत्तेजक मंडळाच्या प्रेरणेनें व आर्थिक सहायानें लिहिलीं गेलीं; व नंतर यांत वेळोवेळी मिळत गेलेल्या माहितीप्रमाणें भर टाकण्यांत व सुधारणा करण्यांत आली. अर्थात् त्याचें सर्व श्रेय त्या मंडळाला व ज्यांच्या औदार्यानें हें मंडळ मूळ अस्तित्वांत आलें व हल्लीं कार्य करुं शकत आहे त्या श्रीमंत तुकोजीराव होळकर महाराजांस आहे. त्या दोघांचाही लेखक अत्यंत कृतज्ञ आहे.

आईच्या प्रेमळ स्मृतीला समर्पण असो.

इंदूर.
ता. ४ फेब्रुवारी १९२१ इ. वि. सी. सरवटे.

---

**शुद्धीकरण** : प्रकरण ३ ते ६ भाग २ रा सामाजिक वादाचा उत्कर्ष व प्र. ७ आणि ८ भाग ३ रा-सामाजिक वादाचें आधुनिक स्वरुप ह्याप्रमाणें समजावें. पान ३ ओळ ३ "या प्रकरणांत" हे शब्द खोडावे. व पान ४ ओळ १३ "असून" च्या जागी "नसून" वाचावें.

( या आवृत्तीत वरील शुद्धीकरण करण्यात आले आहे. )

## प्रकरण १ लें

# औद्योगिक क्रान्ति

हल्लींचें युग हें औद्योगिक युग आहे. हल्लीं जगांतील बहुतेक सर्व घडामोडी औद्योगिक व व्यापारिक कारणांमुळें घडतात. नुक्त्याच संपलेल्या महायुद्धाच्या मुळाशी औद्योगिक कारण–जर्मनीची व इंग्लंडची व्यापारी चुरस–होतें हें सर्वांस माहीत आहे. पाश्चात्य राष्ट्रांच्या व परंपरया सर्व जगाच्या राजकारणाचीं सूत्रें औद्योगिक व व्यापारिक विचारांनीं आजकाल हलत असतात. ज्या ज्या राष्ट्राला म्हणून हल्लींच्या काळीं जगांत पुढें जावयाचें असेल, त्याला आपली औद्योगिक उन्नति करुन घेतल्याशिवाय दुसरा उपाय नाहीं. पाश्चात्य राष्ट्रांनीं अशी उन्नति करुन घेतल्यामुळें तीं आज जगावर प्रभुत्व गाजवीत आहेत; व हिंदुस्थानांत अशी उन्नति झालेली नाहीं हें त्याच्या निकृष्टावस्थेचें एक मुख्य कारण आहे. औद्योगिक प्रश्नांना यामुळें साहजिकच अत्यंत महत्त्व आलेलें असून, प्रत्येक उदयेच्छु राष्ट्रानें त्यांचा काळजीपूर्वक विचार करणें हें एक आवश्यक कर्तव्य झालें आहे.

हल्लींच्या उद्योगधंद्याचीं कारखानदार व मजूर, भांडवलवाले व कामकरी, हीं दोन मुख्य अंगें आहेत. वस्तुतः हीं दोन्हीं अंगें परस्परोपजीवी आहेत. कारखाने मजूरांशिवाय चालावयाचे नाहींत, व मजूरांना कारखान्याशिवाय रोजगार मिळणार नाहीं. परंतु या दोन अंगांत पुष्कळ काळापासून विरोध उत्पन्न झाला आहे, किंबहुना हल्लींची उद्योगपद्धतीच अशी आहे कीं, तिच्यांत हा विरोध अनिवार्य आहे. आजकाल चोहोंकडे–हिंदुस्थानांत सुद्धां– जे संप होत आहेत, त्यांनीं झाडून सर्वांना या विरोधाची माहिती करुन दिलेली आहे. आणि या

विरोधांची कारणें अगदीं उघड आहेत. कामाचे तास कमी करावेत, किंवा मजूरीचे दर वाढवावेत, हें त्या कारणांचें वरपांगी स्वरुप आहे. पण मूळ कारण असें आहे कीं, घटकाभर हिंदुस्थानची गोष्ट बाजूला ठेवूं, परंतु युरोपियन राष्ट्रांतून आजकाल–निदान युद्धापूर्वी पावेतों तरी–संपत्तीचा नुसता पूर लोटला होता; परंतु असें असूनहि राष्ट्रांतील बहुसंख्यांक जो मजूरवर्ग त्याची स्थिति पूर्वीसारखीच निकृष्ट राहिलेली होती. उद्योगधंद्यांच्या व व्यापाराच्या विलक्षण वाढीमुळें देशांत संपत्तीचा लोट आला, पण तो बहुतांशीं भांडवलवाले कारखानदारांच्या खिशांतच गडप झाला, व मजूरांच्या वांट्याला त्याचा फारच थोडा अंश आला. त्यांची पूर्वीची दैना बहुतांशीं जशीच्या तशीच कायम राहिली. शिक्षणाचा त्यांच्यांत प्रसार झाला नाहीं, किंवा गरीबीमुळें जडणारीं व्यसनें त्यांच्या मागचीं सुटलीं नाहींत. देशांत अनेक टोलेजंग आकाशाशीं स्पर्धा करणाऱ्या इमारती उभारण्यांत आल्या, पण त्यांच्या कोंदट, गलिच्छ, निरुंद खोल्या नाहींशा झाल्या नाहींत. त्यांच्या मुलांना पोटभर अन्न व पाठभर वस्त्र मिळण्याची पूर्वीप्रमाणेंच यातायात राहिली. अर्थातच मजूरवर्गाला जशी जशी या स्थितीची जाणीव होऊं लागली व आपल्या व आपल्याच कष्टावर गबर होणाऱ्या कारखानदारांच्या स्थितीतलें महदंतर ध्यानांत येऊं लागलें, तसतसा हा विरोध उत्पन्न झाला, व आपली स्थिति सुधारुन हें अंतर नाहींसें करण्यासाठी मजूरवर्गानें संपासारखे उपाय हळू हळू हातीं घेतले.

परंतु हा विरोध कायमचा नाहींसा करुन, मजूरवर्गाची स्थिति खरोखर उत्कृष्टपणें सुधारावयाची असेल, तर त्याला खात्रीचा उपाय हल्लींच्या मजूरवर्गाच्या व कारखानदारांच्या परस्परसंबंधाचें स्वरूप बदललें पाहिजे. हल्लीच्या उद्योगपद्धतींत भांडवल एकाचें व श्रम करणारे कामकरी दुसरे अशी स्थिति आहे तींत सुधारणा केली पाहिजे. अशा प्रकारचीं मतें पाश्चात्य समाजांत आज कित्येक वर्षांपासून प्रचलित असून, त्यांना सामान्य रुपानें 'सामाजिक वाद' हें नांव आहे. या मतांत कांहीं मुख्य गोष्टींत एकवाक्यता असून, इतर बाबतींत थोडाफार भेद आहे. त्याचें वर्णन पुढील भागांत येणार असून, तोच प्रस्तुत ग्रंथाचा मुख्य विषय आहे, परंतु तें वर्णन नीटपणें समजण्यासाठी ज्या औद्योगिक पद्धतीमुळें हा वाद मूळ अस्तित्वांत आला, तिचें स्वरुप कळणें जरुर आहे. म्हणून या प्रकरणांत ही पद्धत प्रचारांत येण्याचीं कारणें, ती उदयाला आली तेव्हांची समाजस्थिति, या पद्धतीचा हळू हळू झालेला विकास व तिचें हल्लींचे उन्नत स्वरुप यांचें या प्रकरणांत वर्णन करावयाचें आहे. पुढील प्रकरणांत या पद्धतीपासून उद्भवलेले अनेक दोष व लाभ यांचें परीक्षण करुन, विचारी पुरुषांची सामाजिक वादाकडे कशी साहजिक प्रवृत्ति झाली हें पाहाण्याचें योजिलें आहे.

अठराव्या शतकाच्या शेवटपर्यंत युरोपांतल्या उद्योगधंद्यांची स्थिति पन्नास वर्षांमागच्या हिंदुस्थानाच्या स्थितीसारखी होती. त्या शतकाच्या अगदीं शेवटीं शेवटीं व एकोणिसाव्याच्या प्रारंभी ही स्थिति बदलण्यास प्रारंभ झाला, व सुमारें पन्नास वर्षांत तिचें स्वरुप पूर्णपणें बदलून गेलें. हा बदल युरोपांतील सर्व देशांत, किंवा यूरोपनें वसविलेल्या अमेरिकेंत

सारख्याच प्रमाणानें किंवा पूर्णपणें एकाच रुपांत झाला नाहीं. देशकाल परिस्थितीला अनुसरुन कांही देशांत कमी तर इतरांत जास्त, कांहीत एका स्वरुपांत तर इतरांत त्याहून किंचित् भिन्न स्वरुपांत असा हा बदल झाला. व पूर्वीची स्थिति कोठेंच कायम राहिली नाहीं. तथापि या सर्व देशांचा परस्परांशी निकट संबंध असल्यानें या क्रांतीची स्थूल रुपरेषा सर्वदूर सारखीच राहिली आहे. इंग्लंडच्या विशिष्ट परिस्थितीमुळें ही क्रान्ति प्रथमत: तेथें सुरु झाल्यामुळें, त्याला उद्योगधंद्यांत व व्यापारांत आपाटी मिळून सर्व जगांत जें एकप्रकारचें पुढारीपण व श्रेष्ठत्व मिळालें तें आतांपर्यंतही पुष्कळ अंशांनी कायम आहे. अमेरिकेनें व युद्धापूर्वी जर्मनीनें कांही कांही बाबतीत इंग्लंडवरही ताण केली असून, देशांतील क्रान्तीचें स्वरुप व कारणें इंग्लंडहून अंशत: भिन्न आहेत. म्हणून या क्रान्तीचें वर्णन करतांना, इंग्लंडमध्यें ती कशी झाली हें प्रथम सांगून, नंतर अमेरिकेंत व जर्मनींत कोणत्या बाबतींत विशिष्टपणा आहे तें सांगण्याचा उद्देश आहे.

अठराव्या शतकाच्या शेवट शेवटपर्यंत इंग्लंडचा मुख्य धंदा शेतकी हा होता, व तो बहुधा प्राचीन काळापासून चालत आलेल्या आउतांनीं व पद्धतीनें केला जात असे. शेतकीच्या खालोखाल दुसरा धंदा लोंकरीचा होता. इंग्लंडमध्यें कुरणें पुष्कळ असल्यानें तेथें लोकर चांगली व मुबलक उत्पन्न होत असे. त्यामुळें तेथें लोंकरीचे बरेच कारखाने चालत, असून लोंकरीचा बराच माल परदेशीं पाठविला जाई. सन १७७० पर्यंत इंग्लंडच्या कुलनिर्यात मालापैकीं एकतृतीयांश माल लोंकरीचा असे. लोंकरीच्या खालोखाल लोखंडाचा धंदा चालत असे. पण त्यावेळीं तो इतक्या लहान प्रमाणांत होता कीं, हल्ली लोखंडाच्या मुबलक पुरवठ्यामुळेंच इंग्लंडला जगाच्या व्यापारांत अग्रेसरत्व मिळालें आहे पण त्यावेळीं इंग्लंडला लोखंड परदेशांहून मागवावें लागे. लोखंडाशिवाय धातूंची भांडीं, कापसाचें व रेशमी कापड, वगैरेही कांहीं धंदे चालत असत. पण ते फारच लहान प्रमाणावर असून नांव घेण्यासारखे नसत. या वेळीं (सन १७९२) इंग्लंडचा निर्यात व्यापार २,४९,०५,२०० पौंडांचा असून, आयात सुमारें १,९६,५९,३५८ पौंडांची होती.*

इंग्लंडची लोकसंख्या आजच्या मानानें फारच थोडी म्हणजे केवळ ८५ लक्ष होती. देशांतून मोठमोठे रस्ते फार असून, गाडी व घोडे एवढीच दळणवळणाची माल ने–आण करण्याची साधनें होतीं. गांवढ्यांतून लागणारा माल बहुधा तेथल्या तेथेंच तयार होऊन खपत असे. एका भागांतला माल दुसरीकडे फार थोडा जात असे. बँका, हुंड्या वगैरे पैसा पाठविण्याची किंवा संचय करण्याचीं आधुनिक साधनें त्यावेळीं फार बाल्यावस्थेंत असून, त्यांच्यापासून व्यापाराला किंवा उद्योगधंद्यांना तादृश फायदा होत नसे.

---

* Modern Industrialism P. P. 21.

जे उद्योगधंदे चालत त्यांच्यांत पूर्वापार चालत आलेली पद्धति कायम होती. बहुतेक धंद्यांत त्या त्या धंद्यांतील कारागिरांचीं लहान लहान स्वतंत्र दुकानें असून, तेथें ते स्वत: एक–दोन मदतनिसांसह काम करीत असत. दुकानांसाठीं लागणारा कच्चा माल व हत्यारें त्यांच्या स्वत:च्या मालकीचीं असत, व उत्पन्न झालेला माल ते स्वत:च गिऱ्हाइकांस विकीत. कांहीं कारखाने यापेक्षां मोठ्या स्वरुपाचे असत. त्यांत मुख्य मालक आपल्या पैशानें कच्चा माल आपल्या जोखमीवर विकीत. पण या कारखान्यांतही कामगार हल्लींसारखे एकत्र जमून काम करीत नसत. प्रत्येक जण कच्चा माल विकत घेऊन तो ठराविक मजूरीवर कारागिरांना देत व तयार झालेला माल आपल्या घरीं घेऊन जाई व घरींच त्याचा पक्का माल तयार करुन तो मालकाला पोहोंचता करी. उद्योगधंद्याच्या उपकरणांतही फारशी सुधारणा झाली नव्हती. बहुधा सर्व काम मनुष्यांच्या व जनावरांच्या श्रमानें केलें जाई. कांहीं थोड्या ठिकाणीं पाण्याच्या धबधब्याचा उपयोग करुन घेऊन, त्या शक्तीनें कारखाने चालविले जात होते. सारांश, उद्योगधंद्याचें त्या वेळचें स्वरुप संकुचित, वैयक्तिक व घरगुती होतें.

अर्थशास्त्रासंबंधी मतेंही त्यावेळीं हल्लींहून निराळीं होतीं. खुल्या व्यापाराचें तत्त्व अजून प्रचलित झालें नव्हतें. देशांतील उद्योगधंदे सुरक्षित ठेवण्यास परदेशाहून येणाऱ्या मालावर जबर जकात बसविली पाहिजे व इतर निर्बंध घातले पाहिजेत असें अर्थशास्त्रज्ञांचे मत असे. म्हणूनच या वेळीं इंग्लंडांत बाहेरुन येणाऱ्या मालावर जबर जकात लागत असे. उद्योगधंद्यासंबंधांतही त्या काळांत पूर्ण स्वातंत्र्य नसे. मजूरांना एका पॅरिश किंवा तालुक्यांतून दुसऱ्या तालुक्यांत राहावयास जातां येत नसे. निरनिराळ्या धंद्याच्या कारागिरांचे संघ कायम झालेले असून त्यांच्याशिवाय इतरांनीं तो धंदा करण्याची कायद्यानें मनाई असे. त्यामुळें कोणत्याही धंद्यांत प्रवेश करणें किंवा एक धंदा सोडून दुसरा करुं लागणें फार जड व त्रासाचें झालें होतें.

त्यावेळची राज्यपद्धतिही या सर्व परिस्थितीला अनुरुप अशी होती. पार्लमेंटचा अधिकार त्यावेळीं हल्लींहून पुष्कळ कमी होता; व त्यांत अमीरउमरावांचें प्रस्थ पुष्कळ मोठें होतें. देशांतला मुख्य धंदा जमिनीचा व तिचे मालक अमीरउमराव असल्यानें असें असणें साहजिक होतें. हौस ऑफ कॉमन्समध्यें म्हणजे लोकप्रतिनिधिसभेंतही अमीरउमरावांनीं आपल्या कुळांकडून स्वत:ला अनुकूल असे धाडलेले प्रतिनिधि बरेच असत; व सामान्य जनसमूहाची काळजी वाहणारे किंवा त्यांच्या मतांचे पुरस्कर्ते अशा प्रतिनिधींची वानवा असे. या योगानें राज्यपद्धतीचें सामान्य धोरण राजाला व जमेदार उमरावांना अनुकूल व त्यांच्याच हिताची चिंता वाहणारें राहत असे. इतरांच्या सुखाचा किंवा हिताचा विचार तादृश जमेंत धरला जात नसे.

याप्रमाणें देशाची औद्योगिक व राजकीय स्थिति पुष्कळ मागासलेली होती. देशांत

संपत्तिही पुष्कळ कमी होती; पण जी संपत्ति होती तिची वांटणी हल्लींच्या मानानें पुष्कळच समप्रमाणांत झालेली होती. अमीरउमरावांच्या घरांतून संपत्तीचा धूर निघत नसे; किंवा गरीब मजूरालाही पोटापुरतें मिळण्यास पंचाईत पडत नसे. समाजांतील निरनिराळ्या वर्गाच्या दर्ज्यांत फार कमी अंतर असून, ते एकमेकांत मोकळ्या मनानें मिसळत. शेतकरी आणि त्याचा मजूर दोघेही जवळ जवळ एकाच दर्जाचे असत. कामकरी आणि त्यांचे मालक, कारागीर आणि त्यांचे हस्तक, हे मोकळेपणानें एकत्र बसून भोजन करीत. पुष्कळ वेळा हस्तकाचें मुख्य कारागिराच्या मुलीशीं लग्नही होत असे. आज इंग्लंडांत निरनिराळे वर्ग किती तुटक झाले आहेत, त्यांच्यांत कसलें वैषम्य उत्पन्न झालें आहे,— आतां मजूराशी कारखानदाराच्या मुलीनें लग्न लावणें तर दूरच राहिलें, पण त्याच्या बरोबर जेवणें, चहा पिणें, फार काय— बोलणेंसुद्धां कारखानदाराच्या मुलीला किती कमी प्रतीचें व आपल्या दर्जाला न शोभेसें वाटतें, याचा विचार केला म्हणजे आजच्या व त्यावेळच्या स्थितींत केवढें महदंतर होतें हें नीटपणें ध्यानांत येतें.

सारांश, त्यावेळच्या देशस्थितीचें थोडक्यांत वर्णन करावयाचें म्हणजे समाजांत उद्योगधंदे थोडे असून, त्यांचें स्वरुप घरगुती व लहान होतें. यंत्रांचा शोध लागलेला नव्हता. व पुष्कळशा लोकांनी एकत्र मिळून उद्योगधंदा करण्याचा प्रघात नव्हता. समाजांत संपत्ति थोडी होती, तथापि ती सर्व वर्गांत पुष्कळ अंशीं सारख्या प्रमाणांत वाटलेली होती. लोक जुन्या चालीरीतींना चिकटून असत, व नव्यांची त्यांना तादृश इच्छा नव्हती. लोक असलेल्या स्थितीत सामान्यतः संतुष्ट असत. स्थूल मानानें सर्व यूरोपभर समाजाची स्थिति अशीच किंबहुना त्याहून मागासलेली होती.

अठराव्या शतकाच्या शेवटल्या चरणापर्यंत इंग्लंडची स्थिति वर वर्णिल्याप्रमाणें होती. सुमारे १७३० पासून कांहीं कल्पक लोकांचें लक्ष यंत्रें तयार करण्याकडे लागलें होतें. यावेळीं व नंतरही पुष्कळ काळपावेतों सामान्य लोक यंत्राच्या फार विरुद्ध असून त्यांच्या कल्पकांचा फार छळ करीत. लिटनच्या Last of the Barons या कादंबरींत या छळाचें फार चांगलें वर्णन केलेलें पहावयास सांपडतें. पण लोकांच्या छळाला न जुमानतां या कल्पकांचे प्रयत्न अव्याहत सुरु राहिले. हळू हळू त्यांतील कित्येकांस यश येऊन कांहीं यंत्रें प्रचारांत येऊं लागलीं. जसा जसा त्यांच्या योगानें श्रम कमी लागूं लागून धंद्यांत फायदा अधिक होऊं लागला, तसें तसें लोकांचें लक्ष नवीन नवीन यंत्रें शोधून काढण्याकडे अधिक लागूं लागलें. ह्या यांत्रिक शोधाच्या कालाचे स्थूल मानानें चार भाग पडतात. पहिला भाग सन १७३० पासून सन १७७० पर्यंतचा. या काळांत मनुष्यबळानें चालणारीं, पण थोड्या काळांत व श्रमांत पुष्कळ माल उत्पन्न करणारीं यंत्रें निर्माण झाली. वॅटचें लोंकरीचें सूत कातण्याचें यंत्र, के ह्याचा धांवत्या धोट्याचा माग, पॉलचें कापूस पिंजण्याचें यंत्र आणि आर्कराइटची कापसाचें सूत काढण्याची फ्रेम, हीं या काळचीं मुख्य यंत्रें होत. दुसरा भाग सन १७७० ते १७९२ पर्यंतचा. या काळांत मागील

यंत्रांत पुष्कळ सुधारणा झाली, आणि कापड विणण्यासंबंधाची बरींच नवीन यंत्रें तयार झालीं. कापूस व लोंकर पिंजण्याची व त्यांच्या रेषा समांतर करण्याची यंत्रें या सुमारास प्रचारांत आलीं; कार्टराइटचा पॉवर लूम निर्माण झाला; क्रॉम्पटनचा रिपनिंग म्यूल तयार झाला. याप्रमाणें या दोन काळांत मिळून श्रम वांचविणारीं बरींच यंत्रें शोधून काढलीं गेलीं. परंतु त्यांच्यांत एक मोठी अडचण होती. त्यांच्यावर एक तर मनुष्यबळानें काम करुन घ्यावें लागे; किंवा धबधब्यासारख्या ठिकाणीं कारखाने उभारुन पाण्याच्या शक्तीचा उपयोग करावा लागे. त्यामुळें जोंपर्यंत लोकसंख्या फारशी वाढली नाहीं तोंपर्यंत कारखान्यांतही वाढ होण्याची संभवतें नव्हती. दुसरी गोष्ट ही की, जरी कांहीं कारखाने पाण्याच्या शक्तीनें चालत, तरी हे कारखाने मनुष्यवस्तीपासून दूर असत; व त्यामुळें कच्चा माल बाजारांत विक्रीस नेण्यास पुष्कळ वेळ त्रास, व खर्च लागे. ही अडचण दूर होण्याकरितां यंत्रें चालविण्याला समर्थ अशा एखाद्या नवीन शक्तीचा शोध लागणें आवश्यक होतें. तो शोध तिसऱ्या भागांत म्हणजे सन १७९२ ते १८३० च्या दरम्यान लागला. ही नवीन शक्ति म्हणजे जुन्या मराठी पांचव्या पुस्तकांतील तिसरा राक्षस बाष्प हा होय. ह्या राक्षसाला वश करुन घेऊन मनुष्यसेवेला लावण्याचें आद्य श्रेय वॅटला आहे. त्यानेंच प्रथमत: वाफेचें एंजिन शोधून काढून, वाफेचा यंत्राकडे कसा उपयोग होऊं शकतो हें दाखवून दिलें. हळू हळू सर्वत्र यंत्रें चालविण्याकडे वाफेचा उपयोग होऊं लागला, व तदनुरुप जुन्या यंत्रांत बदल व नवीन यंत्रांचा शोध सुरु झाला. मालाची पैदास फार झपाट्यानें आणि मोठ्या प्रमाणावर होऊं लागली; आणि यक्षिणीनें कांडी फिरविल्याप्रमाणें उद्योगधंद्यांत फार मोठी क्रांति होण्यास प्रारंभ झाला. यानंतरचा चौथा भाग म्हणजे सन १८३९ नंतरचा. या काळांत इतकी नवीन यंत्रें निघाली व नव्या नव्या युक्त्यांचा शोध लागला आहे कीं ह्या सर्वांचा नामनिर्देश करणेंही कठिण आहे. मालाची ने–आण करण्याचीं, आगगाड्या व वाफेच्या जहाजासाखीं सुलभ साधनें, निर्माण झालीं. विजेचा शोध लागून तिचा कारखान्यांत व संदेश वाहण्यांत उपयोग होऊं लागला. खाणीतून माल काढण्याच्या व तो शुद्ध करण्याच्या नवीन रासायनिक पद्धति प्रचारांत आल्या. थोडक्यांत, प्रत्येक धंद्यांत नवीन नवीन यंत्रें निर्माण होऊन ती वाफेनें किंवा विजेनें चालूं लागलीं, आणि मागील काळांत सुरु झालेली औद्योगिक क्रान्ति पूर्णावस्थेला पोहोंचूं लागली. या क्रान्तीचें स्वरुप कसें होतें हें आतां आपण पाहूं, व त्याबरोबरच यंत्राच्या शोधाशिवाय जीं इतर कारणें तिला सहायभूत झालीं त्यांचाही विचार करुं.

उद्योगधंद्याला चार गोष्टींची आवश्यकता असते. (१) जमीन, (२) जमिनीच्या गर्भांत किंवा पृष्ठभागावर उत्पन्न होणारा कच्चा माल, (३) भांडवल, आणि (४) श्रम. या सर्वांचा मुबलक पुरवठा असून, जेव्हां मालाच्या वाहतुकीचीं साधनें कमी खर्चाचीं, सुलभ व शीघ्र असतात, आणि गिऱ्हाइकी भरपूर असते, तेव्हां धंद्यांची व व्यापाराची भरभराट होते. इंग्लंडच्या औद्योगिक क्रांतीत या सर्व गोष्टींचा योग जुळून आला, किंबहुना तसा योग जुळून आल्यानें क्रांति घडून आली. यंत्रांचा शोध लागून तीं वाफेनें चालूं लागल्यानें, माल उत्पन्न

करण्याला श्रम कमी लागूं लागले. पण त्यासाठीं उद्योगधंद्याच्या एकंदर स्वरुपांत फार बदल करावा लागला. पूर्वी धंद्यांचें स्वरुप घरगुती होतें तें त्यामुळें गेलें. वाफेच्या यंत्रांचा आकार बहुधा बराच मोठा असे. शिवाय एकाच धंद्यांतील निरनिराळ्या क्रियांसाठीं निरनिराळीं यंत्रें लागत. त्या सर्वांना ठेवण्याला मोठी जागा लागे. त्यावर पुष्कळ मजूर कामाला लावावे लागत. यामुळें यंत्राकरितां मोठाल्या इमारती बांधाव्या लागत, व शेंकडो मजूर ठेवावे लागत. यंत्रावर माल पुष्कळ निघे, यासाठीं कच्च्या मालाचा भरपूर पुरवठा लागे. तो विकत घेण्यासाठीं, मजूरांची मजूरी चुकविण्यासाठीं, इमारती बांधण्यासाठीं, यंत्रेंही किंमतीचीं असत तीं विकत घेण्यासाठीं, पुष्कळ मोठें भांडवल लागूं लागलें. पूर्वीच्या लहानलहान धंदेवाईक किंवा कारागिरांपैकी पुष्कळांना भांडवल घालण्याची ऐपत नसे. फारच थोड्यांना तसें सामर्थ्य होतें. त्यांनीं व देशांतील इतर सधन गृहस्थांनीं नवीन पद्धतीचे कारखाने उभारले. कारखान्यांतला माल थोड्या खर्चात मोठ्या प्रमाणावर निघे, त्यामुळें तो स्वस्त देण्यास परवडून त्यापुढें हातानें काढलेल्या मालाचा टिकाव लागेना. हातकारखाने त्यामुळे हळू हळू डुबूं लागले आणि त्याच्या मालकांना निर्वाहासाठीं यांत्रिक कारखान्यांत मजूरी करावी लागूं लागली. या रीतीनें पूर्वीचे स्वतंत्र कारागीर व धंदेवाईक हळू हळू परावलंबी मजूर बनत चालले. देशांत पूर्वी लहान लहान दुकानें असत व कच्चा माल आणि हत्यारें कारागिरांचीं आणि श्रम व कसबही त्यांचेंच असे, तें जाऊन, यंत्रें व कच्चा माल भांडवलवाल्या कारखानदारांचा, आणि श्रम व मेहनत मजूरांची अशी स्थिति आली. पूर्वी तयार झालेल्या पक्क्या मालावर कारागिराची मालकी असे, व त्याचा नफाही त्यालाचं मिळे. नंतर, कारागिराचा पक्का मालाशीं किंवा त्याच्या नफ्याशीं कांहीं संबंध राहिला नाहीं. त्याला फक्त ठराविक मजूरी मिळूं लागली, व नफा कारखानदारांच्या खिशांत जाऊं लागला. मजूराची प्राप्ति याप्रमाणें ठराविक झाली; मजूरीच्या दरांत जें कांहीं कधीं कधीं कमीजास्ती होई तेवढाच काय तो या प्राप्तींत बदल. पण ही कमी-जास्तीही फार थोडी व कालांतरानें होई. त्यानें मजूराची स्थिति जशीच्या तशीच कायम राहिली. परंतु कारखानदारांच्या नफ्याचें प्रमाण मात्र जसजसे कारखाने भरभराटीला येत गेले तसतसें वाढूं लागलें, आणि ते गबर होत चालले. यामुळें भांडवलवाले कारखानदार आणि कामकरी मजूर यांच्या स्थितींतले अंतर वाढत जाऊन त्यांचे दर्जे अलग अलग झाले, आणि समाजांतले हे दोन वर्ग परस्परांहून अगदीं निराळे व तुटक होत चालले. यांत्रिक कारखान्यांत श्रम-विभाग जास्त जोरानें प्रचारांत येऊं लागला. पूर्वी हातकारखान्यांत बाजारांतून कच्चें सूत विकत आणण्यापासून, तों पुढें त्याचा ताणा करुन, खळ लावून, रंग देऊन, कापड विणून, पुनः बाजारांत नेऊन विकीपर्यंतची सर्व कामें एकच मनुष्य—कोष्टी—करी. यंत्रकाराखान्यांत ही सर्व कामें निरनिराळ्या माणसांकडे वांटून दिलीं जातात. ॲडॅम स्मिथनें एक लहानशी टाचणी तयार करण्यांत किती निरनिराळ्या माणसांचे श्रम लागतात याचें वर्णन करुन, या श्रमविभागाचें सुंदर विवेचन केलें आहे. जुन्या मराठी पांचव्या पुस्तकांत पुष्कळांनीं तें वाचलें असेल. धातूचा पत्रा एके ठिकाणीं सरळ केला जातो, दुसऱ्या ठिकाणीं त्याचे तुकडे पाडले जातात,

तिसरीकडे ते तापवून त्याची तार खेंचतात, चौथीकडे त्यांना टोंकें पाडतात, पांचव्या जागीं त्यांचे पुन: योग्य प्रमाणाचे तुकडे पाडतात, सहावीकडे टांचण्यांची डोकीं तयार होतात, सातवीकडे तीं टांचणीच्या अंगावर बसवतात, आठवीकडे झिलई देतात, आणि नंतर मग एक लहानशी सफाईदार टांचणी गिऱ्हाइकाच्या हातीं पडण्याला योग्य होते. या श्रमविभागानें कामकऱ्यांना एकच एक लहानसें काम करण्याचा दृढ अभ्यास होऊन, तें लवकर व सफाईदार होऊं लागतें, एक काम सोडून दुसरें करुं लागण्यांत व्यर्थ जाणारा वेळ वांचतो, वेळाची व श्रमाची काटकसर होऊं लागते, आणि माल चांगला निघूं लागतो. यामुळें श्रमविभाग आणि विशिष्टीकरण यांच्याकडे कारखानदारांचे जास्त लक्ष जाऊं लागलें.

पूर्वीपेक्षां व्यापारांत व उद्योगधंद्यात स्पर्धा व चुरस पुष्कळच वाढली. ज्याचा माल स्वस्त असेल त्याचा खप जास्त होई. त्यामुळें कारखानदार शक्य ती काटकसर करुन, माल स्वस्त काढण्याचा प्रयत्न करीत. हातांनीं होणाऱ्या कामांसाठी यंत्रें धुंडून काढीत, कारखान्यांतील फुकट जाणाऱ्या पदार्थांपासून नवीन उपयोगी पदार्थ तयार करीत, व आपला माल दुसऱ्या कारखानदारांपेक्षां स्वस्त कसा विकता येईल याच्याविषयीं दक्ष असत. आता ज्या मानाने कारखाना मोठा असे त्या मानानें वरील खर्च वांचविणारे उपाय अमलांत जास्त आणतां येत. त्यामुळे कारखाने दिवसेंदिस मोठे होऊं लागले आणि त्यांना जास्त जास्त भांडवल लागूं लागलें.

कारखाने मोठमोठे झाल्यानें त्यांना कच्चा माल व कामकरीही मोठ्या प्रमाणावर लागूं लागले. आतां, कारखाने वाफेच्या शक्तीनें चालूं लागल्यानें, पूर्वीप्रमाणें कारखाना पाण्याच्या सोयीच्या जागीं काढण्याची जरुर न राहून, ज्या ठिकाणीं कच्च्या मालाची व मजूरीची अनुकूलता असेल त्या ठिकाणीं तो काढतां येऊं लागला. तरीही तयार झालेला माल बाजाराच्या ठिकाणीं किंवा परदेशीं पाठविण्याकरितां, किंवा कच्च्या मालाचा पुरवठा जवळ नसेल तेव्हां तो आणण्याकरितां, वाहतुकीच्या साधनांची फार आवश्यकता होती. ती आगगाडयांनीं व वाफेच्या जहाजांनीं पूर्ण झाली. या बाबतींत इंग्लंडला दोन गोष्टींची फार मोठी नैसर्गिक अनूकूलता होती, किंबहुना इंग्लंडचें हल्लीचें व्यापारी ऐश्वर्य या अनुकूलतेचा परिणाम आहे. आगगाड्यांसाठीं लागणारे रुळ, आगगाड्यांचीं व जहाजांचीं एंजिनें, निरनिराळ्या कारखान्यांतील असंख्य यंत्रें, या सर्वांसाठी लोखंडाचा मुबलक पुरवठा आवश्यक होता. आणि हीं एंजिनें व यंत्रें चालविण्याकरितां खाणींतलें लोखंड शुद्ध करण्याकरितां, तितकाच मुबलक कोळशाचा सांठा जरुर होता. इंग्लंडच्या भाग्यदेवतेनें या दोन्ही वस्तूंचा तेथील भूगर्भांत जवळ जवळ अक्षय्य असा सांठा करुन ठेविला होता. दैवाला उद्योगाचें पाठबळ देऊन, इंग्लंडच्या लोकांनीं लोखंडाचे अनेक कारखाने काढले, कोळशाच्या खाणी खोदल्या, लोखंड खाणींतून काढण्याच्या व शुद्ध करण्याच्या रीतींत सुधारणा केली; तेव्हां देशांतील वाढत्या उद्योगधंद्यांना पुरुन उरेल इतका लोखंडाचा पुरवठा सहज होऊं लागला. आगगाड्यांचा प्रसार झपाट्यानें

होत चालला, आणि देशभर रुळांचें जाळें निर्माण होऊं लागलें. सन १८५६ च्या सुमारास सर हेनरी बिसॅवीरनीं लोखंडापासून पोलाद करण्याची एक नवी कमी खर्चाची पद्धत शोधून काढली. त्यानें रुळ करणें फार सोयीचें होऊन आगगाड्यांची वाढ आणखी जारानें होत चालली; व पोलादी जहाजें समुद्रांत वावरुं लागलीं.

ह्या शीघ्र वाहनांबरोबर शीघ्र संदेशवाहकही इंग्लंडांत निर्माण झाले. स्थलतारायंत्रें व जलतारायंत्रें उभारलीं गेलीं, व जमिनीवरुन व पाण्यांतून तारा टाकण्यांत येऊन विजेनें निमिषार्धांत शेंकडों मैलांवर निरोप पाठवितां येऊं लागले. सन १८५० च्या सुमारास सायरस फील्ड नांवाच्या कल्पक आणि कार्यकुशल गृहस्थानें तर यूरोप व अमेरिका खंडें अशा विद्युद्वाहक तारांनीं जोडून टाकलीं. खरोखर हे बाष्परथ, बाष्पनौका आणि विद्युद्वाहक तार यांनीं स्थळ आणि काळ यांच्यांतील अंतर नाहींसें करुन टाकलें.

पूर्वी कारखाने लहान असून माल जेव्हां थोडा निघत असे तेव्हां तो बहुधा आसपासच्या गांवांत किंवा देशांतल्या देशात खपून जाई, कांहीं लोंकरींच्या सारख्या कारखान्यांतून परदेशीं पाठविण्याइतका माल तयार होई पण तोही तादृश फार नसल्यानें त्याला फार मोठें गिऱ्हाइक लागत नसे, पण जेव्हां वर वर्णन केल्याप्रमाणें कारखान्याचें स्वरुप बदललें, आणि माणसांऐवजीं यंत्रें काम करुं लागलीं, तेव्हां माल विस्तीर्ण प्रमाणावर निघूं लागला; आणि त्यासाठी प्रचंड गिऱ्हाइकाची जरुरत लागूं लागली. अठराव्या शतकाच्या तिसऱ्या चरणापावेतों इंग्लंडला हें गिऱ्हाईक अमेरिकेंतील आपल्या वासहतीत मिळत असे. इंग्लंडनें कायदा करुन आपल्याशिवाय दुसऱ्या कोणाचाही माल तेथें आयात न होइल अशी व्यवस्था केली होती. खुद्द अमेरिकेंतही इंग्लंडला लागणारा कच्चा माल व धान्य यांशिवाय इतर जिन्नस तयार न होतील अशी खबरदारी इंग्लंडनें घेतली होती. फार काय, अमेरिकेहून परदेशीं जाणारा माल इंग्लिशांशिवाय इतर जहाजांतून न पाठविण्याविषयीं कडक निर्बंध असे. याप्रमाणें इंग्लंडच्या व्यापाराची भिस्त त्या काळांत अमेरिकेवर असे; आणि व्यापार नीटपणें चालण्यासाठी ज्या देशाशीं तो करावयाचा त्यावर आपलें राजकीय वर्चस्व असलें पाहिजे अशी सामान्य समजूत असे. परंतु सन १७७० च्या सुमारास व्यापारी निर्बंधांवरुनच इंग्लंडचे व वसाहतींचे युद्ध जुंपून त्यांत वसाहतींचा जय झाला, आणि त्या इंग्लंडपासून स्वतंत्र होऊन हल्लीं ज्यांस 'संयुक्त संस्थानें' म्हणतात त्यांची स्थापना झाली. तेव्हां अर्थात् इंग्लंडचें हें मोठें गिऱ्हाइक नाहींसें झाले. तेव्हां राजकीय वर्चस्व नसतांना, किंवा व्यापारी निर्बंध घालता न येतां, व्यापाराला गिऱ्हाईक कसें मिळवावें हें शिकणें इंग्लंडला भाग पडलें. थोड्याच काळानंतर सर्व यूरोपभर नेपोलियनच्या युद्धाचा वणवा पेटला, आणि एका इंग्लंडशिवाय इतर सर्व देशांची शक्ति आत्मसंरक्षणांतच खर्च होऊं लागली. इंग्लंडाच्या चोहोंबाजूनें समुद्र असल्यानें तेथें मात्र नेपोलियनची जगज्जेत्री सेना पोहोंचूं शकत नसे. त्यामुळें तेथें शांतता होती व उद्योगधंदे पूर्ववत् चालू होते. सर्व यूरोपला आपल्याला

लागणारा माल या काळांत इंग्लंडकडून घ्यावा लागे. यामुळें अमेरिकेचें गेलेलें गिऱ्हाइक इंग्लंडला जवळच यूरोपांत सांपडलें. सन १८१५ त नेपोलियनचा भाग्यसूर्य अस्तास गेला आणि यूरोपांतलें युद्ध तात्पुरतें संपून देशांतून शांतता व उद्योगधंदे पुन: सुरु झाले. इंग्लंडच्या परदेशी व्यापाराला त्यानें प्रथम थोडा धक्का बसला, परंतु एवढ्या काळांत त्याच्या उद्योगधंद्यांना आणि व्यापाराला इतर राष्ट्रांहून जी आघाडी होती त्यामुळें तें लवकरच या धक्क्यांतून सांवरलें. एक तर इंग्लंडचा माल इतर देशाहून सुबक व स्वस्त निघत असे. दुसरें, इंग्लंडपाशीं मजबूत व जलद चालीचीं जहाजें होतीं; समुद्रावर त्याचें वर्चस्व असून, ठिकठिकाणीं त्याच्या मालकीचीं मजबूत ठाणीं होती. त्यामुळें इंग्लंडला दूर परदेशीं माल पाठविणें सोयीचें पडत असे. आशियाचें व विशेषत: हिंदुस्थानाचें गिऱ्हाईक त्याला यामुळें सहज मिळवितां आलें. त्यांतही हिंदुस्थानांत त्याची राजकीय सत्ता दिवसेंदिवस एकछत्री होत चालली होती; तिचा आपल्या वाढत्या व्यापारासाठीं त्यानें सर्व प्रकारें उपयोग करुन घेतला. अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें इंग्लंडच्या हातांतून गेलीं होतीं तथापि कानडाच्या वसाहतींत त्यास चांगलें गिऱ्हाइक मिळालें आणि संयुक्त संस्थानांतही राजकीय सत्तेच्या जोरावर नव्हे तर मालाच्या स्वस्ततेमुळें पुष्कळ काळपावेतों इंग्लंडचा बराच व्यापार चालला.

सारांश, इंग्लंडनें यांत्रिक शोध लावून आपल्या उद्योगधंद्यांत इतर देशांच्या अगोदर क्रांति घडवून आणली आणि प्रचंड आरमार निर्माण करुन समुद्रावरचें वर्चस्व मिळविलें. म्हणून इंग्लंडचा व्यापार अमर्याद वाढून त्याला सर्व जगाचें गिऱ्हाईक मिळवितां आलें. वसाहती व हिंदुस्थानचें प्रभुत्व हीं त्यास या कामांत थोडीं फार सहाय्यभूत झाली. पण मुख्य कारण त्याच्या उद्योगधंद्यांतली क्रांति हें होय. एकोणिसावें शतक अर्धे लोटल्यानंतर पुष्कळ पाश्चात्य देशांनीं–विशेषत: जर्मनीनें व संयुक्त संस्थानांनीं–आपल्या देशांतील उद्योगधंद्यांतही अशीच क्रांति घडवून आणली. त्यामुळें त्यांचा व्यापारही अतोनात वाढला; व पूर्वी जो सगळ्या जगाचा व्यापार एकट्या इंग्लंडनें संभाळला होता त्यांत हीं राष्ट्रें वांटेकरी झालीं. आणि आज तर त्यांनीं कित्येक बाबतींत इंग्लंडलाही मागें टाकलें आहे.

असो तर, उद्योगधंद्याच्या स्वरुपांत क्रान्ति झाल्याबरोबर गिऱ्हाइकांचें पूर्वी जें संकुचित क्षेत्र होतें त्याचा विस्तार सर्व जगभर झाला. भांडवलाच्या प्रमाणांत आणि तें उभारण्याच्या पद्धतीतही अशीच क्रांति घडून आली. पूर्वी जेव्हां एका लहानशा दुकानांत एक किंवा दोन कारागीर काम करीत तेव्हां पुंजीही पण बेताचीच लागे. कांहीं थोडीं हत्यारें व थोडा कच्चा माल इतकी सामुग्री असली म्हणजे काम भागे. पण हळू हळू जशीं यंत्रें प्रचारांत येत चालली तशी पुंजी जास्त लागूं लागली; आणि कारखाने काढणें कारागिरांच्या आवाक्याबाहेर जाऊन, श्रीमंत धनिकांनाच तें शक्य राहिलें. थोड्याच काळांत हीहि स्थिति राहिली नाहीं. व्यापारी चढाओढींत मोठ्या कारखान्यापुढें लहान कारखान्यांचा टिकाव लागत

नसे. त्यामुळें कारखान्याचें स्वरुप मोठमोठें होत जाऊन, त्यास इतकी पुंजी लागूं लागली कीं, ती कोणा एका व्यक्तीनें पुरविणें कठीण होत चाललें. शिवाय कारखान्यांत तोटा झाल्यास तोही एकानें सोसणें जड होतें. तेव्हां दहा पांच जणांनीं मिळून कंपनी किंवा मंडळी स्थापन करुन समाईक भांडवल उभें करण्याची पद्धति प्रचारांत आली. हळू हळू सर्व कारखाने समाईक भांडवलानें चालूं लागले. कांहीं कालानें या पद्धतीतही आणखी सुधारणा झाली, तिनें व्यापारांत भांडवल घालणें फार सोयीचें झालें. सामाईक भांडवली पद्धतीत मंडळीला जर कांही कर्ज झालें किंवा ती बुडाली व देणें राहिलें तर तें सर्व फेडण्याची जबाबदारी व्यक्तिशः प्रत्येक हिस्सेदारावर असे, आणि धनको कोणाही एका हिस्सेदारावर दावा करुन त्याजपासून आपलें कर्ज वसूल करुन घेऊं शके. थोडक्यांत या पद्धतींत भागीदारांची जबाबदारी अनियंत्रित असे यामुळें लहान लहान पुंजीवाले अशा मंडळ्यांचे भागीदार होण्यास कचरत, तेव्हां हल्लीं सर्वदूर प्रचलित असलेली मर्यादित जबाबदारीची पद्धती सुरु झाली व तिला कायद्यानें मंजूरी मिळाली. या पद्धतींत इष्ट भांडवलाचे नियमित भाग केलेले असून त्यांपैकी एक किंवा अनेक भाग मंडळीच्या नियमानुसार, कोणालाही विकत घेतां येतात. मंडळीला जर कर्ज झालें किंवा नुकसान लागले तर भागीदारांची जबाबदारी आपल्या भागापुरतीच मर्यादित असते. म्हणजे त्याच्या भागाची जितकी रकम असेल तिच्याहून जास्त रक्कम यास (कर्जाच्या फेडीमध्यें) द्यावी लागत नाहीं. ही पद्धत सुरु झाल्यापासून देशांतलें द्रव्य भांडवलाच्या रुपानें व्यापारांत येण्यास फारच सहाय्य झालें. अगदीं गरीबालाही आपला भाग विकत घेतां यावा म्हणून कंपन्या भागाची किंमत अगदी थोडी ठेवूं लागल्या. आणि फार झालें तर भागाची रकम बुडण्यापलीकडे नुकसान लागण्याची भीति नसल्यानें, गरीबापासून तों श्रीमंतापावेतों सर्वजण असे भाग विकत घेण्यांत आपली शिल्लक लावूं लागले. यामुळे ज्याप्रमाणें पर्वताच्या उतरणीवरुन पाण्याचा प्रत्येक बिंदु वाहत जाऊन पायथ्याशी मोठा जलसंचय व्हावा, त्याप्रमाणें देशांतील सर्व लहानथोरांची शिल्लक एकवटून तिचा प्रचंड निधि इंग्लंडच्या व्यापाराला लाभूं लागला.

या प्रचंड भांडवलाला, प्रसंगवशात् तें सुरक्षित ठेवण्याला, प्रसंगी त्याच्या पतीवर आणखी कर्ज काढण्याला, एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी रकमा पाठविण्याला, बँकांची आवश्यकता होती. गरज लागली म्हणजे उपाय सुचतो. त्याप्रमाणें बँकांची जरुर लागल्यास त्यांची वाढ होऊं लागली, आणि त्यांच्या शाखा प्रथम सर्व देशभर आणि नंतर परदेशीं स्थापन होऊं लागल्या. बँक ऑफ इंग्लंड नांवाची एक मोठी बँक स्थापन होऊन तिच्या शहाजोगपणाची सरकारनें हमी घेतली, व तिला कांहीं विशिष्ट मर्यादापावेतों चलनी नोटांचे कागदी नाणें काढण्याचा अधिकार दिला. त्यामुळें अशा नोटा काढून आपलें व्यापारी भांडवल वाढविण्याची त्या बँकेला मोठी सोय झाली, व व्यापाराला मदत झाली. जसजसा परदेशचा व्यापार वाढत चालला तसतशी हुंड्या, हुंड्यांचीं विनिमय–पत्रें Bills of exchange वगैरे पैसा पाठविण्याची साधनें प्रचारांत आलीं. निरनिराळ्या कंपन्यांचे भाग खरेदी-विक्री करण्याची स्वतंत्र दुकानें स्थापन झालीं.

देशांतील निरनिराळ्या बँका परस्परांकडे हुंड्या धाडीत व स्वीकारीत, त्यांचा हिशोब चुकता करुन फाजील देणें घेणें ज्याच्या त्याच्याकडे पोहोंचतें करण्याकरितां, आणि संकटप्रसंगीं परस्परांना मदत करण्याकरितां, एक मध्यवर्ती संस्था Clearing House अस्तित्वांत आली. या सर्वांहून महत्त्वाची गोष्ट ही कीं, व्यापारांत पती (Credit) चा प्रचार फार जास्त प्रमाणावर होऊं लागला. पूर्वी बँका वगैरे नसल्याने सगळा व्यवहार बहुश: नगदीनें होत असे. परंतु बँका स्थापन झाल्यापासून, सचोटीच्या व शहाजोग माणसास आपल्या पतीवर कर्ज मिळण्यास अडचण पडेनाशी झाली. प्रसंगविशेषीं आपल्याला कर्ज मिळूं शकेल अशी खात्री असल्यानें लोकांना खरेदी-विक्री नुसत्या पतीवर करतां येऊं लागली. कांहीं अंशीं परस्पर-विश्वासही वाढला, आणि व्यापाराचा पुष्कळसा अंश शहाजोग पतीवर होऊं लागला.

सारांश, मर्यादित जबाबदारीच्या भागीदार मंडळ्या, बँका आणि पत, या विघांच्या योगानें भांडवल उभारण्याच्या पद्धतींत क्रांति झाली, आणि इग्लंडच्या जगड्व्याळ व्यापाराला भरपूर भांडवलाचा पुरवठा होऊं लागला.

याच काळात इंग्लंडनें नवीन कायदा करुन कल्पक व धाडशी लोकांना आपल्या श्रमांचा पूर्ण मोबदला मिळण्याची व्यवस्था केली. तिनें नवीन नवीन युक्त्या व यंत्रें शोधून काढण्यास फार उत्तेजन मिळालें. कोणीही नवीन यंत्र किंवा युक्ति शोधून काढल्यास ती सरकारांत जाऊन कळवावी. तेथें योग्य परीक्षणानंतर ती खरोखरच नवीन आहे असें आढळून आल्यास तिची कांहीं वर्षांची सनद किंवा पेटंट शोधकास सरकारांतून दिला जाई. त्यानें शोधकाशिवाय इतरांना तें यंत्र किंवा युक्ति तयार करुन विकतां येत नसे. यामुळें शोधकाशिवाय इतरांना तें यंत्र किंवा युक्ति तयार करुन विकता येत नसे. यामुळें मूर्त वस्तूप्रमाणेंच अमूर्त बुद्धिजात वस्तूंवरही मालकी प्रचारांत आली, शोधकांच्या कल्पकतेस अर्थदृष्ट्यिा किंमत आली, आणि तिचा उद्योगधंद्याकडे उपयोग व्हावयास लागून औद्योगिक उन्नतीस सहाय्य झालें.

इतर औद्योगिक बाबतींप्रमाणें अर्थशास्त्राच्या मतांतही या काळांत क्रांति झाली, आणि एकंदर क्रांतीचा वेग वाढण्यास त्यानें मदत मिळाली. सन १७७६ त ॲडम स्मिथचा 'राष्ट्रांची संपत्ति' नांवाचा नंतरं जगन्मान्य झालेला ग्रंथ प्रकाशित झाला. त्यानें ह्या काळच्या अर्थशास्त्रज्ञांत मोठी खळबळ उडवून दिली. मागें वर्णन केल्याप्रमाणें, यावेळीं व्यापारावर व उद्योगधंद्यांवर सरकारचें पूर्ण नियंत्रण असावें असें अर्थशास्त्रज्ञांचे मत होतें. परंतु ॲडम स्मिथनें आपल्या ग्रंथांत असें सप्रमाण सिद्ध करुन दाखविलें होतें कीं, देशाच्या व्यापाराची किंवा उद्योगधंद्याची भरभराट होण्यासाठीं त्यांना कायद्याचे निर्बंध घालण्यांत उपयोग नसून प्रत्येकाला अनिर्बंध स्वातंत्र्य देणेंच आवश्यक आहे. औद्योगिक उन्नतीचें स्पर्धा हें एक मात्र कारण आहे. एखाद्या धंद्यांत जर पुष्कळ कारागीर किंवा कारखानदार पडलेले असतील, व त्यांपैकीं

कोणालाही सरकारचें किंवा कायद्यांचे आगांतुक पाठबळ नसेल, तर त्यांच्यांत स्पर्धा लागून शेवटीं जो कारागीर किंवा कारखानदार सर्वांत जास्त बुद्धिमान, व्यवहारचतुर, दक्ष व योग्य असतो तोच यशस्वी होतो, व इतर मार्गे पडून कालांतरानें नाहींसे होतात, हा सृष्टीचा क्रम आहे. यानें योग्य व्यक्ति तितक्या कायम राहून निर्बल व अयोग्य व्यक्ति नाहींशा होतात, व समाजाची योग्यता आणि सामर्थ्य वाढत जातें. म्हणून स्पर्धेला पूर्ण वाव देणें हेंच उन्नतीचें खरें साधन आहे. कायद्याचीं बंधनें व निर्बंध घालून एकाला उत्तेजन दिल्यानें व इतरांच्या मार्गांत अडथळे आणल्यानें खऱ्या गुणांचा व योग्यतेचा विकास न होतां, सामर्थ्यहीन परावलंबीपणा मात्र वाढतो. म्हणून सर्व कायद्यांचें धोरण असें असावें कीं, त्यांनीं समाजांत शांतता व सुरक्षितता नांदण्यास जरुर तेवढेच निर्बंध घातले जावेत, व कोणाही व्यक्तीला किंवा वर्गाला प्रत्यक्ष सहाय्य न होतां, तटस्थपणा रहावा. व्यक्तींची उन्नती आत्मप्रयत्नानें झाली पाहिजे, व हे प्रयत्न उत्साहनें होण्यासाठीं समाजांत पूर्णपणें औद्योगिक स्वातंत्र्य असलें पाहिजे. ते नुसतें एका देशांतच असून उपयोग नाहीं. ज्याप्रमाणें एका देशाची भरभराट होण्याला त्यांत स्वातंत्र्य पाहिजे, त्याप्रमाणें सर्व जगाची भरभराट होण्याला सर्व राष्ट्रात परस्परांचा माल येण्याजाण्याला पूर्णपणे स्वातंत्र्य पाहिजे. याप्रमाणे राष्ट्राराष्ट्रांत अनिर्बंध व्यापार होऊं लागेल; व कोणत्याही राष्ट्रानें इतरांच्या मालास आपल्या देशांत येण्यास किंवा तेथून माल नेण्यास प्रतिबंध ठेवला नाहीं, तर प्रत्येक राष्ट्राच्या बाजारांत जो माल सर्वांत जास्त सुबक, टिकाऊ व स्वस्त असेल तोच येऊं लागेल. मग प्रत्येक राष्ट्र आपल्याला जो माल इतरांपेक्षा जास्त स्वस्त व चांगला तयार करतां येईल तोच तयार करुं लागेल. हल्लीं ज्याप्रमाणें एका समाजांत श्रमविभाग व विशिष्टीकरण होतें, त्याप्रमाणें मग तो राष्ट्राराष्ट्रांत होऊन प्रत्येक राष्ट्र स्वत:ला अत्यंत सुलभ अशा उद्योगधंद्यांना वाहून घेईल. श्रमविभागापासून होणारे सर्व लाभ जगाला या योगानें मिळूं लागतील, सर्वच माल स्वस्त आणि चांगला निघू लागेल, आणि औद्योगिक प्रगति होऊन सर्व जगाचें कल्याण होईल. म्हणून औद्योगिक स्वातंत्र्य व अनियंत्रित व्यापार हीं औद्योगिक उन्नतीचीं खरीं व शाश्वत साधनें असून प्रत्येक उत्कर्षेच्छु राष्ट्रानें त्यांचा अवलंब करावा असें ॲडम स्मिथनें प्रतिपादिलें होतें. प्रथम प्रथम या मतांना पुष्कळ विरोध झाला; पण कालांतरानें तो कमी होत जाऊन तीं जीं सर्वसंमत व रुढ झालीं तीं अजूनही बऱ्याच अंशानें तशींच काम आहेत.

एकदां समाजांत हीं मतें प्रचलित व शिष्टसंमत झाल्यावर, त्यांना अनुसरुन कायद्यांत बदल केला जाऊं लागला. मजुरांच्या हालचालींवरील निर्बंध दूर करण्यांत आले. सर्वांना आपल्या अभिरुचीप्रमाणें व अनुकूलतेप्रमाणें वाटेल तो धंदा करण्याची मोकळीक झाली. आयात व निर्यात व्यापारावरील निर्बंध काढून टाकण्यास प्रारंभ झाला. देशांतील शेतीस उत्तेजन मिळण्यासाठीं आयात धान्यावर इंग्लंडांत जबर जकात बसविलेली होती. तिनें बाहेरचें स्वस्त धान्य देशांत येण्यास प्रतिबंध होऊन धान्य फार महाग विके आणि सामान्य जनतेचे व मजूरांचे फार हाल होत. हा प्रतिबंध कॉब्डेनसारख्या महात्म्यांच्या दीर्घ प्रयत्नानें सन १८४२ च्या

सुमारास पूर्णपणें नाहींसा झाला, आणि अनियंत्रित व्यापाराच्या मार्गांतला सरशेवटचा अडथळा इंग्लंडांतून नष्ट झाला. या वेळेपासून प्रस्तुत युद्धाच्या पूर्वीपर्यंत इंग्लंड हें अनियंत्रित व्यापाराचें कट्टे पुरस्कर्ते असून, त्याच्या वजनानें व उदाहरणानें बहुतेक राष्ट्रांनी तें मत अंगीकारलें होतें.

ॲडम स्मिथनंतर कांही काळानें (इ. सन १७८९) फ्रान्सची प्रसिद्ध राज्यक्रान्ति झाली. या क्रान्तींत राज्यव्यवस्थेच्या उलटापालटीबरोबर समाजांतील एकंदर जुन्या मतांत व कल्पनांत विलक्षण स्थित्यंतर घडून आलें. स्वातंत्र्य, समता, व बंधुता या तीन शब्दांत या स्थित्यंतराचें रहस्य सांठवलेलें आहे. या कान्तीपूर्वी यूरोपांतील समाजांची, रुसोनें आपल्या ववपंस ब्वउचंबज नामक ग्रंथाच्या प्रारंभीं म्हटल्याप्रमाणें 'मनुष्य जन्मत: स्वतंत्र आहे, पण हल्लीं तो सर्व दिशेनें शृंखलांनीं बद्ध झाला आहे' अशी स्थिति होती. ही स्थिति बदलण्यास फ्रान्सच्या जनतेनें वरील क्रान्तीच्या द्वारें सुरुवात केली. तिनें जाहीर केलें की, स्वतंत्रता आणि शरीराची व मालमत्तेची सुरक्षितता हे मनुष्यमात्राचे जन्मसिद्ध हक्क असून, ते कोणालाही काढून घेतां येत नाहींत. या त्यांच्या हक्काचें जर अतिक्रमण होऊं लागलें तर त्याला विरोध करणें हाही त्या हक्कांचाच एक भाग आहे. समाजांतील सर्व व्यक्तींचे हक्क निसर्गत: सारखे आहेत. म्हणून कायदा व न्याय यांनीं व्यक्ति मात्राला समानदृष्टीनें पाहिजें पाहिजे. वरील तन्त्वांचा घोष ज्या प्रसिद्ध जाहिरनाम्यांत केला होता त्यांत त्यांचा निष्कर्ष शेवटीं असाकाढला होता कीं राष्ट्रांचे खरें प्रभुत्व समाजाकडे असून, राजा त्या समाजाचा केवळ एक नोकर आहे. या शेवटच्या तन्त्वाला अनुसरुन, राजानें आपली नोकरी नीटपणें न बजावल्याचें आढळून आल्यानें, फ्रान्सनें त्याला सिंहासनावरुन दूर केलें, आणि प्रजासत्ताक राज्यपद्धति सुरु केली. यानंतर व्यक्तिस्वातंत्र्य व समाजप्रभुत्व ही दोन तन्त्वें सर्व यूरोपभर एखाद्या वणव्याप्रमाणें पसरली, आणि त्यांत इंग्लंडचे राजसिंहासन, जरी कांहीं इतर राष्ट्रांप्रमाणें भस्मसात् झालें नाहीं, तरी इंग्लिश समाजांतल्या जुन्या कल्पना व बंधनें त्यानें नाहीशीं झालीं, व ॲडम स्मिथनें औद्योगिक बाबतींत उपदेशिलेलें स्वातंत्र्य, समाजाला इतर बाबतींतही प्राप्त झालें.

सारांश, अठराव्या शतकाच्या शेवट शेवटपासून इंग्लिश समाजाच्या एकंदर विचाराची दिशाच बदलली; आणि मनुष्यमात्र सारखा व स्वतंत्र आहे हें नव्या विचाराचें मूलभूत तन्त्व झालें. त्यानें यांत्रिक शोधामुळें होत असणाऱ्या क्रान्तीस मोठी मदत झाली. बुद्धिवान, कल्पक, व कार्यक्षम लोकांच्या मार्गांतले पूर्वीचे अडथळे दूर झाले; बुद्धिवान्, शोधक, संघटनाकुशल कारखानदार, व्यवहारचतुर व्यापारी, व कार्यक्षम व्यवस्थापक समाजांत पुढें आले; आणि त्यानें स्वत:चें व सर्व समाजाचें कल्याण झालें.

आतां शेवटीं या क्रान्तीत इंग्लिश राज्यपद्धतींत कोणता बदल झाला तें सांगून हें इंग्लंड–क्रान्ति–वर्णन संपवूं. वर वर्णन केलेलया औद्योगिक क्रान्तीचा एक परिणाम असा झाला

आतां शेवटीं या क्रान्तींत इंग्लिश राज्यपद्धतींत कोणता बदल झाला तें सांगून हें इंग्लंड-क्रान्ति-वर्णन संपवूं. वर वर्णन केलेल्या औद्योगिक क्रान्तीचा एक परिणाम असा झाला कीं, समाजांत पूर्वी जो शेतकीला व जमिनीला पहिला मान होता तो नाहींसा झाला. देशांत कारखान्याच्या योगानें नवीन शहरें उदयाला आलीं, आणि व्यापारी व कारखानदारांचा वर्ग धनाढ्य होऊन समाजांत त्यांची प्रतिष्ठा वाढली. त्यानें अर्थातच जुना अमीरउमरावांचा वर्ग तितका मागें पडला,व समाजातलें त्यांचे वजन कमी झालें. प्रथम पुष्कळ काळपावेतों, मागें एके प्रसंगीं सांगितल्याप्रमाणें, व्यापारी व कारखानदार वगैरे मध्यम वर्गांतील लोकांना आपल्या महत्त्वानुरुप प्रतिनिधि पार्लमेंटांत पाठवितां येत नसत; व त्यामुळें राज्यकारभारांत त्यांचें प्रत्यक्ष अंग कमी असे. पण हळू हळू त्यांचें वजन वाढत गेलें व शेवटीं सन १८३२ त नवा कायदा होऊन, प्रतिनिधि-निर्वाचक भागांची पुनर्रचना करण्यांत आली, व देशांतील सर्व भागांना व वर्गांना त्यांच्या त्यांच्या महत्त्वाला अनुरुप प्रतिनिधि देण्यांत आले. याच्या पूर्वीपासून पार्लमेंट सभेंत साहजिकच मध्यम वर्गांतील लोकांचा भरणा जास्त होत चालला होता, आणि राज्यकारभार हा त्या काळीं सर्वसंमत झालेल्या व औद्योगिक प्रगतीला पोषक असलेल्या व्यक्तिस्वातंत्र्याच्या तत्त्वावर चालूं लागला होता. राज्यकारभारांत लोकांचें वजन वाढत चाललें होतें, व सामान्य जनतेच्या हिताकडे पूर्वीपेक्षां जास्त लक्ष दिलें जाऊं लागलें होतें, त्याचा या कायद्यानंतर कळस झाला. पूर्वी सरकारनें समाजाच्या सर्व व्यवहारांचें नियंत्रण करण्याकडे होत चाललें. सारांश, सरकारच्या कर्तव्यक्षेत्राची मर्यादा संकुचित होऊन, शांतता व सुरक्षितता ठेवणें एवढाच तिचा प्रांत राहिला.

याप्रमाणें येथपावेतों अठराव्या शतकाच्या तिसऱ्या चरणापासून पुढील शंभर वर्षांत इंग्लंडांत जी विलक्षण क्रान्ति झाली तिची थोडक्यांत रुपरेषा दिली. समाजाचेंही व्यक्तीप्रमाणेंच परंतु विराट् स्वरुपाचें व दीर्घकाल टिकणारें, असें शरीर व जीवित असून त्याचीं निरनिराळीं अंगें असतात. हीं अंगें व त्यांचे व्यापार परस्परसंबद्ध असून, त्याच्या एका अंगांत बदल झाल्यास, त्याचा परिणाम इतर सर्व अवयवांवर व अंगांवर झाल्याशिवाय राहत नाहीं. म्हणून औद्योगिक क्रान्तीबरोबरच सामाजिक, राजकीय आणि बौद्धिक क्रान्तिही होणें अपरिहार्य असतें. या सर्व क्रान्त्यांचें वर्णन मागें विषयाच्या सोयीकरितां जरी निरनिराळें दिलें आहे व प्रसंगवशात् एकीला दुसरीचें कारण म्हटलें आहे, तरी ह्या सर्व क्रान्त्या समाजांत एका काळींच थोड्या-फार अंतरानें घडून येत होत्या; व जरी एका अंगाची क्रान्ति दुसऱ्या अंगाच्या क्रान्तीला प्रथमत: कारणीभूत होत असली, तरी थोड्याच अवकाशांत ही दुसरी क्रान्ति पहिल्या अंगाच्या क्रान्तीला सहायभूत होत असे, किंवा तिला नवीन वळण लावीत असे. याप्रमाणें निरनिराळ्या अंगांतील क्रान्त्या परस्परसहायक व पोषक होत होत्या. हा त्यांचा परस्परसंबंध स्पष्टपणें ध्यानांत यावा म्हणूनच औद्योगिक क्रान्तीबरोबरच इतर क्रान्तींचेंही वर्णन वर दिलें आहे.

इंग्लंडांत झालेली ही क्रान्ति आरंभीं सांगितल्याप्रमाणें, हळू हळू आणि स्थूलमानानें त्याच स्वरुपांत यूरोपांत व अमेरिकेंत घडून आली; आणि अलीकडे अलीकडे तर जगांतल्या ज्या ज्या राष्ट्राला पाश्चात्य स्पर्धेत आपण नामशेष न व्हावेंसें वाटत असेल, त्याला अशीच क्रान्ति घडवून आणण्याशिवाय गत्यंतर नाहींसें झालें आहे. या क्रान्तींत लहान लहान हातकारखाने आणि घरगुती धंदे जाऊन अवाढव्य यांत्रिक कारखाने व प्रचंड गिरण्या आल्या; घोड्याच्या गाड्या व शिडाचीं जाहाजें जाऊन, आगगाड्या व वाफेचीं जहाजें धांवूं लागली; वैयक्तिक भांडवलदार जाऊन सामायिक मंडळ्या स्थापन झाल्या; गांवढ्यांतला सावकार नाहींसा होऊन आंतरराष्ट्रीय पेढ्या निर्माण झाल्या; स्थानिक गिऱ्हाइकांचे जागीं सर्व जगाचें गिऱ्हाइक आलें; भांडवल व श्रम यांची एकत्र स्थिति जाऊन, भांडवलवाल्यांचा एक व कामकऱ्यांचा एक असे दोन भिन्न वर्ग अस्तित्वांत आले; संरक्षणाचें व नियंत्रणाचें धोरण जाऊन अनियंत्रित व असंरक्षित व्यापार सुरु झाला; अमीरउमराव व जमीनदार मागें पडून व्यापारी व कारखानदारांचा मध्यम वर्ग पुढें आला; राजसत्ता कमी होऊन प्रजासत्ता वाढली; सारांश, स्वातंत्र्य, प्रजासत्ता व व्यापारधंदा यांचें युग सुरु होऊन, औद्योगिक उन्नति हें समाजाचें व राष्ट्राचें मुख्य ध्येय होऊन बसलें.

या क्रान्तींत इंग्लंडशीं स्पर्धा करुन कांहीं गोष्टींत त्याला मागें टाकणारीं, यूरोपांत जर्मनी व अमेरिकेंत संयुक्त संस्थानें हीं दोनच राष्ट्रें होत. प्रस्तुत युद्धानें जर्मनी हतवीर्य व आपद्ग्रस्त झाला आहे. तथापि त्याची औद्योगिक उन्नति इतक्या मजबूत पायावर उभारलेली आहे कीं, या भयंकर आपत्तींतूनही तो लवकरच सांवरेल व आपलें पूर्वीचें अग्रस्थान पटकावील या भीतीचे भूत दोस्तराष्ट्रांना अजूनही सतावींत आहे. संयुक्त संस्थानांचा व्यापार तर युद्धापूर्वीच इंग्लंडहून मोठा, किंबहुना जगात पहिल्या प्रतीचा होता, व या युद्धांत सामील होण्यापूर्वी व नंतर त्याला जो व्यापाराचा व कीर्तीचा लाभ झाला आहे त्यानें त्याचें प्रथम स्थान यानंतर बराच काळ कायम राहील असें दिसतें. विशेषत: इंग्लंडांत अलीकडील कोळशांच्या खाणींतल्या संपांनीं तेथील सर्व व्यापारास व उद्योगधंद्यास एक प्रकारचा धक्का बसला; व त्यांतच तेथील कामकरी वर्गाच्या असंतुष्ट स्थितीची भर पडल्यानें, इंग्लंडला अमेरिकेशीं स्पर्धा करणें जास्त जड झालें आहे. म्हणून अमेरिका व जर्मनीच्या औद्योगिक क्रान्तीविषयीं दोन शब्द सांगून हें प्रकरण संपवूं.

अमेरिकेंत हल्लीं ज्यांना स्वतंत्र संस्थानें म्हणतात तेथें प्रथमत: इंग्लंडांतील धर्मच्छळाला त्रासलेल्या प्युरिटन लोकांनीं येऊन वसाहत केली. पण नंतर यूरोपांतील सर्व देशांतून धर्मछळाला त्रासलेले, राजाच्या जुलुमानें गांजलेले, किंवा स्वप्रयत्नानें भाग्य काढण्यास उत्सुक झालेले, लोक तेथें येऊन राहूं लागले. प्रथम इंग्लंडची सत्ता या देशावर होती. पण स्वत:चा व्यापार अनिर्बंध चालण्यासाठीं इंग्लंडनें तेथील उद्योगधंद्यांना प्रतिबंधक असे अनेक कायदे केले

व कर बसविले. त्यांनीं चिडून जाऊन अमेरिकेनें इंग्लंडशीं युद्ध पुकारलें. त्यांच्या एकजुटीनें व शौर्यानें त्यांत त्यांस यश आलें, आणि सन १७७६ त हें राष्ट्र स्वतंत्र झालें.

स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर अमेरिकेनें आपले उद्योगधंदे वाढविण्याचे प्रयत्न जारीनें सुरु केले. जरी त्यांचा इंग्लंडशीं राजकीय संबंध आतां तुटला होता, तरी इतर बाबतींत त्यांचें दळणवळण पूर्ववत् कायम होतें. यामुळें इंग्लंडच्या यांत्रिक शोधाची व प्रगतीची त्यांस माहिती होत राहून त्यांच्या उद्योगधंद्याची वाढ इंग्लंडच्या पद्धतीवर होत गेली. इंग्लंडमध्यें जशीं अनेक शहरें, रस्ते व उद्योगधंद्याच्या इतर सोयी होत्या तशा अमेरिकेंत अर्थातच प्रथम प्रथम नव्हत्या. त्यांचे रस्ते अजून तयार व शहरें निर्माण व्हावयाचीं होतीं. पण या प्रतिकूलतेबरोबर इंग्लंडला नसलेली एक अनुकूलताही अमेरिकेला होती. इंग्लंडांत जुने अमीरउमराव औद्योगिक प्रगतीला अडथळा आणण्यास तयार असत. पूर्वपरंपरा आणि स्वार्थ यांनीं दूषित झालेले धंदेवाईक व इतर लोक यंत्राच्या प्रचाराला शक्य तितका विरोध करीत, कायदे उद्योगधंद्याच्या वाढीला प्रतिबंधक असत, आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट ही कीं, राजसत्ता लोकांच्या हातीं नव्हती. अमेरिकेंत या सर्व गोष्टींची अनुकूलता होती. अमीरउमराव अस्तित्वांत आले नव्हते, लोकांचा यंत्राविरुद्ध ग्रह नव्हता किंवा त्यांच्या प्रचारापासून कोणाचा धंदा बुडणारा नव्हता, औद्योगिक कायदे बहुतेक केले गेले नव्हतेच, आणि राजकीय सत्ता पूर्णपणें लोकांच्या हातीं होती. यामुळें आपली प्रगति करण्याला अमेरिकेला उशीर लागला नाहीं. इंग्लंडच्या सर्व युक्त्या व शोध तिनें उचलले, व आपल्या कल्पकतेनें व योजनाचातुर्यानें त्यांत भर घातली. सुधारलेली शेती, वाफेनें व विजेनें चालणारीं यंत्रें, आगगाडया, वाफेचीं जहाजें, सामायिक मंडळ्या, मोठमोठ्या पेढ्या, तारायंत्रें, टेलिफोन हीं सर्व तेथें प्रचारांत आलीं. आज तर विजेचें व नवीन नवीन अद्‌भूत शोधांचें अमेरिका हें माहेरघर झालें आहे. मध्यंतरीं संयुक्त संस्थानांपैकी उत्तरेकडील संस्थानें व दक्षिणेकडील संस्थानें यांच्यांत गुलामांचा व्यापार करावा किंवा न करावा याबद्दल विरोध पडून, मोठें युद्ध झालें. तरी त्या युद्धानंतरही उत्तरेकडील व दक्षिणेकडील संस्थानांचा संयुक्त संघ पूर्ववत् कायम राहिला व तेव्हांपासून सर्व संस्थानांतील उद्योगधंदे व व्यापार जास्त एकजीव झाले असून, त्यांची वाढ विशेष जोरानें झालेली आहे.

अमेरिकेच्या उद्योगधंद्यांत इंग्लंडहून हा विशेष आहे कीं, कारखानदारांतील परस्परस्पर्धा सर्वांनाच नाशक न व्हावी, किंवा त्यांचा स्वार्थ समाजाला जाचक न व्हावा, म्हणून इंग्लिश सरकाराला प्रसंगविशेषीं कायदे करुन नियंत्रण करतां येतें, पण अमेरिकन सरकारांत हें नियंत्रण-सामर्थ्य उरलेलें नाहीं. व्यक्तिस्वातंत्र्य व स्पर्धा यांचें साम्राज्य अमेरिकेंत जास्त आहे; आणि त्यानें सरकारचे हात तेथें इतके जखडले गेले आहेत कीं समाजालाही ते थोडे सैल होतील तर बरें असें वाटूं लागलें आहे. अमेरिकेंत रेल्वेच्या मंडळ्यांची व्यवस्था समाधानकारक नाहीं. त्यांचे दर भारी असून सर्वांना सारखे नाहींत; अंतर्व्यवस्थेंत घोंटाळा आहे; लांचलुचपतीचा प्रकार

जारी आहे. सरकारला हें सर्व समजत असून त्याच्या निवारणार्थ त्याला कांहींच करतां येत नाहीं. मोठमोठ्या व्यापारी मंडळ्या व कारखानदार 'ट्रस्ट' सारखे संघ करुन आपलें भांडवल संयुक्त करतात, किंवा परस्परांत जुटीनें वागण्याचा ठराव करतात; त्यानें त्यांचें भांडवल अफाट होतें. त्याच्या सहायानें इष्ट वस्तूचा सर्व जगांतील व्यापार किंवा पैदास्तवारी हे व्यापारी आपल्या हस्तगत करुन घेतात, व मग ती व्रस्तु एकमतानें वाटेल त्या भारी दरानें विकूं लागतात. केरोसीन तेलाचे व पोलादाचे असले फारच मोठे संघ असून, या वस्तूंकरितां सर्व जगाला त्यांच्या तोंडाकडे पाहावें लागतें. स्वत: अमेरिकेंतील लोकांनाही या ट्रस्टपासून पुष्कळ नुकसान सोसावें लागत आहे. अगदीं अलीकडे (सन १८९०) या संघाविरुद्ध एक कायदाही केला गेला आहे, पण त्याचा तादृश उपयोग झालेला नसून संघाचें स्वरुप व वजन पूर्ववत् कायम आहे. याप्रमाणें ट्रस्टनें पुष्कळ नुकसान जरी होत असलें तरी अमेरिकेच्या विलक्षण औद्योगिक भरभराटीला हे संघ पुष्कळ अंशीं कारणीभूत झालेले आहेत हें नि:संशय कबूल करावें लागतें.

अमेरिकेंतील उन्नतीस व्यक्तिश: प्रयत्न कारणीभूत झाले तर जर्मनीची उन्नति राजप्रयत्नानें घडून आली. जर्मनींतल्या औद्योगिक क्रान्तीस इंग्लंड किंवा अमेरिकेपेक्षां फार उशीरां प्रारंभ झाला. एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापावेतों जर्मनींत अनेक लहान लहान संस्थानें असून त्यांच्यांत परस्परांत द्वेष आणि कलह सुरु असे. सन १८६२ त प्रशियाच्या मुख्य प्रधानगिरीचीं सूत्रें प्रसिद्ध मुत्सद्दी बिस्मार्कच्या हातीं आलीं, आणि तेव्हांपासून जर्मनीच्या उदयास प्रारंभ झाला. बिस्मार्कनें अतिशय प्रयत्न करुन प्रशियाचें लष्करी सामर्थ्य अतोनात वाढविलें; ऑस्ट्रियाशीं युद्ध करुन अवघ्या सात आठवड्यांत त्याचा पूर्ण पराभव केला, आणि जर्मन संस्थानांतून त्या राष्ट्राचें जें विलक्षण वर्चस्व होतें तें नाहींसें केलें, यानंतर बिस्मार्कनें आपल्या मुत्सद्दीगिरीनें जर्मनींतल्या उत्तर संस्थानांचा संघ कायम करुन, त्यांतलें मुख्य पद प्रशियाला मिळवून दिलें. लष्कराची वाढही तो सारखी करीत होताच. सन १८७० त त्यानें फ्रान्सशीं युद्ध घडवून आणलें. त्यांत मोल्टकेच्या युद्धचातुर्यानें फ्रान्सचा बादशाह दुसरा नेपोलियन १।। लक्ष सैन्यानिशी शस्त्रें खालीं ठेवून त्याच्या स्वाधीन झाला, आणि फ्रान्स दांतीं तृण धरुन प्रशियास शरण आलें. बिस्मार्कच्या राजकारण कौशल्यानें या विजयानंतर जर्मनींतील दक्षिणेकडचीं संस्थानें उत्तरेकडील संघांत मिळण्यास कबूल झालीं; आणि सन १८८१ त फ्रान्सच्या तहाबरोबर व्हरसायले येथें सर्व जर्मन संस्थानांचा संघ कायम होऊन त्यांच्या अधिपत्याचा अभिषेक प्रशियाच्या विल्यम राजास करण्यांत आला. यानंतर जर्मनींत सर्वत्र ऐक्य आणि शांतता नांदूं लागली, आणि बाहेर त्याचें वजन व इभ्रत वाढली. तेथील सरकारानें मग आपल्या उद्योगधंद्यांकडे व व्यापाराकडे लक्ष वळविलें. फ्रान्सकडून मिळालेल्या एक अब्ज खंडणीचा या कामांत त्या सरकाराला फार उपयोग झाला. सरकारांतून तज्ज्ञांच्या द्वारें सल्ला देण्याची व्यवस्था करुन, योग्य नियंत्रण ठेवून, आणि भरपूर पैशाचा आश्रय देऊन, त्या सरकारानें आपली औद्योगिक उन्नति करण्याचे प्रयत्न सुरु केले. या त्याच्या प्रयत्नांस इतकें

विलक्षण व सत्वर यश आलें कीं जी प्रगति करण्यास इंग्लंडला शंभर वर्षे लागलीं, अमेरिकेला ५० वर्षे लागलीं, ती प्रगति जर्मनीनें अवघ्या पाव शतकांत करुन दाखविली.

जर्मनीनें इंग्लंडच्या व अमेरिकेच्या औद्योगिक अनुभवाचा स्वत:च्या प्रगतींत पूर्ण उपयोग करुन घेतला. जर्मनींत खनिज पदार्थ जरा हलक्या प्रतीचे पण विपुल आहेत. ते बाहेर काढून शुद्ध करण्याची व्यवस्था सरकारनें स्वत: व लोकांच्या मंडळया उभारुन केली. उत्साही व धाडशी लोकांस भांडवल पुरवून सर्व प्रकारचे कारखाने उभारवले; व सरकारांतून शास्त्रज्ञ व तज्ज्ञ नेमून या कारखान्यांतून नवीन नवीन सुधारणा घडवून आणल्या. भौतिक शास्त्रांचा उत्कर्ष करुन तें सर्व ज्ञान उद्योगाच्या आणि व्यापाराच्या सेवेंत लागलें. औद्योगिक शिक्षणाची मुबलक सोय केली. सरकारी खर्चानें आणि कांहीं खासगी भांडवल उभारवून देशभर आगगाड्या व कालवे केले. खासगी मंडळयांना उत्तेजन देऊन त्यांच्याकडून परदेशी व्यापारासाठीं जहाजें बांधविलीं. सारांश, जर्मन सरकारनें उद्योगाचीं व व्यापाराचीं सर्व साधनें आपल्या राष्ट्रांस प्राप्त करुन दिलीं. त्यायोगानें युद्धापूर्वी जर्मनीचा माल जगांतील सर्व बाजारांतून मुबलक दिसून येत होता. इतकेंच नव्हे तर तो इतर राष्ट्रांच्या मालापेक्षां स्वस्त व चांगला म्हणून नांवाजला जात असे.

अठराव्या शतकाच्या शेवटापासून एकोणिसाव्याच्या अखेरपावेतों जी क्रान्ति इंग्लंडांत सुरु होऊन, अमेरिका, जर्मनी व इतर युरोपियन राष्ट्रांतून पसरली तिचें दिग्दर्शन आतांपर्यंत केलें. यावरुन वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल कीं या क्रान्तीचें मुख्य अंग व्यापार व उद्योग असून, तदनुषंगानें राजकीय, सामाजिक, व विचारविषयक अंगांत क्रान्ति झालेली आहे. परंतु या क्रान्तीनंतर समाजाची जी पुनर्रचना झाली तिच्यांत अनेक नवे व बिकट प्रश्न उद्‌भवून ते पुन: समाजाला त्रासवूं लागले, त्यांपैकींच कारखानदारांचा व मजूरांचा परस्परसंबंध हा एक प्रश्न असून, तो सोडविण्याच्या प्रयत्नांतच सामाजिक वाद उदयाला आला. परंतु त्याच्या विचारायला लागण्यापूर्वी या क्रान्तीपासून पाश्चात्य समाजाला कोणकोणते लाभ व हानि झाली त्याचा विचार करुं.

## प्रकरण २ रें

# औद्योगिक क्रान्तीचे लाभ व हानि

मागील प्रकरणांत अठराव्या शतकाच्या शेवटापासून पुढील शंभर वर्षांत प्रथमत: इंग्लंडांत व नंतर हळू हळू सर्व यूरोपांत व अमेरिकेंत झालेल्या औद्योगिक क्रांतीचें वर्णन केलें. आतां त्या क्रान्तीपासून त्या राष्ट्रांना व पर्यायानें सर्व जगाला कोणकोणते फायदे व तोटे झाले याचा विचार करूं.

पहिला व अतिशय ठळक लाभ म्हणजे संपत्तीची वाढ हा होय. ही वाढ अनेक दिशांनीं झाली. प्रथम तर यंत्रांचा शोध लागल्यानेंच पूर्वी हातानें निघणाऱ्या मालापेक्षां किती तरी पटीनें जास्त माल तयार होऊं लागला; आणि त्यांतही पूर्वीच्या हातकारखान्यांपेक्षां कितीतरी अधिक यंत्र-कारखाने सर्व देशांतून स्थापन झाले. सन १९०० साली पाश्चात्य राष्ट्रांतून नुसत्या कापडाच्या गिरण्यांतून १० कोटी १२ लक्ष • चात्या फिरत होत्या. हाच प्रकार इतर सर्व उद्योगधंद्यांतून झालेला होता. त्यामुळें मालाची उत्पत्ति अनेक पटींनी वाढली होती. या वाढीची कांहींशी कल्पना या गोष्टीवरून येईल कीं सन १९०० साली एकट्या अमेरिकेतील कारखान्यांतून १३०० कोटि डॉलर किंमतीचा माल तयार झाला. एका शतकापूर्वी सर्व जगांत मिळून इतका माल तयार होत नव्हता. ही तर पक्क्या किंवा कारखान्यांत तयार होणाऱ्या मालाची गोष्ट झाली. याशिवाय यंत्राच्या सहाय्यानें व शास्त्रीय शोधानें कच्च्या किंवा निसर्गजात मालाचाही पुरवठा पूर्वीपेक्षां अतिशय जास्त होऊं लागला. नवीन नवीन उपकरणांनीं व खतांनीं जमिनीची मशागत उत्तम प्रकारें केली जाऊन तिची उत्पादकशक्ति वाढविण्यांत आली; व अमेरिका, आस्ट्रेलियासारख्या देशांतून शेंकडो मैल नवीन नवीन उपकरणांनी व खतांनीं जमिनीची मशागत उत्तम प्रकारें केली जाऊन तिची उत्पादकशक्ति वाढविण्यांत आली; व अमेरिका, आस्ट्रेलियासारख्या देशांतून शेंकडो मैल नवीन जमीन लागवडीस आली. त्यानें धान्यांचें उत्पन्न अनेक पटीनें वाढलें. कोळसा, सोनें, रुपें, लोखंड, व इतर खनिज पदार्थ पूर्वीपेक्षां अतिशय मोठ्या प्रमाणावर भूगर्भांतून खोदून काढले जाऊं लागले; आणि कमी त्रासाच्या व कमी खर्चाच्या

शास्त्रीय पद्धतीनें त्यांना शुद्ध करण्यांत येऊन व्यवहारांत त्यांचा उपयोग होऊं लागला. एकट्या इंग्लंडांत सन १७३७ त प्रतिवर्षी १७३५० टन लोखंड निघत असे तें सन १९०० त ९४,५४,२०४ टन निघूं लागलें. जनावरांची जोपासना जास्त चांगली होऊं लागून वीण चांगली करण्याकडे जास्त लक्ष दिलें जाऊं लागलें, त्यानें जनावरें संख्येनें जास्त व गुणानें चांगली होऊं लागलीं व त्यांच्यापासून मिळणाऱ्या पदार्थांची वाढ झाली. उद्योगधंद्यांत पूर्वी जे पदार्थ फुकट जात असत त्यांपासून शास्त्रीय शोधांच्या मदतीनें नवीन उपयुक्त पदार्थ तयार होऊं लागले. उदांहरणार्थ, तेल काढल्यानंतर जो अशुद्ध पदार्थ राहतो तो पूर्वी व्यर्थ जात असे. नंतर त्याचा उत्तम प्रकारचा साबण तयार होऊं लागला. दिव्यांत जळणाऱ्या गॅसांतील अॅमोनिया पूर्वी फुकट जात असे. आतां त्याचें अॅमोनियम नायट्रेड नांवाचें उत्तम खत तयार होतें. साखर करतांना पूर्वी फुकट जाणाऱ्या द्रव्यापासून हल्लीं मद्यार्क तयार होतो. सारांश, हल्ली धंदे किफायतशीर करण्याचें एक मुख्य साधन पूर्वी फुकट जात असलेल्या द्रव्यांचा उपयोग हें आहे. श्रमविभाग व सुसंघटित व्यवस्था यांनीं पूर्वी लागणाऱ्या श्रमांत व वेळांत काटकसर होऊन त्या श्रमांपासून आणखी संपत्ति उत्पन्न होऊं लागली. या सर्व कारणांनीं यूरोप व अमेरिका खंडांत गेल्या शतकापासून संपत्तीचा धूर निघूं लागला. आम्ही कुबेराची संपत्ति म्हणतों तीही हल्लीच्या कांहीं राष्ट्रांच्या संपत्तीपुढें फिक्की पडेल! नवकोट नारायण ही आमच्या संपत्तीची परमावधि, पण असे पांच-चार नवकोट नारायण एकत्र केले तरी कमी पडतील असे पंचाशत्कोट नारायण आज अमेरिकेंत नांदत आहेत. ज्यांची संपत्ति दशलक्षांनीं मोजतां येईल असे लक्ष्मीपति आज अमेरिकेंत सहा हजार आहेत. सन १८०० सालीं संयुक्त संस्थानांची सर्व संपत्ति सुमारें १८० कोट डॉलर होती, ती सन १९०० सालीं ९४३० कोट डॉलर झाली! लक्ष्मीचें हें इतकें अफाट ऐश्वर्य जरी यूरोपांतल्या राष्ट्रांना लाभलेलें नाहीं, तरी या क्रांतीनें त्यांच्या संपत्तींत कांहीं कमी भर पडलेली नाहीं. त्यांच्यांतल्या कांहीं ठळक देशांतल्या व्यापाराचे आंकड्यांवरुन त्यांच्या संपत्तीची कल्पना होईल. सन १८४० त इंग्लंडचा व्यापार ८५ कोट डॉलरचा होता तो १९०० त ३९६ कोटींचा झालेला होता. याच काळांत फ्रान्सचा व्यापार २८ कोट डॉलरचा १५६ कोट डॉलर झाला, जर्मनीचा व्यापार २६ कोटींचा २४१ कोट झाला. आणि युरोपांतील सर्व बलाढ्य राष्ट्रांत मागासलेल्या शेतकीस बहुतांशीं वाहलेल्या व त्यामुळें इतर उद्योगधंद्याकडे दुर्लक्ष करीत असलेल्या रशियाचाही व्यापार १२ कोट डॉलरचा ६४ कोटी डॉलर झाला! ग्रेटब्रिटनच्या पंधरापट असलेल्या हिंदुस्थानचा याच वर्षी (सन १९००) एकंदर व्यापार केवळ ५५ कोट डॉलर (रु. १६८ कोट) होता हें ध्यानांत घेतलें म्हणजे या देशाच्या संपत्तीची यथार्थ जाणीव होईल.

---

• हा व या विवेचनांतले इतर आंकडे Modern Industrialism नांवाच्या Appletons Business Series मधील पुस्तकांतून घेतले आहेत. १९१४ साली हा आंकडा १४ कोटि ३० लक्ष झाला आहे. (पायोनियर, ता. २३.१०.१९२०)

औद्योगिक क्रान्तीचा दुसरा लाभ म्हणजे सुखोपभोगाचीं साधनें पूर्वीपेक्षां पुष्कळ वाढलीं, व तीं अधिक लोकांना सुलभ झालीं. यांत्रिक कारखान्यांमुळें आणि व्यापाराच्या सोयीमुळे सर्व प्रकारचा माल पूर्वीपेक्षां कमी खर्चांत तयार होऊं लागला, व बाजारांत स्वस्त विकूं लागला. त्यानें पूर्वी तो माल घेण्याची ऐपत नसलेल्यांनाहि तो आतां घेता येऊं लागला. जो तलम कपडा पूर्वी श्रीमंतांसच लभ्य असे तो आतां एकाद्या गरीबालाही वापरतां येऊं लागला हीच स्थिति इतर पदार्थांची झाली. यांत्रिक शोधानें ऐषआरामाचीं पुष्कळ नवीन साधनें निर्माण झालीं. आगगाड्या, वाफेचीं जहाजें, त्यानंतर अलीकडे सायकल व मोटारी (व अगदीं अलीकडे आकाशयानें) प्रचारांत येऊन सुखानें प्रवास करण्याची सोय झाली. स्थलतारा, जलतारा, टेलिफोन पसरुन, शेंकडो मैलांवरच्या स्नेह्यांशीं आनंदानें गप्पागोष्टी करतां येऊं लागल्या. विजेच्या दिव्यांनीं रात्रीचा दिवस करुन सूर्याची कमतरता भरुन काढली. ग्रॅमोफोननें ध्वनीची क्षणभंगुरता नष्ट करुन टाकली. प्रकाशचित्रकलेनें प्रिय सुहृदांचें दर्शन चिरकालीन करुन दिलें. चलत्‌चित्रांनीं (सिनेमानें) एका स्थलीं बसून समाधींतल्या प्रमाणें चारी खंडांतील व तिन्ही काळांतील प्रसंग अनुभवितां येऊं लागले. छापण्याच्या कलेनें कवीचे काव्यालाप आणि शास्त्रज्ञांचीं शास्त्रप्रमेयें सामान्य जनांना सुलभ करुन दिलीं. ही सुखसाधनांची यादी आणखी कितीतरी वाढवितां येईल, पण ती लांबविण्याची तरी काय आवश्यकता? वाचकांनींच जर स्वत:भोवतींच थोडा वेळ लक्षपूर्वक पाहिलें, आणि आपल्या पूर्वजांना प्राप्त नसलेलीं, किंबहुना त्यांच्या कल्पनेंतही नसलेलीं, किती सुखसाधनें आज आपण प्रत्यक्ष अनुभवीत आहोंत याचा विचार केला, तर ज्या देशांतून हीं साधनें येथें आलीं, तेथें मूळांत त्यांचा विस्तार किती मोठा असेल याची कल्पना त्यांस आल्यावांचून राहणार नाहीं. मग एवढें सांगितलें कीं पुरें कीं हीं सर्व साधनें औद्योगिक क्रान्तीचीं फळें होत.

माल पाठविण्याची सुलभता व त्यायोगानें होणारे फायदे हा या क्रान्तीचा तिसरा लाभ आहे. पूर्वी जेव्हां वाहनांची सोय नव्हती, रस्ते बांधले गेले नव्हते, तेव्हां जो माल जेथें उत्पन्न होई तेथेंच आसपासच्या मुलखांत तो खपत असे. त्यामुळें एका भागांत धान्य मुळींच न झाल्यानें दुष्काळ, तर दुसऱ्या भागांत तें आडमाप पिकल्यानें सडत पडलेलें, अशी स्थिति एकाच देशांत होत असे. मग एका देशांतल्या जास्त मालाचा उपयोग दुसऱ्या देशास प्राय: होत नसे हें सांगण्याचें कारण काय? आतां जर एकाद्या देशांत दुष्काळ पडला, तर जगाच्या सर्व भागांतून तेथें पुरवठा करतां येतो. हिंदुस्थानांतील दुष्काळांत अमेरिकेचा गहूं आणि ब्रह्मदेशाचा तांदूळ लोकांना खाण्यास मिळतो. या वाहन-सुलभतेनें सर्व देशाचा माल सर्व ठिकाणीं मिळूं लागला आहे. हिंदुस्थानासारख्या गरीब देशांतही एकाद्या सामान्य माणसाच्या घरांत इंग्लंडचें कापड, जर्मनीच्या चाकूकातऱ्या, अमेरिकेचे दिवे, ऑस्ट्रियाच्या कांचेच्या चिमण्या, जपानचीं खेळणीं, रशियाचें चामडें, फ्रान्सांतला कागद, इत्यादि निरनिराळ्या देशाचे पदार्थ एकवटलेले पहावयास सांपडतात. हीच स्थिति मोठ्या प्रमाणावर सर्व देशांतून आहे.

त्यायोगानें आयुष्य सुखानें घालविण्याचीं साधनें सुलभ होऊन वृद्धिंगत झालीं आहेत हें उघड आहे.

औद्योगिक क्रान्तीपासून भौतिक शास्त्रांच्या उध्ययनास उत्तेजन मिळून त्याची विलक्षण प्रगति झाली व होत आहे हा तिजपासून चौथा लाभ आहे. जसा जसा मनुष्याचा भोंवतालच्या सृष्टीशीं परिचय वाढत जातो, तसतसे, स्वत:चा जीवनक्रम चालविण्यासाठीं, व कांहीं अंशीं आपल्या अंत:करणांतील नैसर्गिक जिज्ञासा तृप्त करुन घेण्यासाठीं, त्या सृष्टींतलें रहस्य उकलून घेऊन तिला अंकित करण्याचे त्याचे प्रयत्न सुरु होतात. सर्व शास्त्रांचा हा पाया आहे. पाश्चात्य देशांतही याप्रमाणें कांहीं शास्त्रें पूर्वीपासून अस्तित्वांत आलीं होतीं, परंतु जेव्हां या शास्त्रांचा व त्यांतील ज्ञानाचा उद्योगधंद्यांत उपयोग होऊं लागून त्याच्यापासून व्यवहारांत प्रत्यक्ष लाभ होऊं लागला, तेव्हां त्यांच्या अध्ययनास अतिशय उत्तेजन मिळालें, व त्यांच्या उत्कर्षास प्रारंभ झाला. अलीकडे त्या देशांतून रसायन, पदार्थविज्ञान, भूगर्भ, यांत्रिक, वगैरे शास्त्रांची किती विलक्षण वाढ झाली, व या शास्त्रांच्या सहाय्यानें त्या देशांनीं पंचमहाभूतें व एकंदर वस्तुजात आपल्या सेवेंत कसें लावून घेतलें आहे हें सर्वांस ठाऊक आहे. विद्युत् तर आज पाश्चात्यांच्या घरीं बटकीसारखी राबत आहे. अद्भूत यंत्रें निघालीं आहेत, त्यांनीं स्वर्ग, मृत्यु व पाताल हे तिन्ही लोक सुगम झाले आहेत, आणि विश्वकर्म्याप्रमाणें नवी सृष्टि निर्माण होऊं लागली आहे. ही भौतिक शास्त्रांची उन्नति झाली; पण तिनें त्या देशांचा व्यापारधंदा वाढून देशांत जो संपत्तीचा व वैभवाचा पूर लोटला त्यानें इतर शास्त्रांच्याही अध्ययनाला व उत्कर्षाला फार मदत केली. आज यूरोप व अमेरिका खंडें प्राणिविषयक, सामाजिक, राजनैतिक, मानसिक इत्यादि शास्त्रांचीं माहेरघरें झालेलीं आहेत. हजारों विद्वान् त्यांचा आजन्म व्यासंग करीत आहेत व प्रत्येक शास्त्राचें ज्ञान इतकें वाढत आहे कीं, त्यांच्या अंगप्रत्यंगाचें एक एक निराळें शास्त्र बनत आहे. मनुष्य जातीच्या सर्वांगीण उन्नतींत त्यानें पुष्कळ भर पडली आहे.

स्वतंत्रता आणि समानता या तत्त्वांना मिळालेला पुरस्कार हा या क्रान्तीचा पांचवा लाभ आहे. सर हेनरी मेननें म्हटल्याप्रमाणें या काळांत The society moved from state to contract त्यापूर्वी पूर्वापार चालत आलेल्या रीतींनीं व बंधनानीं समाज जखडून बांधलेला होता. त्यानें त्यांची सर्व गात्रें चैतन्यरहित झालीं होतीं. मोठेपणा हा जन्मावर अवलंबून होता. थोरांच्या कुळांत जन्मला तोच थोर. त्यासच समाजांत पुढें येण्याची किंवा मर्दुमकी करुन नांव काढण्याची सोय! इतरांनीं असलेल्या–जन्मत: मिळालेल्या–स्थितींतच समाधान मानून दिवस काढावेत. अठराव्या शतकांतील क्रान्तीनें ही स्थिति पालटून टाकली. जुनी बंधनें नष्ट झालीं. नवीन उद्योग, नवीन धंदे उदयाला आले, आणि त्यात शिरुन आपल्या अंगांतलें पाणी दाखविण्याची प्रत्येकास मोकळीक मिळाली. देशांतील गुणवान् व कर्तृत्ववान् लोक पुढें

येऊं लागले. स्वावलंबन वाढलें. वेणीसंहारांत कर्णानें म्हटल्याप्रमाणें 'मदायत्तं तु पौरुषम्' अशी स्थिति झाली. चढाओढ लागून योग्य तेवढेंच टिकून राहिलें, व अशक्त नाहींसें होऊं लागले. सर्व प्रकारच्या सामर्थ्याचा विकास झाला. व्यवहारचातुर्य, संघटनाकौशल्य, आत्मप्रत्यय, दक्षता, साहस, इत्यादि गुणांची वाढ झाली. जुनें गोठलेलें रक्त जाऊन नवें ताज्या दमाचें, प्रचंड उत्साहाचें रक्त समाजाच्या धमन्यांतून खेळूं लागलें. त्याचा परिणाम काय झाला हें हिंदुस्थानच्या लोकांस तरी सांगावयास नको.

प्रजासत्तेचा उदय हें या क्रान्तीचें सहावें फळ आहे. पूर्वकाली राजा हा मुख्य असून, सरदार लोक हे दुय्यम असत. समाजांतील इतर लोकांस कांहीच महत्त्व नसे. जमीन हीच संपतीचें मुख्य साधन असून तिची मालकी राजा व त्याच्या सरदारांकडे असे. लढाईशिवाय देशाचें वैभव वाढविण्यास दुसरा मार्ग नव्हता. पुढें जेव्हां उद्योगधंदे व व्यापार वाढला, तेव्हां साहजिकच जमिनीचें महत्त्व कमी झालें. कारखानदारांचा नवीन धनिक वर्ग निर्माण झाला; आणि समाजांत त्याचें वजन वाढलें. देशाच्या वैभवाचें व्यापार हें नवें साधन अस्तित्वांत आले. त्यानें व्यापारी व उद्योगी वर्ग समाजांत अग्रभागीं आला, व सत्ता हळू हळू त्याच्या हातीं जाऊं लागली. राजसत्तेचें याप्रमाणें स्थलांतर होऊन ती सामान्यजनाभिमुख झाली. इंग्लंडांत पार्लमेंटमधील लोकप्रतिनिधि सभा जी हौस ऑफ कॉमन्स तिचें महत्त्व राजापेक्षांही जास्त झाले, व राज्यकारभार अधिकांश तिच्या द्वारें चालूं लागला. इतर देशांत तर राजाचें आसनच नाहींसें झालें. राजा किंवा सरदार वर्ग यांच्या सारख्या व्यक्तिविशेषांच्या हातीं सत्ता असण्यापेक्षां ती समाजांतील मध्यम वर्गासारख्या विस्तृत वर्गाच्या हातीं असण्यापासून समाजकल्याणाकडे तिचा जास्त उपयोग होऊं लागला हें उघड आहे.

औद्योगिक क्रान्तीपासून पाश्चात्य समाजांस व तद्वारें सर्व जगास वर वर्णन केल्याप्रमाणें विविध प्रकारचे फायदे झाले आहेत. परंतु जगांत निर्दोष असें काय आहे? कवींनीं वर्णन केल्याप्रमाणें गुलाबाच्या प्रत्येक सुंदर फुलाखालीं तीक्ष्ण कांटा झांकलेला असतो. तशीच स्थिति या क्रान्तीची झालेली आहे. लाभकारक गुणांबरोबर हानिकारक दोषही तिच्यांत विद्यमान होते. व जशी जशी ही क्रांति पूर्ण होत चालली व काळ लोटूं लागला, तसे तसे या दोषाचे परिणाम जास्त तीव्र होत जाऊन ते समाजाच्या डोळ्यांसमोर स्पष्टपणें येऊं लागले. उत्क्रान्तीचा हा नियम आहे की, समाजाला प्राप्त होणाऱ्या अवस्था प्रथम जरी उपयुक्त व हितप्रद असल्या तरी कालांतरानें त्या सदोष व अतएव अपायकारक होतात. व्यक्तीप्रमाणें समाजही चैतन्ययुक्त असून त्यासही वृद्धिक्षय लागला आहे. म्हणून ज्याप्रमाणें लहानपणीं अंगाला बरोबर बसणारे कपडे मोठेपणीं टाकून द्यावे लागतात, त्याप्रमाणें समाजालाही एका काळीं हितकारक असलेली अवस्था कालांतरानें गैरसोयीची होऊन सोडून द्यावी लागते. औद्योगिक क्रान्तीनें प्राप्त झालेली अवस्था पाश्चात्य समाजाला एके काळीं अत्यंत हितकारक, किंबहुना त्याच्या उन्नतीला

आवश्यक होती. परंतु आतां तिचें कार्य पूर्ण होत आलें आहे व तिच्यापासून मिळणारी उन्नति मिळून चुकत आली आहे. या क्रान्तीतले दोष पूर्वी जे लुप्त होते ते नंतर स्पष्ट होऊन समाजाला प्रथम जाचक, व शेवटीं जवळ जवळ असह्य होत चालले. समाजाला अवस्थांतराची आवश्यकता असल्याचें हें दिग्दर्शक आहे.

एका दृष्टीनें समाजाच्या प्रत्येक अवस्थेंत गुणांबरोबरच दोषांचेंही बीज विद्यमान असतें, व ज्याप्रमाणें गुणाचें बीज वृद्धिंगत होऊन गुणाचा विकास होत जातो, त्याप्रमाणें दोषाचीही वृद्धि होत जाते. फरक इतकाच आहे कीं, ह्या गुणदोषांच्या बीजांच्या वाढीचें प्रमाण निरनिराळें असल्यानें कांहीं गुण प्रथम विकास पावतात, तर कांहीं दोष कालांतरानें दिसूं लागतात. पुढें वर्णन केलेले सर्व दोष एकसमयावच्छेदेंकरुन, किंवा एकाच प्रमाणांत समाजांत उद्भूत झाले नाहींत. कित्येक प्रथम तर कित्येक अगदीं उशीरां उत्पन्न झालेले आहेत. कित्येक अगदीं झालेले आहेत तर कित्येकांना अजून तितकें तीव्र रुप आलेलें नाहीं. कित्येक नंतर उद्भवलेले दोष प्रथमच्या दोषांचेच परिणाम आहेत. हीच स्थिति गुणांचीही पण आहे. विवेचनाच्या सोयीकरितां या सर्व गुणांचें वर्णन जसें वर एकजागीं केले आहे त्याप्रमाणें दोषांचेंही वर्णन पुढें एकजागींच दिलें आहे, व त्याला सामान्यत: एकोणिसाव्या शतकाच्या अखेरचा काल घेतलेला आहे.

औद्योगिक क्रान्तीपासून पाश्चात्य समाजांत संपत्तीची अतिशय वृद्धि झाली हा तिजपासून मोठा लाभ झाला, पण तिचा मोठा व इतर सर्व दोषांच्या मूळाशीं असलेला दोष किंवा न्यूनत्व हें होय कीं, या वाढलेल्या संपत्तीची वांटणी समाजांत सारखी झाली नाहीं. तिनें बहुजनसमाजाचें दारिद्र्य फारच थोड्या अंशानें कमी झालें, किंबहुना कांहीं बाबतींत तर तें पूर्वीइतकेंच कायम राहिलें किंवा वाढलेंही. ज्या मुख्य तन्त्वांच्या योगानें ही क्रान्ति घडून आली त्यांचा हा नैसर्गिक परिणाम आहे. ग्रेटब्रिटनची संपत्ति सन १८५५ त ३७६ • कोट पौंड होती, ती सन १९१० त १३५० कोट झाली. त्याचें वार्षिक उत्पन्न सन १८६० त ७६ कोट पौंड होतें तें सन १९१० त १८० कोट पौंड झालें. म्हणजे राष्ट्राची संपत्ति साडेतीन पटीनें व वार्षिक उत्पन्न अडीच पटीनें वाढलें. परंतु मजूरांचें-राष्ट्रांतील बहुसंख्यांक वर्गाचे वार्षिक उत्पन्न सन १८६० त १५ पौंड होतें तें १९१८ त केवळ २९ पौंड झालें; म्हणजे पुरे दुपटीनेंही वाढलें नाहीं.

यापेक्षां अमेरिकेचें उदाहरण जास्त मननीय आहे. या देशाची संपत्ति सन १८००

---

• हे व या प्रकरणांत पुढें येणारे आंकडे रॅमसे मॅकडोनल्डच्या The socialist movement नामक ग्रंथांतून घेतले आहेत. पृष्ठ. ७१.

त १८० कोट डॉलर * होती ती सन १९०० त ९४३० कोट झाली होती, व आजला ती आणखी कित्येक कोटींनी वाढली असेल. पण खेदाची गोष्ट ही कीं या प्रचंड संपत्तीपैकीं ८२५० कोटि म्हणजे ७/८ भाग समाजांतील वरवरच्या १/८ लोकांत गडप झाला असून, बाकीच्या १/८ तुकड्यांवर सर्व समाजाला समाधान मानावें लागत आहे. सन १८०० त संपत्ति थोडी होती पण ती समाजांत सारखी विभागली होती, व माणशी उत्पन्न ४१८ डॉलर होतें. सन १९०० त देशांतली संपत्ती वर म्हटल्याप्रमाणें ५२ पटीनें वाढली, तेंव्हा श्रीमंताचें माणशीं उत्पन्न ८७०० डॉलर झालें म्हणजे जवळ जवळ २२ पटीनें वाढलें, तर मजूरांचें उत्पन्न १८० डॉलर म्हणजे पूर्वीच्या निम्मेहून कमी झालें होते! या अवकाशांत सर्व वस्तूंचे भाव किती वाढले असून राहणी किती महाग झाली आहे याचा विचार केला म्हणजे उत्पन्नाच्या या कमीपणाचें खरें महत्त्व ध्यान्नांत येईल.

यूरोपांतील देशांचीही कमीअधिक प्रमाणानें अमेरिकेसारखी स्थिति झाली आहे. देशांत संपत्ति पुष्कळ आली, पण तिचा बहुतेक भाग कारखानदार, भांडवलवाले, मोठमोठे व्यापारी यांनींच लाटला व बाकी उरलेल्या कांहीं थोडा इतरांच्या वाट्यांस आला. त्यांत त्यांचेंही उत्पन्न कांहीं वाढलें, पण जवळ जवळ तितकीच राहणी महाग झाली. एवंच त्यांची स्थिति बहुतांशीं जशीच्या तशीच कायम राहिली. अलीकडे अलीकडे (युद्धाच्या पहिले वर्षी) इंग्लंडांतही देशाची संपत्ति वाढत असून मजूरांची मजूरी कांहींशी कमीच झाली होती. तेथील बोर्ड ऑफ ट्रेडनें प्रसिद्ध केलेल्या आंकड्यांवरुन सन १९०० त शेतकी, रेलवे, वगैरे ठिकाणच्या मजूरांखेरीज इतरांना मजूरींत जी रकम मिळत असे त्यापेक्षां सन १९०९ त दर आठवड्याला एक लक्ष पौंड कमी मिळूं लागले.The socialist Movement पृष्ठ ३२.) यावरुन मजूराच्या स्थितीची कल्पना येईल. समाजांतील एक लहानसा वर्ग संपत्तींत व ऐषआरामांत लोळत आहे, संपत्तीचें काय करावें हें त्यास सुचत नाहीं; तर दुसरा मोठा थोरला वर्ग पोटभर खायला मिळत नाहीं म्हणून तळमळत आहे. वेस्ट-एंडमधील एकएका छानछोक लॉर्डांच्या एका खान्याला कित्येक हजार पौंड लागतात, तर ईस्ट-एंडमधील कामकऱ्याला तितके हजार राहोत पण तितके नुसते पौंड हाडाचीं काडें करुन वर्षभरांत देखील मिळत नाहींत. हल्लींच्या औद्योगिक पद्धतीचा हा अपरिहार्य परिणाम आहे. या पद्धतींत भांडवल हें प्रधान आहे. त्यामुळें ज्याचें भांडवल असतें त्याला उद्योगांतील सर्व नफा मिळतो. ज्यांच्यापाशीं भांडवल नाहीं त्यांना निर्वाहाला मजूरीशिवाय दुसरें साधन नसतें; आणि समाजांत असेच लोक जास्त असल्याने त्यांच्यांत परस्परांत तीव्र स्पर्धा लागून मागणीपेक्षां त्यांचा पुरवठा जास्त होतो, व केवळ

* Modern Industrialism

निर्वाहाला पुरेल इतक्या मजूरीवर त्यांस सर्व जन्म कंठावा लागतो. यामुळें कांहीं थोड्या व्यक्तींपाशीं दरवर्षी नफ्याची रकम सांचत जाऊन, ती लक्षांनीं, कोटींनीं मोजावी लागते, तर

हजारों लाखों व्यक्तींना पोटाला पाहिजे त्यापेक्षा जास्त मिळण्याची स्थितीच येत नाहीं. एकीकडे कारखानदारांच्या घोड्यांच्या तबेल्यांना व मोटारांच्या गाडीखान्यांना मोठाले वाडे लागतात, तर दुसरीकडे मजूरांच्या पोरांना अंग टाकायला पुरेशी निवाऱ्याची जागा मिळत नाहीं. एकाच्या कुत्र्यांना किंमती झुली मिळतात तर दुसऱ्यांच्या मुलांना अंगभर साधा कपडा मिळत नाहीं.

संपत्तीच्या या विषमतेचा दुष्परिणाम समाजाच्या शारीरिक, नैतिक व मानसिक स्थितीवर झाल्यावांचून राहिलेला नाहीं, आणि त्यांतच प्रस्तुतच्या उद्योगपद्धतीच्या व स्वातंत्र्य-कल्पनेच्या नैसर्गिक दोषांची भर पडली. पूर्वी शेतकीचा धंदा मुख्य होता, व इतर धंदेहि मोकळ्या जागेंत लहान प्रमाणावर असत. त्यामुळें कामकऱ्यांना मुबलक जागा व स्वच्छ हवा मिळत असे; व त्यांची प्रकृति निकोप राही. काम मिळेल किंवा नाहीं याची भ्रांति नसे; रोजमुरा चांगला मिळे, व कामही शक्ति क्षीण करणारें नसे. त्यामुळें मजूरांचें आयुष्य एकंदरींत सुखानें जाई. पण उद्योगधंद्याच्या वाढीबरोबर शहरें वाढलीं, कारखाने अवाढव्य झाले, कामाची जागा कोंदट, बंद केलेली झाली, व एका एका जागीं हजारों मजूर जमून काम करुं लागले. कामही सकाळपासून संध्याकाळपावेतों बारा बारा तास सारखें यंत्रासारखें करावें लागतें. घरी राहण्याची जागाही घाणेरडी आणि कोंदट. मग मजुरांची शरीरप्रकृति खालावत चाललेली यांत नवल काय? यंत्रें सुरु झालीं तेव्हां प्रथम प्रथम मजुरी बरी मिळे, पण पुढें रहाणीच्या महागाईच्या मानानें तीही जेमतेम निर्वाहाला पुरेल इतकीच मिळूं लागली. तेव्हां तर खाण्यालाही पूर्वीसारखें चांगलें व पुरेसें मिळेनासें झालं. हल्लीं आठवड्यातून कारखाना एक दिवस बंद ठेवला पाहिजे, कारखान्याच्या इमारती आरोग्यप्रद पाहिजेत, अमुक वयाखालील मुलांना कामावर घेऊं नये, वगैरे मजुरांना हितकारक असे कायदे झाले आहेत. पण एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभीं स्वातंत्र्याची कल्पना फारच विस्तृत होती; आणि कारखानदार व मजूर यांच्यामध्यें सरकारनें कोणत्याही बाबतींत कायद्यानें हात घालू नये असें तज्ज्ञ विद्वानांचें मत होतें. त्यामुळें मजूरांच्या आरोग्याकडे किंवा हिताकडे लक्ष देण्याचें कारखानदारांवर कांहींच बंधन नसे. शक्य तितका कमी खर्च करुन आपला नफा वाढविण्याकडे त्यांचें ध्यान असे. पुरुषांपेक्षां बायका कमी मजुरीवर मिळत म्हणून कित्येक कारखान्यांतून बायका व अगदीं कोंवळी कोंवळीं मुलें यंत्रें चालविण्याच्या कामावर ठेवलेलीं असत. हीं यंत्रें रात्रंदिवस चाल; आणि त्यांच्यावर हीं मुलें व बायका जास्त मजुरीच्या आशेनें कंबर मोडेपर्यंत चौदा चौदा तास काम करीत. त्यांच्या कोमल प्रकृतीवर याचा काय परिणाम होत असेल याची कल्पना करावी. बायकांना विश्रांति मिळेनाशी झाली; प्रजा दुबळी निपजूं लागली; आणि जेव्हां ही दुबळी प्रजाही लहानपणापासून कामावर जुंपूं

लागली तेव्हां तर क्षीणतेचा कडेलोट होण्याची पाळी आली. तेव्हां कांहीं दिवसांनीं वर सांगितलेले कायदे होऊं लागले व या अनर्थाला कांहींसा आळा बसत चालला. पण शहरांतली दाट वस्तीची, कोंदट हवेची, अस्वच्छपणाची राहणी आणि प्रारंभीं वर्णन केलेलें दारिद्र्य, यांच्या जोडीनें मजूरांची शारीरिक स्थिति पूर्वीच्या मानानें खालावतच गेली, आणि क्षयासारखे रोग त्यांच्यांत बळावले. गरीबीमुळें त्यांच्यांत अनेक व्यसनें उद्भवलीं, व दु:खाचा विसर पडावा म्हणून मद्यपान व व्यभिचार वाढत चालला. विश्रांति कमी मिळाल्यानें बौद्धिक शिक्षणाकडे किंवा वाचन वगैरेकडे लक्ष देण्यास सवड व उत्साह राहिला नाहीं. याप्रमाणें मजूरांवर शरीर, बुद्धि व नीति या तिन्ही बाबतींत औद्योगिक क्रान्तीचा परिणाम शोचनीय झाला. श्रीमंतांवरही तिचा परिणाम फारसा स्पृहणीय झाला नाहीं. दारिद्र्याप्रमाणें अतिशय संपत्तीहि अनीतीला कारणीभूत होते. गरीबांचीं व्यसनें गरीबीचीं दु:खें विसरण्यासाठीं असतात, तर श्रीमंतांचीं व्यसनें श्रीमंती व रिकामपणाचा वेळ घालविण्यासाठीं असतात. मिळून दोघांच्याही शरीराची व शीलाची नासाडी सारखीच होते. श्रीमंतीचा हा मादकपणा पाश्चात्य राष्ट्रांतील वरच्या वर्गांत बाधक झाल्याशिवाय राहणें शक्य नव्हतें. नटवेपणा, छानछोकी, ऐषआराम ही त्या वर्गांत वाढलीं, विषयासक्ति बळावली, विवाहाचें पावित्र्य नाहींसें झालें आणि अनेक उधळीं शरीराची माती करणारीं व्यसनें मागें लागलीं. एकंदरींत एकाच कारणाच्या दोन भिन्न भिन्न परिणामांनीं पाश्चात्य समाजाच्या दोनी टोंकांला कीड लागली व तीं शरीर, नीति व बुद्धिदृष्ट्या खंगूं लागलीं.

या क्रान्तीनंतर प्रचलित झालेल्या उद्योगपद्धतींत वैयक्तिक स्वार्थ व स्पर्धा हीं दोन प्रधान तत्त्वें आहेत, व त्यांना स्वातंत्र्याची जोड मिळाली आहे. स्वार्थ व परस्परस्पर्धा यांनीं प्रेरित होऊन समाजांतील व्यक्ति अहमहमिकेनें उद्योगधंद्यास लागतात. सरकार तटस्थ राहून त्यांस स्वतंत्रपणें यथेष्ट भांडूं देतें. त्यांत ज्यांना बुद्धि, द्रव्य, इत्यादि साधनांची अनुकूलता असते ते वांचतात, इतर नामशेष होतात. औद्योगिक क्रान्ति होत असतां हा क्रम पुष्कळ काळपावेतों जारी होता, व आतांही प्राय: अशाच रीतीनें जारी आहे. फरक इतकाच कीं सरकारची वृत्ति आतां पूर्वीइतकी तटस्थ नसते. या क्रमांत नामशेष झालेल्या व्यक्तींच्या द्रव्याचा, बुद्धीचा, श्रमाचा जो विलक्षण क्षय होतो तो प्रस्तुत उद्योगपद्धतींतला दुसरा मोठा दोष आहे. सन १९०० च्या पूर्वीचे आंकडे मिळाले नाहींत, पण त्यानंतरच्या दहा वर्षांत इंग्लंड व वेल्स मिळून ७८००० कारखानदारांचीं दिवाळीं निघालीं!! आणि राष्ट्राला ८ कोटि पौंडांचें नुकसान सोसावें लागलें. डेव्हिड वेल्स नांवाच्या अर्थशास्त्रज्ञानें अमेरिकेंतल्या वुर्सेस्टर शहरांत चौकशी केली तीवरुन त्यास असें आढळून आलें कीं, सन १८४५ मध्यें त्या शहरांत जितके

1. The Social Movement पृष्ठ ७७. २. सदर पृष्ठ ७६.

केली तीवरुन त्यास असें आढळून आलें कीं, सन १८४५ मध्यें त्या शहरांत जितके व्यापारी व धंदेवाले होते त्यांपैकी शेंकडा पंचवीस पुढील पांच वर्षांत डुबाले, पन्नास पुढील दहा वर्षांत गेले, आणि सदुसष्ट पंधरा वर्षांअखेर गळले. आणि ते सर्व व्यापारांत किंवा धंद्यांत नुकसान लागल्यानें डुबले होते. श्रमाचा व द्रव्याचा हा जो विलक्षण क्षय होतो तो टाळण्याचे कांहींच उपाय नाहींत काय? हल्लींच्या पद्धतींत तरी या प्रश्नाला 'नाहीं' असेंच उत्तर द्यावे लागतें.

जे कारखानदार यशस्वी होऊन टिकून राहतात त्यांस तरी सुख व शांति मिळती तर ठीक झालें असतें, पण तसेंही होत नाहीं. व्यापारांत नवे नवे प्रतिस्पर्धी सारखे उत्पन्न होतच असतात. त्यांनीं आपल्याला मागें टाकून थोड्या दिवसांपूर्वी आपल्या व्यवसायबंधूंची जी आपण गत केली तीच त्यांनीं आपली करुं नये, म्हणून त्यांस डोळ्यांत तेल घालून सारखें जपावें लागते. नित्य चिंतन करुन अगदीं नवे मार्ग, अगदीं नव्या युक्त्या शोधून काढाव्या लागतात. या योगानें जो मानसिक ताप व शीण होतो त्यानें जीवाची स्वस्थता नाहींशी होऊन पुष्कळ दुर्धर रोग जडतात. अलीकडे पाश्चात्य देशांत श्रम, स्मृतिनाश, पक्षघात, क्षय, मधुमेह, इत्यादि रोंगांचें प्रमाण वाढले आहे तें या मनस्तापाचें फल आहे असें पुष्कळ तज्ज्ञांचे मत आहे.

या स्पर्धेचे व औद्योगिक क्रान्तीचे इतरही दुष्परिणाम समाजाला जाचक झाले आहेत. माल जितक्या मोठ्या प्रमाणावर काढावा तितका तो अधिक स्वस्त पडतो, व नफा जास्त होतो. म्हणून कारखानदार शक्य तितका अधिक माल काढण्याची खटपट करतात. गिन्हाईक किती आहे, त्याची मागणी केवढी आहे, आपण सर्वच कारखानदार असा जास्त माल काढूं लागलों तर त्याचा बाजारावर काय परिणाम होईल, हे विचार जरी त्यांच्या मनांत आले तरी ते दूर सारुन त्यांस निघेल तेवढा माल काढीतच राहावें लागतें. एरवीं कारखाना डुबून उद्यांचे मरण आजच यावयाचें. या सर्वांचा परिणाम अपेक्षित तोच होतो. अति-पुरवठ्यानें बाजार विटून जातो, मालाचीं कोठारें तुडुंब भरुन जातात, भाव उतरतात, बाजारांत चलबिचल होऊन भाव तेजीचे व्हावेत म्हणून कित्येक वेळां तयार केलेला माल जाळून टाकावा लागतो, आणि इतक्यावरही कित्येकांचीं दिवाळीं निघतात. पाश्चात्य समाजांत हा अतिसमृद्धीचा रोग कालाकालानें सारखा उद्‌भवूं लागला व त्यानें बाजाराची स्थिरता नाहींशी करुन टाकली.

सर्वांत खेदाची गोष्ट ही कीं एकीकडे अशी अतिसमृद्धि होत असतां–त्या अतिसमृद्धीमुळेंच–शेंकडों मजूर बेकार होऊन अन्नान्न-दशेला येतात. अति पुरवठा झाला, बाजार मंदावला, म्हणजे निरुपाय होऊन कारखानदारांना कारखाने बंद करावे

लागतात; आणि मजूरांचा रोजगार नाहींसा होतो. त्यामुळें एकीकडे बाजारांत गिऱ्हाइक नाहीं म्हणून माल सडत असतो, व दुसरीकडे गिऱ्हाइकाला माल घेण्याचें सामर्थ्य नसल्यानें तो उपाशी मरत असतो. ज्या वेळीं अंगांवर कपडा नसल्यानें गिरणींतले मजूर थंडीनें कांकडत असतात, त्याच वेळीं बाजार मंदावलेले असतात, भाव पडलेले असतात, व मालाच्या वखारी कापडानें उतूं लागलेल्या असतात.

अनेक प्रकारचा अपव्यय हा हल्लींच्या उद्योगपद्धतीचा नैसर्गिक दोष आहे. सर्व उद्योगांचा हेतु समाजाच्या आवश्यकता पुरवाव्यात हा असतो. अर्थात् प्रत्येक उद्योगांत ज्या मानानें समाजाला आवश्यकता असेल त्याच मानानें कारखाने पाहिजेत. तसें असलें म्हणजेच प्रत्येक कारखान्याची सर्व उत्पादकशक्ति उपयोगांत येऊन, तिचें पूर्ण फल समाजाला मिळूं लागतें. पण जर कारखान्यांची संख्या आवश्यकतेपेक्षां जास्त असली, तर अति पुरवठा व्हावयास लागून, वर वर्णन केल्याप्रमाणें कांहीं कारखाने डुबतात, किंवा सर्वच कारखान्यांना आपल्या उत्पादकशक्तीपेक्षां कमी माल काढावा लागतो. अर्थात् या जास्त कारखान्यांचें भांडवल समाजाच्या दृष्टीनें व्यर्थ गेलें, आणि इतर उपयुक्त व आवश्यक धंद्यांना त्याचा उपयोग झाला असता तो झाला नाहीं. हल्लींच्या उद्योगपद्धतींत नियंत्रणाचा अभाव असल्यानें कोणताही धंदा किंवा उद्योग जरा फायदेशीर होऊं लागला कीं ह्यांत नव्या नव्या कारखान्यांची गर्दी उसळूं लागते, आणि मग जरुरीपेक्षां जास्त कारखाने होऊन भांडवलाचा क्षय होतो. सन १८९५ त अमेरिकेंत खिळ्यांचे कारखाने इतके झाले होते कीं, त्यांच्या यंत्रांना पुरेसें काम मिळतें तर अमेरिकेला लागणाऱ्या खिळ्यांच्या चौपट खिळे तयार झाले असते! अमेरिकेंत एक वेळां साखरेचे चाळीस कारखाने होते. व्यापारी चढाओढींत त्यांतले अठरा प्रथम डुबाले, तेव्हां बाकी राहिल्यांपैकीं अठरा जणांनीं एकमत करुन एक संघ स्थापन केला, तेव्हां त्या अठरांपैकीं अकरा कारखाने अनावश्यक म्हणून बंद करावे लागले व बाकीच्या सातांपासूनच जरुर तेवढा माल निघूं लागला. यावरुन जेथें सात कारखान्यांची जरुर नव्हती, तेथें छत्तीस कारखाने उभारले गेले होते असें उघड होतें. काय हा भांडवलाचा व्यर्थ व्यय !

आवश्यकतेपेक्षां जास्त माल निघूं लागला म्हणजे तो खपण्यासाठीं कारखानदारांना व व्यापाऱ्यांना निरनिराळे उपाय योजावे लागावेत यांत नवल नाहीं. जाहिराती, फिरते एजंट वगैरे प्रकार कांहीं थोड्या प्रमाणांत सर्वदाच आवश्यक राहतील, पण हल्लीं त्यांवर जे लाखो रुपये प्रतिवर्षी व्यर्थ उधळले जातात, ते जर अति-पुरवठा व स्पर्धा नाहींशी झाली तर बहुतांशीं वांचतील, व त्यांचा दुसरीकडे सदुपयोग करतां येईल. इंग्लंडांत जेव्हां साबणाच्या कारखान्यांचा संयुक्त संघ करण्याचा विचार चालला होता, तेव्हां डेलीमेल पत्रानें त्याचा फार विरोध केला व प्रसिद्ध केलें कीं, अशा संघानें

वर्तमानपत्रांना जाहिरातींचें पांच लक्ष पौंडाचें • दरवर्षीचें नुकसान होईल. अमेरिकंतील औद्योगिक कमिशनच्या चौकशींत असें आढळून आलें कीं, तेथील व्हिस्कीच्या व्यापाऱ्यांचे चार कोट डॉलर दरवर्षी जाहिराती वगैरेंत खर्च होत. अमेरिकेंत जेव्हां पुष्कळसे ट्रस्ट (संघ) कायम झाले, तेव्हां तेथील फिरत्या एजंटांच्या राष्ट्रीय परिषदेनं पस्तीस हजार विक्री-दलालांचा धंदा या संघांनी डुबाला व पंचवीस हजारांचा पगार कमी झाला असें जाहीर केलें होतें. ट्रस्टासारख्या संयुक्त संघापासून इतर पुष्कळ गैरफायदे आहेत, पण त्यांनीं स्पर्धा नाहींशी होऊन जाहिराती वगैरेंची तादृश जरुरत राहत नाहीं हा फायदा आहे. जर ट्रस्टचे दोष उत्पन्न न होतां, इतर प्रकारांनी हा प्रसिद्धीकरणाचा खर्च वांचवितां आला, तर द्रव्याच्या अभावीं ज्या कित्येक सार्वजनिक गोष्टी हल्लीं करतां येत नाहींत त्या सहज करता येऊं लागतील.

या अपव्ययाचे संप आणि कारखानेबंदी हें आणखी एक कारण आहे. या योगानें व्यापारांत व उद्योगधंद्यांत किती अव्यवस्था व घोंटाळा माजतो आणि सर्व समाजाला त्रास सोसावा लागतो हें हल्लीं तरी सांगावयाला नको. परंतु हल्लींच्या स्वतंत्रतायुगांत हे प्रकार अपरिहार्य आहेत. प्रचलित उद्योगपद्धतींत भांडवलवाले आणि मजूर असे दोन निरनिराळे वर्ग निर्माण झाले आहेत, व त्यांच्या हितसंबंधांत एक प्रकारचा विरोध उत्पन्न झाला आहे. मजूरांस रोजमुरा जितका कमी दिला जाईल तितका खर्च कमी होऊन भांडवलवाल्यांचा नफा जास्त होतो. रोजमुरा शक्य तितका कमी देण्याची भांडवलवाल्यांची साहजिक प्रवृत्ति झालेली असते. कमी रोजमुरा दिल्यानें मजूरांची शारीरिक व नैतिक स्थिति खालावते, व शेवटीं तिचा परिणाम कामावर झाल्यावांचून राहत नाहीं. पण सद्यःस्वार्थामुळें कारखानदारांची दृष्टि इतकी दूरवर पोहोंचत नाहीं. मजूरांच्या असहाय व अगतिक स्थितीचा पूर्ण फायदा घेऊन ते रोजमुऱ्याचा दर शक्य तेवढा कमी ठेवतात. त्यामुळें त्रासून, कित्येक वेळां चिडून, कित्येक वेळां निरुपा : होऊन, मजूरी वाढण्यासाठीं एकाद्या कारखान्यांतील सर्व मजूर काम बंद करीत. प्रथम हे संप थोडे होत, व जे होत तेही लवकर मोडत. कारण संपाच्या दिवसांत निर्वाह चालण्यास द्रव्याची अनुकूलता लागते ती त्यावेळीं मजुरांना नव्हती. पण उद्योगधंद्यांची भरभराट जशी जशी होत चालली, तसतसा मजूर-कारखानदारांतला विरोध तीव्र होत गेला, व मजूरांत जागृति होऊं लागली, तेव्हां स्वसंरक्षणासाठीं एकजुटीची आवश्यकता त्यांस भासूं लागली व ते आपले संघ स्थापूं लागले. तेव्हांपासून या संपांचें सामर्थ्य वाढून त्यांना जास्त यश येऊं लागलें. पण उलटपक्षीं कारखानदारही परस्परांत एकमत करुन मजूरांना वठणीवर आणण्यासाठीं

---

* The Socialist Movement पृष्ठ ६६. १.सदर पृष्ठ ६८. २. सदर पृष्ठ ६९.

कारखाने बंद ठेवूं लागले. हल्लींच्या या उद्योगी युगांत मजूर व कारखानदार हे याप्रमाणें दोन युद्धमान पक्ष झालेले आहेत. संप, कारखानेबंदी हीं त्यांचीं शस्त्रात्रें आहेत. या शस्त्रास्त्रांच्या खणखणाटांत त्यांना परस्परांना तर जखमा होतातच, पण आर्थिक हानि व गैरसोयी या रुपानें त्याचे दुष्परिणाम सर्व समाजालाही सोसावे लागतात.

याप्रमाणें या औद्योगिक क्रान्तीपासून उद्‌भवलेल्या अन्याय्य वांटणी, दारिद्र्य, अपव्यय, बाजाराची अस्थिरता, मजूरांची दु:स्थिति इत्यादि दोषांचें वर्णन केलें. आर्थिकदृष्ट्या कोणत्याही औद्योगिक पद्धतीच्या योग्यतेचीं प्रमाणें दोन होत. एक तर हें कीं, ती पद्धती मितव्ययी असावी, म्हणजे तिच्यांत द्रव्योत्पादन-साधनांच्या शक्तीचा पूर्ण उपयोग होऊन त्यांच्यापासून शक्य तितकी अधिक द्रव्योत्पत्ति व्हावी. प्रस्तुत पद्धतीच्या अपव्ययाच्या वर केलेल्या वर्णनावरुन या मितव्ययाच्या कसोटीला ती मुळींच उतरत नाहीं हें स्पष्ट आहे. दुसरें प्रमाण किंवा कसोटी ही कीं, समाजाच्या गरजा पुरविणें हा जो सर्व उद्योगधंद्यांचा मूळ हेतु तो तिच्यापासून सिद्धीला जावा. कपडे मनुष्यांनीं घालावेत म्हणून तयार व्हावेत, धान्य माणसांनीं खावें म्हणून उत्पन्न केलें जावें; फार काय, देशांतील सर्व कारखान्यांतला एकंदर माल माणसांनीं वापरावा म्हणून तयार व्हावा, व केला जावा. पण हल्लींच्या उघोगपद्धतींत कारखान्यांतून माल तयार होतो, तथापि समाजांतील अधिकांश लोकांना तो वापरण्यास मिळत नाहीं. देशांत धान्य निपजून मजुरांना तें पोटभर खाण्यास मिळत नाहीं, व अनेक गिरण्यांतून कापड निघून त्यांचें अंग धडपणें झांकत नाहीं. सारांश, समाजांतील सर्वांत मोठ्या वर्गाच्या आवश्यकता या उद्योग-पद्धतींत पुरविल्या जात नाहींत. अर्थात् या दुसऱ्या कसोटीलाही ही पद्धति उतरत नाहीं. थोडक्यांत मितव्यय व आवश्यकता-पूर्ति या दोन्ही दृष्टींनीं प्रस्तुत पद्धति सदोष ठरते.

वरील आर्थिक दोषांचा प्रतिकूल परिणाम राष्ट्राच्या सामाजिक व राजकीय स्थितीवरही होतो. पूर्वी समाजांतले निरनिराळे वर्ग सामान्यत: सारख्या दर्जाचे असून, समाज एकस्वरुप होता. निरनिराळ्या वर्गांत विरोध किंवा कलह नव्हता. परंतु नवीन औद्योगिक पद्धतीनें समाजांत तीव्र विषमता उत्पन्न केली. समाजाच्या एका टोंकाला तिनें एक सर्वसाधनसंपन्न ऐश्वर्यमंडित असा भांडवलवाल्यांचा वर्ग निर्माण केला, व दुसऱ्या टोंकाला असहाय, पंगू, उपजीविकेच्या साधनांना पारखा झालेला, असा कामकऱ्यांचा वर्ग जन्माला घातला. दोन वर्गांतलें अंतर अत्यंत मोठें असून, त्यांच्यांतील विरोध तशाच तीव्र स्वरुपाचा आहे. त्यानें समाजांत दुफळी माजून, पूर्वीची शांति आणि स्वस्थता नाहींशी झाली आहे.

क्रान्तीचा राजकीय स्थितीवरील परिणाम तर जास्त भीषण स्वरुपाचा आहे. जेव्हां कारखाने प्रचंड झाले तेव्हां त्यांच्यासाठीं गिऱ्हाईकही तसेंच मोठें मिळविणे जरुर झालें. व त्यानें जगांतील निरनिराळ्या भागांचें गिऱ्हाईक मिळविण्यासाठीं यूरोपियन राष्ट्रांची आपसांत मोठी चढाओढ लागली. या नवीन व्यापारी युगांत जो गिऱ्हाईक जास्त मिळवील तोच प्रमुख-स्थान पटकावील हें प्रत्येक राष्ट्र ओळखून होतें, व या आपल्या गिऱ्हाइकीसाठींच्या चढाओढीचें रुपांतर पुढें कलहांत व युद्धांत होणार याचीही प्रत्येकाला खात्री होती. म्हणून या भावी युद्धाच्या तयारीसाठीं प्रत्येक राष्ट्र आपलें लष्करी सामर्थ्य वाढवूं लागलें. ज्या मानवी बुद्धीनें आवश्यकता-तृप्तीसाठीं औद्योगिक यंत्रें शोधून काढिलीं तिनेंच आत्मसंहारासाठीं यौद्धिक यंत्रेंही निर्माण केलीं. नवीन युगांतले भौतिकशास्त्रांचें ज्ञान युद्धकलेच्या सेवेला लावण्यांत आलें, आणि सैन्य व आरमारें पंचमहाभौतिक शस्त्रास्त्रांसह सज्ज झालीं. उद्योगधंद्यांप्रमाणें सैन्याचेंही वामनस्वरुप जाऊन भीमरुप झाले. पूर्वी जेथें हजार फौज होती तेथें आतां लाख राहूं लागली आहे. या सर्वाच्या मूळाशीं व्यापारी चढाओढ आहे. जर यंत्रें निर्माण होऊन माल जास्त निघूं लागला नसता, तर या चढाओढींचे व त्यानंतरच्या लष्करी तयारीचें कारणच उरलें नसतें. हल्लीं पाश्चात्य राष्ट्रांच्या सर्व महत्त्वाकांक्षांचें पर्यवसान व्यापारांत होत आहे. वसाहती करावयाच्या त्या व्यापराकरितां, नवीन हक्क मिळवावयाचे ते व्यापराकरितां, वर्चस्व-क्षेत्रें स्थापन करावयाचीं तीं व्यापाराकरितां, आणि राजसत्ता संपादावयाची तीही पण व्यापाराच्या सोयीकरितां. एवंच 'सर्वं खलु इदं वाणिज्यम्' असें झालें आहे. नुकतेच संपलेल्या अतिभारतीय युद्धाच्या मूळाशीं व्यापारी चढाओढ होती, व युद्धोत्तर कालचे सर्वांत महत्त्वाचे प्रश्न व्यापरविषयक आहेत हें सर्वश्रुतच आहे. या चढाओढींपासून किंवा युद्धापासून सामान्य जनसमूहाचा विशेष लाभ असतो असेंही नाहीं. युद्धांत संहार मात्र त्यांचा होतो. परंतु युद्धांत जय येऊन गिऱ्हाईक मिळालें व व्यापार वाढला, तर जास्त होणाऱ्या नफ्याचा बहुतांश, पुष्कळदां सर्वांश-भांडवलवाल्यांच्या खिशांत जातो. राष्ट्रांतील मजूरांचा जो मोठा वर्ग त्याची मजूरी वाढत नाहीं किंवा त्यास इतर लाभ होत नाहीं. परंतु राष्ट्रांतली राजकीय सत्ता कारखानदारांच्या व भांडवलवाल्यांच्या हातीं असल्यानें ते स्वत:च्या फायद्यासाठीं लष्करी सामर्थ्य वाढविण्याकडे राष्ट्राचा अतोनात पैसा खर्च करतात व युद्धें घडवून आणतात. हल्लीं लष्करांत व युद्धांत जो संपत्तीचा चुराडा होत आहे तो जर थांबला व त्यांत वांचलेल्या संपत्तीचा योग्य उपयोग केला तर जगाच्या पाठीवर दारिद्याचा लवलेश उरणाार नाहीं. पण 'प्रभव: स्वार्थदूषिता:' मग हें कसें व्हावें ?

हल्लींच्या उद्योगपद्धतीनें परोपकारवृत्ति आणि सामान्यत: मानवी अंत:करणांतील उच्च मनोभाव यांना मोठा धक्का बसला आहे. आध्यात्मिक प्रवृत्ति तर

तिनें नाहींशीच केली आहे. जीवन हें कलहस्वरुप आहे; त्यांत प्रत्येकानें आपल्या स्वार्थाकडे पाहून स्वसंरक्षण करावें; असमर्थांनीं व अयोग्यांनीं मरावें हा सृष्टीचाच नियम आहे; त्या नियमाविरुद्ध जाऊन त्याचा बचाव करण्याच्या भानगडींत पडणें म्हणजे उन्नतीच्या मार्गांत विघ्न आणणेंच होय; अशी हल्लींची विचारपरंपरा आहे. यामुळें जे असहाय व दीन असतील त्यांना सहाय केलें पाहिजे ही भावनाच नष्ट होत चालली. आप्पलपोटेपणाला कर्तव्याचें स्वरुप आलें आणि मनुष्याचा नैसर्गिक स्वार्थ बळावला. व श्रीमंत व गरीब, समर्थ व असमर्थ, भांडवलवाले व कामकरी, सर्वच या स्वार्थपरवृत्तीला बळी पडलेले आहेत. आपण या जीवनकलहांत यशस्वी झालों म्हणून एक धन्य मानीत आहेत, तर दुसरे आपणाला इतरांनीं चिरडून टाकलें म्हणून त्यांना शिव्याशाप देत आहेत. एकंदरींत दोघांच्याही वृत्ति ऐहिकस्वार्थलोलुप, सुखतत्पर झाल्या आहेत. कांहीं थोड्या व्यक्तींत व त्यांच्या कृत्यांत परोपकारासारखे गुण दृष्टीस पडतात, पण सामान्यत: पाश्चात्य राष्ट्रांची वाणिज्य वृत्ति बेताल झाली आहे. आणि हा बहुतांशीं हल्लींच्या बेताल उद्योगपद्धतीचा परिणाम आहे.

या क्रान्तीचा देशाच्या रचनेवर व साम्राज्याच्या राहणीवर अनिष्ट परिणाम झाला. पूर्वी लहान कारखाने असल्यानें वस्ती जास्त विरळ असे, व दाट वस्तीचीं शहरें थोडीं असत. परंतु जेव्हां यांत्रिक कारखाने निघून हजारों मजूर एका कारखान्यांत लागूं लागले, तेव्हां अर्थातच हे सर्व लोक एका जागीं राहावयास लागून वस्ती दाट होऊं लागली, व शहरें वाढत चाललीं. जर्मनींत १८७५ सालीं एका लाखापेक्षां जास्त वस्तीचीं शहरें केवळ १० होतीं तीं १९१० सालीं ५८ झालीं. त्यांपैकीं ३३ शहरांची वस्ती एक लाखाहून जास्त, १४ शहरांची २ लाखांहून जास्त, व ११ ची ३ लाखांहून जास्त आहे. * जर्मनीच्या क्षेत्रफळाएवढाच जर हिंदुस्थानचा एकादा प्रांत, उदाहरणार्थ घेतला, तर त्यांत एक लाखाहून जास्त वस्तीचीं शहरें सन १९१० त फार थोडीं होतीं. यावरुन यूरोपांत शहरांची वाढ किती झाली आहे हें ध्यानांत येईल. हा परिणाम औद्योगिक क्रान्तीचा व तिच्यामुळें उद्भवलेल्या स्थितीचा आहे. पन्नास लाख वस्तीचें लंडन शहर अग्निशकटाच्या पूर्वकालीं वसणें असंभवनीय होतें, व तत्कालीन उद्योगधंद्यांना अशा शहराची आवश्यकताही नव्हती. या मोठ्या शहरांतील दाट वस्तींनें लोकांच्या राहणी बदलून शरीरप्रकृतीवर वाईट परिणाम झाला. पूर्वीची स्वच्छ हवा नंतर दुर्मिळ झाली. गलिच्छपणा व घामटपणा वाढला. हस्तपादादि इंद्रियांच्या ऐवजीं यंत्रानें काम करुन घ्यावें लागत चाललें. राहणी कृत्रिम झाली, व त्यानें अतिश्रमानें शरीरें कमकुवत झालीं, व दवाखाने वाढत चालले. शरीराबरोबर मनोविकार व बुद्धि क्षीण होत गेली. ज्यांचीं

* Modern Industrialism पृष्ठ ७०.

शरीरें अशक्त, रोगट व पंगु त्यांच्या मनांत उच्च विकार येणें प्राय: कठीण. मजूरवर्गाच्या बाबतींत या सर्व गोष्टींला, दारिद्याची जोड मिळाल्यानें, संकुचित वृत्ति, व्यसनें, आणि रोग यांनीं त्या वर्गाला ग्रासून टाकलें. श्रीमंत वर्गावर दारिद्र्याची आपत्ति नव्हती, परंतु शहरांतील रोगजनक परिस्थितीचा व कृत्रिम राहणीचा त्यांच्यावरही परिणाम होत होता. याशिवाय मागें सांगितल्याप्रमाणें संपत्तीच्या अतिशयापासून येणाऱ्या मोहांची, दुर्व्यसनांची व अनीतीची त्यांच्यांत वाढ होत होतीच. सारांश, शहरांतील निसर्गविरुद्ध राहणी, अपायकारक परिस्थिति, आणि संपत्तीचा अभाव किंवा अतिशय, या सर्व कारणांनीं समाजाची शारीरिक शक्ति व शील हीं खालावत चाललीं.

असो तर, प्रस्तुत प्रकरणांत औद्योगिक क्रान्तीपासून पाश्चात्य राष्ट्रांस झालेले लाभ व हानि यांचें एथवर थोडक्यांत पर्यालोचन केलें. या क्रान्तीनें पाश्चात्य देशांतील संपत्ति अतोनात वाढली, सुखोपभोगाच्या साधनांत अनेक पटींनीं भर पडली, दळणवळण सुगम व सुखकर झालें, भौतिक शास्त्रांचा उत्कर्ष झाला, पूर्वीचीं बंधनें नाहींशीं झालीं, व्यक्तिमात्र समान व स्वतंत्र मानली जाऊं लागली, व राजकीय वातावरणांत प्रजासत्तेचा अरुणोदय झाला. या सर्व कारणांनीं पाश्चात्य समाजांचें स्वरुप पूर्णपणें बदलून गेलें. त्या राष्ट्रांच्या उत्क्रांतीला-कदाचित् सर्व मानवी जातीच्या उन्नतीला अशा प्रकारें रुपांतर होणें आवश्यकच होतें. परतु जशी जशी ही क्रान्ति पूर्णत्वाला येत चालली, तसतसा तिच्यांतील गुणांपेक्षां दोषांचा विकास जास्त होत चालला व तिच्या सुपरिणामांपेक्षां दुष्परिणाम समाजाला जास्त जाणवूं लागले. समाजांतल्या वाढलेल्या संपत्तीची अत्यंत विषम व अन्याय्य वांटणी होऊन, अत्यंत मोठा वर्ग दारिद्र्यानें व तज्जात विविध दु:खांनीं त्रस्त झाला. सर्व समाजाची शारीरिक व नैतिक अवस्था क्षीण होत चालली. अनेक दिशांनीं संपत्तीचा भयंकर अपव्यय होऊं लागला. स्पर्धा व स्वार्थ वाढून, उदात्त भावना व आध्यात्मिक वृत्ति नाहींशा झाल्या. समाजांतील निरनिराळ्या वर्गांत विरोध वाढून, सुख, शांति व स्वस्थता हीं पारखीं झालीं. राष्ट्राची वृत्ति वाणिज्यमय झाली, व तिला पोषक म्हणून मनुष्य-संहारक साधनांवर अतोनात श्रम, बुद्धि व संपत्ति वेंचलीं जाऊं लागलीं. अठराव्या शतकाच्या शेवटीं सुरु झालेली ही क्रान्ति एकोणिसाव्या शतकाच्या शेवटीं बहुतांशीं पूर्णत्वाला पोहोंचली, आणि तिचे दुष्परिणाम इतके तीव्र झाले कीं, त्यांच्या यातनांत तिच्या सुपरिणामांचें बहुतांशीं विस्मरण पडलें. समाजाला नवीन अवस्था प्राप्त होण्याचें व दुसरी क्रान्ति सुरु होण्याचें हें लक्षण आहे, व त्याचीं चिन्हें आज सर्व यूरोपभर दृग्गोचर होत आहेत. परंतु व्यक्तीप्रमाणेंच समाजाचेंही अवस्थांतर सावकाश होत जातें. ज्याप्रमाणें व्यक्तींत बाल्य संपून तारुण्य, किंवा तारुण्य संपून वार्धक्य केव्हां लागलें हें केवळ स्थूलमानानेंच ठरवितां येतें, त्याप्रमाणेंच समाजांतही एक अवस्था संपून दुसरी केव्हां सुरु होते हें स्थूलमानानेंच ठरवावें लागतें. वास्तविक जेव्हां

एकाद्या अवस्थेची वाढ होत असते तेव्हांच ती संपून दुसरी अवस्था येण्याचाही क्रम सुरु असतो. दोन्ही गोष्टद्धद्धी एकाच वेळीं होत असतात. फरक इतकाच असतो कीं, एक गोष्ट जास्त स्पष्ट असल्यानें तिच्याकडे पाहणाराचें लक्ष जातें, दुसरी अस्पष्ट असल्यानें तिच्याकडे तें तितकें जात नाहीं. पाश्चात्य समाजांतील क्रांन्तीची हीच स्थिति झालेली आहे. तिचा उदय झाला तेव्हां तिच्या स्वतःतच तिच्या नाशाचें बीज उद्‌भवलें. तिच्या विकासाबरोबरच पण कमी प्रमाणानें या बीज-कारणाचीही वाढ झाली. हें बीजकारण म्हणजे या क्रान्तीपासून उपजलेले दुष्परिणाम व त्यांच्या निवारणार्थ सुचलेले विचार व योजिलेले उपाय हे होत. यांपैकीं दुष्परिणामांचें वर्णन या प्रकरणांत झालें. बाकी राहिलेले दोषनिवारक विचार व उपाय तोच सामाजिक वाद होय. त्याचा उदय व विकास कसा झाला याचा विचार पुढील भागांतून करूं.

---

## प्रकरण ३ रें

# सामाजिक वादाचा फ्रान्सांत उदय

मागील दोन प्रकरणांत यूरोपांत यांत्रिक कारखाने निर्माण होऊन वाफ आणि वीज ह्यांच्या द्वारें उद्योगधंद्यांचे जुनें स्वरुप कसें पूर्णपणें बदललें ह्याचें वर्णन केलें. ह्या औद्योगिक क्रान्तीस अठराव्या शतकाच्या तिसऱ्या चरणांत प्रारंभ झाला व हल्लीं ती बहुतांशीं पूर्णत्वाला पोहोंचली आहे. ह्या अवधींत प्रथम प्रथम लोकांना तिजपासून मोठें सुख वाटलें, परंतु उत्तरोत्तर तिच्या दुष्परिणामांची तीव्रता वाढत जाऊन हल्लीं तर तिच्यामुळें पाश्चात्य समाजांतील बहुतेक लोक अत्यंत त्रस्त झाले आहेत. ह्याप्रमाणें ह्या क्रान्तीच्या दुष्परिणामाचा जाच जरी समाजाला कांही काळानें होऊं लागला, तरी त्या दुष्परिणामांचीं पूर्वचिन्हें व तें उत्पन्न करण्याची प्रस्तुत क्रान्तीची प्रवृत्ति, हीं विचारी पुरुषांच्या ध्यानांत प्रथमपासूनच आल्यावांचून राहिलीं नाहींत. यामुळें एकीकडे औद्योगिक क्रान्ति घडून येत होती, व दुसरीकडे विचारी, परोपकारी व उत्साही पुरुष तिचे दुष्परिणाम ओळखून ते टाळण्याचे उपाय सुचवीत होते. मधून मधून त्या उपायांप्रमाणें व्यवहारांत उपयोगही करुन पाहिले जात हाते. सारांश, ज्याप्रमाणें रोग उद्‌भवल्यानंतर लवकरच त्याचें शामक औषधही शोधून काढण्यांत येतें, त्याप्रमाणे औद्योगिक क्रांतीस प्रारंभ झाल्यानंतर थोड्याच काळानें तिच्या दुष्परिणामांचा निवारक जो सामाजिक वाद तो उदयाला येऊं लागला.

ह्या वादाच्या उत्पत्तीपासून आजपर्यंत इतिहास पाहतां, त्यांत समाज-स्थितीच्या अनुरोधानें रुपांतर होत आलें असून, प्रसंगाप्रसंगाने विविध प्रकारचीं मतें प्रचलित झालेलीं आहेत. ह्या सर्व मतांची एका गोष्टींत एकवाक्यता आहे. ती गोष्ट म्हणजे कामकऱ्यांचें हल्लींचें पारतंत्र्य दूर करण्याचा उपाय ही होय. नवीन क्रान्तीनें उद्योगधंद्यांचीं सर्व साधनें भांडवलवाल्यांच्या हातीं गेलीं, आणि समाजांतील बहुसंख्यांक वर्गाला मजूरीशिवाय निर्वाहाचें दुसरें साधनच उरलें नाहीं. ह्या मजुरीकरितांही लोकांना भांडवलवाल्यांच्या तोंडाकडे पहावें लागत असून, ते देतील त्या रोजमुऱ्यावर संतुष्ट राहावें लागतें.

कामकऱ्यांना हें जें आर्थिक पारतंत्र्य प्राप्त झालें आहे तें नाहींसें करण्याचा उपाय एकच आहें. तो हा कीं, उद्योगधंद्यांची साधनें जमीन व कारखाने-ह्यांच्यावरील भांडवलवाल्यांची खरी मालकी काढून समाजाची मालकी ठेवली जावी व त्यांच्यापासून होणारें उत्पन्न काम करणाऱ्या मंडळींना वांटून दिले जावें. हा उपाय सामाजिक वादांतील सर्व मतांनीं सुचविलेला आहे. परंतु ह्याशिवाय इतर बाबतींत निरनिराळ्या मतांत पुष्कळ भेद आहे.

स्थूल मानानें ह्या मतांचे दोन भाग पडतात. पहिल्या भागांत हा वाद प्रथम उदयाला आल्यापासून सुमारें सन १८३० पर्यंत त्यांचें जें स्वरुप व मतें प्रचलित होतीं त्यांचा समावेश करतां येईल. ह्या काळांतील मतांवर त्याकाळीं नुकतीच घडलेली जी फ्रान्सची राज्यक्रान्ति तिच्या विचारसरणीची छाया पडलेली होती. फ्रान्सांतील राज्यक्रांन्तिकारकांप्रमाणें त्याकालच्या सामाजिकवाद्यांनाही समाजाच्या उन्नतीचे व रुपांतराचे नियम माहीत नव्हते. त्यामुळें जें परिवर्तन किंवा सुधारणा घडण्यास पुष्कळ काळ लागावयाचा, ती समाजांत एकदम घडवून आणण्याची ह्या लोकांना उमेद होती. समाजाच्या आर्थिक दशेपेक्षां नैतिक सुधारणेकडे ह्या लोकांचें लक्ष विशेष असे.

त्यांचें मत असें होतें कीं, मनुष्याचा न्यायाकडे आणि चांगल्याकडे साहजिक ओढा आहे. तेव्हां उपदेश करुन किंवा अन्य मार्गानें ह्या सद्वृत्तींना उत्तेजन दिलें असतां समाजांत वाटेल ती सुधारणा सहज घडवून आणतां येईल. म्हणून समाजाच्या भावी स्थितीचीं सर्वांगसुंदर कल्पनाचित्रें काढून तदनुरुप सुधारणा घडवून आणण्याचे प्रयत्न ह्या काळांत बरेच झाले. ह्या काळच्या मतांत दुसरा एक विशेष असा आहे कीं, मजूरांची स्थिति तोंपावेतों विशेष कष्टमय झालेली नव्हती, आणि भांडवलवाल्यांत व त्यांच्यांत जोराचा कलह सुरु झाला नव्हता. मजूर लोक स्वत: अशिक्षित व अज्ञानी असल्यानें आपलें दु:ख दूर करण्याची जाणीव किंवा सामर्थ्य त्यांस प्राप्त झालेलें नव्हतें. त्यामुळें ह्या वेळचीं मतें व उपाय मजूरांशिवाय इतर वर्गांतल्या लोकांनीं त्यांच्या विषयीं दया वाटून प्रचलित केले होते. सारांश, ह्या पूर्व भागांतलीं मतें नीतिप्रधान, कल्पनामय, अनुकंपामूलक, आणि आशापूर्ण अशीं होतीं.

अठराव्या शतकाच्या तिसऱ्या चरणांत समाजशास्त्राचें अध्ययन यूरोपांत होऊं लागून समाजाच्या उन्नतीचे नियम विचारी पुरुषांस ज्ञात होऊं लागले. डार्विन आणि स्पेन्सर ह्यांनीं विकास-वाद प्रचलित केला; व व्यक्तीप्रमाणें समाजाचा विकास सावकाश व नियमबद्ध होत असतो हें सिद्ध केलें. सामाजिक वादाच्या उत्तरभागांतल्या म्हणजे सन १८३० नंतरच्या मतांत ह्या विकास-तत्त्वांचा पूर्णपणें अवलंब केलेला आहे. पूर्वीप्रमाणें भावी समाजाची रम्य कल्पनाचित्रें न काढतां सृष्टीच्या प्रागतिक नियमांप्रमाणें समाजाची

भावी स्थिति कशी होईल व झाली पाहिजे ह्याचा विचार या काळांत होऊं लागला. एकदम सुधारणा घडवून आणण्याची आशापूर्ण वृत्ति मावळली. समाजांत स्थित्यंतर घडवून आणण्यास दीर्घकाल प्रयत्न करावा लागतो हें पटून तदनुरुप उपाय सुचविण्यांत येऊं लागले. समाजाच्या नीतीपेक्षां आर्थिकदशेला जास्त महत्त्व दिलें जाऊं लागलें, व आर्थिक सुधारणा ही सर्व सुधारणेच्या मुळाशीं आहे असें मत प्रचलित होत चाललें. सर्वांत महत्त्वाची गोष्ट ही कीं, आर्थिक सुधारणा घडवून आणण्याकरितां राजकीय सत्ता प्राप्त करुन घेतली पाहिजे हें ध्यानांत येऊन, तसे प्रयत्न सामाजिकवादी करुं लागले. ह्या काळांत मजूरांची स्थिति फार दुःखमय झाली. हळू हळू आपल्या दुःखाची त्यांस जाणीव होऊं लागलीं व आत्मोद्धारार्थ त्यांचे स्वतःचे प्रयत्न सुरु झाले. भांडवलवाल्यांचें व आपलें हित अगदीं उलट आहे असें त्यांच्या प्रत्ययाला आलें. त्यामुळें ह्या काळच्या मतांतून हल्लींच्या उद्योगपद्धतीवर कडक टीका केलेली असून, अंतःकरणाच्या संतप्त वृत्ति त्यांतून स्पष्ट दिसून येतात. मजूरांना मोठ्या जोरानें स्वावलंबन व स्वप्रयत्न ह्यांचा उपदेश होऊं लागला, व सर्व धंद्यांतील व सर्व देशांतील मजूरांनीं एकवटून आपली उन्नत्ति आपण स्वतःच घडवून आणण्याच्या दिशेनें प्रयत्न सुरु झाले. सारांश, ह्या उत्तर भागांतलीं मतें आर्थिक, विकासतत्त्वानुयायी, राजसत्ताकांक्षी, स्वावलंबनवादी, संतापमूलक आणि वर्तमान उद्योगपद्धतीचीं उन्मूलक अशीं झालीं.

वरील वर्गीकरण स्थूलमानानें केलेलें आहे. कित्येक पूर्वकालीन मतांत सुद्धां उत्तरकाळच्या मतांची छटा दिसून येते, आणि कित्येक उत्तरकाळच्या मतांत पूर्वकाळचें आशावादित्व आणि विकासनियमांचें अज्ञान दृग्गोचर होतें. तथापि सामान्यतः पाहतां जसजसा जास्त काळ लोटूं लागला, तसतसा समाजाच्या गुणधर्मांचा जास्त अनुभव व ज्ञान प्राप्त होत जाऊन, सामाजिक वादांतील मतें जास्त व्यवस्थित, शास्त्रसुद्ध, व विचारप्रधान झालीं, व त्याबरोबरच कामकऱ्यांची स्थिति शोचनीय होत गेल्यानें हीं मतें जास्त जास्त क्षोभमूलक, स्वावलंबनवादी व क्रान्तिकारक होत गेलीं.

प्रस्तुत प्रकरणांत ह्या वादाच्या फ्रान्सांतील प्रवर्तकांच्या मतांचें विवेचन केलें आहे. त्यांपैकीं पहिले दोन सेंट सायमन व फोरियर ह्यांच्या मतांचें स्वरुप पूर्वकालीन असून, दुसरे दोघे-लुई ब्लँक व प्रौढन-ह्यांचीं मतें उत्तरकालीन स्वरुपाचीं आहेत.

यूरोपांतील आधुनिक काळांतल्या बहुतेक सर्वनवीन, उदात्त, व क्रांतिकारक कल्पना फ्रान्स देशांत जन्माला आलेल्या आहेत. तेथील जनता सगळ्या यूरोपांत अत्यंत उत्साही व विकारवश असल्यानें, अशा प्रकारच्या कल्पना उत्पन्न होण्यास तेथें विशेष अनुकूलता आहे असें सांगतात. अठराव्या शतकांतली सगळ्या यूरोपला हालवून

सोडणारी राज्यक्रान्ति फ्रान्सांतच सुरु झाली. त्याचप्रमाणे पुढें विसाव्या शतकांत समाजक्रान्ति घडवून आणणारा समाजहितवाद प्रथमत: फ्रान्सांतच उदयाला आला. हा एकप्रकारचा योगायोगच म्हणावयाचा कीं, स्वतंत्रता, समानता व बंधुता ह्या तन्त्वांचा उद्धोष करणारी राज्यक्रान्ति ज्या फ्रान्स देशांत प्रथम सुरु झाली, त्यांतच ह्या तन्त्वत्रयीच्या एकांगीपणाचे दोष दूर करणारा समाजहितवाद उदयाला यावा !! पण एकप्रकारें हा सृष्टीचा क्रमच दिसतो. जेथें रोग उद्‌भवतो, तेथेंच त्याचीं शामक औषधेंही पण निर्माण होतात.

सामाजिक वादाचा आद्य फ्रेंच प्रवर्तक सेंट सायमन हा होय. त्याचा जन्म सन १७६० त एका थोर सरदार घराण्यांत झाला. त्याचें शिक्षण उत्तम प्रकारचें झालेलें असून, त्याचा स्वभाव महत्त्वाकांक्षी आणि साहसी, परंतु परोपकारप्रिय व विकारवश होता. त्याची जी एक आख्यायिका सांगतात तिच्यावरुन त्याची महत्त्वाकांक्षा व्यक्त होते. त्यानें लहान असतांनाच आपल्या हुजऱ्याला असा हुकूम देऊन ठेवला होता कीं, त्यानें रोज सकाळीं येऊन 'महाराज आपणाला जगांत थोर कार्य करावयाचें आहे याचें स्मरण असूं द्यावें' असें बजवावें. सायमनच्या या गोष्टीवरुन रोमन कॉन्सल सिपियोची आठवण होते. कार्थेज शहरचा विध्वंस करुन आल्यानंतर त्याची जी जंगी मिरवणूक रोम शहरांत काढण्यांत आली होती, तींत त्यानेंही आपणास असेंच स्मरण देण्याकरितां एक चाकर रथांत आपल्या मागें उभा केला होता; यांत त्याचा उद्देश मात्र सायमनच्या अगदीं उलट होता. हा चाकर थोड्या थोड्या वेळानें सिपियोच्या कानाशीं हळूंच म्हणे कीं, "सिपियो, हें खचित लक्षांत असूं दे कीं, तरीही तूं मर्त्य आहेस." अस्तु. सायमन आपल्या वयाच्या एकोणिसाव्या वर्षीच अमेरिकेच्या स्वतंत्रता-युद्धांत स्वयंसेवक म्हणून दाखल झाला होता. अटलांटिक व पॅसिफिक महासागर हे एका प्रचंड कालव्यानें जोडावेत (या दोन महासागरातील अंतर अंदाजें ५५०० मैल आहे) अशी एक योजना त्यानें तरुणपणींच तयार केली होती. त्याची दुसरी अशीच योजना म्हणजे स्पेनची राजधानी माद्रिद येथून समुद्रापावेतों (२१५ मैल) एक कालवा खणावयाचा ही होय. यावरुन त्याच्या कल्पनांचे नावीन्य व विशालत्व ध्यानांत येईल. या कल्पना अगदींच अव्यवहार्य किंवा स्वप्न-सृष्टींतल्या नव्हत्या, याच्या प्रमाणांत ही गोष्ट सांगितली म्हणजे पुरे कीं, पुढें लेसेप्सनें जो सुएझचा कालवा खणला त्याची प्रथम योजना सेंट सायमनच्या एका शिष्यानें तयार केली होती.

सेंट सायमनचा उत्तर काल मोठ्या दारिद्र्यात गेला. आपल्या कल्पनेप्रमाणें काहीं प्रयोग करुन पाहण्यांत त्याची सर्व संपत्ति नाहींशी झाली; व पुढें पुढें तर पूर्वीच्या एका नोकरानें दिलेल्या पैशावर त्याचा निर्वाह होत असे. मरणाच्या थोड्या काळ पूर्वी मात्र

त्यास कांहीं तरुण, विद्वान व उत्साही शिष्य मिळाले व मग त्याच्या चरितार्थाची काळजी दूर झाली.

सायमननें अनेक लहान मोठे ग्रंथ लिहून सामाजिक वादाच्या आपल्या कल्पना लोकांपुढें मांडल्या. त्यांत 'New Christianity' (नवा ख्रिस्ती धर्म) नांवाचा त्याचा ग्रंथ विशेष प्रसिद्ध आहे. सायमनच्या शिष्यांनीं आपल्याविषयीं लोकांत असलेला गैरसमज दूर करण्याकरितां सन १८३० त एक पत्रिका प्रसिद्ध केली तींत त्यांचीं सर्व मतें सारांशरुपानें दिलेलीं आहेत. म्हणून तिचा साग्र अनुवाद पुढें दिला आहे, त्याच्यावरुन त्याच्या मतांची उत्तम कल्पना होईल.

"समाजांत स्त्रियांचा दर्जा कोणता असावा व मालमत्तेची व्यवस्था कशी व्हावी, ह्याविषयीं सेंट सायमन व त्याचे अनुयायी ह्यांचीं मतें विशिष्ट प्रकारचीं आहेत. धर्म, सत्ता व स्वतंत्रता ह्याविषयींचेही त्याचे विचार अगदीं नवीन आहेत. सारांश, आजच्या महत्त्वाच्या प्रश्नांचा खल सर्व यूरोपभर इतक्या अव्यवस्थित रीतीनें व दांडगाईनें चालला आहे, त्या सर्व प्रश्नांसंबंधी त्यांचे विचार इतरांहून स्वतंत्र आहेत. पण लोक आरोप करतात त्याहून मात्र हे विचार फार निराळे आहेत.

"मालमत्ता सामवायिक असावी ह्या सिद्धांताचा अर्थ हल्लीं सामान्यत: असा करण्यांत येतो कीं, संपत्ति उत्पन्न करण्याचीं साधनें किंवा संयुक्त श्रमानें उत्पन्न झालेली संपत्ति, हिची समाजांतील सर्व व्यक्तींमध्यें सारखी वाटणी केली जावी. सायमन मतानुयायांना असला समविभाग मान्य नाहीं. त्यांच्या दृष्टीनें तो एकप्रकारचा बलात्कार व अन्याय आहे. व समाजाच्या प्रारंभीं शारीरिक बलाच्या किंवा विजयाच्या जोरावर संपत्तीची जी विषयविभागणी झालेली आहे तिच्याहूनही ह्या अन्यायाचें स्वरुप जास्त तीव्र व उद्वेगजनक आहे.

"कारण त्यांची अशी खात्री आहे कीं, समाजांतील निरनिराळ्या व्यक्तींत निसर्गत: विषमता आहे, आणि ही विषमताच मनुष्यसमाज अस्तित्वांत येण्याच्या मूळाशीं असून, समाजव्यवस्थेलाही आवश्यक आहे.

"म्हणून सामवायिक मालमत्तेची जी पद्धति हल्लीं प्रचलित होऊं पाहत आहे ती सायमनच्या अनुयायांना मान्य नाहीं. कारण ह्या पद्धतींत, ज्या नीतितत्त्वांचा व नियमांचा ते उपदेश करतात त्यांचें स्पष्ट उल्लंघन होत आहे. नीति व न्याय तर हा आहे कीं, समाजांत प्रत्येक व्यक्तीला आपल्या गुणानुरुप दर्जा व श्रमानुरुप फळ मिळावें.

" परंतु ह्या नितितत्त्वांनाच अनुसरुन सायमन-पंथाची अशी मागणी आहे कीं, हल्लीं समाजांत कित्येक व्यक्तींना जे जन्मत: कांहीं विशेष हक्क प्राप्त होतात ते झाडून सारे बंद केले जावेत. विशेषत: ह्या हक्कांतला सर्वांत मोठा व इतर सर्व हक्कांचा अंतर्भात होणारा, वारसाचा हक्क समूळ नाहींसा केला जावा. ह्या वारशाच्या हक्काचा असा परिणाम होतो की, ज्या थोड्या व्यक्तींना हा हक्क यदृच्छेनें प्राप्त होतो त्यांच्या वांट्याला समाजांतील सुखोपभोगाची सर्व साधनें जातात, आणि इतर असंख्य लोक दु:ख, अज्ञान व दारिद्य ह्यांत लोटले जातात.

" सेंट सायमनच्या अनुयायांची अशी मागणी आहे कीं जमीन, भांडवल आणि श्रमाचीं उपकरणें हीं हल्लीं समाजांतील कांहीं थोड्या व्यक्तींत वांटलीं जाऊन त्यांची खासगी मालमत्ता झालेलीं आहेत. तीं ह्यापुढें त्यांच्याकडून काढून घेऊन कामकऱ्यांच्या संयुक्त संस्थांच्या स्वाधीन करावींत, आणि त्या संस्थांनीं त्यांजपासून द्रव्य उत्पन्न करावें. ह्या संस्थांतून कामाचे असे क्रमवार दर्जे ठेवले जावेत कीं, प्रत्येकास मिळालेल्या कामावरुन त्याची योग्यता व्यक्त व्हावी आणि त्याच्या वाटणीस आलेल्या संपत्तीवरुन त्याच्या श्रमाच्या उपयुक्ततेची कल्पना व्हावी.

"खासगी मालमत्तेची प्रचलित पद्धति सर्वांगानें आक्षेपार्ह आहे असें सायमन-पंथानुयायांना वाटत नाहीं. त्यांचा आक्षेप फक्त दोनच गोष्टींवर आहे. एक, ह्या पद्धतींत कांहीं व्यक्तींना निरुद्योगिपणाचा-अर्थात् दुसऱ्यांच्या श्रमांवर निर्वाह करण्याचा-अपवित्र हक्क प्राप्त होतो. दुसरी गोष्ट ही कीं, व्यक्तींचा समाजांतला दर्जा जन्मासारख्या केवळ यदृच्छाप्राप्त आगांतुक गोष्टींवरुन ठरतो.

"ख्रिस्तीधर्मानें स्त्रियांना दास्यत्वापासून मुक्त केलें खरें, पण त्यानें समाजांतील कनिष्ट दर्जाचाच शिक्का त्यांच्या कपाळीं मारला. आजही यूरोपांतील सर्व ख्रिस्तधर्मी देशांतून राजकीय, नागरिक किंवा धर्मविषयक हक्कांना स्त्रिया पारख्या झालेल्या आहेत.

"सायमनचे अनुयायी हे स्त्रियांचें पूर्णपणें दास्यविमोचन व्हावें, त्यांची अक्षय्य बंधमुक्तता व्हावी, असें प्रतिपादन करतात. परंतु ही बंधमुक्तता करतांना ख्रिस्तीधर्मानें प्रतिपादिलेला जो पवित्र विवाहसंस्कार तो नाहींसा करण्याचा त्यांचा उद्देश नाहीं. उलट हा संस्कार अधिक सफल करावा. त्याला नवें पावित्र्य आणून द्यावें, आणि त्याच्या योगानें जें पवित्र बंधन स्त्रीपुरुषांत उत्पन्न होतें त्याचा अधिकार आणि अनुल्लंघनीयता दृढतर करावी अशी त्यांची इच्छा आहे.

"ख्रिस्ती धर्माप्रमाणें एका स्त्रीशीं एकच पुरुष विवाहबद्ध व्हावा असें त्यांचें मत आहे. परंतु त्यांचा असा उपदेश आहे कीं, वैवाहिक स्थितींत स्त्रीपुरुषांचा दर्जा सारखा असावा; आणि ज्या नैसर्गिक गुणधर्मांनीं ईश्वरानें स्त्रीजातीला अलंकृत केलें आहे त्यांस अनुसरुन पत्नीनें कुटुंब, राज्य व धर्म ह्या त्रिविध कार्यांत पतीची सहधर्मचारिणी व्हावें. ह्यायोगानें हल्लीं जें पुरुष एकटेच समाजांतील सर्व कार्यांत भाग घेतांना दृष्टीस पडतात, तें ह्यापुढें स्त्रीपुरुष उभयतांही दिसूं लागतील.

"हल्लीं विवाहाच्या नांवाखालीं जो लज्जास्पद व्यवहार चालतो, जो कायदेशीर शरीरविक्रय केला जातो, जो स्वार्थत्याग आणि लोभ, बुद्धिमत्ता आणि अज्ञान, तारुण्य आणि जरा, ह्यांचा अस्वाभाविक संयोग केला जाऊन तो पवित्र मानला जातो, त्याचें मात्र सेंट सायमनच्या पंथांत खंडन केलेलें आहे.

"ह्याप्रमाणें सायमनानुयायांच्या मतांचें स्थूल स्वरुप आहे, आणि स्त्रियांच्या सामाजिक स्थितींत व समाजांतील प्रचलित संपत्तिव्यवस्थेंत सुधारणा व्हावी अशी त्यांची मागणी आहे."

वरील पत्रिकेवरुन सेंट सायमनच्या मतांचा चांगला बोध होतो. द्रव्योत्पादनाचीं साधनें हीं समाजाच्या स्वाधीन असावींत असें तर त्याचें मत होतेंच; परंतु पुढील काळच्या सामाजिकवाद्यांप्रमाणें कामकरी व भांडवलवाले ह्यांच्यांतील परस्परविरोधावर त्यानें विशेष जोर दिलेला नाहीं. त्याचप्रमाणें अलीकडच्या सामाजिकवाद्यांनीं अंगीकारिलेली मनुष्यमात्राच्या समानत्वाची कल्पनाही त्यास मान्य नव्हती. मनुष्यें ही निसर्गतः बुद्धि, शरीरशक्ति, इत्यादि गुणांत असमान आहेत, आणि ह्या असमतेला अनुरुप अशी समाजांत अधिकारपरंपरा असावी असें त्याचें म्हणणें होतें. समाजांतले जुने सरदारांचा व धर्मोपदेशकांचा वर्ग हे निरुपयोगी व विषयलोलुप झाले असल्यानें ते मोडून टाकावेत; आणि त्यांच्या जागीं नव्या युगांतले बुद्धिमान, उद्योगदक्ष पुरुष, व विद्वान शास्त्रज्ञ ह्यांची स्थापना करुन त्यांच्याकडे समाजाचें धुरीणत्व द्यावे. त्यांपैकीं शास्त्रज्ञ हे समाजाला आध्यात्मिक विषयांत मार्ग दाखवून देतील, आणि उद्योगदक्ष विचारी पुरुष द्रव्योत्पादनाची अशी व्यवस्था करतील कीं, तेणेंकरुन सर्व समाजाला सुख मिळूं लागेल. समाजाचा मुख्य उद्देश चरितार्थाला उपयुक्त वस्तु उत्पन्न करणें हा आहे. त्यामुळें साहजिकच समाजांतील सर्व उद्योगांचें ध्येय "परस्परसाहाय्यानें पृथ्वीपासून मनुष्योपयोगी पदार्थ निर्माण करणें" हें ठरतें. म्हणून समाजाचें ध्येय आर्थिक आहे, असें सायमननें प्रतिपादिलें आहे. परंतु ईश्वराच्या अस्तित्वावर व ख्रिस्ती धर्मावर त्याचा पूर्ण विश्वास होता. तो म्हणे की, ख्रिस्ती धर्मांत सर्वांनीं परस्परांवर बंधूप्रमाणें प्रेम करावें असा

उपदेश केलेला आहे, त्याचा अर्थ हल्लींच्या युगांत मनुष्यमात्रानें आपणहून दीन, दु:खी व पंगु असलेल्यांच्या कल्याणाकरितां झटावें असा होतो. प्रचलित राज्यपद्धतीवर सायमनचा बिलकुल कटाक्ष नव्हता. फार काय, त्यानें समाजसुधारणेची आपली योजना त्या वेळचा फ्रान्सचा बादशहा अठरावा लुई ह्याजकडे पाठवून ती अमलांत आणण्याची त्यास विंनंती केली होती. असो तर. ह्याप्रमाणे असमानता, अधिकारपरंपरा, राजसत्ता-विरोध, ख्रिस्तानुयायित्व, वगैरे सायमनचे विचार सामाजिक वादांत जीं मतें नंतर सामान्यत: प्रचलित झालीं व आजलाही मान्य आहेत, त्याहून भिन्न आहेत. तरी सामाजिक वादाचा आद्यप्रर्वतक ह्या नात्यानें सायमनची योग्यता मोठी आहे. समाजाची उन्नति ही त्याच्या आर्थिक दशेवर अवलंबून आहे हें त्यानें स्पष्ट करुन दाखविलें. गरीबांच्या हीन स्थितीकडे समाजाचें लक्ष वेधिलें; प्रचलित सरदार व धर्मोपदेशक वर्ग नाहीसे करावेत असें प्रतिपादन केलें; आणि द्रव्योत्पत्तीचीं साधनें सामवायिक करण्याचा उपदेश केला. हें कार्य महत्त्वाचें असून त्यानें समाजाचें आत्मपरीक्षणाकडे लक्ष लागलें, व सामाजिक वादाच्या प्रसारास सुरुवात झाली.

## फोरियर

सेंट सायमनच्या नंतर सामाजिक वादाला फोरियरकडून चालना मिळाली. त्याचा जन्म सन १७७२ त झाला. त्याचा बाप कापडाचा मोठा व्यापारी होता, त्यामुळें फोरियरला आपलें शिक्षण संपतांच व्यापारांत पडावें लागलें. परंतु त्याची नैसर्गिक प्रवृत्ति व्यापाराकडे मुळींच नसून त्याचा स्वभावहि व्यापाराला अयोग्य होता. अगदीं लहानपणीं त्याला मालाची खरी स्थिति गिऱ्हाइकाला सांगण्याबद्दल बापाकडून चोप खावा लागला होता. पुढें एकदां तांदुळाच्या व्यापाऱ्याकडे नोकरीस असतां, दुसऱ्या गांवीं त्या व्यापाऱ्याचीं कांहीं कोठारें होतीं तीं जाळून टाकण्याचें काम त्याच्याकडे आलें. त्या वेळीं देशांत दुष्काळ पडला होता. परंतु पुढें चांगली किंमत येईल ह्या आशेनें तांदूळ न विकल्यानें तीं कोठारें सडून गेली होतीं. हा प्रकार पाहून तर फोरियरचें मन विटून गेलें आणि त्यानें व्यापारास कायमचा राजीनामा दिला. यापुढचें सर्व आयुष्य त्यानें तत्त्वचिंतनांत व ग्रंथलेखनांत घालविलें. ज्या पद्धतींत इतका व्यर्थ अपव्यय होतो तिच्या मूळांतच कांहीं मोठे दोष असले पाहिजेत, ते शोधून काढून दूर करण्याचा प्रयत्न करणें हेंच आपलें जीवितकर्तव्य आहे, अशी त्याची दृढभावना झालेली होती, आणि तिला अनुसरुन त्यानें सर्व जन्मभर अत्यंत एकाग्रतेनें परिश्रम केले. त्याच्या वृत्ति अत्यंत सात्त्विक असून, स्वीकृत कार्यावरील त्याची भक्ति अव्यभिचारी होती. त्याची विचारशक्ति मोठी दांडगी, प्रसवशील आणि स्फूर्तियुक्त होती. पण इतकें असूनहि त्याचा स्वभाव एकाद्या मुलासारखा सरळ, निष्कपट, आशापूर्ण आणि एकप्रकारें

व्यवहारज्ञानरहित होता. तो कित्येक वर्षेपर्यंत रोज दुपारीं नियमित वेळीं आपल्या खोलींतही वाट पहात असे कीं, कोणी संपत्तिमान गृहस्थ येऊन आपल्या योजनेप्रमाणें संस्था स्थापण्याला पुरेसा पैसा देईल !!

प्रथम प्रथम त्याच्या ग्रंथाकडे कोणाचेंच लक्ष गेलें नाहीं; परंतु सायमनच्या मरणानंतर त्यास कांहीं थोडे उत्साही शिष्य मिळाले व त्याच्या मतांचा प्रसार करण्याकरितां एक वर्तमानपत्रही काढण्यांत आलें. सन १८३२ त त्याच्या शिष्यांनीं कांहीं जमीन विकत घेऊन तेथें त्याच्या योजनेप्रमाणें फॅलँग करुन ते सामवायिक पद्धतीनें राहूं लागले. पण पुढें लवकरच ती संस्था मोडली, आणि नंतर सन १८३७ त फोरियरचाहि मृत्यू झाला.

सृष्टिरचनेसंबंधांत फोरियरच्या कल्पना विशिष्ट प्रकारच्या असून त्यांच्यावरच त्याची समाजसुधारणाविषयक मतें स्थापिलेलीं आहेत. सृष्टींतल्या पदार्थमात्रांत ईश्वर भरलेला असून त्यानें जें जें उत्पन्न केलें तें सर्व चांगलेंच आहे, वाईट अथवा निरुपयोगी असें ह्या विश्वांत कांहींच नाहीं. खगोलांतील प्रचंड ग्रहापासून तों सृष्टीवरील सूक्ष्मतम जंतूपावेतों ह्या विश्वांतील सर्व वस्तुमात्रांत एकप्रकारची आकर्षणशक्ति भरलेली असून, तिच्या योगानें विश्वांत एकतानतेची व स्नेहाची नैसर्गिक प्रवृत्ति आहे. व्यक्तींच्या अंत:करणांत आणि मानवी समाजांतही अशीच नैसर्गिक स्नेह-प्रवृत्ति आहे. परंतु ईश्वराचा हेतु न समजल्यामुळें त्यांचें आचरण तिच्या विरुद्ध होतें, आणि अंत:करणांत व समाजांत अव्यवस्था माजून दु:ख होते. हे दु:ख दूर करण्याचा उपाय एकच आहे. तो हा कीं, ईश्वराचा हेतु व सृष्टींतील सर्वव्यापी चांगुलपणा समजून घेऊन त्याप्रमाणें वर्तन करावें.

मानवी अंत:करणांतील सर्व भावना व वृत्ति ह्या निसर्गत: चांगल्या व सत्प्रवर्तक आहेत. परंतु मनुष्यानें अज्ञानानें त्यांपैकीं कांहींना उत्तम व कांहींना नीच ठरवून, कांहींना वृद्धिंगत व इतरांना नाहींशा करण्याचा प्रयत्न सुरु केला. त्यामुळें त्याचा स्वभाव एकांगी आणि अपूर्ण राहून, समाजांतील सर्व दु:खें उद्भवली. तीं दु:खें निर्मूल करण्यासाठीं मनुष्याचा सर्व वृत्तींचा आणि विकारांचा अनिर्बंध विकास होऊं दिला पाहिजे. असा विकास झाला असतां, ज्याप्रमाणें सर्व रंगाच्या एकीकरणापासून पांढरा रंग निर्माण होतो, त्याप्रमाणें ह्या पूर्ण विकसित वृत्तींपासून अंत:करणांत सुसंगतता, शांति आणि आनंद निर्माण होईल.

म्हणून कोणत्याही मानवी वृत्तीचें दमन न करतां सर्वांची स्वैर वाढ होऊं दिलीं पाहिजे. परंतु त्यासाठीं हल्लींची समाजव्यवस्था व सुधारणेच्या नांवाखाली चाललेला

प्रकार बंद केला पाहिजे व समाजाची पुनर्रचना झाली पाहिजे. ह्या नवीन रचनेंत समाजांतून 'फॅलँग' स्थापावें म्हणून फोरियरची सूचना होती. सामान्यत: एका 'फलँगात' ४०० कुटुंबें किंवा १८०० माणसें असावींत. त्यांना राहण्यासाठीं एक भव्य, सुंदर व सर्व सोयी असलेला वाडा-फॅलँग गृह-बांधून दिला जावा. ह्या वाड्यांत प्रत्येकाला आपापल्या आवडीप्रमाणें एकटें किंवा एकत्र राहण्याची सोय केली जावी. साधारणपणें फॅलँगमध्यें सातपासून नऊ जणांचे लहान समुदाय असावे. चोवीसपासून बत्तीस समुदायांचा एक संघ असावा. एका फॅलँगात असे आठ किंवा नऊ संघ होतील. ही फॅलँगची अंतर्रचना पूर्णपणें आकर्षण-तत्त्वानुरुप ज्याचा ज्याच्याशीं स्नेह जमेल तशी केली जावी. हींत फॅलँगगृहाला चार मैल औरस चौरस मोकळी जमीन दिली जावी. फॅलँगला लागणाऱ्या सर्व वस्तु उत्पन्न करण्याची व्यवस्था व्हावी. आर्थिक दृष्टीनें प्रत्येक फॅलँग स्वायत्त व स्वत:सिद्ध असावा, म्हणजे आवश्यक वस्तूकरितां दुसऱ्याकडे पाहण्याची त्याला जरुर पडूं नये. फॅलँगनें वरील धोरणानें आपल्या जमिनींत शेतकी आणि उद्योगधंदे सुरु करावे. खेळ व करमणुकीचीं इतर साधनें ह्यांचाही तेथें सोय करावी. उद्योगधंदे पूर्णपणें शास्त्रीय पद्धतीनें व आधुनिक शास्त्रीय शोधांचा उपयोग करुन चालवावे. फॅलँगमधून प्रत्येकाला त्याची योग्यता आणि अभिरुचि ह्याप्रमाणेंच काम वाटून दिलें जावें आणि मधूनमधून कामाचा पालट होत जावा. मनुष्याचा हा स्वभाव आहे कीं, जें काम त्यास आवडतें तें तो अत्यंत मेहनतीने व आस्थेनें करतो. दुसऱ्याहून आपण चांगले आहोंत ही इर्ष्याही मनुष्यांत स्वभावत:च असते. ह्या दोन स्वभावविशेषांचा उपयोग करुन घेतला तर कोणताही जुलूम किंवा नियंत्रण न करतां, समाजांतली सर्व कामें आनंदानें करुन घेतां येतील. जीं कांहीं धाण व किळसवाणीं कामें हल्लीं मनुष्यांना करावीं लागत आहेत, तीं पुढें शास्त्रीय शोधांच्या सहाय्यानें यंत्रांच्या द्वारें करुन घेणें मोठेंसें कठीण नाहीं.

ह्या प्रकारें 'फॅलँग' हा एक पूर्णपणें स्वेच्छानुसारी पण परस्परसहायक लोकांचा संघ होईल. ह्या संघांत व्यक्तींना समाजांत राहूनही पूर्णपणे स्वच्छंदाने वागतां येईल. व्यक्तिस्वातंत्र्य व समाजव्यवस्था ह्यांचा त्यांत अपूर्व व सुखकारक संयोग घडून येईल. स्वार्थ, द्वेष, परस्परघात, इत्यादिकांना त्या फॅलँगातून कारणच उरणार नाहीं. स्नेह व प्रेम ह्यांचेंच त्यांत साम्राज्य राहील.

फॅलँग मध्यें जो माल अथवा द्रव्य उत्पन्न होईल त्यांतून प्रथमत: प्रत्येकाला त्याच्या त्याच्या चरितार्थाला आवश्यक इतकी ठराव रकम दिली जावी. बाकी उरलेल्या रकमेचा पांचबारांश भाग कामकऱ्यांना, चारबारांश भाग भांडवलवाल्यांना, व राहिलेला तीनबारांश भाग ज्यांच्या बुद्धीचा व कौशल्याचा द्रव्योत्पत्तींत उपयोग झाला असेल त्यांनादिला जावा. कामकऱ्यांत ज्यांचें काम नित्याचें व विशेष श्रमाचें असेल त्यांना जास्त अंश दिला जावा व सुखकर कामाला सर्वांत कमी वांटा मिळावा. फॅलँगांत खासगी

मालमत्ता व खासगी भांडवल राहूं द्यावें, व आवश्यकतेप्रमाणें एकास दुसऱ्यापासून योग्य व्याजावर उसनवार रकमही घेतां यावी. फॅलँगमधून बुद्धिकौशल्य आणि योग्यता ह्यांचा अनुसार उच्चनीच भाव साहजिकच राहील; व तदनुरुप निवडणूकीनें, प्रत्येकाची अभिरुचि लक्षांत घेऊन, कामाची वाटंणी केली जावी.

स्त्रिया व मुलें ह्यांनाही फॅलँगांत आपापल्या सामर्थ्यानुरुप कामें करुन योग्य पुरस्कार मिळवितां यावा. स्त्रियांची हल्लींची परतंत्रता त्यानें साहजिकपणें नाहीशीं होईल. स्त्रीपुरुषसंयोग केवळ प्रेमानें प्रेरित होत जाईल, व स्वेंच्छेनुसार तो मोडण्याचें प्रत्येकास स्वातंत्र्य राहील.

ह्याप्रमाणें सर्व देशांतून फॅलँग स्थापन केले जावेत. प्रत्येक देशापुरता त्यांचा एक संयुक्त संघ केला जाऊन त्या संघाचा अधिपति मत-नियुक्त असावा. ह्या राष्ट्रीय संघाची एक आंतरराष्ट्रीय मालिका केली जाऊन, तिचाही मुख्याधिपति सर्वांनुमतें निवडला जावा. असें झालें असतां, सर्व पृथ्वीवर फॅलँग-संघ-मालिका निर्माण होऊन, मनुष्यांच्या विविध दु:खांचा ठावठिकाण राहणार नाहीं.

फोरियरच्या विचारांची अशी स्थूल रुपरेषा आहे. त्यांचें अव्यवहार्य स्वरुप स्पष्ट आहे. एकप्रकारची ती कल्पनासृष्टि-गंधर्वनगरी-आहे. आजपर्यंत जगाची जी प्रगति झालेली आहे ती मनोविकारांच्या नियंत्रणानें, अंतर्वृत्तींच्या संयमनानें झाली आहे. 'न जातु काम: कामानां उपभोगेन शाम्यति' कामक्रोधादि विकार हे उपभोगानें शमन न होतां उलट वृद्धिंगत होत जातात हा अबाधित अनुभव आहे. असें असून फोरियर त्यांचा स्वैर संचार होऊं द्यावा असा उपदेश करतो. त्यानें समाजांत शांतता व प्रेम पसरण्याऐवजीं 'बळी तो कान पिळी' अशी स्थिति होऊन सर्वत्र अनवस्था मात्र माजेल. फोरियरच्या मनोभावना स्वत:च्या अत्यंत उदार, सात्त्विक व उच्च असल्यानें, मनुष्याच्या अंत:करणांत क्षुद्र व स्वार्थपरवृत्तिहि असतात, व संयमन न केलें तर ह्याच क्षुद्रवृत्ति इतरांहून बळावतात, ह्या गोष्टींकडे त्याचें दुर्लक्ष झालें.

फोरियरच्या कल्पना जरी ह्याप्रमाणें पुष्कळ अंशीं अव्यवहार्य होत्या, तरी त्यांच्यापासून एक मोठें कार्य झालें. फोरियरच्या काळापावेतों राजा हा सर्व समाजाचा केंद्र मानला जाऊन, कोणतीही समाजसुधारणा किंवा पुनर्रचना ही राजापासून उद्भुत व्हावी असें सुचविण्यांत येत असे. खेडेगांव किंवा ग्रामसंस्था हें जें राष्ट्राचें बीज त्याचें महत्त्व कोणाच्याच लक्षांत आलें नव्हतें, तें फोरियरनें लक्षांत आणून दिलें. नवीन रचना करणें झाल्यास फक्त केंद्राकडेच लक्ष न देतां, प्रत्येक घटकावयवाकडेही लक्ष पुरविलें पाहिजे. किंबहुना एक एक शुद्ध घटकावयव घेऊन त्यांचा संयोग केल्यास, निर्माण

होणारा पदार्थ जास्त शुद्धस्वरुप व चिरस्थायी होतो, हें तन्त्व फोरियरनें प्रतिपादन केलें. त्याच्या फॅलँगमध्यें अलीकडे सुचविण्यांत येणाऱ्या ग्रामसंस्थांचें शुद्ध स्वरुप पाहण्यास सांपडतें. ह्या दिशेनेंच समाजांत स्थानिक व वैयक्तिक स्वातंत्र्य उपजणारें आहे. त्याच्या फॅलँगचा आकार अशा बेतानें ठेवला आहे कीं, त्यांत साधारणपणें निर्वाहाच्या साधनांची व मनोरंजनाची सोय चांगल्या प्रकारें होऊं शकते. परंतु हल्लींच्या मोठमोठ्या कारखान्यांची, किंवा जगड्व्याळ द्रव्योत्पादनाची त्यांत व्यवस्था होण्यासारखी नाहीं. आंतरराष्ट्रीय द्वेषास त्यानें जागा उरणार नाही. प्रत्येक फॅलँग स्वयंशासित व लोकसत्ताक असल्यानें राजाच्या जुलुमाचा संभव राहत नाहीं. प्रत्येक व्यक्तीला एक फॅलँग सोडून दुसरीकडे जाण्यास पूर्ण मोकळीक असल्यानें इतर प्रकारें जुलूम होण्याचाही संभव पुष्कळच कमी झालेला आहे.

अशा प्रकारें स्थानिक संस्थांच्या स्थापनेनें वैयक्तिक सुखाला व स्वातंत्र्याला कसें सहाय होईल, हें दाखवून देऊन समाजसुधारणेचा एक नवीन मार्ग फोरियरनें काढून दिला. हेंच त्याचें महत्त्वाचें कार्य होय.

## लुई ब्लँक

सेंट सायमन व फोरियर ह्यांच्या नंतर सामाजिक वादाला कांहींशी निराळी दिशा लागली. ह्या दोघांचेही विचार मुख्यत्वेंकरुन तरुण व सुशिक्षित लोकांतच प्रसार पावले होते. प्रत्यक्ष कामकऱ्यांत त्यांचा मुळींच प्रवेश झाला नव्हता. त्या विचारांप्रमाणें प्रयोग करुन पाहिले, तेही मध्यम वर्गांतील सुशिक्षित लोकांनी. पूर्वस्थितीचे अवशेष जे सरदार व धर्मोपदेशक त्यांच्यावर सेंट सायमन व फोरियर ह्यांचा विशेष कटाक्ष असे. पण नंतर हे अवशेषही नाहींसें झाले, भांडवलवाल्यांचा वजनदार वर्ग पुढें सरसावला. आणि त्यांच्यांत व कामकरी वर्गांत जोरानें घर्षण सुरु झालें. ह्या काळीं (सन १८३०) राजसत्ता ही मुख्यत्वेंकरुन भांडवलवाल्या मध्यम वर्गाच्या हातीं आली होती. त्यांच्या जाचानें वैतागून कामकऱ्यांचे दंगे फ्रान्सांत ठिकठिकाणीं होऊं लागले होते. सन १८३१ त लॉयन्स येथें असाच एक मोठा दंगा झाला. त्यात रोजगार नसल्यानें उपाशी मरणाऱ्या मजूरांचाच भरणा विशेष होता. मरायचेंच असलें तर लढून तरी मरुं आणि वांचलोंच तर पोटाला रोजगार तरी मिळवूं अशा निश्चयानें ह्या मजूरांनीं आपलें आदर्शवाक्य "काम करीत जगूं किंवा लढत मरुं" असें ठेविलें होतें. सारांश, ह्या काळापासून कामकरी लोकांत आपल्या दु:स्थितीची जाणीव होऊं लागून सामाजिक वादाच्या प्रयत्नांत त्यांचें अंग येण्यास सुरुवात झाली; समाजहितवादाचा रोंख भांडवलवाल्यांवर विशेष राहूं लागला

आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट ही कीं, सामाजिक स्थिति सुधारण्याला राजसत्तेची आवश्यकता भासूं लागून, त्या दिशेनें प्रयत्न होऊं लागले.

लुई ब्लँक हा ह्या काळचा पहिला प्रवर्तक होऊन गेला. त्याच्या काळांत पारिस हें सामाजिक वादाचें शिक्षणपीठ झालेलें असून, सर्व युरोपांतून तरुण भावी समाजसुधारक समाजरचनेच्या नवीन नवीन कल्पना ग्रहण करण्याकरतां तेथें गोळा होत असत. लुई ब्लँक हा पारिस येथें 'प्रगतिपरीक्षण' (revue du progres) नांवाचें एक वजनदार पत्र काढीत असे. ह्या पत्रांतूनच त्यानें आपला 'श्रमव्यवस्था' (Organisation du travail) नांवाचा नामांकित ग्रंथ प्रथम प्रसिद्ध केला. ह्या ग्रंथाची भाषा अत्यंत वक्तृत्वपूर्ण, ओजस्वी, आणि चित्ताकर्षक असून, प्रचलित उद्योगपद्धतीचें सारभूत तत्त्व जें स्पर्धा तिचे दुष्परिणाम त्यांत मुद्देसूद दाखविले आहेत. ह्याशिवाय समाजसुधारणेच्या कांहीं साध्या योजनाही ह्या ग्रंथांत ब्लँकनें सुचविल्या होत्या. कामकरी लोकांस हा ग्रंथ फार आवडला, व त्याच्या योगानें त्यांच्यांत पुष्कळ जागृति झाली.

लोकसत्ता आणि आर्थिक सुस्थिति ह्यांच्यावर ब्लँकनें आपल्या ग्रंथांतून विशेष जोर दिला आहे. त्यापूर्वीच्या पाश्चात्य तत्त्ववेत्त्याप्रमाणें आत्म्याच्या उन्नतीकरितां शरीराकडे किंवा भौतिक परिस्थितीकडे दुर्लक्ष केलें पाहिजे असें त्यांचें मत नव्हतें. तो म्हणे कीं, मनुष्याची खरी उन्नति होण्यास शरीर व आत्मा ह्या दोहोंचीही योग्य व समप्रमाण उन्नति झाली पाहिजे. मानवी प्रगतीचीं दोन अंगें आहेत. एक शारीरिक व दुसरें आत्मिक; किंवा एक भौतिक व दुसरें नैतिक. मनुष्यांनीं एकत्र राहून, प्रेमानें व परस्पर-सहकारितेनें ह्या दोहों अंगांनीं आपली उन्नति करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. पहिलीच्या शिवाय दुसरी उन्नति मोठ्या प्रमाणांत होणें संभवनीय नाहीं. दोन्ही उन्नति परस्पर-सहायक व परस्परपूरक आहेत. ह्यांपैकीं भौतिक उन्नति ही प्रत्यक्षत: व नैतिक उन्नति ही परंपरा या समाजाच्या आर्थिक स्थितीवर अवलंबून आहे. समाजांतील बहुसंख्याक वर्ग सुसंपन्न व सुखी असल्याशिवाय या दोन्हीपैकीं कोणतीच उन्नति घडणें शक्य नाहीं. म्हणून आर्थिक स्थितीकडे प्रथम लक्ष दिलें पाहिजे. परंतु ही आर्थिक स्थिति सुधारण्याकरितां नुसतें तात्त्विक विचार करुन किंवा किरकोळ व्यावहारिक योजना सुचवून कार्यभाग व्हावयाचा नाहीं. खरी सुधारणा घडवून आणण्यास राजकीय सत्ता पाहिजे. ह्या सत्तेशिवाय सायमन व फोरियरप्रमाणें नुसतें तत्त्वविवेचन, किंवा नुसते सामवायिक-समाज-पद्धतीचे प्रयोग हे इष्ट सुधारणा घडवून आणण्यास पंगु आहेत. राजकीय संस्था व सैन्य ह्यांच्यावर सत्ता मिळविली तरच आर्थिक स्थिति सुधारतां येईल. एक तर ती सत्ता मिळविली तरी पाहिजे, किंवा तिचा जबरदस्त विरोध तरी सहन केला पाहिजे. परंतु हा विरोध इतका सर्वसमर्थ असतो कीं, त्याच्यापुढें इतर सर्व प्रयत्न फोल

होतात. अंत:करणांत कितीही थोर विचार आले तरी हातपाय वगैरे इंद्रियांवांचून ज्याप्रमाणें कोणतेंच परोपकाराचें कृत्य घडूं शकत नाहीं, त्याप्रमाणें कल्पना कितीही योग्य व उदात्त असल्या तरी राजकीय सत्तेवांचून इष्ट सुधारणा करतां येत नाहीं. एरवीं सत्ताधारी लोक ह्या तुमच्या सर्व कल्पना मूळापासून हाणून पाडण्यास चुकणार नाहींत. म्हणून इतर सर्व प्रयत्नांच्या आधीं राजकीय सत्ता मिळविण्यास एकचित्तानें लागलें पाहिजें. आद्य साध्य तें ठेविलें पाहिजे. इतकें मात्र ध्यानांत असावें, राजकीय सत्ता ही अंतिम साध्य जी भौतिक उन्नति तिचें साधन मात्र आहे. व हें साधन जरीं अपरिहार्य व अत्यावश्यक असलें तरी त्याची किंमत साधनापेक्षां जास्त नाहीं.

राजकीय सत्ता समाजाच्या हातीं असण्याकरितां राज्यपद्धति पूर्णपणें प्रतिनिधिसत्ताक असावी, व समाजांतील प्रत्येक व्यक्तीला प्रतिनिधि निवडण्याचा हक्क असावा. हल्लींची द्रव्यप्रधान उद्योगपद्धति समाजांत अतिशय बद्धमूल झाली असून तिला राजसत्तेचें पाठबळ आहे. तेव्हां ती बदलून कामकरी बंधमुक्त होण्यास हें तिला असलेलें राजसत्तेचें पाठबळ नाहीसें झालें पाहिजे, व तें कामकरी वर्गानें स्वत:स मिळविलें पाहिजे. हल्लीं कामकऱ्यांना द्रव्य उत्पन्न करण्याचीं साधनें पाहिजे आहेत. तीं साधनें त्यांस मिळालीं म्हणजे ते आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र होतील. जेव्हां मतदानाचा अधिकार समाजांतील प्रत्येक व्यक्तीला मिळून, राजसत्ता लोकप्रतिनिधींच्या हातीं येईल, तेव्हां त्यांचें पहिलें कर्तव्य कामकऱ्यांना हीं द्रव्यसाधनें पुरविणें हें होईल. गरीबांना द्रव्योत्पत्तीचीं साधनें मिळवून देणें हेंच भावी सरकारचें-लोकप्रतिनिधींचें-मुख्य कर्तव्य होय. सरकार सर्व-जन-नियुक्त झाल्यावर त्यानें देशांतून कामकऱ्यांच्या औद्योगिक मंडळ्या स्थापन कराव्या. ब्लँकने ह्या मंडळ्यांना 'सामाजिक उद्योगस्थानें' (Social Workshop) असें नांव दिलें होतें. ह्या मंडळ्यांना यंत्रें, कच्चा माल, कारखान्याच्या इमारती, वगैरेकरितां लागणारें भांडवल प्रथम सरकारांतून पुरवावें. सरकारनेंच त्यांचे नियम करुन द्यावेत, व पहिल्या वर्षाकरितां अधिकारी निवडून द्यावेत. पण एकदां स्थापन झाल्यावर हीं उद्योगस्थानें पूर्णपणें स्वनियंत्रित असावींत. पुढें दरवर्षी त्यांनींच आपले अधिकारी निवडीत जावेत, होणाऱ्या नफ्याची आपसांत वांटणी करावी, व कारखाना पुढें चांगल्या रीतीनें चालेल अशी व्यवस्था करावी. हळू हळू अशा मंडळ्या देशांतील सर्व उद्योगधंद्यांत स्थापन हो न समाजाला आवश्यक तितका माल तयार केला जात जावा, व कांहीं थोड्या श्रीमंत भांडवलवाल्यांनाच फायदेशीर होत असलेली हल्लींची उद्योगपद्धति बंद केली जावी.

ह्या मंडळ्यांतून कारखान्याच्या उत्पन्नाची वांटणी सर्व सभासदांना सारखी केली जावी. ब्लँकचें असें म्हणणें होतें कीं, हल्लींच्या अयोग्य शिक्षणामुळें व उद्योगपद्धतीमुळें

चांगलें कसोशीनें काम करुन घेण्यासाठीं जास्त तनखा देण्याशिवाय दुसरें साधनच राहिलेलें नाहीं. परंतु हल्लींची उद्योगपद्धति बदलली, व योग्यप्रकारचें शिक्षण दिलें जाऊं लागलें, म्हणजे लोकांचे स्वभाव व विचार बदलतील; आणि प्रत्येकजण कर्तव्याच्या भावनेनें प्रेरित होऊन आपापलें काम करुं लागेल. अशा स्थितींत काम साहजिकपणें चांगलें होऊं लागेल. वस्तुत: जर कोणास ईश्वरकृपेनें उत्तम प्रतिभा किंवा बुद्धिकौशल्य प्राप्त झालें असेल, तर द्रव्याशेनें तिचा विक्रय करण्यापेक्षां, निरपेक्षपणानें समाजहितार्थ तिचा उपयोग करावा हें मनुष्यपणाला जास्त शोभेसें आहे. ही मनुष्यपणाची जाणीव योग्य शिक्षणानें उत्पन्न होईल, आणि मग बुद्धिमान असो कीं मंद असो, चतुर असो किंवा अडाणी असो, जो तो समाजहितबुद्धीनें आपल्या शक्तीप्रमाणें काम करुं लागेल; आणि आपल्या निर्वाहाला पुरेसा पुरस्कार मिळाला म्हणजे संतुष्ट राहत जाईल. मग उत्पन्नाची सारखी वांटणी होण्यांत कोणालाच वाईट वाटणार नाहीं कारण मनुष्याचा मोठेपणा हल्लींप्रमाणें संपत्तीवर अवलंबून न राहतां, ज्या मानानें तो समाजहित-समाजसेवा-करील त्यावरुन ठरविली जाऊं लागेल.

सारखी वांटणी होऊं लागली म्हणजे उद्योगधंद्यांतल्या हल्लींच्या स्पर्धेचें व भांडणाचें मूळच खुंटले, व ह्या स्पर्धेपासून होणारी अनर्थपरंपरा सहजी बंद होईल. हल्लींचें दारिद्र्य, अशांति, मनस्ताप, समाजांतील निरनिराळ्या वर्गांतले विरोध, ह्यांस जागा राहणार नाहीं; आणि सर्व लोक सुखानें नांदूं लागतील, मनुष्यमात्राची आर्थिक स्वतंत्रता पुन: कायम होईल, आणि त्या स्वतंत्रतेपासून येणाऱ्या स्वाभिमान, आत्मविश्वास, शीलवत्ता, इत्यादि गुणांच्या योगानें समाजाच्या उन्नतीस पुन: प्रारंभ होईल.

ब्लँकच्या विचारांचा सारांश ह्याप्रमाणें होता. सन १८४८ त फ्रान्स देशांत दुसरी राज्यक्रान्ति होऊन, मध्यंतरी कायम झालेली एकतंत्री राज्यपद्धति नाहींशी करण्यांत आली. ह्या क्रान्तीच्या प्रमुख पुढाऱ्यांत ब्लँक हा होता. त्याच्या वजनानें प्रतिनिधि निवडण्याचा एक हक्क देशांतील सर्व व्यक्तींना देण्यांत आला, व कामकऱ्यांचे हितासाठीं झटणें हें आपलें कर्तव्य असल्याचें सरकारनें जाहीर केलें. ह्या क्रान्तीनंतर जें तात्पुरतें अधिकारीमंडळ राज्य चालविण्याकरिता नेमण्यांत आलें त्यांत कामकरी वर्गातर्फे त्याची नेमणूक करण्यांत आली. त्याच्या सूचनेवरुन व आग्रहावरुन कांहीं "सामाजिक उद्योगस्थाने" प्रयोगादाखल स्थापन करण्यांत आलीं. परंतु पुढें निवडणूक होऊन जी प्रतिनिधि-सभा स्थापन झाली तींत कामकरी पक्षास पुरेंसें मतानुकूल्य मिळालें नाहीं, आणि ब्लँकच्या उद्योगस्थानाचा प्रयोग तितकाच राहिला.

त्यांस यावें तसें यश आलें नाहीं हें खरें; पण त्याचा दोष ब्लँकच्या योजनेकडे नसून, ज्या पद्धतीनें तो प्रयोग करुन पाहिला तिच्याकडे आहे. एक तर, हा प्रयोग करुन पाहण्याचें काम ब्लँककडे दिलें न जातां, दुसऱ्या एका अधिकाऱ्याकडे सोंपविलें गेलें. त्यामुळें कांहीं अंशीं स्वार्थामुळे, व कांहीं अंशीं अज्ञानामुळे ब्लँकच्या कांहीं मूलभूत तत्त्वांनाच रजा देण्यांत आली. उद्योगस्थानांत सामील होणाऱ्या सर्व कामकऱ्यांनीं चांगल्या वर्तनाची हमी द्यावी अशी ब्लँकची योजना होती, परंतु स्थापन झालेल्या उद्योगस्थानांत गांवगुंड, बदफैली आणि आळशी लोक सरसकट भरती करण्यांत आले. ह्यांत अधिकाऱ्यांचा दुहेरी हेतु होता. एक हा कीं, ब्लँकचा प्रयोग अव्यवहार्य ठरुन त्याची नामुष्की व्हावी; व दुसरा हा कीं, पुढेंमागें ब्लँकच्या पक्षाशीं विरोध झाला तर ह्या उद्योगस्थानांतील गांवगुंडांचा दंगा करण्यांत उपयोग व्हावा. दुसरी गोष्ट अशी कीं, उद्योगस्थानांत चालणारें सर्व उद्योग उत्पादक असावेत असा ब्लँकचा आग्रह होता, परंतु स्थापिलेल्या उद्योगस्थानांतून कित्येक अनुत्पादक धंदे चालविण्यांत येत होते. याशिवाय ह्या कामाकरितां सरकारांतून जी रकम देण्यांत आली होती तिचा बराच अंश इतर कामांतच खर्च करण्यांत आला. त्यामुळें उद्योगस्थानांना भांडवलाची टंचाई भासूं लागली. योजना मूळची कितीही चांगली असली तरी प्रयोगकर्ते अधिकारी जर प्रतिकूल असले तर तिचा कसा विपर्यास होतो ह्याचें हें उत्तम ऐतिहासिक उदाहरण आहे.

असो तर; ह्याप्रमाणें ब्लँकची योजना अनेक कारणांमुळें सफल झाली नाहीं. परंतु अशा योजनांचा प्रयोग जो पूर्वी खासगी प्रयत्नांनीं होत होता तो त्यावेळीं सरकारकडून करुन पाहण्यांत आला हें विशेष होतें. ब्लँकच्या वेळीं कांहीं थोड्या काळाकरितां कां होईना, सामाजिक पक्ष राजसत्तामंडळांत प्रथम समाविष्ट झाला; व कामकरी वर्गाचें हित हें सरकारच्या धोरणापैकीं एक मुख्य धोरण असल्याचें जाहीर झालें. ही स्थिति टिकली नाहीं हें खरें, पण अशा प्रकारचा प्रघात पडणें हें सुद्धां कमी महत्त्वाचें नव्हतें. सामाजिक वादाच्या प्रसाराला व संचालनाला त्यानें पुष्कळ उत्तेजन मिळालें आणि राजसत्ता मिळविणें हें ह्या पंथाच्या प्रधान ध्येयांपैकीं एक ध्येय बनलें.

## प्रौढन

ह्या काळाचाच सामाजिक वादाचा दुसरा मोठा प्रवर्तक प्रौढन हा होय. त्याचा जन्म सन १८०८ मध्यें एका अत्यंत गरीब कुळांत झाला. स्वत: त्याचें लहानपण गुरें चारण्यांत व अशाच प्रकारची इतर मोलमजूरी करण्यांत गेलें. परंतु पुढें त्यानें स्वपरिश्रमानें प्रथम शाळेंत व नंतर कॉलेजांत जाऊन सर्व शिक्षण संपादन केलें. तो जात्या अतिशय कुशाग्रबुद्धि व मेहनती असून धर्म, तत्त्वज्ञान व समाजशास्त्र ह्यांकडे त्याचा विशेष ओढा असे. कॉलेजचा शिक्षणक्रम संपल्यानंतर तो पॅरिस येथें येऊन

राहिला. सामाजिकवाद हा त्या काळी तेथील विचारी पुरुषांत मोठी खळबळ उडवून देत होता. प्रौढाननें त्यांतील पुढाऱ्यांचे विचार समजाऊन घेतले, व स्वतः त्या विषयीं पुष्कळ चिंतन केलें. तेव्हां तो स्वतःच त्या पंथाचा अनुयायी बनला. सन १८४० त त्यानें आपला पहिला ग्रंथ 'मालमत्ता म्हणजे काय?' (What is property) हा प्रसिद्ध केला. ह्या ग्रंथांत खासगी मालमत्तेच्या स्वरुपाची मीमांसा केली असून, शेवटीं सर्व मालमत्ता ही चोरी आहे असें सिद्ध केलें आहे. ह्या ग्रंथामुळे प्रौढनची सामाजिक वादाच्या जहाल अग्रणीत गणना होऊं लागली. सन १८४८ च्या क्रान्तीत तो मोठ्या उत्साहानें सामील झाला. त्यावेळच्या पत्रांतून त्याने आपल्या पक्षाच्या समर्थनार्थ अनेक जोरदार लेख लिहिले, व समाजरचनेच्या अत्यंत जहाल कल्पना सप्रमाण लोकांपुढें मांडल्या. त्या वेळच्या लोकप्रतिनिधि सभेंत तो एका प्रांतातर्फे निवडून आला होता. त्या सभेंत असतांना, उद्योगधंद्यांतील नफा, सावकारी व्याज, व जमीन महसूल, ह्यांच्या उत्पन्नाचा एकतृतीयांश सरकारांत कर म्हणून घेतला जावा असें एक बिल त्यानें सभेपुढें आणलें. अर्थात् तें नामंजूर झालें. पुढें आपल्या जहाल भाषणाकरितां कांहीं काळ तुरुंगवास व कांहीं काळ देशत्याग, ह्यांसारखीं संकटें सोसल्यानंतर शेवटीं सन १८६५ त ह्या समाजहितवादाच्या अत्यंत जहाल पुढाऱ्याचा अंत झाला.

प्रौढनचे समाजविषयक विचार त्याच्या ग्रंथांतून व लेखांतून इतस्ततः पसरलेले आहेत. त्याचें संगतवार विवेचन त्याने कोठेंच केलेलें नाहीं. त्याचे विचार अत्यंत पुरोगामी असून, त्यांत एकप्रकारचें नावीन्य व उज्ज्वलता आहे. त्याच्या सिद्धान्तांच्या मांडणींतही असा विरोधाभास व चटकदारपणा आहे कीं, एकदां ऐकल्यावर त्यांचा विसरच पडूं नये. कांहीं मूलभूत तत्त्वांवर प्रौढनचा दृढ विश्वास होता; आणि समाजांतील उद्योगपद्धति व सर्व आर्थिक व्यवहार त्या तत्त्वानुसार चालावेत असे तो म्हणे. न्याय, स्वातंत्र्य व समता हीं त्या तत्त्वांपैकीं मुख्य होती. समतेवर तर प्रौढनचा विशेष कटाक्ष होता, व त्याविषयींचे त्याचें मत पूर्वीच्या सामाजिकवाद्यांहून निराळें होतें. तो असें प्रतिपादन करी कीं, एका दिवसाच्या श्रमाचा मोबदला एका दिवसाच्या श्रमानेंच दिला पाहिजे. म्हणजे एका मजूरानें एक दिवसभर खपून जर एखादी वस्तु तयार केली, तर ती घेतांना तिच्या बदल्यांत, जी वस्तु करण्याला दुसऱ्या मजूराला एक दिवस लागला असेल अशीच वस्तु दिली पाहिजे. सारांश, श्रमाची, अर्थात् त्या श्रमापासून तयार झालेल्या वस्तूची किंमत तिला लागलेल्या कालावरुन ठरविली पाहिजे. उदाहरणार्थ, एक टोपी तयार करण्यास एक दिवस लागला तर तिची किंमत एक रुपया ठेवली जावी. एक पेटी करण्याला चार दिवस लागले, तर तिची किंमत चार रुपये ठेवली जावी. एक कापडाचें ठाण तयार करण्याला आठ दिवस लागले तर त्याची किंमत आठ रुपये ठेवावी. किंमतीचें प्रमाण श्रमाची कालमर्यादा होय. हल्लीं किंमत ज्या मानानें वस्तु दुर्मिळ किंवा उपयुक्त असेल त्या मानानें ठरविली जाते, हें योग्य नव्हे. वस्तुतः तिला उत्पन्न

करण्याला ज्या मानानें श्रम पडले त्या मानानें तिची किंमत ठरवावी हीच समता होय, आणि तीच न्याय्य आहे. कारण, काम करणारा अत्यंत कुशल असो किंवा अडाणी असो, दिवसभर काम करण्यांत दोघांनाही श्रम सारखेच होतात. ह्याकरितां अत्यंत कुशल व बुद्धिमान कारागीर आणि मूर्ख व अडाणी मजूर ह्या दोघांनाही श्रमाचा मोबदला सारख्याच प्रमाणानें मिळावा हेंच योग्य आहे. हे मत प्रथमदर्शनीं मोठें चत्मकारिक दिसतें; पण त्याच्या मूळाशीं अंत:करणाचा उदारपणा व एकप्रकारची कडक न्यायप्रियता आहे. दुसरी हीहि गोष्ट ध्यानांत घेतली पाहिजे कीं प्रौढनचें असेंही मत होतें कीं, योग्य शिक्षण देत गेलें तर कांहीं कालानें समाजांतील सर्व व्यक्तींची बुद्धि व कौशल्य साधारणपणें सारखें होईल.

'श्रमाचा मोबदला श्रम' हे वरील तत्त्व प्रौढनच्या मालमत्तेच्या विवेचनास आधारभूत आहे. तो म्हणतो कीं, देशांत ज्या कोणापाशीं संपत्ति अथवा मालमत्ता असते त्यांनीं ती तीन प्रकारानें मिळविली असते. कांहीं जमीनदार असतात त्यांनीं जमिनीचा महसूल घेऊन संपत्ति एकत्र केलेली असते; दुसऱ्या कांहींनीं भांडवलांवर व्याज घेऊन ती मिळविलेली असते; इतरांनीं उद्योगधंद्यांत नफा कमवून तिचा संचय केला असतो. पण ह्या तिन्ही प्रकारांत दुसऱ्याच्या श्रमांचें फल योग्य मोबदला दिल्याशिवाय घेतलेलें असतें. वस्तुत: जमीनमहसूल, नफा किंवा व्याज ही घेतांना कोणते श्रम करावे लागतात? कोणतेच नाहींत. अर्थात् हे लोक महसूल, नफा किंवा व्याजरुपानें दुसऱ्याच्या श्रमांचें फल, विना श्रम, विनामोबदला घेतात; म्हणजे एकप्रकारची चोरी किंवा लूट करतात. सांप्रत समाजांत श्रमाची किंमत कालमर्यादेवरुन न ठरवितां त्याच्या उपयुक्ततेवरुन ठरविली जाते. एका मनुष्याच्या एका दिवसाच्या श्रमाबरोबर दुसऱ्याचे चार, आठ, किंवा जास्त श्रम मानले जातात. ही विषमताच समाजांत कोणाही व्यक्तीपाशीं जी संपत्ति सांचते तिच्या मूळाशीं आहे. जर ही विषमता नाहींशी केली व विवक्षित काल केलेल्या श्रमाचा मोबदला तितक्याच काल केलेल्या श्रमानें मिळूं लागला, तर मग कोणापाशीं संपत्ति जमण्याचें साधनच उरणार नाहीं. सारांश, सर्व संपत्ति अथवा मालमत्ता ही विनाश्रमाचें फल-अर्थात् चोरी आहे.

न्याय, स्वातंत्र्य व समता ह्या तत्त्वांवर समाजाची भावी रचना व्हावी. परंतु हें परिवर्तन किंवा रुपांतर एकदम घडवून आणतां येणार नाहीं. समाजाच्या गुणधर्मांच्या दृष्टीनें असें करणें अशक्य आहे. त्यासाठीं समाजाच्या अनुकूल गुणांचा विकास करुन त्याची क्रमश: उन्नति करुन घेतली पाहिजे.

ह्या विचारसरणीनुरुप प्रौढननें सामाजिक रुपांतराचे दोन भाग केले आहेत. एक इष्ट किंवा साध्यावस्था व दुसरी संक्रमणावस्था. संक्रमणावस्थेंत महसूल, नफा व व्याज

ह्यांचे दर हळू हळू कमी करीत जावे आणि ह्याप्रमाणें मालमत्तारुप चोरीचा हक्क नाहींसा करावा. साध्यावस्थेसंबंधांत सामान्य आणि स्थूल कल्पनाच करतां येणें शक्य आहे. त्या अवस्थेंत कोणत्या तत्त्वांना अनुसरुन समाज-रचना होईल किंवा व्हावी एवढेंच दिग्दर्शन हल्लीं करतां येईल. त्या भावी अवस्थेंत मनुष्याच्या स्वभावांत व परिस्थितीत इतका बदल झालेला असेल, कीं त्याची पूर्णपणानें कल्पना करणेंही हल्लीं आपल्या शक्तीबाहेर आहे; म्हणून त्या अवस्थेसाठीं आतांच एकादी संपूर्ण योजना तयार करुन ठेवणें अप्रयोजकपणाचें आहे. स्थूलपणानें एवढी कल्पना करतां येते, व तेवढी कल्पनाच तूर्त पुरेशी आहे, कीं त्या साध्यस्थितींत मनुष्याची व्यक्तीच्या नात्यानें स्वतंत्रता व समाजाचा घटक ह्या नात्यानें नियमबद्ध परतंत्रता ह्या दोहोंचा योग्य मिलाफ होईल. समाजाची सुरक्षितता आणि व्यक्तीचें सुख ह्या दोहींकडे पूर्ण लक्ष दिलें जाईल. समाजांतील सर्व व्यक्ति स्वसंतोषानें एकत्र होऊन, श्रमविभाग आणि शास्त्रीय ज्ञान ह्यांचा योग्य उपयोग करुन, आवश्यक द्रव्य उत्पन्न करतील. स्वातंत्र्य हें ह्या स्थितींत पूर्णपणें नांदेल. कारण मनुष्यें नीतिमान व शीलसंपन्न झाल्यावर, कोणत्याच बाह्य नियंत्रणाची आवश्यकता राहणार नाहीं. मग राजसत्ता ही अनावश्यक म्हणून आपोआप नाहींशी होईल. वस्तुत: राजसत्ता, किंवा एका व्यक्तीची दुसऱ्या व्यक्तीवर कोणत्याही प्रकारची सत्ता म्हणजे जुलूम होय. समाजाच्या साध्यावस्थेंत हा जुलूम पूर्णपणें नाहींसा होईल; आणि अराजकता किंवा असत्ताकता आणि व्यवस्था किंवा नियमबद्धता हीं एकत्र नांदूं लागतील. सारांश, समाजाच्या पूर्णावस्थेंत अनियंत्रण आणि नियंत्रितता हीं एकाच वेळीं समाजांत आढळूं लागतील.

ह्याप्रमाणें प्रौढनचे विचार होते. पुढील भागांतल्या विवेचनावरुन आढळून येईल कीं, प्रौढनच्या विचारांत सामाजिक वादांतील अलीकडील सर्व मतांचे बीज दृष्टीस पडतें. बाकुनिनचा अराजक पंथ त्यांत आहे. मार्क्सची आधुनिक उद्योगपद्धतीची उपपत्ति त्यांत आहे. श्रम हेंच सर्व संपत्तीचें मूळ आहे, हें मार्क्सचें तत्त्व त्यांत आहे. म्हणूनच प्रौढनला आधुनिक सामाजिक वादाचा जनक असें कित्येक वेळां म्हणण्यांत येतें.

प्रौढननंतर सामाजिक वाद फ्रान्सांत निर्बल झाला; व पारिसहून- त्या वादाच्या नवीन कल्पनांचा प्रसार होणें बंद झालें. १८४८ च्या राज्यक्रांतीच्या उत्तरकालांत मजूर पक्षाचा जो दंगा झाला, त्यांत त्या पक्षाचे बरेच पुढारी मारले गेले, व जे उरले त्यांचा उत्साह नष्ट झाला. पुढें दुसऱ्या नेपोलियनच्या कारकीर्दीत देशाची भरभराट होऊन मजूरवर्गाचीं दु:खें अंशत: कमी झालीं. ह्या सर्व कारणांनीं सामाजिक वादाचा जोर कमी होऊन, तोंपावेतों त्या वादाचें पुढारीपण जें फ्रान्सकडे होतें तें तेथून निघून जर्मनीकडे गेलें.

जर्मन प्रवर्तकांच्या मतांचे विवेचनास लागण्यापूर्वी, या वादाच्या इंग्लंडांतील स्थितीविषयीं दोन शब्द सांगणें इष्ट आहे. फ्रान्सच्या मानानें इंग्लंडांत या वादाचा प्रसार त्या कालपावेतों फार कमी झाला होता, व त्यास इंग्लिश लोकांचा पुराणप्रिय स्वभाव हें जरी कांहीं अंशीं कारण होतें तरी मुख्य कारण इतर, आर्थिक स्वरुपाचें, होतें. औद्योगिक क्रान्तीला प्रथम प्रारंभ इंग्लंडांत झाला होता हें खरें, तथापि त्या कालापावेतों इंग्लंडला उद्योगधंद्यांत मोठासा प्रतिस्पर्धी उत्पन्न झालेला नसल्यानें, अतोनात नफा होत असे. त्यामुळें इंग्लंडांतील कामकरी वर्गाची स्थिति फ्रान्सपेक्षां बरी असून, औद्योगिक क्रान्तीचे दुष्परिणाम त्यांस विशेष तीव्रतेनें भोवूं लागले नव्हते.

## रॉबर्ट ओवेन

इंग्लंडांत या काळीं सामाजिकवादाचा पुरस्कर्ता रॉबर्ट ओवेन (सन १७७१-१८५८) म्हणून होऊन गेला. एका कापडाच्या गिरणींत त्याचा हिस्सा असून, तिची व्यवस्थाही तोच पहात असे. तेव्हां तेथील मजूरांची कष्टमय स्थिति पाहून त्याचें मन या विषयाकडे प्रथम वळलें. त्यानें प्रारंभीं आपल्या गिरणींतील मजूरांची स्थिती सुधारण्याचे प्रयत्न सुरु केले. त्यांच्यासाठीं त्यानें आपल्या खर्चानें नीटनेटकीं सोईस्कर घरें बांधून दिलीं. जवळ जवळ मूळ किंमतींत माल पुरविण्यासाठीं एक सहकारी भांडागार स्थापन करुन दिलें. त्यांच्या मुलांसाठीं शाळा उघडल्या, उपदेशानें आणि स्वतःच्या उदाहरणानें त्यानें त्यांच्यामधील दारुचें व्यसन हळू हळू नाहींसें केलें, आणि नीटनेटकेपणा व स्वच्छता वाढविली. या सर्व उपायांनीं त्याच्या गिरणींतील मजूरांची स्थिति पुष्कळच सुधारली, आणि त्यांच्यांत सुख, समाधान आणि सुबत्ता नांदूं लागली. प्रथम प्रथम या सर्व योजना ओवेन आपल्या एकट्याच्याच खर्चानें करीत असे. पण नंतर त्या जास्त विस्तृत प्रमाणावर करतां याव्या म्हणून त्यानें आपल्या मताचे कांहीं भागीदार मिळवून एक नवी गिरणी विकत घेतली. हिच्या भागीदारांनीं फक्त शेंकडा पांच टक्के नफा घेऊन बाकीची नफ्याची सर्व रकम मजूरांची स्थिति सुधारण्यासाठीं खर्च करण्याचा आपसांत करार केला होता. त्यामुळें ओवेनला आपल्या सर्व योजना अमलांत आणण्याला पुरेसा पैसा मिळूं लागला. त्याचा सुपरिणाम तेथील मजूरांचे स्थितीवरुन फारच चांगला दृष्टीस पडत असे. न्यू लॅनॅर्क येथील ओवेनच्या गिरणींतील मजूरांइतके निरोगी, स्वच्छ व नीतिमान् मजूर दुसऱ्या कोणत्या कारखान्यांत दिसत नसत. त्यांची राहणी मोठी साधी, पण नीटनेटकी, मितव्ययी, आणि सदाचारसंपन्न असे. या सुधारणांवरुन ओवेनचा मोठा लौकिक झाला, आणि त्याची न्यू लॅनॅर्कची गिरणी पाहण्यास साऱ्या इंग्लंडांतून व परदेशाहूनही यात्रा लोटूं लागली. ओवेननें याप्रमाणें मजूरांच्या स्थितीकडे समाजाचें लक्ष वेधलें, आणि कारखानदारांनीं मन घातल्यास या दिशेनें किती कार्य करतां येण्यासारखें आहे याचें उदाहरण घालून दिलें.

हा ओवेनच्या कार्याचा व्यावहारिक भाग झाला. तान्त्विक विचारांत त्याचीं मतें फोरियरशीं जुळतात. फोरियरच्या फॅलँगप्रमाणें, सुमारें १२०० माणसांची एक एक संस्था स्थापन करुन, तिला प्रत्येकीं अदमासें १५०० एकर जमीन द्यावी अशी त्याची सूचना होती. ही संस्था पूर्णपणें स्वावलंबी असावी. तिच्यांत शेतकी व इतर सर्व धंदे आधुनिक यंत्रांच्या सहाय्यानें चालवावेत, व संस्थेला आवश्यक तेवढा माल तयार करावा. संस्थेतील लोकांचें उत्पन्न व खर्च, खानपान वगैरे एकत्र—संयुक्त कुटुंबपद्धतीवर—असावें. या संस्थेंतील मुलें तीन वर्षांचीं होतांच आईबापांपासून वेगळीं ठेवावींत, व त्यांच्या शिक्षणाची सर्व व्यवस्था संस्थेनें करावी. देशांतील लोकसंख्येच्या मानानें जरुर तेवढ्या अशा संस्था हळू हळू स्थापन कराव्यात, व नंतर त्यांचे दहादहाचे किंवा शंभराशंभराचे समूह केले जावेत; व त्यांची व्यवस्था बहुमतानें केली जात जावी.

ओवेनचा शिक्षणावर, विशेषत: बालशिक्षणावर फार भर होता. तो म्हणे कीं मनुष्याचा स्वभाव, शील, बुद्धि, हीं सर्व परिस्थितीप्रमाणें बनतात. वस्तुत: मनुष्य या बाबतींत पूर्णपणें पराधीन आहे. तो ज्या परिस्थितींत जन्मास येतो व वाढतो, जी कार्यपरंपरा त्याच्या भोंवतीं सारखी घडत असते. तिचा ठसा त्याच्यावर उमटतो, किंबहुना ती परिस्थिति व कार्यपरंपराच त्याचा स्वभाव निर्माण करते. म्हणून उत्तम शील व बुद्धि निर्माण करण्याचा खात्रीचा व खरा उपाय म्हटला म्हणजे हा कीं, मनुष्याची भौतिक, नैतिक व मानसिक परिस्थिति योग्य स्वरुपाची ठेवावी; त्याच्यावर ज्या कार्यपरंपरेचा परिणाम व्हावयाचा ती सर्व दृष्टींनीं अनुकूल राहील अशी खबरदारी घ्यावी. अर्थात् त्याच्यावर योग्य संस्कार होण्याची व्यवस्था करावी, त्याला उत्तम शिक्षण द्यावें.

ओवेनच्या सूचनेप्रमाणें कांहीं संस्था खासगी प्रयत्नांनी स्थापन करण्यांत आल्या. एक स्वत: त्यानेंही अमेरिकेंत जमीन विकत घेऊन तेथें सुरु केली होती. पण अनेक प्रतिकूल कारणांनीं त्यांपैकीं कोणतीच संस्था जास्त दिवस चालली नाहीं. या संस्थांपैकीं कांहींतून ओवेननें जी विनिमयाची नवी पद्धत सुरु केली होती ती लक्षांत ठेवण्यासारखी आहे. श्रमाचें विवक्षित प्रमाण हा एकांक ठरवून, त्या मानानें निरनिराळे पदार्थ उत्पन्न करण्यास, श्रमाचे किती एकांक लागतात, हें निरीक्षणानें व अनुभवानें प्रथमत: ठरविण्यांत आलें. हे श्रमाचे एकांक म्हणजेच त्या त्या पदार्थांच्या खरेदीविक्रीची किंमत. मग हल्लींच्या चलनी नोटांप्रमाणें श्रमाचे एकांक दर्शविणारीं 'श्रमपत्रें' काढण्यांत आलीं. संस्थेंतील सर्व खरेदी-विक्री या श्रमपत्रांच्या द्वारें चाले. उदाहरणार्थ, एकानें एक पेटी तयार केली, तशी पेटी तयार करण्यास आपण पांच श्रमएकांक लागतात असें समजूं. तर पेटीच्या बदल्यांत या गृहस्थास संस्थेंतून पांचएकांक-दर्शक श्रमपत्र दिलें जाई. नंतर त्या गृहस्थाला एक टोपी विकत घ्यावीशी

वाटली. टोपीची किंमत समजा दोन एकांक आहे. तर हा गृहस्थ त्या टोपीबद्दल आपल्याजवळील पांच एकाकांपैकी दोन देऊन तीन एकांक परत घेईल. या विनिमय-पद्धतींत दोन फायदे होते. एक तर सर्व पदार्थांची किंमत एकाच प्रमाणांत, एकाच तत्त्वावर ठरविली जाई. दुसरा फायदा हा कीं, चलनी नाण्यांतला सरकारचा नफा व त्यांच्याद्वारे होणाऱ्या खरेदीविक्रींत दलालांचा मधला नफा, या सर्वांना फाटा बसून, वस्तू मूळ किंमतीला मिळे.

ओवेनच्या सुमारासच इंग्लंडांत माल्थस म्हणून एक प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ होऊन गेला. त्याचीं लोकसंख्येविषयींचीं मतें त्याकाळीं सर्वमान्य झालेलीं असून, आजलाही तीं कित्येकांना संमत आहेत. ओवेननें आपल्या ग्रंथांतून त्यांचा भ्रामकपणा सिद्ध केला आहे. मनुष्याच्या निर्वाहाचीं सर्व साधनें जमिनीपासून निर्माण होत असून, जमीन मर्यादित असल्यानें, हीं साधनेंहीं निसर्गत: मर्यादित झालेलीं आहेत. परंतु मनुष्यसंख्येची वाढ भूमितीश्रणीनें होत जात असून, तिला मर्यादा नाहीं. त्यामुळें लवकरच मनुष्यांना निर्वाहाचीं साधनें पुरेनाशीं होऊं लागतील. म्हणून माणसांनीं आत्मसंयमन करुन प्रजोत्पादन नियमित प्रमाणाबाहेर होऊं देतां कामा नये. एरवीं परस्परकलह, रोगांच्या सांथी वगैरेंनीं त्यांचा संहार होऊन त्यांची संख्या निर्वाहसाधनांच्या बेतानें राहील, किंवा असा संहार न झाल्यास सर्व लोक दारिद्र्यपीडित होऊन कोणासच सुख व शांति मिळणार नाहीं. असा माल्थसच्या मतांचा सारांश आहे. त्याविरुद्ध ओवेननें असें प्रतिपादन केलें आहे कीं, समाजांची-अर्थात् पाश्चात्य समाजांची-हल्लींची स्थिति पाहतांना तर लोकसंख्या ज्या मानानें वाढली आहे त्यापेक्षां किती तरी पटीनें संपत्तीची-निर्वाहाच्या साधनांची-यंत्रादिकानें वाढ झाली आहे. त्यामुळें हल्लीं लोकसंख्या निर्वाहाच्या साधनांहून अधिक होण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाहीं. समाजांत हल्लीं जें दारिद्र्य आहे तें लोकसंख्येच्या वाढीमुळें आलेलें नसून संपत्तीची वांटणी योग्य प्रमाणांत व यथान्याय झाली नसल्यानें आलेलें आहे. ती वांटणी योग्य रीतीनें केली म्हणजे हें सर्व दारिद्र्य दूर होईल. पृथ्वीवर लोकसंख्या अतिशय होण्याचा प्रश्न बऱ्याच काळपावेतों येणार नाहीं. जर कोणा एका देशांत मनुष्यसंख्या वाढली, तर तिच्यांतील कांहीं भाग दुसऱ्या कमी वस्तीच्या देशांत नेऊन वसवितां येईल. अशा वस्तीसाठीं पृथ्वीवरील किती तरी भाग हल्लीं वाट पाहत आहेत. हल्लीं जर असें होत नसेल, किंवा करतां येत नसेल, तर त्याचें कारण समाजाचें व राज्यकर्त्यांचें अज्ञान व कर्तृत्वशून्यत्व होय. योग्य शिक्षणानें या गुणांचा अभाव दूर करतां येईल. वस्तुत: पाहतां, मनुष्य-निर्वाहाला पृथ्वी ही कधींच अपुरी होणार नाहीं; पण जर कधीं काळीं तशी स्थिति आलीच तर त्या काळचा मनुष्यसमाज इतका उन्नत व सुसंस्कृत झालेला असेल, कीं आत्मनिर्वाहासाठीं आपणांस वाटतें त्याहून अधिक योग्य व न्याय्य उपाय तो शोधून काढील.

इंग्लंडांत सामाजिक वादाची स्थापना ओवेननेंच केली, आणि आज ह्या वादाचें Socialism म्हणून जें नांव सर्वदूर प्रचलित आहे तेंही ह्या विचारांची चर्चा करण्यासाठीं त्यानें काढलेल्या सभेंतच प्रथम रुढ झालें. परंतु या वादाचा इंग्लंडांत प्रसार होण्यास ओवेनचीं इतर धार्मिक मतें आडवीं आलीं. वस्तुत: त्याच्या इतर मतांचा व सामाजिक वादाचा प्रत्यक्ष संबंध कांहींच नव्हता. परंतु सामान्य जनता इतका सूक्ष्म भेद करीत बसत नाहीं. ओवेनचा प्रचलित ख्रिस्ती धर्मावर विश्वास नव्हता, व वैवाहिक बंधनांविषयीं तो उदासिन असे. त्यामुळें लोकांनीं त्याच्या सामाजिक वादावरही अधार्मिकतेचा व वैवाहिक अनीतीचा छाप मारला, व तीं मतें ग्रहण करण्यास ते कचरुं लागले. ओवेनच्या कार्यास त्यानें फार अडथळा आला.

## चार्टिस्ट.

ओवेनच्या प्रयत्नानें मजूरांच्या हिताचे बरेच कायदे करण्यांत आले. परंतु मजूरांना राजकीय हक्क मिळविण्याविषयीं किंवा प्रचलित राज्यपद्धतींत बदल करण्याविषयीं त्यानें चळवळ केली नाहीं. ती याच सुमारास चार्टिस्ट म्हणून जो पंथ अस्तित्वांत आला त्यानें हातीं घेतली. सन १८३२ त पार्लमेंटच्या मतदारसंघाची इंग्लंडांत पुनर्रचना करण्यांत आली. या रचनेंत कारखानदार, भांडवलवाले, वगैरे मध्यम वर्गांतील लोकांच्या हातीं सत्ता जाऊन समाजाचा तिसरा व कनिष्ठ जो कामकरी वर्ग तो अगदींच वगळण्यांत आला. तेव्हां या वर्गापैकी कांहींनीं हीं चळवळ सुरु केली. त्यांनीं आपल्या मागण्यांचा एक चार्टर किंवा खर्डा तयार केला होता. या खर्ड्यांतील मुख्य मागण्या राजकीय स्वरुपाच्या होत्या. परंतु ती चळवळ मुख्यत्वेंकरुन कामकरी वर्गाची असल्यानें साहजिकच तिचें धोरण आर्थिक सुधारणांनाही अनुलक्षून असे. सर्व संपत्ति वास्तविक कामकरी आपल्या श्रमानें उत्पन्न करतात, परंतु त्यापैंकी अगदीं अल्प—केवळ निर्वाहाला पुरेल एवढाच—अंश त्यांना मिळून, बाकीचा बहुतांश कारखानदार लाटतात. राजे, अमीरउमराव, सावकार, व्यापारी, सर्वजण या लाटलेल्या अंशावरच चैन उडवीत असतात. सारांश, कामकऱ्यांवर होत असलेला जुलूम, त्यांच्या पोटाला बसत असलेला हा चिमटा, नाहींसा झाला पाहिजे, असें चार्टिस्ट लोकांच्या आर्थिक मताचें सार होतें.

## ख्रिस्तानुयायी सामाजिकवादी.

चार्टिस्ट लोकांच्या चळवळीनें कांहीं धार्मिक व उदार लोकांचें लक्ष मजूरांच्या स्थितिकडे लागलें. मॉर्निंग क्रॉनिकल नांवाच्या पत्रानेंही याच सुमारास (सन १८४९)

एक लेखमालिका प्रसिद्ध करुन लंडन शहरांतील मजूरवर्गाच्या दारिद्र्याची आणि दुःखाची खरी कल्पना समाजाला करुन दिली. तेव्हां मॉरिस, किंग्सले, लडलो, वगैरे गृहस्थांनी आपल्या ग्रंथांच्या आणि व्याख्यानांच्या द्वारें या बाबतींत समाजांत जागृति करण्यास आरंभ केला. ते स्वतःस ख्रिस्तानुयायी सामाजिकवादी म्हणवीत. त्यांचा नैतिक व आध्यात्मिक उन्नतीवर विशेष कटाक्ष असून बायबलच्या आज्ञा मनःपूर्वक पाळल्या असतां समाजांतील सर्व दुःखें नाहींशीं होतील असें त्यांचें म्हणणें असे. किंग्सलेनें आपल्या कादंबऱ्यांच्या द्वारें या दिशेनें पुष्कळ कार्य केलें. लडलोनें सहकारी संस्था स्थापण्याचा उपक्रम केला. त्या योगानें मजूरांना परस्परसहायाचें आणि स्वावलंबनाचें शिक्षण मिळूं लागलें. ख्रिश्चन धर्माच्या तत्त्वांनाही पुनः एकप्रकारची शुद्धता व उज्ज्वलता येऊन, स्फूर्ति देण्याचें सामर्थ्य त्यांच्यांत अंशतः उत्पन्न झालें.

परंतु ओवेनचें काय किंवा चार्टिस्ट आणि ख्रिस्तानुयायी सामाजिकवाद्यांचें काय, मतप्रसाराचें कार्य फार दिवस किंवा फार नेटानें चाललें नाहीं. एकंदर परिस्थिति त्यांच्या शक्तीच्या बाहेर प्रतिकूल होती. अजून औद्योगिक क्रान्तीची पूर्णावस्था होऊन समाजाला तिच्यानंतरची दुसरी नवीन अवस्था प्राप्त होण्याचा समय पुष्कळ दूर होता. औद्योगिक क्रान्तीच्या दुष्परिणामांची तीव्रता तिला स्वतःला नष्ट करण्याइतकी प्रखर झाली नव्हती. त्यामुळें सामाजिक वादाचें बीज नीटपणें रुजलें नाहीं. आणि या वादाच्या प्रसाराचें क्षेत्र फार संकुचित राहिलें.

या (सन १८५२) नंतरचें सामाजिक वादाचें संचालन व प्रवर्तन, पूर्वी सांगितल्याप्रमाणें, जर्मन पुढाऱ्यांनीं केलें. पुढील प्रकरणांत त्याच्या विचारास लागूं.

## प्रकरण ४ थें

# सामाजिक वादाचा जर्मनींत उत्कर्ष

मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें सामाजिक वाद प्रथमत: फ्रान्स देशांत जन्मास आला. सेंट सायमन व फोरिअरनीं ह्या वादाचें बीजारोपण केलें; आणि त्यांच्या अनुयायांनीं त्याची जोपासना केली. परंतु या प्रवर्तकांचा रोख खासगी प्रयत्नानें आणि उदार उच्च भावनांच्या द्वारें समाजांत क्रान्ति घडविण्याकडे होता. त्या पुढील काळांत लुई ब्लँक आणि प्रौढननें सामाजिक वादास निराळें वळण दिलें. समाजांत जें काय परिवर्तन करावयाचें तें क्रमश: घडवून आणणेंच शक्य आहे, व त्याकरितां देशांतील राज्यव्यवस्थेला पूर्णपणें प्रजासत्ताक करुन घेतली पाहिजे, असें सायमनच्या काळानंतरचें धोरण होतें.

इंग्लंडमध्येही ह्या काळांत सामाजिक वाद अस्तित्वांत येऊन फोरियरचें कार्य ओवेन व ख्रिस्तानुयायी सामाजिकवादी ह्यांनीं केलें; लुई ब्लँकचें धोरण अंशत: चार्टिस्ट ह्यांनीं उचलिलें.

पण सुमारें १८५२ च्या सुमारास या दोन्ही देशांतून सामाजिक वादाचा जोर फार कमी झाला. यापुढें या वादांतील नवीन कल्पनांची प्रसवशक्ति जर्मनींत उत्पन्न झाली. कार्ल मार्क्स, फ्रेडरिक एंजल्स, लॅसेल आणि राडबर्टस ह्या जर्मन पुढाऱ्यांनीं मुख्यत्वेंकरुन सर्व यूरोपभर यापुढें सामाजिक वादाचा प्रसार केला. त्यांपैकीं लॅसेल हा कालानुक्रमानें सर्वांत पहिला असून जर्मनींतील सामाजिक प्रजासत्तावादी पक्ष (Social Democratic) त्यानें निर्माण केला.

## लॅसेल.

लॅसेल ह्याचा जन्म सन १८२५ त जर्मनींतील ब्रेस्लॉ गांवीं झाला. तो जातीचा ज्यू असून त्याचा बाप एक श्रीमंत व्यापारी होता, त्यामुळें लॅसेलला उत्तमप्रकारचें शिक्षण

मिळालें. त्याच्या वडिलांची इच्छा त्यानें व्यापारांत पडावें अशी होती, परंतु त्याला व्यापारापेक्षां राजनीति, तन्त्वज्ञान व इतिहास ह्यांची आवड विशेष होती.

सन १८३६ त आपलें शिक्षण संपवून व कांहीं दिवस पारीसला घालवून तो बर्लिनला आला. येथें त्याची कौंटेस हॅटफील्ड नांवाच्या बाईची ओळख झाली. ह्या बाईच्या नवऱ्याचें दुसऱ्या एका स्त्रीवर प्रेम बसल्यानें ही त्याच्यापासून बरेच दिवसांपासून विभक्त होती. हल्लीं तो आपली सर्व संपत्ति आपल्या प्रेमपात्राच्या नांवानें करुन देत असल्यामुळें ह्या बाईचें व त्याचें कोर्टांत भांडण चाललें होतें. लॅसेलच्या अंगांत विशाल बुद्धिमत्ता व विकारवशता यांच्याबरोबर अलौकिक कृत्य करण्याची हौस व लोकप्रसिद्धिची आवड हे गुण विशेष होते. त्या बाईवर मोठा जुलूम झालेला आहे ह्या भावनेनें व कांहीं अंशीं वरील स्वाभाविक प्रवृत्तीनें लॅसेलनें तिचा खटला हातीं घेतला. त्यासाठीं त्यानें कायद्याचा अभ्यास केला. छत्तीस निरनिराळ्या कोर्टांतून तो मुकदमा चालविला. आवश्यक पुरावा मिळविण्यासाठीं नाना प्रकार केले, आणि आठ वर्षें अत्यंत चिकाटीनें व मेहनतीनें काम करुन त्यानें त्या बाईच्या नवऱ्यास तिला अत्यंत अनुकूल अशा शर्तीवर आपसांत तोड करण्यास भाग पाडलें.

मध्यंतरीं १८४८ त फ्रान्सच्या राज्यक्रान्तीबरोबर जर्मनींतही त्या स्वरुपाचे कांहीं प्रयत्न झाले, परंतु ते फार लहान प्रमाणांवर आणि सर्वस्वीं विफल झाले. लॅसेलचेंही त्यांत अंग होतें; व त्यावरुन त्यास कांहीं दिवस तुरुंगांत जावें लागून, बर्लिनला येण्याचीही कांहीं वर्षें बंदी झाली.

सन १८६२ त बिस्मार्क हा प्रशियाचा मुख्य प्रधान होऊन, जर्मनीच्या लष्करी सामर्थ्यवृद्धीच्या धोरणास आरंभ झाला. लॅसेलच्या सामाजिकवादविषयक कार्यासही एव्हांपासूनच सुरवात झाली. आस्ट्रियाचें जर्मनींतील वर्चस्व फ्रान्सच्या साह्यानें नाहीसें करावें व सर्व जर्मन संस्थानांनीं एकत्र होऊन देशाचा उत्कर्ष घडवून आणावा असें त्याचेंही मत होतें, परंतु बिस्मार्कची सैन्य वाढविण्याची योजना त्यास पसंत नव्हती. तिच्या प्रतिकारार्थ त्यानें सुचविलेला उपाय इतर सर्व पक्षांहून निराळा होता. तो म्हणे, कीं देशांतील राजकारणसभेंत जरी राजा, सरदार, मध्यम वर्ग, कामकरी वर्ग वगैरे पक्ष असले तरी सैन्य राजाच्या ताब्यांत असल्यानें खरी कार्यशक्ति त्याचे हातीं असते. तेव्हां त्यास केवळ शाब्दिक वादविवादानें विरोध करणें व्यर्थ होय. अशा वेळीं विरोधाचा खरा व परिणामकारक उपाय हाच कीं, सर्व प्रतिनिधींनीं राजकारणसभा सोडून देऊन राज्यकारभारांत भाग घेणेंच बंद करावें. एरवीं तें राजसभेंत राहिल्यानें राजाच्या कृत्यांस एका प्रकारचा औपचारिक कायदेशीरपणा येतो. प्रतिनिधींनीं राजसभेंतून अंग

काढून घेतल्यावर, यूरोपांत असें एकही राष्ट्र नाहीं, कीं ज्यास ह्याप्रमाणें लोकमताच्या विरुद्ध राज्यकारभार बराच वेळ चालवितां येईल. थोड्याच वेळांत राजास निमूटपणानें प्रतिनिधींचें म्हणणें कबूल करावें लागेल.

ज्या रसाळ, प्रभावशाली, आणि अंत:करणास जाऊन भिडणाऱ्या दिव्य व्याख्यानांनीं लॅसेलनें सर्व जर्मनींतल्या कामकरी वर्गांत नवें चैतन्य उत्पन्न केलें, आणि अडाणी, अशिक्षित, अव्यवस्थित, निराशापूर्ण, कर्तव्यशून्य अशा त्यांच्या समूहांत व्यवस्थित, कार्यक्रमबद्ध आणि भावी कालांत आपल्या संघटित सामर्थ्यानें राजसत्तेसही भारी होणाऱ्या पक्षाची उभारणी केली, त्या व्याख्यानांस ह्याच सुमारास प्रारंभ झाला. लॅसेलचें बहुतक कार्य ह्या व्याख्यानांच्या द्वारेंच झालेलें आहे. त्याचा श्रोतृसमुदाय हजारांनीं मोजण्यासारखा असे. तीं चार चार तास चालत आणि केवळ बंडाळी करण्यासाठीं आलेली मंडळीही शेवटीं अत्यंत गार होऊन लॅसेलची भक्त होऊन परत जात.

ह्या व्याख्यानांतून आणि ह्याच सुमारास त्यानें प्रसिद्ध केलेल्या ग्रंथांतून लॅसेलनें आपल्या पक्षाचें ध्येय व कार्यक्रम अत्यंत स्पष्ट रीतीनें रेखाटला आहे. कामकरी वर्गाच्या प्रतिनिधींनीं पूर्वींप्रमाणें ह्या किंवा त्या पक्षांत मिसळून न जातां आपला एक स्वतंत्र पक्ष तयार करावा. ह्या पक्षाचें धोरण राजकीय तर असलेंच पाहिजे, पण त्याचा अंतिम हेतु कामकरी वर्गाची आर्थिक स्थिति सुधारण्याचा असावा. त्यासाठीं त्या पक्षानें हल्लींची रोजमुऱ्याची पद्धत बदलून कामकऱ्यांना आपल्या श्रमाचें पूर्ण फळ मिळेल अशी व्यवस्था केली पाहिजे. ही व्यवस्था कामकरी लोकांच्या औद्योगिक संस्था स्थापन करुनच होण्यासारखी आहे. पण ह्या संस्था स्थापन करण्याचेंही सामर्थ्य येण्यास कामकरीवर्गास प्रतिनिधिसभेंत मताधिक्य मिळालें पाहिजे. व तें जोंपावेतों कामकरी लोकांस प्रतिनिधि निवडण्याचा हक्क दिला जात नाहीं तोंपावेतों कधींही प्राप्त होण्याचा संभव नाहीं. म्हणून कामकरी लोकांचें पहिलें काम प्रतिनिधि निवडण्याचा हक्क मिळविण्याचें असावें. आपले सर्व प्रयत्न त्यांनीं ह्या दिशेनें एकवटून करावेंत. सारांश, समाजांतील सर्व व्यक्तींना मतदानाचा समान अधिकार मिळवून देण्याचें कामकरी पक्षानें आपलें तूर्त धोरण ठेवावें, असा लॅसेलच्या उपदेशाचा मतितार्थ होता. सहकारी पेढ्यांची पद्धति ज्यानें प्रथमत: सुरु केली तो शूल्झ डेलिशही त्याच सुमारास कामकरी लोकांची स्थिति सुधारण्याचा प्रयत्न करीत होता. पण त्याची सर्व भिस्त सहकारी पतपेढ्यांवर असून, राजकीय हक्कांविषयीं तो उदासीन होता. त्यामुळें त्याचीं मतें लॅसेलला मुळींच पसंत नसून, त्यांचा त्यानें आपल्या ग्रंथांतून ठिकठिकाणीं उपहास व खंडण केलें आहे. सन १८६३ मध्यें लॅसेलनें जर्मन कामकरी लोकांची सार्वराष्ट्रीय सभा स्थापन केली. मतदानाचा सर्वत्रिक हक्क मिळविण्याचें तिचें मुख्य ध्येय होतें. लॅसेलला ह्या सभेचा अध्यक्ष पांच वर्षाकरितां

नेमण्यांत आलें त्यामुळें त्याचें वजन पुष्कळच वाढलें. इतके दिवस तो एकटाच असून त्याच्या मताला एकाद्या सामान्य व्यक्तीच्या मताहून जास्त किंमत नव्हती. परंतु आतां त्याला शेंकडो अनुयायांचा पाठिंबा मिळून, एका वजनदार संस्थेचा प्रमुख पुढारी ह्या नात्यानें त्याच्या मतांना मान मिळूं लागला. लॅसेलच्या उत्साहानें व वक्तृत्वानें या संस्थेंची भरभराट होऊन देशांतील राजकारणांत तिचें वर्चस्व वाढण्याचा बराच संभव होता. व त्याप्रमाणें पहिल्या वर्षी लॅसेलनें एकदोन उत्साहभरित व्याख्यानें देऊन सभेला बरेच नवे अनुयायी मिळविलेही. पण त्याच्या स्वभावांतील चैनी व शृंगारप्रिय प्रवृत्तीनें त्यावेळीं पुन्हां उचल खाल्ली. त्याचें एका तरुण स्त्रीवर अत्यंत प्रेम बसलें व तिचेंही त्याच्यावर तसेंच प्रेम जडलें. पण त्या स्त्रीच्या वडिलांस ही गोष्ट पसंत न पडून जबरदस्तीनें तिचा दुसऱ्या एका गृहस्थाशीं विवाह करुन देण्यांत आला. लॅसेलला हें कळतांच तो रागानें व निराशेनें वेडा झाला, व त्यानें त्या स्त्रीच्या वडिलांस व नवऱ्यास द्वंदयुद्धास आव्हान केलें. त्याप्रमाणें लवकरच तिच्या नवऱ्याचें व त्याचें द्वंदयुद्ध होऊन दुर्भाग्यवशात् त्यांत झालेल्या जखमेनें त्याचा अंत झाला. एका अलौकिक बुद्धिमान्, कर्तृत्वशाली व लोकसंग्रह-चतुर व्यक्तीच्या आयुष्याचा अशा रीतीनें शोकदायक शेवट झाला.

लॅसेलचे बहुतेक सर्व ग्रंथ वादविवादात्मक असून कांहीं विशिष्ट प्रसंगाला अनुलक्षून लिहिलेले आहेत. त्यामुळें त्याच्या मतांचें संपूर्ण व संगतवार विवेचन कोणत्याही एका ठिकाणीं केलेलें आढळत नाहीं. अशा प्रकारचा व्यवस्थेशीर ग्रंथ लिहिण्यास त्यास अवसरच मिळाला नाहीं. परंतु सामान्यतः त्याचीं मतें कार्ल मार्क्स व राडबर्टस ह्यांच्यासारखींच आहेत. 'कामकरी लोकांचा कार्यक्रम (Working men's Programme) अनावृत्त पत्र ( the open letter) आणि बॉसियट शूल्स' हे त्याचे तीन ग्रंथ असून, त्याच्या मतांचा त्यांतून खुलासा झालेला आहे.

कामकरी लोकांच्या कार्यक्रमांत यूरोपच्या आर्थिक उन्नतीचा इतिहास दिलेला असून, लोकांच्या किंवा कामकरी वर्गाच्या हातीं सत्ता येऊन तिचा कळस होतो, हें दाखविलें आहे. मध्ययुगांत संपत्तीचें मुख्य साधन जमीन होती, व ती लष्करी नोकरीच्या शर्तीवर सरदारलोकांना वांटून दिलेली होती. त्यामुळें तत्कालीन युरोपांतील राजकारणांत त्यांचें वर्चस्व असे. आपल्याला अनुकूल असेच कायदे ते सरकारांतून करवून घेत. मोलमजूरी फार हलकी समजली जात असून, ती करणाऱ्यावर सर्वप्रकारचा जुलूम होत असे. परंतु पुढें हळू हळू व्यापार व उद्योगधंदे ह्यांची वृद्धि होऊं लागून भांडवलदारांचें वजन वाढूं लागलें. निरनिराळीं पत्रें निर्माण करण्यांत आलीं. अमेरिकेचा शोध लागला. हिंदुस्थानला जाण्याला नवीन व जवळचा समुद्रमार्ग शोधून

काढण्यांत आला. माल मोठ्या प्रमाणावर व स्वस्त निघूं लागला. नवें नवें जगभरचें गिन्हाईक मिळूं लागलें. मोठमोठे कारखाने स्थापन होऊं लागले. तेव्हां समाजांतील पूर्वीची सरंजामी पद्धत मोडली व राजकारणांतून सरदार जमीनदाराचें अंग नाहींसें झालें. पूर्वी निरनिराळ्या सरदारांत जी राजसत्ता विभागली गेली होती ती आतां एका मध्यवर्ती सरकारांत एकवटली. तींत उद्योगधंद्यांचे चालक जे भांडवलवाले त्यांच्याकडे प्रमुखत्व आलें. फ्रान्सांतील सन १७८९ ची राज्यक्रान्ति म्हणजे जुन्या जमीनदार सरदारांच्या हातून राजसत्ता जाऊन नव्या कारखानदार भांडवलवाल्यांच्या हातीं सत्ता येण्याचा प्रारंभ होय. ह्या क्रान्तींत प्रथम प्रथम स्वातंत्र्य, विश्वबंधुत्व, व व्यक्तिमात्राचें समानत्व ह्यांसारख्या उदार तन्त्वांचा घोष करण्यांत येत असून, कांहीं अंशीं त्यांचा प्रचारही करण्याचा प्रयत्न केला जात होता. परंतु लवकरच हा उत्साह थंडावला, व त्याबरोबर तात्त्विक औदार्याचा पूरही ओसरूं लागला. आणि राजसत्ता पुन: सर्व समाजाच्या हातीं न राहतां एका वर्गाच्या-भांडवलवाल्यांच्या हातीं आली. ह्या नवीन वर्गाच्या कारकीर्दीत देशांत शांतता जास्त नांदूं लागली. जीविताची व मालमत्तेची सुरक्षितता देशांत पूर्वीहून जास्त चांगली व उदार न्यायपद्धति स्थापन झाली, आणि रस्ते व सुखसोयीचीं इतर साधनें निर्माण झालीं. परंतु समाजांतील सर्व अंगांकडे या कारकीर्दीतही लक्ष दिलें जात नसें. पूर्वी जमीनदारांना अनुकूल असे कायदे होत. आतां भांडवलवाल्यांना अनुकूल असे होऊं लागले. समाजांतील प्रतिष्ठा व दर्जा संपत्तीवर कायम होऊं लागला, व संपत्तिमानालाच राजकीय हक्क प्राप्त होऊं लागले. नव्या कारकीर्दीतही समाजांतील सर्व व्यक्तींना मतदानाचा अधिकार न मिळतां ज्यांच्यापाशीं संपत्ति असेल त्यांनाच तो देण्यांत आला.

ह्या नवीन व्यापारी युगांत भांडवलवाल्याबरोबरच मजूर लोकांचा एक नवीनच पण संख्येनें फार मोठा वर्ग समाजांत निर्माण झाला होता. समाजांत त्याला मुळींच प्रतिष्ठा नसून राजकीय हक्कही त्यास कोणत्याच प्रकारचे नव्हते. अशा स्थितींत सर्व राज्यव्यवस्थेंत त्याच्या हिताकडे दुर्लक्ष किंबहुना विरोध व्हावा हें साहजिक होतें. ही स्थिति बदलण्याची स्पष्ट चिन्हें सन १८४८ च्या फ्रान्सांतील राज्यक्रान्तीनंतर दिसूं लागलीं. त्या राज्यक्रान्तींत स्थापन झालेल्या तात्पुरत्या सरकारांत एक कामकरी वर्ग होता. ह्या वेळीं कामकरी वर्गाची स्थिति सुधारणें हें सरकारचें कर्तव्य असल्याचें जगाच्या इतिहासांत प्रथमत: जाहीर करण्यांत आलें, व संपत्तीची आडकाठी न ठेवतां २१ वर्षांवरील सर्व व्यक्तींना हा मतदानाचा अधिकार देण्यांत आला. ह्या वेळींच कामकरी वर्ग हा भावी काळांत समाजांत सत्ताधारी होणार, असें जगाला जाहीर झालें. कामकरी वर्गांत व पूर्वीच्या जमीनदारांच्या किंवा भांडवलदारांच्या वर्गांत एक फार मोठा फरक आहे. देशांतील जमीन फारच मर्यादित आहे व संपत्ति प्राप्त करुन घेणें हे पुष्कळ अंशीं समाजांतील परिस्थितीवर व साधनांच्या अनुकूलतेवर अवलंबून असतें. त्यामुळें

जमीनदार होणें किंवा धनवान बनणें हें समाजांतील सर्वच व्यक्तींच्या आवांक्यातलें नसतें. परंतु कामकरी वर्गाचें तसें नाहीं. ज्याला ज्याला म्हणून समाजाच्या उपयोगीं पडण्याची इच्छा असते, त्याला कामकरी होतां येतें. म्हणून ह्या कामकरी वर्गाची व्याप्ति सर्व समाजाइतकी आहे. ह्यामुळें त्याची सत्ता ती सर्व समाजाचीच सत्ता होणारी आहे.

समाजांत कामकरी लोकांची सत्ता स्थापन होण्यास एकच मार्ग आहे व तो समाजांतील सर्व व्यक्तींना मतदानाचा अधिकार मिळणें हा होय. म्हणून कामकरी लोकांचें वर्तमान ध्येय हा हक्क मिळविणें हें असलें पाहिजें. हा हक्क मिळाल्यानें सर्व दु:खें दूर होतील किंवा समाजाची स्थिति एकदम सुधारेल अशांतला भाग नाहीं; परंतु हा हक्क असा आहे कीं, स्वतांतील दोष दूर करण्याचें त्याच्यांत सामर्थ्य आहे. समाजाचें सामवायिक हित त्यानेंच साधलें जाण्याचा संभव आहे. त्याच्या अंमलबजावणींत जरी प्रथम प्रथम चुका झाल्या तरी त्या सुधारण्याचें साधनही ह्या हक्कांतच आहे. ह्या हक्काचा दुरुपयोग होण्याचा संभव नाहीं. कारण ज्याला म्हणून किंचितही व्यवहारज्ञान आहे, त्याला अनुभवानें हें दिसून येईल कीं, समाजाची स्थिति सुधारण्यास कोणतीही एक व्यक्ति असमर्थ आहे तीस सर्व समाजाचें पाठबळ पाहिजे. समाजांतील सर्व व्यक्तींनीं संमतीनें कार्य केलें तरच सुधारणा शक्य आहे, ह्याचा प्रत्येकाला प्रत्यय येतो. व मग साहजिकच त्याप्रमाणें आचरण होऊं लागतें. असें झाल्यावर व्यक्तिस्वार्थ व समाजस्वार्थ ह्यांत विरोध राहत नाहीं, व समाजाच्या उन्नतीबरोबर व्यक्तीची उन्नती होऊं लागून समाजांत खरें खरें व्यक्तिस्वातंत्र्य नांदूं लागतें.

ह्या प्रमाणें लॅसेलनें कामकरी वर्गाचा भावी कार्यक्रम आंखला आहे. ह्या ग्रंथाच्या शेवटीं लॅसेलनें एकंदर कामकरी वर्गाला केलेला उपदेश अत्यंत उदात्त आहे. —"आतांपर्यंत केलेल्या विवरणावरुन कामकरी वर्गांत समाविष्ट होणारांचें भावी काळांत हल्लींहून अत्यंत निराळ्या प्रकारचें कर्तव्य राहील हें स्पष्ट आहे. समाजांतील शासनसत्ता व नेतृत्व आपणांकडे सोंपविण्यांत आलें आहे, आपलें ध्येय तेंच आपल्या युगाचें मुख्य ध्येय करुन देण्याचा मान आपणांस प्राप्त झाला आहे, आपलें उद्दिष्ट तेंच समाजाचें मुख्य उद्दिष्ट करुन देऊन तदनुरुप समाजाला वळण देण्याचा भार आपणावर टाकण्यांत आला आहे, या भावनेइतकी कोणतीहि भावना समाजांतील एकाद्या वर्गांत उदात्त नैतिक प्रेरणा करण्यास समर्थ नसते. कामकऱ्यांनो, समाजाला इष्ट वळण देण्याच्या ह्या उदात्त व इतिहाससंस्मरणीय कार्याचे विचार तुमच्या अंत:करणांत यापुढें घोळले पाहिजेत. जुलुमानें गांजलेल्यांचीं दुर्व्यसनें, अविचारी लोकांच्या हलकट चैनी, किंवा क्षुद्र लोकांचा छचोरपणा तुम्हांला यापुढें शोभणार नाहीं. कारण भविष्यत्‌काळाचें धर्माचें-नीतीचें-मंदिर तुमच्या भरभक्कम पायावर उभारलें जाणारें आहे."

लॅसेलचा कामकऱ्यांना हा स्वकर्तव्याविषयींचा उपदेश व त्याची सरकारच्या कर्तव्याची कल्पना हीं परस्परसंबंद्ध आहेत. त्यानें सरकारच्या कार्याची मीमांसा ही कामकरी वर्गांच्या कार्याप्रमाणेंच स्वतंत्र व नवीन प्रकारें केली आहे. त्यापूर्वीचे राजनीतिशास्त्रज्ञ समाजांतील व्यक्तींच्या स्वतंत्रतेचें व मालमत्तेचें संरक्षण करणें एवढेंच राज्यकर्त्यांचें कर्तव्य व हेतु आहे, असें प्रतिपादीत. लॅसेलला ही राज्याच्या कर्तव्याची कल्पना फारच संकुचित वाटे. तो म्हणे कीं, एकाद्या चौकीदाराप्रमाणें भांडण होऊं न देणें एवढेंच सरकारचें कर्तव्य नाहीं. त्याचें कर्तव्य ह्याहून फार विस्तृत आहे. समाजांतील व्यक्तींच्या अंगांतील सर्व गुण विकास पावतील अशी व्यवस्था करण्याचें सरकारचें कर्तव्य आहे. समाजाच्या आद्यावस्थेंत अज्ञान, दारिद्रय व कलह ह्यांचें प्राबल्य असून व्यक्तिस्वातंत्र्याचा अभाव होता. या स्वातंत्र्याचा उदय म्हणजे समाजाची सुधारणा होय. परंतु ही सुधारणा एकट्या व्यक्तीला आपापल्या बळावर घडवून आणणें अशक्य होतें, म्हणून सरकार ही संस्था निर्माण झाली. व्यक्तींना जें सामर्थ्य, स्वातंत्र्य व सुधारणा एकाएकीं संपादन करतां यावयाची नाहीं, ती संपादन करण्यास सहाय्य करणें हें सरकार ह्या संस्थेचें कर्तव्य आहे. समाजांतील व्यक्तींना सुख व संस्कृति ह्यांचा लाभ करुन द्यावा, त्यांच्या अंगांतील गुणांचा विकास करावा, त्यांना स्वातंत्र्याची जोड करुन द्यावी, आणि आपल्या आयुष्याचें अंतिमध्येय साधण्यास सहाय्य करावें हें राजाचें ध्येय आहे. सरकारच्या निरनिराळ्या अंगांनीं स्वत:च्या उन्नतीसाठीं प्रयत्न करण्यास उत्तेजन द्यावें, व त्यांचें स्वावलंबन किंवा आत्मविश्वास कमी न करतां त्यांच्या प्रयत्नाला यश येण्यासाठीं आवश्यक ती मदत करावी. लॅसेलची ही राजाच्या कर्तव्याची मीमांसा आतां बहुतेक समाजशास्त्रज्ञांना पटूं लागली आहे.

'अनावृतपत्रां'त लॅसेलनें मजूरांच्या मजूरीचे दर कसे ठरतात ह्याविषयीं अर्थशास्त्रांतील एका नवीन सिद्धांताचें प्रतिपादन केलें आहे. हा सिद्धांत म्हणजे लॅसेलच्या अर्थशास्त्रविषयक मतांची किल्ली आहे. लॅसेल म्हणतो कीं, आपल्या मजूरीचे दर ठरविणें हें मजूरांच्या हातीं नसून, ते मागणी आणि पुरवठ्याच्या अर्थशास्त्रांतील नियमाला अनुसरुन अबाधित रीतीनें ठरत असतात. सामान्यत: समाजांत मजूरांच्या राहणीचा जसा प्रघात असेल त्या मानानें त्याच्या स्वत:च्या व मुलांबाळांच्या पोषणाला आवश्यक इतकीच मजूरी मजूराला सदा मिळते. त्याहून फारशी जास्त किंवा फारशी कमी ती केव्हांहि बराच काळ राहूं शकत नाहीं. जर मजूरी वाढली तर मजूरांची तितकी सुस्थिति होते. त्यांच्यांतील लग्नांचें व जन्मांचें प्रमाण वाढतें. मृत्यू कमी होऊं लागतात, देशांत बाहेरुन मजूर येतात, मजूरांची संख्या वाढते, व संख्या वाढून मजूरीचा पुरवठा जास्त होऊं लागला म्हणजे मागणी व पुरवठ्याच्या नियमाअन्वयें तिची किंमत कमी होऊन मजूरीचे दर पडतात उलटपक्षीं जर मजूरीचे दर निर्वाहाला आवश्यक त्याहून कमी झाले तर मजूरांचे दैन्य वाढतें; मृत्यु जास्त प्रमाणांत होऊं लागतात; लोक परदेशीं जाऊं लागतात;

मजूरांची संख्या घटते, मजूरीचा पुरवठा कमी होतो आणि मजूरीचे दर वाढून पुन: पूर्वीच्या मानावर येतात. त्याप्रमाणें परिस्थिति व राहणी ह्यांच्या मानानें निर्वाहाला आवश्यक इतकेंच मजूरीचें मान राहावें, हा मजूरीचा अबाधित नियम आहे. अर्थातच या नियमामुळें कारखान्यांतील नफ्यापैकीं फारच थोडा, केवळ निर्वाहाला आवश्यक इतकाच, अंश मजूरांना मिळून बाकीचा सर्व भाग कारखान्याचे मालक जे भांडवलवाले त्यांच्या खिशांत जातो. कारखान्यांत मजूर आपल्या श्रमानें कितीही जास्त माल उत्पन्न करोत, कारखान्यांतील नफ्याचें प्रमाण कितीही वाढो, मजूरांची मजूरी जेवढीच्या तेवढीच कायम राहते व त्यांच्या श्रमाचें फळ दुसरेच गिळंकृत करुन बसतात.

अर्थशास्त्रांतले सिद्धांत किंवा नियम हे सार्वत्रिक व सार्वकालिक नसतात. एका विशिष्ट परिस्थितींत काढलेला सिद्धांत सर्व कालीं, सर्व परिस्थितींत लागू होतोच किंवा बरोबर ठरतोच असें नाहीं. लॅसेलचा वर सांगितलेला 'मजूरीचा अबाधित नियम' हा एका विशिष्ट औद्योगिक पद्धतीवरुन काढलेला होता, व तो त्या पद्धतीपुरता पूर्णपणें बरोबर होता व अजूनही आहे. ज्या वेळीं मजूरांत परस्परांत तीव्र स्पर्धा सुरु असते, उद्योगाला लागणारें भांडवल हें दुसऱ्या एका वर्गाच्या हातीं असून त्या वर्गाची सत्ता उद्योगधंद्यांत अबाधित चालत असते, सरकारची वृत्ति तटस्थ असून उद्योगधंद्यांत हात न घालण्याचें त्याचें धोरण असतें, अशा भांडवलसत्ताक औद्योगिक पद्धतीला लॅसेलचा नियम तंतोतंत लागू होतो. परंतु आज ही पूर्वीची पद्धति पुष्कळ अंशीं बदलत चालली आहे. मजूरांत शिक्षण वाढून संघ निर्माण होऊं लागले आहेत. व त्या मानानें परस्परांतील स्पर्धा कमी झाली आहे. सहकारी संस्था अस्तित्वांत येऊन मजूरांच्या मालकीचे कारखाने घातले जाऊं लागले आहेत. करखान्यासंबंधांत सरकार निरनिराळ्या प्रकारचे कायदे करावयास लागलें असून, पूर्वीची आपली तटस्थवृत्ति सोडून देत आहे. ह्या सर्व चिन्हांवरुन भांडवलसत्ताक औद्योगिक पद्धतीचा अम्मल कमी होत जात आहे. व ज्या मानानें हा अम्मल कमी होऊन नवीन परिस्थिति निर्माण होईल त्या मानानें लॅसेलचा नियम वस्तुस्थितीला लागू पडेनासा होईल हें उघड आहे.

ह्या नियमाचे दुष्परिणाम टाळण्यासाठीं लॅसेलनें स्वत:ही सहकारी संस्थांचा उपायच सुचविला आहे. मात्र ह्या संस्था केवळ गिऱ्हाइकापुरत्याच नसाव्यात असें त्याचें म्हणणें असे. गिऱ्हाइकांच्या सहकारी संस्था स्थापन झाल्यानें प्रथम प्रथम त्यांच्या सभासदांना माल स्वस्त मिळूं लागून त्यांची राहणी कांहींशी सुखाची होईल. परंतु ह्या संस्थांचा देशांत पुष्कळ प्रसार झाला व मजूरवर्गांतले व बहुतेक लोक अशा संस्थांचे सभासद झाले म्हणजे मजूरवर्गाची राहणीच सामान्यत: स्वस्त होईल व मग मजूरीचा नियम लागू पडूं लागून मजूरीचे दर त्या राहणींत निर्वाह होईल ह्या बेतानें कमी होतील. कारण, साधारण राहणीप्रमाणें निर्वाहाला पुरेल या बेतानेंच मजूरीचे दर ठरतात हें

आपण वर पाहिलेंच आहे. म्हणून नुस्त्या गिऱ्हाइकांच्या सहकारी संस्थांनीं मजूरांची स्थिति कायमची सुधारणार नाहीं. ती स्थिति सुधारण्यासाठीं मजूरांना कारखान्यांतील नफ्याचा जास्त भाग मिळूं लागला पाहिजे. व याला सर्वांत चांगला उपाय म्हणजे माल उत्पन्न करणाऱ्या सहकारी संस्था स्थापणें हा आहे. त्या उत्पादक सहकारी संस्थांत जे मजूर तेच कारखान्याचे मालक राहतील व कारखान्यांत होणारा सर्व नफा त्यांना मिळूं लागेल. त्या उत्पादक संस्थांना लागणारें भाडवल प्रथम प्रथम मजूरांपाशीं नसेल हें उघड आहे. ह्यासाठीं सरकारनें त्यांना आपल्या पतीवर कर्ज देववावें, संस्था योग्य प्रकारें चालण्यासाठीं प्राथमिक नियम करुन द्यावेत, व त्यांची अंमलबजावणी योग्य रीतीनें होते किंवा नाहीं ह्यावर देखरेख ठेवावी. पण ह्यापलीकडे सरकारनें ह्या संस्थांत दखल न देतां, त्यांतील सभासदांना त्यांची व्यवस्था ठेऊं द्यावी. जर ह्या संस्थांना कर्ज देण्यास प्रथमतः लोक तयार न झाले तर सरकारनें स्वतः मर्ज द्यावें. राजांच्या वैयक्तिक महत्त्वाकांक्षा तृप्त करण्याकरितां, किंवा भांडवलवाल्या कारखानदारांचा व्यापार वाढविण्याकरितां, सरकारानें आजपर्यंत लाखो रुपये युद्धांत उधळले आहेत, व आजही युद्धाची तयारी जय्यत ठेवण्यासाठीं भली थोरली रकम दरवर्षी खर्च होत असते. मग मजूरवर्गाची स्थिति कायमची सुधारण्यासाठीं सरकारनें त्याच्या संस्थांना कर्ज देण्यांत थोडा पैसा खर्च केला तर कोणती हरकत आहे? एकदां अशा उत्पादक संस्था स्थापन होऊन यशस्वी होऊं लागल्या म्हणजे समाजांत त्यांचा झपाट्यानें प्रसार होऊं लागेल. मग एकएका धंद्यांतील संस्थांचा संघ कायम करुन त्यांची पत संयुक्त ठेवावी व त्यांच्या नुकसानीचा विमा उतरला जावा. अशा रितीनें समाजांत उत्पादक सहकारी पतसंस्थांचे जाळें पसरलें म्हणजे हल्लींची स्पर्धा नाहींशी होईल. हल्लीं श्रमविभागाची पद्धति प्रचारांत येऊन समाजांतील व्यक्तींचे श्रम संयुक्त झालेच आहेत. त्यांना वरील संस्थांनी भांडवलाची जोड मिळेल. अशा प्रकारें समाजांतील सर्व व्यक्तींच्या संयुक्त भांडवलानें व संयुक्त श्रमानें जो माल उत्पन्न होईल तो त्याच्या त्याच्या श्रमाच्या मानानें वांटून दिला जाऊं लागला म्हणजे हल्लींची भांडवलसत्ताक उद्योगपद्धति नाहींशी होऊन समाजांतील विषमता व दु:ख नाहींसें होईल.

लॅसेलचा तिसरा ग्रंथ जो ब्रेस्टियट शूल्स त्यांत त्यानें मुख्यत्वेंकरुन सहकारी संस्थांचा उत्पादक जो शूल्स डेलिश त्याच्या मतांचे खंडण केलें आहे. प्रथमतः त्यानें अनेक ऐतिहासिक प्रमाणें देऊन समाजाची प्रगति व्यक्तीच्या प्रयत्नानें न होतां समाजाच्या संयुक्त प्रयत्नानें झाली आहे, असें सिद्ध केलें आहे. समाजाची कोणत्याही काळची विशिष्ट परिस्थिति एका व्यक्तीच्या कृत्यांचे फळ नसून, समाजांतील सर्व विद्यमान व पूर्वी होऊन गेलेल्या व्यक्तींच्या कृत्यांचें फळ असतें. ज्या आर्थिक, राजकीय व सामाजिक परिस्थितींत मनुष्य जन्माला येतो, ती बदलणें बहुतेक अंशी त्याच्या शक्तीच्या बाहेरचें असतें, व अशा रीतीनें आपल्यापूर्वी दुसऱ्यांनीं केलेल्या बऱ्या वाईट कृत्यांचें फळ त्याला

भोगावें लागतें. केत्येक वेळां राष्ट्रावर अशा आपत्ति येतात कीं, त्याबद्दल कोणाही एका व्यक्तीला किंवा सर्वांनाहि जबाबदार धरतां येत नाहीं. उदाहरणार्थ, दोन राष्ट्रांत पुष्कळ काळ स्पर्धा चालून अखेरीस युद्ध सुरु होतें; किंवा देशांत अवर्षण होऊन दुष्काळ पडतो; किंवा बराच काळ अस्वस्थता राहून शेवटीं दंगेधोपे होतात व लष्करी कायदा सुरु होतो. कित्येक वेळां देशांतील समाज-स्थितीच अशी जुलुमी असते कीं, तिला कंटाळून लोक बंड करितात. अशा प्रसंगी किंचितही दोष नसतां समाजांतील कित्येक व्यक्तींना व्यर्थ दु:ख सोसावें लागतें. अशा वेळीं सरकारनें तटस्थ वृत्ति धारण करुन, ज्याला त्याला व्यक्तिश: आपल्या दु:खमोचनाचा उपाय करण्यास लावणें म्हणजे आपल्या कर्तव्याला चुकणें हें होय. सामाजिक वादाच्या मताप्रमाणें अशा राष्ट्रीय आपत्ति शक्यतोंपावेतों येऊंच न देणें हें सरकारचें प्रथम कर्तव्य असून, योग्य प्रयत्नानंतरही आपत्ति आल्यास ज्या ज्या व्यक्तींना त्यांच्यापासून अपाय पोहोंचला असेल त्यांना साहाय करुन त्यांचे दुष्परिणाम शक्य तेवढे कमी करणें, हा सरकारच्या कर्तव्यांतला नंतरचा भाग आहे.

हल्लींची औद्योगिक पद्धति अशा राष्ट्रीय आपत्तीपैकींच एक आपत्ति आहे, असा लॅसेलच्या म्हणण्याचा भाव आहे. ही पद्धति अनेक काळापासून चालत आलेल्या कारणांचा संयुक्त परिणाम आहे. मागील इतिहास पाहतां त्यांत ह्या कारणांचा उगम आपणास दिसून येतो. थोडक्यांत हीं कारणें लॅसेलच्या मतें पुढीलप्रमाणें आहेत.

(१) कारखाने मोठ्या प्रमाणावर स्थापन होऊं लागून त्यांच्यांत श्रमविभाग सुरु झाला.

(२) जगांतील सर्व भागांत गिऱ्हाईक मिळूं लागून त्या अफाट गिऱ्हाइकांसाठीं तशाच प्रमाणांत माल उत्पन्न करण्यांत येऊं लागला.

(३) समाजांत अनिरुद्ध स्पर्धा सुरु झाली.

(४) माल उत्पन्न करण्यास लागणारीं श्रमाशिवाय इतर साधनें ही एका वर्गाच्या हातांत गेलीं.

(५) हा वर्ग श्रम करणाऱ्या कामकरी वर्गाला, मजूरीच्या अबाधित नियमाप्रमाणें ठराविक दरानें मजूरी देऊन, उत्पन्नाचा उरलेला सर्व भाग स्वत: गिळंकृत करुं लागला.

ह्या योगानें मालमत्ता ही स्वत:च्या श्रमाचें फळ न राहतां दुसऱ्यांच्या श्रमांचें अपहरण झालेली आहे. त्या पद्धतींत भूतकाळच्या श्रमाचें भांडवलांत रुपांतर होतें व तें समाजांतील एक विशिष्ट वर्ग दाबून बसतो. मग हें रुपांतर पावलेले भूतकाळचे श्रम वर्तमानकाळच्या श्रमांना मारक होतात. असली ही अन्यायमूलक, दु:खकारक, औद्योगिक पद्धति बदलून समाजांतील सर्व व्यक्तींना सुखकारक अशी पद्धति प्रचारांत आणणें हें

सामाजिक वादाचें ध्येय आहे.

वरील विवेचनावरुन लॅसेलच्या ग्रंथांतील मुख्य मुद्दे वाचकांच्या ध्यानांत आले असतील. समाजाची प्रगति ही व्यक्तिविशिष्टाच्या प्रयत्नांवर अवलंबून नसल्याबद्दलचा त्याचा सिद्धांत हा कांहींसा एकांगी आहे. त्याचप्रमाणें परिस्थिति बदलणें किंवा राष्ट्रीय आपत्ति टाळणें हें व्यक्तींच्या शक्तीच्या बाहेर आहे हें त्याचें प्रतिपादन म्हणजे प्रारब्ध व प्रयत्न यांच्यांतील वादाप्रमाणें एकपक्षी आहे. मनुष्य ज्या परिस्थितींत जन्मास येतो ती परिस्थिति किंवा त्याच्या आयुष्यांत राष्ट्रावर ओढवणारे विविध प्रसंग हे जरी पुष्कळदां त्याच्या आवाक्याबाहेर असतात, तरी त्याच्या स्वत:चें ।शापयश किंवा सुखदु:ख हें बहुतांशीं प्रामाणिकपणा, मितव्यय, सततोद्योग इत्यादि त्याच्या स्वत:च्या सद्‌गुणांवर अवलंबून असतें हें कोणालाही नाकबूल करतां येणार नाहीं. कामकरी वर्गाच्या आर्थिक सुधारणेकरितां त्यानें सरकारच्या पतीवर कामकरी वर्गाच्या उत्पादक संस्था काढाव्यात हा उपाय त्यानें सुचविला होता. हा उपाय अजून प्रत्यक्ष व्यवहारांत करुन पाहण्यांत आला नाहीं, परंतु तत्त्वत: त्यांत दोष दिसत नाहीं. तथापि मजूरवर्गाची परिस्थिति सुधारण्याला हाच एक उपाय आहे, असें मात्र नाहीं. शूल्स डेलिशनें कामकरी वर्गानें सरकारचा मदत न घेतां स्वत:च्या हिंमतीवर ग्राहक–सहकारी संस्था काढाव्यात म्हणून अत्यंत प्रयत्न केले. लॅसेलनें त्यांचा उपहास केला होता, पण त्या संस्था आतां सर्व जगभर पसरल्या असून त्यांच्या योगानें मजूरवर्गाची स्थिति अत्यंत सुधारली आहे. स्वत: शूल्झ डेलिशचें ह्या सहकारी संस्था सदा ग्राहकांच्या असाव्यात असें मत नव्हतें. परंतु प्रारंभीं प्रारंभीं अशा गिऱ्हाइकांच्या संस्था स्थापणें जास्त सोयीचें असतें म्हणून प्रथम त्या स्थापन करुन मग हळू हळू त्यांचा विस्तार करावा, व नंतर साधनें अनुकूल होत जातील त्याप्रमाणें उत्पादक वगैरे इतर संस्था काढाव्यात, असें त्याचें म्हणणें होतें. लॅसेलमध्यें व त्याच्यांत मुख्य मतभेद या संस्थांचें भांडवल सरकारनें पुरवावें, किंवा त्यांनींच स्वत: आपल्या प्रयत्नानें उभारावें ह्याविषयीं होता. व शूल्झच्या संस्थांना जें विलक्षण यश आजला आलें आहे त्यावरुन त्याचें मत चुकीचें नव्हतें एवढें तरी स्पष्ट होतें.

परंतु हा वाद म्हणजे लॅसेलच्या ग्रंथांतील गौण भाग आहे. त्याची मुख्य शिकवण निराळी आहे. समाजांतील सर्व व्यक्तींना मतदानाचा अधिकार दिला जाऊन खरी लोकसत्ता स्थापन केली जावी, अशी ही शिकवण आहे. राजाचा हेतु केवळ लोकांच्या जीविताचें व मालमत्तेचें संरक्षण करणें एवढेंच नाहीं. ह्या राजकीय हेतूला नैतिक हेतूची जोड दिली म्हणजे राजाचें कर्तव्य पूर्ण होतें. व्यक्तींच्या कल्याणाविषयीं, नीतिमत्तेविषयीं व प्रगतीविषयीं राज्यांतून व्यवस्था झाली पाहिजे. ह्यासाठीं हल्लीं व्यक्तींना जें आर्थिक पारतंत्र्य आलें आहे तें सरकारनें प्रथम नाहींसें केलें पाहिजे. त्याला एकच उपाय असून, तो हल्लींची औद्योगिक पद्धति नाहींशी करणें हा होय. ह्या सर्व

शिकवणीपैकीं राजाच्या कर्तव्याबद्दलची लॅसेलची व्यापक कल्पना ही सारभूत असून ती आतां सर्वसंमत झाली आहे.

## रॉडबर्टस

लॅसेलसारखींच पुष्कळ अंशीं मतें असलेला समाजहितवादाचा दुसरा पुढारी रॉडबर्टस हा होय. त्याचा जन्म इ. स. १८०५ त झाला. त्याचा बाप एका युनिव्हर्सिटींत प्रोफेसर असून साधारणपणें बऱ्या स्थितींत होता. स्वत: रॉडबर्टस ह्यानें कायद्याचा अभ्यास केलेला असून तो वकिली करीत असे. इ. स. १८४८ च्या राज्यक्रांतीनंतर प्रशियांत जें प्रातिनिधिक राज्याधिकार मंडळ थोडा काळ स्थापन झालें त्यांत तो कांहीं दिवस एका खात्याचा मंत्रीहि राहिला. पण पुढें त्यानें व्यावहारिक राजकारणांतून आपलें अंग काढून घेऊन राहिलेलें आयुष्य ग्रंथलेखनांत व चिंतनांत घालविलें. इ.स. १८७५ त त्याचा मृत्यु झाला.

रॉडबर्टस ह्याचीं मतें पुष्कळ अंशीं लॅसेलसारखीं होतीं; परंतु त्याचा स्वभाव शांत व एकांतप्रिय असून चळवळीचा त्यास कंटाळा असे. समाजांत सुधारणा करावयाची ती जबरदस्तीनें किंवा एकदम क्रान्ति करुन होण्यासारखी नसून ती हळू हळू शांतपणानें लोकांना शिक्षण मिळून झाली पाहिजे असें त्याचें मत असे. त्याला जर्मन राष्ट्राचा अभिमान वाटे व त्या वेळीं नुक्त्याच उदय पावलेल्या साम्राज्यापासून जगांत मोठें कार्य होईल असा भरंवसा वाटे. तत्त्वत: सामाजिक वादाच्या मतांना अनुसरुन समाजांत लोकसत्ता स्थापन करतां येईल हें त्याला मान्य होतें. पण स्वत: त्याचा ओढा वैयक्तिक राज्यपद्धतीकडे असून, जर्मनीच्या बादशहानें स्वत: पुढारी होऊन सर्व इष्ट समाजसुधारणा घडवून आणाव्यात अशी त्याची इच्छा असे.

रॉडबर्टस ह्याच्या मतें पदार्थाच्या किंमतीचें कारण श्रम असून, ती मोजण्याचें साधनहि श्रम आहेत. समाजांत ज्याला भांडवल म्हणतात तें सर्व श्रमाचेंच फळ आहे. म्हणून मजूरांना भांडवलांतून मजूरी दिली जाते हें म्हणणें चुकीचें आहे. वास्तविक मजूरांच्या पूर्वीच्या व हल्लीच्या श्रमानें जें उत्पन्न झालें त्यांतून त्यांच्या पदरांत पाडलेल्या हिश्याचें नांव मजूरी होय.

समाजांत जमीन व भांडवल हीं एका वर्गाच्या हातांत गेल्यानें कामकरी वर्गाची स्थिति असह्य झाली आहे. त्यांच्या स्वत:च्या श्रमानें उत्पन्न झालेल्या द्रव्यापैकीं फारच थोडा अंश मजूरीच्या रुपानें त्यांच्या हिश्यास येतो. त्यांच्यांत आपसांत स्पर्धा असल्यानें जमीन व भांडवलाचे मालक निर्वाहाला आवश्यक ह्याहून जास्त मजूरी त्यांना केव्हांच देत

नाहींत. हाच मजूरीचा अबाधित नियम होय. पण ह्याचा परिणाम कालांतरानें सर्व समाजावर होऊन दारिद्य व आर्थिक आपत्ति ओढवतात. देशांतील कारखान्यांतून जास्त जास्त माल उत्पन्न होऊं लागतो, परंतु देशांतील बराच मोठा भाग कामकरी लोकांचा असून मालाचें गिऱ्हाइकही तोच असतो. पण वर सांगितलेल्या नियमाला अनुसरुन त्याची मजूरी पूर्वीइतकीच कायम राहत असल्यानें माल विकत घेण्याचें त्याचें सामर्थ्य वाढत नसतें. ह्याप्रमाणें देशात उत्पन्न होणाऱ्या मालाचें प्रमाण वाढत असतें, पण गिऱ्हाइकाचें विकत घेण्याचें सामर्थ्य पूर्वीचेंच कायम राहतें. अर्थातच त्याचा परिणाम माल शिल्लक पडून राहण्यांत होतो, व पुढेंमागें कारखाने बंद करावे लागतात. बेरोजगारी वाढते व मजूरांच्या पूर्वीच्या आपत्तींत आणखी भर पडते. देशांतील बऱ्याच मोठ्या भागाला केवळ निर्वाहाला आवश्यक इतकेंच उत्पन्न सदा मिळत राहिल्यानें दारिद्र्यांतून डोकें वर काढण्याची त्याला संधिच मिळत नाहीं. कांहीं मोजक्या भांडवलदारांपाशीं संपत्ति रगड सांचते, परंतु संसाराला, आवश्यक लागणाऱ्या वस्तूंचा खप त्या मानानें त्यांच्यांत वाढणें शक्य नसतें. म्हणून आवश्यक वस्तूंची गिऱ्हाइकी त्या योगानें फारशी वाढूं शकत नाहीं. आवश्यक पदार्थ घेऊन उरलेला पैसा श्रीमंत भांडवलवाले चैनीच्या पदार्थांवर उधळूं लागतात, व त्याची पैदासवारी मात्र समाजांत वाढूं लागते.

समाजाच्या उन्नतींत तीन अवस्था आहेत असें राडबर्टसचें मत होतें. पहिल्या अवस्थेंत मनुष्यही एकप्रकारची मालमत्ता मानली जात असे. हा फार जुना दास्यत्वाचा काळ. दुसऱ्या अवस्थेंत मनुष्यरुपी मालमत्ता नाहींशी झाली व वैयक्तिक खासगी मालमत्ता अस्तित्वांत येऊन जमीन व भांडवल हीं एका वर्गाची खासगी मालमत्ता बनलीं. हा वर्तमानकाळ. तिसऱ्या अवस्थेंत जमीन व भांडवल ह्यांच्यावर समाजाची मालकी राहील; श्रम व योग्यता ह्यांच्यावर प्रत्येक व्यक्तीची खासगी मालमत्ता अवलंबून राहील. हा भविष्यत् काळ यावयास अजून पुष्कळ अवकाश आहे.

आम्हीं वर सांगितलेंच कीं, समाजांत एकदम क्रान्ति घडवून आणणें रॉडबर्टसला इष्ट वाटत नव्हतें. जमीनदार व भांडवलवाले ह्यांचे हल्लींचें सर्व हक्क एकदम काढून घेऊं नयेत असें तो म्हणे. हल्लीं त्यांना जें उत्पन्न मिळत असेल तें तसेंच त्यांना पुढेंही मिळण्याची सरकारनें व्यवस्था करावी. मात्र जमीन व कारखाने हे सर्व सरकारनें आपल्या मालकीखालीं घेऊन स्वतःच्या देखरेखीखालीं द्रव्यार्जन सुरु करावें व मालाच्या उत्पन्नांतून जमीनदार व पूर्वीचे भांडवलवाले ह्यांची ठरीव रकम देऊन बाकीचा भाग कामकऱ्यांना वांटून देत जावा. अर्थातच मालाचें उत्पन्न वाढतें असल्यानें कामकऱ्यांना दिवसेंदिवस जास्त रक्कम मिळूं लागेल व त्यांची स्थिति सुधारत जाईल.

ह्याप्रमाणें रॉडबर्टसच्या मतांचा सारांश आहे. शास्त्रशुद्ध रीतीनें त्यानें

सामाजिक वादाची आपल्या ग्रंथांतून मीमांसा केली आहे, त्यामुळें त्याला कित्येक जण 'शास्त्रीय सामाजिक वादाचा' जनक म्हणून मानतात. लॅसेलसारखें व्यावहारिक कार्य त्याच्या हातून झालें नाहीं, पण त्याच्या मतांचा व ग्रंथांचा तत्कालीन सामाजिकवाद्यांवर पुष्कळ परिणाम झाला. ह्या दोहोंतूनही फार मोठें तात्त्विक व व्यावहारिक कार्य करणारा, किंबहुना सामाजिक वादाला नवीन वळण लावून त्याची नव्यानें स्थापना करणारा ह्याच काळांतला पुढारी कार्ल मार्क्स हा होय. त्याचें चरित्र व कार्य ह्याचा विचार पुढील प्रकरणांत करूं.

---

## प्रकरण पांचवें

# कार्ल मार्क्स

सामाजिक वादाच्या सर्व प्रवर्तकांत कार्ल मार्क्स हा अत्यंत थोर होय. एक प्रकारें त्यास या वादाचा आद्यऋषि म्हणतां येईल. या वादाची अत्यंत सोपपत्तिक व तर्कशुद्ध मांडणी प्रथम त्यानें केली, व या वादावर 'भांडवल पद्धति' (Das Capital-The capital) नांवाचा विस्तृत प्रमाणभूत ग्रंथ लिहिला. सनातन धर्मांत गीतेचें, किंवा ख्रिश्चन धर्मांत बायबलचें तसें सामाजिक वादात या ग्रंथाचें महत्त्व आहे. त्या वादांतील आधारभूत तत्त्वांची इतकी शास्त्रशुद्ध मांडणी या ग्रंथापूर्वी किंवा नंतर कोणीं केलेली नाहीं. पण मार्क्स हा नुसता तात्त्विक ग्रंथकार नव्हता. आपल्या मतांसाठीं चाळीस वर्षें अत्यंत हालअपेष्टांत काढून त्यानें त्यांचा इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी वगैरे देशांत प्रसार केला, मजूर वर्गांत नवें चैतन्य व आत्मविश्वास उत्पन्न केला, व मजूरवर्गाचा आंतरराष्ट्रीय संघ स्थापन करुन त्या वर्गाच्या चळवळीला नवें वळण व नवा जोम प्राप्त करुन दिला.

कार्ल मार्क्सचा जन्म सन १८१८ त जर्मनींतील ट्रीव्ज नांवाच्या गांवीं एका सुशिक्षित व संपन्न जोडप्याच्या पोटीं झाला. तो लहान असतांना त्याच्या आईबापांनीं ख्रिश्चन धर्म सोडून ज्यू धर्म स्वीकारला. परंपरागत मतांची किंवा आप्तेष्टांच्या निंदास्तुतीची पर्वा न करतां स्वतःच्या बुद्धीला पटेल तें करण्याच्या वृत्तीचें बीज याप्रमाणें कार्ल मार्क्समध्ये वडिलांपासून रुजलेलें होतें. त्याला लहानपणीं उत्तम शिक्षण मिळालें व विश्वविद्यालयांतून तत्त्वज्ञानांत डॉक्टरची पदवी त्याला देण्यांत आली होती. आपल्या वडिलांच्या इच्छेला मान देऊन त्यानें कायद्याचाही अभ्यास केला होता, पण पुढें

वकिलीच्या धंद्यांत न पडतां त्यानें वडिलांच्या इच्छेविरुद्ध वर्तमानपत्राचा धंदा स्वीकारला. पहिल्यापासून त्याचीं मतें अत्यंत उदार परंतु तितकींच पुरोगामी असून, जर्मनींतील तत्कालीन बेजबाबदार राज्यपद्धतीवर त्याचा मोठा कटाक्ष असे. थोड्याच दिवसांनंतर त्यास ' ऱ्हीनिश गॅझेट' नांवाच्या पत्राचा मुख्य संपादक नेमण्यांत आलें. त्याबरोबर त्यानें त्या पत्रांतून सरकारवर कडक टीकेचा भडिमार सुरु केला. त्याचा परिणाम असा झाला कीं, त्याला लवकरच जर्मनी सोडून पॅरिसचा आश्रय करावा लागला. मार्क्सच्या भाग्यानें त्याला त्याच्यासारखीच उदार मताची, प्रेमळ स्वभावाची, व धैर्यानें सर्व प्रकारच्या संकटांना तोंड देणारी सहधर्मचारिणी मिळाली होती. आपल्या पतीच्या ठिकाणीं तिची विलक्षण निष्ठा होती. यानंतर मार्क्सला सर्व जन्म एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं भटकण्यांत, अत्यंत हालअपेष्टांत व दारिद्र्यांत काढावा लागला. पण या सर्व आपत्तींतून ती त्याच्या बरोबर राहून त्याच्या दुःखाची वांटेकरीण झाली. तिचें साह्य व उत्तेजन नसतें तर कार्ल मार्क्सच्या हातून झालेलें कार्य कधींही होऊं शकलें नसतें. पॅरिसला गेल्यावर मार्क्सचा त्यावेळचे फ्रेंच सामाजिकवादी प्रौढन वगैरेंशीं अत्यंत निकट संबंध आला. तेव्हां तेथेंही त्यानें जर्मनींतील आपल्या स्नेह्यांना पाठिंबा देण्यासाठीं एक पत्र काढलें. पण जर्मन सरकारच्या सांगण्यावरुन फ्रेंच प्रधान-मंडळानें त्याला फ्रान्समधून काढून लावलें (सन १८४५). तेव्हांच तो बेल्जममध्यें ब्रुसेल्सला जाऊन राहिला. तेथें त्याला त्याच्यासारखेच जर्मन सरकारनें हद्दपार-केलेले अनेक स्वदेशबांधव भेटले. त्यांच्या द्वारें त्याची अनेक सामाजिक वादाच्या पुढाऱ्यांशीं व संस्थांशीं परिचय झाला, व तो मोठ्या उत्साहानें त्या वादाच्या प्रसारार्थ उद्योग करुं लागला. ब्रुसेल्समधील कामकरी लोकांना तो अर्थशास्त्रावर व्याख्यानें देत असे. लवकरच त्याच्या प्रयत्नानें त्या लोकांचा एक क्लबही स्थापन झाला, व त्या पक्षाचें एक पत्र मार्क्सच्या संपादकत्वाखालीं निघूं लागलें. पॅरिसमध्यें जर्मन सामाजिकवाद्यांचा एक संघ स्थापण्यांत आला होता. त्यानें मार्क्सची विद्वत्ता, उत्साह व सामाजिकवादी मतांवरील श्रद्धा पाहून, त्याला आपल्या संघाचें उद्देशपत्र लिहून काढण्यास विनंति केली. तेव्हां मार्क्स व त्याचा मित्र एंजल्स यांनीं हें उद्देशपत्र तयार केलें. तेंच Communist Manifesto म्हणून प्रसिद्ध असून, त्यांत मार्क्सचीं मतें अत्यंत जोरदार व सणसणीत भाषेत साररुपानें ग्रंथित झालीं आहेत. हींच मतें नंतर त्याच्या 'भांडवली पद्धती' नांवाच्या ग्रंथांत जास्त विस्तारानें, ऐतिहासिक उदाहरणें व दाखले देऊन विशद केलीं आहेत. निरनिराळ्या देशांतील कामकरी लोकांच्या सामाजिकवादी संस्थांचा एक संघ स्थापन करण्याची कल्पना या वेळेपासून त्याच्या डोक्यांत घोळूं लागली. या सुमारासच जर्मन सरकारच्या आग्रहावरुन बेल्जन सरकारनें त्यास ब्रुसेल्सहून निघून जाण्याचा हुकूम केला (सन १८४८). फ्रान्सची दुसरी राज्यक्रान्ति होण्याला व मार्क्सने ब्रुसेल्स सोडण्याला एकच वेळ आली. नव्या लोकसत्ताक फ्रेंच सरकारनें त्यास मोठ्या सन्मानानें पॅरिसला येण्याचें निमंत्रण केलें. त्याप्रमाणें पॅरिसला कांहीं महिने घालवून तो पुनः जर्मनींत परत गेला. आपल्या मताच्या

प्रसारार्थ त्यानें तेथें एक नवें पत्र सुरु केलें, व कामकरी लोकांत मोठ्या जोरानें चळवळ सुरु केली. या सुमारास (सन १८४८) कलोन येथें कामकरी लोकांची एक मोठी परिषद् भरली होती, तिच्यांत त्यानें झटून काम केलें. अर्थात् त्याची ही चळवळ आणि सरकारवरील सणसणीत टीका जर्मन सरकारला फार वेळ सहन झाली नाहीं. त्यांनीं या खेपेला त्याच्यावर निरनिराळ्या आरोपावर कोर्टात राजद्रोहाचे खटले केले. परंतु त्या सर्वांतून मार्क्सला ज्यूरीनें निर्दोषी ठरविले. तेव्हां संतापून जर्मन सरकारनें त्याला आपल्या अधिकारांतच जर्मनींतून काढून लावलें, व त्याचें पत्र बंद केलें (सन १८४९). यापुढचें मार्क्सचें सर्व आयुष्य लंडनला गेलें. तेथें मात्र त्यास जर्मन सरकारचा उपसर्ग पोहोंचू शकला नाहीं. परंतु इतर प्रकारें त्याचे दिवस अत्यंत हलाखींत गेले. अठरा विश्वे दारिद्य त्याच्यामागें हात धुवून लागलें होतें. कित्येक वेळां मुलांना पोटभर जेऊं घालण्यासाठीं त्याला स्वत: उपाशी रहावें लागे. त्याचीं दोन मुलें केवळ गरिबीमुळें नीट संगोपन न झाल्यानें मरण पावलीं. परंतु इतक्या संकटांतही आपल्या ब्रीदापासून तो यत्किंचित्ही ढळला नाहीं. लंडनमधील कामकरी लोकांना तो अर्थशास्त्र शिकवीत असे, त्याबद्दल त्यांनीं त्यास कांहीं रकम देऊं केली, पण ती घेण्याचें त्यानें साफ नाकारलें. जर्मन सरकारनें त्यास आपल्या पक्षास येऊन मिळण्यासाठीं निरनिराळीं आमिषें दाखविली, परंतु त्यांचा त्याच्यावर किंचिन्मात्र परिणाम झाला नाहीं. घरांत दुपारची भ्रांत पडली असतां, आपलीं आवडतीं लेंकरें खाण्यास न मिळाल्यानें पटापट मरत असतांना, या महात्म्यानें आपलें ध्येय किंचितही सोडलें नाहीं. कामकरी लोकांच्या उद्धाराचें त्याचें व्रत सरतेशेवटपर्यंत अखंड चाललें. सामाजिक वादाच्या प्रसारार्थ त्यानें निरनिराळ्या मासिकांतून व पत्रांतून अनेक लेख लिहिले, त्या वादांतील निरनिराळ्या प्रश्नांवर निबंध छापून प्रसिद्ध केले, त्या वादाच्या आक्षेपकांस उत्तरें दिलीं, व Das Capital 'भांडवली पद्धती' नांवाचा, या वादाचा प्रमाणभूत ग्रंथ लिहून प्रसिद्ध केला.

पॅरिस येथें असतांना मार्क्सची एंजल्स नांवाच्या गृहस्थाशीं भेट झाली. दोघांचीं मतें अगदीं जुळतीं असून दोघांनाही कामकरी वर्गाविषयीं अत्यंत कळकळ वाटत होती, त्यामुळें त्यांचा स्नेह जमण्यास वेळ लागला नाहीं व तो पुढें आजन्म कायम राहिला. त्यापुढच्या सर्व कार्यांत मार्क्सला एंजल्सचें अत्यंत साहाय झालें. वर जो 'भांडवली पद्धत' म्हणून ग्रंथ सांगितला त्याचा केवळ पहिला भाग मार्क्सच्या हयातींत प्रसिद्ध होऊं शकला होता. बाकीच्या दोन भागांचीं टिप्पणें त्यानें लिहून ठेवलीं होतीं, पण त्यांवरुन विस्तृत ग्रंथ लिहिण्यापूर्वीच त्याचें देहावसान झालें. तें मित्रकार्य एंजल्सनें त्या टिपणांवरुन पुढचा दुसरा व तिसरा भाग लिहून पुरें केलें. एंजल्स व मार्क्स यांचीं मतें पूर्वीपासूनच सारखीं होतीं. त्यांत दोघांनीं जवळ जवळ चाळीस वर्षे एकत्र घालविलीं होतीं, व अनेक लहानमोठीं कामें मिळून केलीं होतीं. त्यामुळें मार्क्सच्या टिपणांतील रहस्य एंजल्सनें लिहिलेल्या भागांत पूर्णपणें उतरलें असून, पहिल्या व नंतरच्या भागांत

किंचितही विसंगतपणा आलेला नाहीं. या ठिकाणीं बाणभट्ट व पित्याचा अपुरा राहिलेला लोकोत्तर काव्यग्रंथ पूर्ण करुन श्राद्ध करणारा त्याचा सुपुत्र यांची आठवण झाल्याशिवाय राहत नाहीं. एंजल्स व मार्क्स यांच्यासारखा दीर्घकाळ अविरत झालेला, एकनिष्ठ व निर्मत्सर स्नेह सदाच विरळा असतो, पण त्यांच्यासारखा समानयोग्यतेचा व तुल्यकर्तृत्वाचा योग तर त्याहून विरळा होय.

सन १८६४ मध्यें मार्क्सनें कामकरी लोकांचा आंतरराष्ट्रीय संघ स्थापण्याच्या आपल्या कल्पनेस मूर्त स्वरुप दिलें. या वर्षी आपल्या काहीं मित्रांच्या सहायानें त्यानें International working a men's association (कामकऱ्यांचा आंतरराष्ट्रीय संघ) नांवाची संस्था स्थापन केली. निरनिराळ्या देशांतील कामकरी लोकांस एकजीव करुन त्यांच्या प्रयत्नांस एक धोरण लावण्यांत या संस्थेचा अत्यंत उपयोग झाला. सर्व देशांतील कामकरी वर्गांत तिनें नवें चैतन्य उत्पन्न केलें. हल्लीं ही संस्था नामशेष झाली आहे, पण अजूनही तिच्या नांवाचा युरोपखंडातील कामकरी लोकांवर जादूसारखा परिणाम होतो. या संस्थेचा मार्क्स हा अंतरात्मा होता. तिच्या पहिल्या बैठकींतलें त्याचें भाषण अत्यंत स्फूर्तिदायक असल्यानें सामाजिकवादाच्या इतहिासांत तें चिरस्मरणीय झालें आहे. working men of all countries, unite. you have nothing to use but your chains you have worlds to gain. हे सर्व देशांतील कामकऱ्यांनो, एक व्हा. पायांतील शृंखलांशिवाय तुमच्यापाशीं जाण्यासारखें कांहीं नाहीं. मिळाल्यास सर्व जग तुम्हांला मिळवावयाचें आहे. या त्याच्या उपदेशानें सर्व यूरोपास खडबडून जागें केलें. या पहिल्या सभेला इटलीचा मॅझिनीही आला होता. प्रथमत: संस्थेचे नियम व कार्यपत्रिका **(programme)** तयार करण्याचें काम मॅझिनीला सांगण्यांत आलें होतें; परंतु त्याच्या व संस्थेच्या निरनिराळ्या चालकांच्या मतांत एकवाक्यता न झाल्यानें, अखेरीस तें काम मार्क्सनेंच केलें. या नियमाप्रमाणें आळीपाळीनें निरनिराळ्या देशांतील प्रमुख शहरांतून संस्थेची प्रत्येक वर्षी बैठक होत असे; व मध्यंतरीं वर्षभर काम करण्यासाठीं तिचें एक आंतरराष्ट्रीय कार्यकारी मंडळ नेमलेलें असे. सुमारें सात वर्षेपर्यंत संस्थेचें काम मोठ्या जोरानें चाललें. परंतु इ. स. १८७०-७१ च्या फ्रँको-जर्मन युद्धानंतरच्या गडबडींत तिच्यांतले बरेच उत्साही सभासद नाहींसे झाले, व बाकी राहिलेल्यांत मतभेद उत्पन्न झाला त्यानें ती संस्था लवकर लयाला गेली.

इ.स. १८८१ मध्यें मार्क्सची प्रिय पत्नी मरण पावली. त्यानंतर त्याचें आयुष्य अधिकच दु:खदायक व नीरस झालें. त्याची शरीरप्रकृति मूळची मोठी निकोप व सुदृढ होती, परंतु दारिद्र्य, चिंता व अतिशय बौद्धिक श्रम यांनीं ती अत्यंत खंगून गेली होती. त्यांतच त्यास अलीकडे निरनिराळ्या व्याधींनींही पीडित केलें होतें. तरी त्याचें ग्रंथलेखनाचें वगैरे काम चालूच होतें. अशा स्थितींत इ. स. १८८३ त एक दिवस

आराम खुर्चीवर पडला असतां, शांतपणानें या थोर महात्म्याचें प्राणोत्क्रमण झालें.

कार्ल मार्क्सच्या सर्व मतांचे, किंबहुना सामाजिक वादांतील प्रमुख तत्त्वांचें सार त्याच्या 'भांडवली पद्धत' या ग्रंथांत आलेलें आहे. हा ग्रंथ म्हणजे हल्लींच्या भांडवलप्रधान उद्योगपद्धतीच्या उत्पत्तीचा व वाढीचा थोरला इतिहास आहे. मार्क्सनें या पद्धतीचें अत्यंत सूक्ष्म ज्ञान करुन घेण्यांत सारा जन्म घालविला होता. तिच्या उत्पत्तीपासूनच्या सर्व अवस्थांची माहिती त्यानें अत्यंत श्रमानें मिळविली होती. तिच्या कार्यकारणांचा त्यानें कित्येक वर्षे विचार केला होता. तें सर्व ज्ञान व विचार त्यानें या ग्रंथांत ओतले आहेत. हा ग्रंथ म्हणजे यूरोपीयन समाजांचा एक-दीड शतकाचा अत्यंत विस्तृत व कार्यकारणदर्शक औद्योगिक इतिहास आहे. या इतिहासांत निरनिराळ्या देशांतील उदाहरणें देऊन औद्योगिक पद्धतीची वाढ कशी झाली, व तिच्यांतले अनेक दोष कसे उद्भवले व बळावत गेले याचें कडक पण शास्त्रशुद्ध विवेचन केलेले आहे; व सरतेशेवटीं या दोषांमुळेंच हल्लींच्या औद्योगिक पद्धतीचा अंत होऊन सामाजिक वादानें प्रतिपादिलेली 'सामाजिक पद्धति' कशी उदयाला येईल हें सप्रमाण सिद्ध केलें आहे.

मार्क्स हा भौतिकवादी होता. त्याच्या मताप्रमाणें सृष्टींतलें मूलभूत तत्त्व हें अस्थिर आणि चंचल असून, त्याच्या रुपांत सारखें परिवर्तन होत असतें. मनुष्यप्राणी आणि समाज हीं या तत्त्वाचींच हृदयरुपें असून त्यांच्यांतही ठरीव नियमांनीं एक अवस्था जाऊन दुसरी अवस्था येत असते. या अवस्थांतराचे नियम शोधून काढणें हें शास्त्राचें काम आहे. मनुष्यसमाजांतील अवस्थांतराच्या मूळाशीं संपत्ति आहे. तिनें समाजांतील सर्व बदल होत असतो. समाजाची सर्व व्यवस्था सांपत्तिक पायावर रचलेली आहे. त्यांतील कायदें, राज्यकारभार, नीति, फार काय–धर्म व तत्त्वज्ञानही सांपत्तिक नियमांच्या अनुरोधानें प्रचलित होतात, म्हणून त्या सर्वांची मीमांसा व उलगडा होण्यास सांपत्तिक नियमांचे–समाजाच्या सांपत्तिक व्यवस्थेचें–ज्ञान झालें पाहिजे. समाजाचा खरा इतिहास लिहिण्यास, त्याच्या अवस्थांतराचें खरें ज्ञान करुन घेण्यास, समाजाच्या सांपत्तिक स्थितींत कसकसा बदल होत गेला हें समजलें पाहिजे. सारांश, मनुष्यसमाजांतील सर्व अवस्थाभेद व संस्था ह्या मूलतः सांपत्तिक कारणांनीं निर्माण होतात असा मार्क्सच्या म्हणण्याचा फलितार्थ आहे. अर्थांतच त्यांत थोडीफार अतिशयोक्ति आहे हें निर्विवाद, पण त्या कालपावेतों या कारणाकडे सर्व इतिहासकारांनीं व शास्त्रवेत्त्यांनीं जें दुर्लक्ष व उपेक्षा केली होती ती दूर करण्याला अशा अतिशयोक्तीशिवाय दुसरा उपायही नव्हता, हेंही ध्यानांत ठेवलें पाहिजे.

याप्रमाणें मार्क्सच्या मतें समाजाचा आर्थिक इतिहास हाच त्याचा खरा इतिहास होय. अठराव्या व एकोणिसाव्या शतकांच्या या इतिहासांत भांडवलाचें अत्यंत

वर्चस्व बसलेलें दिसून येतें. या शतकांत उद्योगधंद्यांची व त्यांच्या द्वारें सर्व समाजाची मुख्य सत्ता भांडवलवाल्यांच्या हाती आली, म्हणून या सत्तेच्या उदय व उत्कर्षाचा इतिहास पाहिल्यानें या शतकांतील समाजाचा इतिहास कळून येईल. मार्क्सनें यासाठीं आपल्या ग्रंथांत हा इतिहास सविस्तर दिला आहे.

भांडवलाचें वर्चस्व असलेली आधुनिक उद्योग-पद्धति अस्तित्वांत येऊन भरभराटीला येण्याला तीन गोष्टींची आवश्यकता होती. प्रथमतः माल उत्पन्न करण्याचीं साधनें—भांडवल व जमीन—ही पूर्णपणें एका वर्गाच्या ताब्यांत गेलेली असावीत. दुसरी गोष्ट ही कीं, शरीरश्रमाशिवाय निर्वाहाला दुसरें साधन नसलेला कामकरी लोकांचा मोठा थोरला वर्ग समाजांत असावा. आणि तिसरी गोष्ट ही कीं, उत्पन्न झालेल्या मालाला सर्व जगाचें गिऱ्हाईक मिळत असावें. या तिन्ही गोष्टी एकत्र झाल्यानें यूरोपांतल्या उद्योगपद्धतीला हल्लींचें स्वरूप प्राप्त झालें.

या तिनी गोष्टी किंवा कारणें समाजांत एकदम उत्पन्न झाली नाहींत. समाजांतील पूर्वावस्थेंत बदल होत जाऊन तीं हळू हळू अस्तित्वांत आलीं व वृद्धिंगत झालीं. मार्क्सनें यूरोपच्या व विशेषतः इंग्लंडच्या इतिहासांतील उदाहरणें देऊन ही वाढ कशी झाली हें दाखविलें आहे.

मध्ययुगांत म्हणजे साधारणपणें खिस्ती शकाच्या सहाव्यापासून पंधराव्या शतकापावेतों यूरोपांत सरंजामी पद्धत कायम होती. या पद्धतीत जमिनीची मालकी सरदार लोकांकडेच असे, पण प्रत्यक्ष ताबा शेतकऱ्यांचा असे; आणि मालकीप्रीत्यर्थ उत्पन्नाचा कांहीं ठराविक अंश सरदारांना दिला म्हणजे बाकीचें सर्व उत्पन्न त्यांना निर्वेधपणें भोगायला मिळत असे. उद्योगधंद्यांचें स्वरुप घरगुती असे. प्रत्येक कारागिरापाशी आणि धंदेवाल्यापाशी स्वतःचा कच्चा माल असे, व आपल्या स्वतःच्या श्रमानें तो त्यापासून पक्का माल तयार करी. हा माल अर्थात् थोडा व मर्यादित असे, पण त्याच्यापासून होणारा सर्व फायदा त्याच्या पदरांत पडत असे. सोळाव्या शतकानंतर ही स्थिति हळू हळू बदलत गेली, सरंजामी पद्धत मोडली. सरदार लोकांची जमिनीवरील मालकी कायम राहिली, पण लढाईच्या वेळीं राजाला सैन्य पुरविण्याची जी त्यांच्यावर पूर्वी जबाबदारी होती ती मात्र राहिली नाहीं. त्यामुळें लढाईच्या वेळीं हजर होण्याच्या शर्तीवर आपली जमीन पूर्वी निरनिराळ्या कुळांना व शेतकऱ्यांना लावून दिली होती ती त्यांच्याकडे कायम ठेवण्याची त्यांना यापुढें आवश्यकता राहिली नाहीं. याच सुमारास लोंकरीचें भाव वाढल्यानें, जमिनी शेतकऱ्यांना साऱ्यावर देण्यापेक्षां, त्यांच्यांतमेंढ्या ठेवून लोंकर पैदा करणें सरदारांना जास्त फायदेशीर होऊं लागलें. शिवाय लहान लहान तुकडे खंडानें देण्यापेक्षां मोठ्या प्रमाणावर जमिनीची लागवड

करणेंही व्यापारीदृष्ट्या जास्त फायदेशीर होऊं लागलें. या सर्व कारणांमुळें सरदारलोकांनीं पूर्वीच्या शेतकऱ्यांपैकीं पुष्कळांकडून जमिनी काढून घेतल्या; व त्या लोकांस पोट भरण्यास मजुरीशिवाय दुसरा उपाय ठेवला नाहीं. याप्रकारें कामकरी लोकांचा वर्ग यूरोपांत प्रथमत: मोठ्या प्रमाणावर अस्तित्वांत आला.

याच वेळीं घरगुती धंदे हळू हळू लुप्तप्राय होत चालले होते. निरनिराळीं यंत्रें निर्माण केलीं जात होतीं; तीं चालविण्याला वाफेचा उपयोग होऊं लागला होता; आणि कारखाने व फॅक्टरी अस्तित्वांत येऊन त्यांचें स्वरुप व त्यांना लागणारें भांडवल अवाढव्य होत जात होतें. त्यामुळें पूर्वीचे कारागीर व धंदेवाले यांचे धंदे बसूं लागून, ते अगतिक होऊन मजूरी करुं लागले.

याप्रमाणें एक वेळीं शेतकरी किंवा कारागीर असलेल्यांचा मजूर वर्गांत समावेश होऊं लागून त्या वर्गाची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली.

याच सुमारास अमेरिकेचा शोध लागला. हिंदुस्थानास जाण्यास जवळचा मार्ग सांपडला. वाफेचीं जहाजें समुद्रावर धांवूं लागलीं. यूरोपच्या असंख्य व अफाट कारखान्यांतील माल थोड्या खर्चांत सर्व जगभर पाठवितां येऊं लागला व त्याला सर्व जगाचें गिऱ्हाईक मिळूं लागलें.

या कारखान्यांना मोठमोठ्या इमारती लागत, पुष्कळ कच्चा माल लागे, मोठमोठ्या किंमतीची यंत्रसामुग्री विकत घ्यावी लागे, त्या सर्वांसाठीं मोठ्या भांडवलाची जरुरत असे. तें ज्याच्यापाशीं असे त्यांचा एक निराळा वर्ग बनत चालला. आपल्या कारखान्याचें स्वरुप आणखी मोठें करावें, त्यांच्यांत जास्त माल तयार करावा,त्याला लागणारा खर्च शक्य तितका कमी करावा व आपल्या नफ्याचें प्रमाण वाढवून आपल्या जवळच्या संपत्तींत आणखी भर टाकावी, यासाठीं या लोकांची–धनिक कारखानदारांची–धडपड चालत असे. मजूरी कमी द्यावी लागावी म्हणून हे कारखानदार लहान लहान कोंवळया मुलांस व बायकांस कामावर ठेवीत. त्यांच्या असहाय स्थितीचा फायदा घेऊन त्यांस शक्य तितकी कमी मजूरी देत, व मरेमरेपावेतों चोपून काम घेत. कारखान्यांतील स्वच्छतेकडे किंवा मजूराच्या आरामाकडे, फार काय, त्याच्या जीवाला अपाय होईल याकडेही, ते पूर्णपणें दुर्लक्ष करीत. मार्क्सनें या सर्व गोष्टींचें अत्यंत भेसूर पण वस्तुस्थितीला धरुन असलेलें चित्र आपल्या ग्रंथांत रेखाटलें आहे. त्यानें या ग्रंथांत कारखानदारांच्या जुलमांच्या, मजूरांच्या आपत्तींच्या, व त्यांच्यावर होणाऱ्या आर्थिक बळजबरीच्या उदाहरणांचा फार मोठा संग्रह केला आहे. या उदाहरणांच्या द्वारें कामकरी वर्गांत भांडवलीपद्धतीविषयीं चिरस्थायी द्वेष,संताप, तिरस्कार उत्पन्न करुन, त्यांस देहं

वा 'पातयेत् अर्थं वा साधयेत्' अशा कृतनिश्चयांनें भांडवलदारांशीं झगडण्यास प्रवृत्त करण्याची त्याची अपेक्षा होती; व जो जो म्हणून हा ग्रंथ वाचील त्यास तो सफल होण्याबद्दल तिळमात्र शंका वाटणार नाहीं. त्यांतील एक दोन उदाहरणेंच आम्ही खालीं देतों, त्यांवरुन वाचकांस खात्री पटेल.

"नॉटिंगहॅमला ता. १४ जानेवारी सन १८६० रोजीं भरलेल्या सभेंत अध्यक्ष या नात्यानें मि. ब्राग्टन चार्लटन, मॅजिस्ट्रेट हे आपल्या भाषणांत बोलले कीं, 'लेसच्य कारखान्यांत काम करणाऱ्या मजूरांस इतकें विलक्षण दुःख व आपत्ति सहन करावी लागत आहे, कीं तिची तोड सर्व राज्यांत, किंबहुना सर्व सुधारलेल्या जगांत सांपडणार नाहीं.... नऊ नऊ, दहा दहा वर्षांची कोंवळीं मुलें सकाळीं दोन, तीन, चार वाजतां बिछान्यांतून बाहेर खेंचण्यांत येतात, आणि तेव्हांपासून रात्र पडेपावेतों दहा, अकरा, बारा तासपावेतों सारखीं कामास जुंपलीं जातात; व तींही केवळ जेमतेम पोटाची गुजराण होईल इतक्या मजूरीवर. या श्रमातिरेकानें त्यांचे हातपाय जणूं सुकून जातात, शरीरकाठी झिजत जाते, चेहरे पांढरे फिके पडतात, आणि त्यांच्यांतले चैतन्य विझून जाऊन, गुंगीनें त्यांची दगडासारखी अवस्था होते. याचा नुसता विचार मनांत आला तरी अंगावर शहारे उभे राहतात."

"लंडन येथें ज्यूरीसमोर अपघाताची चौकशी चालू आहे. एक गार्ड, एक एंजिन-ड्रायव्हर, व एक सिग्नलमन, असे तीन नोकर ज्यूरीसमोर उभे आहेत. नुक्ताच रेल्वेचा एक मोठा थोरला अपघात घडला असून त्यांत कित्येकशें उतारुंची परलोकीं रवानगी झाली होती. नोकरांचा हलगर्जीपणा या अपघाताचें कारण होतें. त्यांनीं सर्वांनीं आपल्या जबानींत सांगितलें कीं, दहा-बारा वर्षांपूर्वी आम्हांला रोजचें आठ तास काम करावें लागे, परंतु गेल्या पांच-सहा वर्षांत या कामाची मजल चौदा, अठरा, वीस तासपर्यंत गेली, आणि जेव्हां सणाच्या दिवसात जास्त सफरी-गाड्यांचा धडाका सुरु होतो, तेव्हां तर ४० किंवा ५० घंटेपर्यंत सारखें खळ न पडतां काम करावें लागतें. आम्हीही पण माणसेंच आहोंत, राक्षस तर नव्हेत. काहीं वेळानें आमच्यांत काम करण्याची शक्ति उरत नाहीं. सर्व अंगाला गुंगी येते, डोकें विचार करीनासें होतें, डोळे पाहीनासे होतात. यावर त्या ज्यूरींतील 'सन्मान्य' गृहस्थांनीं तिघांचीही सदोष मनुष्य वधाबद्दल चौकशी व्हावी असा निर्णय दिला, व त्या निर्णयाला एक लहानशी पुरवणी जोडून रेल्वेचे कोट्याधीश मालक यापुढें पुरेसे नोकर ठेवण्याची उधळपट्टी करतील, व ठेवलेल्या नोकरांचें रक्त शोषून घेण्यांत जास्त 'आत्मसंयमन', जास्त 'परिमितपणा' दाखवितील, अशी सदिच्छा व्यक्त केली."

"सहाव्या एडवर्डची कारकीर्द. या कारकीर्दीच्या पहिल्याच वर्षी, सन १६४७

त असा कायदा करण्यांत आला कीं, जो मजूर काम करण्याचें नाकबूल करील त्याला गुलाम ठरविण्यांत येऊन, ज्यानें त्याला रिकामटेकडा म्हणून दाखवून दिलें असेल त्याच्या स्वाधीन करुन दिलें जाईल. या धन्यानें त्या गुलामाला रोटी, पाणी व हलकेंसलकें योग्य दिसेल तें मांसहीं खाण्यास द्यावींत. त्या गुलामाला चाबकानें बडवून किंवा पायांत बेड्या घालून पाहिजे तें किळसवाणेंही काम करुन घेण्याचा धन्याला अधिकार राहील. जर तो गुलाम पंधरा दिवस गैरहजर राहिला, तर त्याला जन्मभर गुलामगिरीची शिक्षा दिली जाईल, आणि त्याच्या पाठीवर किंवा कपाळावर 'S' हें अक्षर डागलें जाईल. धन्याला तो गुलाम विकतां येईल, मृत्युपत्रानें दुसऱ्याला देतां येईल, भाड्यानें कामाला देतां येईल, थोडक्यांत गुरेंढोरें किंवा इतर मालमत्तेप्रमाणें त्याची वाटेल ती व्यवस्था करतां येईल. जर गुलामांनीं आपल्या धन्याविरुद्ध कट करण्याचा प्रयत्न केला, तर त्यांना फांशीं देण्यांत येईल. जस्टिस ऑफ धी पीसला खबर लागतांच त्यांनीं अशा बंडखोर गुलामांना पकडण्याची व्यवस्था केली पाहिजे. जर कोणी रिकामटेकडा मनुष्य तीन दिवसपावेतों उगाच भटकत असलेला आढळला, तर त्याला पकडून त्याच्या जन्मगांवीं नेण्यांत येईल, तापलेल्या सळईनें त्याच्या छातीवर Vagabond शब्दाचें अद्याक्षर 'V' हें डागलें जाईल, आणि त्याच्या पायांत बेड्या घालून रस्त्यांत किंवा इतरत्र कामाला लावलें जाईल. जर त्यानें खोटें जन्मगांव सांगितलें, तर त्याला त्या गांवच्या लोकांचा, किंवा तेथील म्युनिसिपालिटीचा गुलाम केला जाईल, व त्याला 'S' या अक्षराचा डाग दिला जाईल. या रिकामटेकड्या माणसांचीं मुलें वाटेल त्यानें धरुन नेऊन आपल्या येथें उमेदवार म्हणून कामाला लावावींत. मुलांकडून चोवीस वर्षांचे,व मुलींकडून वीस वर्षांच्या, होईपावेतों अशा रीतीनें काम घेतां येईल. जर तीं पळून गेलीं; तर त्यांना वयाच्या वरील मर्यादेपावेतों त्यांच्या धन्याचें गुलाम केलें जाईल. मग धन्यानें त्यांच्याकडून, बेड्या घालून किंवा चाबूक मारुन, काम घ्यावें. धन्यानें गुलामाला ओळखतां यावें व हा आपलाच म्हणून खात्री व्हावी म्हणून त्याच्या गळ्यांत, पायांत किंवा दंडावर लोखंडी कडी घालावी. या कायद्यांत सरते शेवटच्या भागांत असें ठरविण्यांत आलें होतें कीं, कांहीं विशिष्ट प्रकारच्या गरीब लोकांकडून जो कोणी मनुष्य किंवा गांव त्याच्या खाण्यापिण्याची व्यवस्था करील त्याला काम करुन घेतां येईल. ही गांव-गुलाम-गिरीची पद्धत इंग्लंडांत एकोणिसाव्या शतकाचा बराच काळ लोटेपावेतों कायम होती; व अशा गुलामांना 'round men' असें म्हणत असत."

वरील दोन तीनच उताऱ्यांवरुन या ग्रंथाच्या वाचनानें कामकरी वर्गाच्या वृत्ति किती संतप्त होत असतील याची कल्पना होईल. प्रकरणामागून प्रकरणें अशा उदाहरणांनीं खचून भरलीं आहेत.

असो तर. याप्रमाणें ज्यावेळीं युरोपीय समाजांत एकीकडे संपत्तीचा पूर लोटत होता, त्याच वेळीं दुसरीकडे समाजांतील बहुजन वर्ग कष्टांत खितपत होता. नव्या उद्योगपद्धतीचा हा अनिवार्य परिणाम होता. तिनें समाजांतील एका लहानशा वर्गांत सर्व संपत्ति सांठवूं लागली होती, त्याच्याच हातीं समाजांतील सर्व सत्ता होती, व या संपत्तीचा व सत्तेचा उपयोग समाजांतील इतर सर्व लोकांना दारिद्र्यांत व दु:खांत ठेवण्याकडे होत होता.

ही कारखान्यांची पद्धत मूलत:च अन्यायाची आहे. पूर्वी समाजांतून गुलामगिरी सुरु असे. तींत गुलामांनीं काबाडकष्ट करावेत व त्याचें फळ मालकांनीं हक्कानें लाटावें असा प्रघात असे. हल्लीं ती गुलामगिरी नाहींशी झाली; पण कारखान्याच्या हल्लींच्या पद्धतीनें नवी गुलामगिरी कायम झाली आहे. हींतही पूर्वीप्रमाणें एकाच्या श्रमाचें फळ दुसरा गिळंकृत करतो. फरक एवढाच आहे कीं, पूर्वीची गुलामगिरी उघड व स्पष्ट असे, हल्लींची प्रच्छन्न व अप्रत्यक्ष आहे.

या पद्धतींतला अन्याय दाखविण्यासाठीं मार्क्सनें दोन सिद्धांत स्थापित केले आहेत. त्याच्या विचारसरणीचे ते मुख्य आधारस्तंभ आहेत, असें म्हणण्यास हरकत नाहीं. मार्क्सच्या पूर्वीच्या समाजिकवाद्याच्या व विशेषत: रॉडबर्टस व लॅसेलच्या ग्रंथातूनही त्या सिद्धांतांचा उल्लेख आढळतो, पण त्यांचें मार्क्सइतकें सांगोपांग, तर्कशुद्ध, व ऐतिहासिक दाखल्यांनीं ,पूर्ण असें विवेचन पूर्वी कोणींच केलेलें नसल्यानें, ते सिद्धांत त्याच्या नांवानें प्रसिद्ध आहेत.

या कामीं पहिला सिद्धांत म्हणजे पदार्थाला किंमत त्याला लागणाऱ्या श्रमामुळें येते. सामान्यत: कोणत्याहि निसर्गजात पदार्थाला मनुष्याला उपयुक्त असें रुप देण्यासाठीं थोडेफार श्रम करावे लागतात, आणि या श्रमावरुनच त्याची किंमत–बाजारांतील विनिमय मूल्य–ठरते. यावरुन सर्व उपयुक्त पदार्थांचा हा साधारण धर्म म्हणतां येईल कीं, ते मनुष्यश्रमापासून तयार होतात. अर्थशास्त्रांत विवेचनाच्या सोयीसाठीं उपयुक्त पदार्थ किंवा 'संपत्ति' उत्पन्न करण्याला जमीन, भांडवल व श्रम असे तीन घटक लागतात असें सांगण्यांत येतें. यांपैकीं जमीन हा घटक जरी निसर्गजात आहे तरी संपत्ति उत्पन्न करण्यांत तिचा उपयोग होईल असें रुप देण्याला बरेच श्रम करावे लागतात. दुसरा घटक भांडवल हें तर सर्वस्वीं मनुष्यश्रमानेंच उत्पन्न झालेलें असतें. मनुष्य आपल्या श्रमानें जें कांहीं अर्थोपार्जन करतो त्यापैकीं आपल्या व आपल्या कुटुंबाच्या निर्वाहाला आवश्यक तेवढें खर्च केल्यानंतर बाकी जें उरतें तें भांडवल होय. जगांतलें सर्व भांडवल अशा रीतीनें उत्पन्न झालेलें आहे. तें श्रमाचें संचित रुप आहे. या भांडवलानें कच्चा माल विकत घेतला जातो, यंत्रसामुग्री आणली जाते, व इमारती

उभारल्या जातात; पण याप्रमाणें जरी निरनिराळ्या प्रकारांनीं त्याचें रुपांतर झालें तरी तें मूळचें मनुष्यश्रमाचें फळ आहे, हें विसरतां कामा नये. सारांश, सर्व भांडवल श्रमजन्य आहे. यावरुन संपत्तीच्या घटकांपैकीं जमीन हा घटक बहुतांशीं मनुष्यश्रमानें संपत्तीच्या उत्पादनास उपयोगी पडतो, व दुसरा भांडवल हा घटक तर मनुष्यश्रमाचेंच रुपांतर आहे. म्हणून सर्व संपत्ति हें मनुष्यश्रमाचें फळ आहे, पदार्थाला संपत्तीचें रुप येण्याला श्रम हें एकमात्र कारण आहे, किंवा पदार्थाचें संपत्तिमत्त्व श्रमजन्य आहे, हें सिद्ध होतें. पदार्थाला किंमत येण्याचें कारण श्रम हें याप्रमाणें ठरल्यानंतर ती किंमत ठरविण्याचें साधन या श्रमाचें प्रमाण हेंच होय, हें उघड आहे. सारांश, पदार्थाला किंमत येण्याचें कारण व ती ठरविण्याचें साधन मनुष्यश्रम होत. हा मार्क्सचा पहिला सिद्धांत होय.

हल्लींची उद्योगपद्धति विनिमयावर अवलंबून आहे. कारखानदार कारखान्यांत माल तयार करवतो, तो बाजारांत नेऊन देतो, व त्याच्या बदल्यांत दुसरा माल-रुपये-घेऊन येतो. जर या मोबदल्यांत त्यानें तो माल उत्पन्न करण्यांत जेवढी पुंजी खर्च केली होती तेवढीच परत त्यास मिळत गेली तर अर्थातच त्यास कांहीच नफा होणार नाहीं, व त्याची संपत्ति दिवसेंदिवस वाढत जाते तशी वाढणार नाहीं. परंतु वस्तुत: असा नफा होत असतो, व कारखानदार दिवसेंदिवस गब्बर होत जातो, यावरुनच अर्थातच त्याला लावलेल्या पुंजीपेक्षां मोबदल्यांत जास्त कांहीं मिळतें. हें जास्त मिळण्याचें कारण काय? त्या पुंजींत असा कोणता उपयुक्त फरक होतो, कीं त्यानें तिला बाजारांत जास्त मोबदला मिळूं लागतो?

मार्क्स म्हणतो कीं, हा उपयुक्त फरक मजूरांच्या श्रमानें होतो. मजूरांच्या श्रमामुळें त्या पुंजीपासून माल तयार होतो, व त्याला बाजारांत मूळ पुंजीपेक्षां जास्त किंमत येते. अर्थातच या 'जास्त किंमती' चें 'अतिरिक्त मूल्या'चें, मूळ पुंजीपेक्षां जास्त मोबदला मिळण्याचें, कारण मजूरांचे श्रम होत. म्हणून न्याय हा झाला असता, कीं ही जी मोबदल्यांत जास्त किंमत आली ती मजूरांना मिळावी. परंतु हल्लींच्या अन्याय्य उद्योगपद्धतींत कारखानदार हे मालक व मजूर सर्वस्वी अगतिक असतात. त्यामुळें कारखानदार लोक ही जास्त येणारी किंमत मजूरांच्या हातीं पडूं देत नाहीत. ते मजूरांना केवळ त्यांच्या पोटाला जेमतेम पुरेशी मजूरी देतात, व नफ्याचा म्हणजे त्या 'जास्त किंमती'चा बाकीचा सर्व अंश स्वत: गिळंकृत करतात. अर्थातच ते याप्रमाणें मजूरांना लुटतात, व त्यामुळेंच श्रीमंत बनतात. मजूरांच्या श्रमानें मूळ पुंजीला आलेल्या 'जास्त किंमती'चें अपहरण हेंच कारखानदारांच्या संपत्तीचें बीज आहे. हा मार्क्सचा दुसरा सिद्धांत होय.

मार्क्स म्हणतो कीं, पूर्वींच्या व हल्लींच्या उद्योगपद्धतींत मुख्य फरक हाच

आहे. पूर्वी एक व्यक्ति श्रम करी, व आपल्या श्रमाच्या फळाचा—त्यापासून होणाऱ्या नफ्याचा—उपभोग घेई. हल्लीं अनेक व्यक्ति श्रम करतात, व त्यांचें फळ एकटा भांडवलवाला किंवा कारखान्याचा मालक घेतो. हल्लीं श्रम करणारे एक व त्याचें फळ भोगणारे दुसरेच. हल्लींच्या पद्धतींत माल उत्पन्न करण्याला अनेकांचे श्रम लागतात, पण त्या मालावर मालकी मात्र तिसऱ्या एकट्याचीच—कारखानदाराची—राहते. समाजांतील विद्यमान दारिद्र्यांचें व अनवस्थेचें मूळ यांतच आहे.

मार्क्सच्या मताप्रमाणें समाजांत उत्क्रांति होत जात आहे. तिला अनुसरुन हल्लींच्या पद्धतीचा जो उत्कर्ष होत आहे यांतच तिच्या ऱ्हासाचें व सरतेशेवटीं ती पद्धत सर्वस्वीं बदलून नवी पद्धत अस्तित्वांत येण्याचें बीज आहे. हल्लीं कारखानदार माल स्वस्त पडावा म्हणून परस्परांच्या चढाओढीनें तो बेसुमार अवाढव्य प्रमाणावर काढूं लागले आहेत. बाजारांत मालाचा खप किती आहे, गिऱ्हाइकाची मागणी केवढी आहे, याकडे त्यांचें लक्ष राहत नाहीं. त्यामुळें या चढाओढींत वाजवीपेक्षां किती तरी फाजील माल तयार करण्यांत येतो, व मग कांहीं कारखाने एकदम डुबतात, व कांहीं कित्येक दिवस बंद ठेवावे लागतात. त्यानें शेंकडो मजूरांस उद्योग नाहींसा होतो व ते उपाशी मरुं लागतात. ही मालाची अति-पैदास व त्यामुळें बाजारावर येणारी आपत्ति हल्लींच्या पद्धतीचा जसा जसा उत्कर्ष होत जाईल तशी तशी जास्त वारंवार व लवकर येऊं लागेल; व त्याचा प्रत्यक्ष अनुभवही अलीकडच्या काळांत येत आहे. एकीकडे यंत्रांत सुधारणा होत जाऊन मनुष्यश्रम कमी लागूं लागतात, जास्त जास्त लोकांस रोजगार मिळेनासा होतो, व समाजांतील बराच मोठा जो कामकरी वर्ग त्याची ग्राहकशक्ति कमी होत जाते. पण दुसरीकडे उत्पन्न होणाऱ्या मालाचें प्रमाण मात्र कारखानदारांच्या चढाओढीनें वाढत असतें. यामुळें समाजांत असा विचित्र प्रकार घडतो कीं मालाला गिऱ्हाईक नाहीं म्हणून तो सडत असतो, व गिऱ्हाइकाला माल घेण्याचें सामर्थ्य नाहीं म्हणून तो उपाशी मरत असतो.

या सर्व प्रकारांनीं समाज कालांतरानें त्रस्त झाल्याशिवाय राहणार नाहीं. कांहीं दिवस कारखाने खूप जोरानें चालावेत, खूप माल तयार व्हावा, व मग एकदम त्यांपैकीं कांहीं डुबावेत, बरेच बंद व्हावेत आणि शेंकडों लोकांची अन्नान्नदशा व्हावी, अशी आपत्ति जर पुन्हा पुन्हा ओढवूं लागली; जर समाजांतल्या एका लहानशा भागांत कल्पनातीत संपत्ति व बाकीच्या मोठ्या थोरल्या भागांत कल्पनातीत दारिद्र्य नांदूं लागलें; जर ह्या दरिद्री भागानें मरमर मरेपावेतों कष्ट करावेत, व दुसऱ्या भागानें ऐषआरामांत लोळत त्या कष्टाच्या फळाचा उपभोग घ्यावा अशी श्रमांची वांटणी झाली, तर ही स्थिति समाजाला फार काळ सहन होणार नाहीं हें उघड आहे. हळू हळू ती स्थिति बदलण्याचें

सामर्थ्यही कामकरी वर्गांत येत असतें. आपत्तीनें व संकटानें त्यांच्यांत जागृति होते. मोठमोठ्या गिरण्यांतून व कारखान्यांतून एकच काम करावें लागल्यानें, सर्वांनीं मिळून एकजुटीनें व शिस्तीनें वागून इष्ट कार्यभाग कसा साधावा याचें त्यांस शिक्षण मिळतें. आपल्या जीवावर हे कारखाने चालले आहेत, त्यांचे खरे चालक आपण आहोंत, आपणांवांचून हे व्यर्थ होत, असें असतांही आपणांस ही जी आपत्ति सोसावी लागत आहे तिला कारण आपल्यांतील अज्ञान व फूट आहे असें त्यांना पटूं लागतें. संख्येनें त्यांचा जमाव इतका मोठा व अफाट आहे, कीं एकदां त्यांच्यांत वरील वृत्ति बळावून जूट उत्पन्न झाली कीं त्यांच्यापुढें समाजांतील इतर सर्व सत्ता निर्बळ पंगू होत. भविष्यत् काळांत कामकरी वर्ग समाजांतील राजकीय सत्ता आपल्या हातीं घेईल यांत संशय नाहीं; व ती सत्ता हातीं घेतल्यावर त्यांचें पहिलें काम हल्लींची आर्थिक व्यवस्था बदलणें हें होईल. हल्लींची कारखान्यांतील काम करण्याची पद्धत जशीच्या तशीच कायम राहील; फक्त त्यांतील नफा जो एकादोघां किंवा कांहीं थोड्या व्यक्तींच्या–कारखानदारांच्या किंवा भागीदारांच्या–हातीं हल्लीं जातो, तो नंतर सर्व कामकऱ्यांत वांटून दिला जाऊं लागेल. कारखान्याची खासगी मालकी जाऊन त्यावर समाजाची मालकी होईल. तो समाजाच्या हितासाठीं, व समाजाच्या आवश्यकतेनुरुप चालविला जाईल, व त्याचें उत्पन्न त्यांत काम करणाऱ्या व्यक्तींसच मिळूं लागेल.

सामाजिक उत्क्रांतीच्या नियमाप्रमाणें ही क्रांति घडून येणारी आहे. हल्लींच्या उद्योगपद्धतीचा तो अनिवार्य परिणाम आहे. तो कोणासही टाळतां यावयाचा नाहीं. परंतु त्याचें स्वरुप ध्यानांत आणून तदनुरुप वर्तन समाजानें एव्हांपासून ठेवल्यास, त्या क्रान्तीच्या वेळीं होणारीं अवश्यंभावी वैयक्तिक दुःखें कमी करतां येतील, व ती क्रान्तीही लवकरच पण शांतपणानें, फारसा अपाय न होतां घडवून आणतां येईल.

वरील क्रान्ति झाल्यानंतर समाजस्थिति कशा स्वरुपाची होईल याबद्दल मार्क्सनें फारसा खुलासा केलेला नाहीं. वस्तुतः स्थूल रुपरेषेशिवाय त्या स्थितीचें जास्त वर्णन करतां येण्यासारखें नाहीं. मार्क्सनें तिचें दिग्दर्शन पुढील शब्दांत केलें आहे. "समाजांतील कांहीं व्यक्तींनीं आपखुशीनें एक संघ किंवा मंडळी स्थापली असें आपण समजूं या. या मंडळीनें माल उत्पन्न करण्याचीं साधनें जमविलीं व सर्वजण आपापल्या शक्ति एकवटून सहकारितेनें काम करुं लागले. अशा रीतीनें जो माल तयार होईल त्यावर त्या मंडळीची सामायिक स्वरुपाची मालकी राहील. त्यापैकीं कांहीं हिस्सा पुनः नवीन माल तयार करण्याला आवश्यक म्हणून वेगळा काढून ठेवावा लागेल. ती सामायिक मालमत्ता राहील. मंडळीच्या सभासदांचा निर्वाहही ह्या उत्पन्नांतूनच व्हावयाचा असल्यानें बाकी राहिलेला हिस्सा त्यांना वांटून दिला जात जाईल. ह्या वांटणीची पद्धत व स्वरुप ज्या मानानें माल उत्पन्न करणारांची सामाजिक उन्नति झाली असेल व माल उत्पन्न होणाऱ्या

कारखान्याचें जसें स्वरुप असेल त्यांवर अवलंबून राहतील". मार्क्स पुढें म्हणतों कीं भावी समाजस्थितींत सामायिक माल उत्पन्न करण्यांत प्रत्येकानें जितका काळ श्रम केले असतील तितका त्याचा हिस्सा त्या मालांत राहील. कारण उत्पन्नांतील हिस्सा श्रमांतील हिश्यावरुनच ठरविला पाहिजे, आणि श्रमांतील हिस्सा ठरविण्यास प्रत्येकानें किती काळ श्रम केले हें पाहण्याशिवाय दुसरें साधन नाहीं. थोडक्यांत, नवीन समाजस्थितींत सर्व माल हल्लींप्रमाणेंच सामायिक रीतीनें तयार होत जाईल. परंतु त्याची वांटणी मात्र हल्लींप्रमाणें न होतां, तो माल तयार करण्यांत ज्यानें जितका काळ श्रम केले असतील त्या मानानें त्यांतील हिस्सा त्याला दिला जाईल.,

वरील नवीन स्थितींत समाजांत सरकारची आवश्यकता राहणार नाहीं, असें मार्क्सचें मत होतें. आतांपर्यंत व हल्लींही जो जी उद्योगपद्धति समाजांत प्रचलित होती व आहे तिच्यापासून समाजांतल्या एका वर्गाचें मात्र हित होत आलें आहे, व बाकीच्या वर्गांस व्यर्थ काबाडकष्ट मात्र करावे लागले आहेत. ही पद्धति अशा रीतीनें अन्यायाची असल्यानें ती कायम ठेवण्यास सरकारची जरुरत असे. वस्तुत: आतांपर्यंत सरकार म्हणजे एका वर्गाच्या हितासाठीं समाजांतील बाकीच्या वर्गांवर अन्याय्य उद्योगपद्धति लादणारी संस्था राहत आली. आतांपर्यंत व आतांही समाजांत जमीनदार आणि त्यांचीं कुळें, कारखानदार आणि मजूर असे निराळे वर्ग निर्माण होऊन त्यांच्यांत सारखा द्वेष आणि कलह नांदत आला; आणि त्यांपैकीं बलिष्ठ वर्गाची सत्ता दुसऱ्या वर्गावर चालविण्यासाठीं सरकारची आवश्यकता राहत आली. परंतु भावी काळांत जेव्हां समाजांतील प्रत्येक व्यक्तीला हितावह अशी उद्योगपद्धति सुरु केली जाईल, जेव्हां समाजांत परस्परविरोधी असे वर्गच उरणार नाहींत, जेव्हां मजूर व कारखानदार हा भेद नष्ट होऊन हल्लींची वैयक्तिक स्पर्धा व कलह नाहींसा होईल, तेव्हां कोणाचें नियंत्रण कोणीं करण्याची आवश्यकता न उरुन सरकार हें नामशेष होईल. समाजांत समाजाच्या मालकीचे, कामकऱ्यांनीं आपण होऊन काढलेले, कारखाने निर्माण होतील. त्यांच्यांतील काम सुरळितपणें चालविण्यास व निरनिराळ्या कारखान्यांतील परस्परसंबंध व्यवस्थित ठेवण्यास सर्वांच्या संमतीनें कायम केलेली एकादी संस्था राहील; पण तिचें स्वरुप हल्लींच्या 'सरकार' हून फार वेगळें व नियंत्रणरहित राहील हें उघड आहे.

विद्यमान उद्योगपद्धतीच्या या शास्त्रीय इतिहासकाराच्या मतांची याप्रमाणें स्थूल रुपरेषा आहे. त्याच्या एकंदर मतांचें सार थोडक्यात पुढीलप्रमाणें काढतां येईल :

(१) **भौतिक वाद** – तो पक्का भौतिकवादी होता. एकंदर सृष्टि ही कार्यकारण शृंखलेनें बद्ध असून, तिला स्वतंत्र नियंता नाहीं. समाजांतील स्थित्यंतरें हीं भौतिक कारणांनीं घडत असतात, व त्यांत संपत्ति हें मुख्य कारण आहे. समाजांतल्या

एकंदर व्यवहाराच्या मूळाशीं सांपत्तिक कारणें असतात. इतिहास, कायदे, राज्यव्यवस्था, तत्त्वज्ञान, यांचें स्वरुपही सांपत्तिक कारणांवर अवलंबून असतें. अर्थातच जसा जसा या सांपत्तिक कारणांचा परिणाम होत जातो, तसतशी समाजाची परिस्थिति बदलत जाते. मनुष्य या बाबतींत पूर्णपणें परवश आहे.

पूर्वी या सांपत्तिक कारणांनीं फ्रान्सांत क्रान्ति सुरु होऊन ती सर्व यूरोपांत पसरली. तींत सरंजामीपद्धत मोडून भांडवली पद्धत व भांडवली सत्ता समाजांत प्रस्थापित झाली. यापुढें भविष्यत् काळांत दुसरी क्रान्ति होऊन, ही भांडवली सत्ता नष्ट होऊन, कामकऱ्यांची सत्ता रुढ होईल. पहिली क्रान्ति जशी अनिवार्य होती, तशीच भविष्यत् काळची दुसरी क्रान्तिही अनिवार्य आहे, अवश्यंभावी आहे. मार्क्सनें आपल्या ग्रंथांतून हें पुढील क्रान्तीचें अवश्यंभावित्वच सिद्ध केलें आहे. भांडवलदारांना दोषी ठरविण्यापेक्षां, भांडवलीपद्धतीचा अनिवार्य क्रूरपणा दाखविण्याकडे त्याचा जास्त कटाक्ष दिसून येतो. तो जणूं काय एक त्रयस्थ तत्त्वविवेचक या नात्यानें समाजाची या क्रान्तीकडे कशी अनिवार्य प्रवृत्ति आहे हें या ग्रंथांत दाखवीत आहे. हल्लींच्या भांडवली पद्धतींतच नाशाचें बीज असून, तिनें उत्पन्न केलेल्या कारणांनींच अंतीं तिचा उच्छेद होणार आहे.

(२) **कारखान्यांचा विस्तार व भांडवलाचें एकीकरण** – मार्क्सने आपल्या ग्रंथांत हल्लींच्या कारखान्यांचें स्वरुप जास्त मोठें होत जाणें कसें अनिवार्य आहे हें दाखविलें आहे. कारखानदारांतील परस्परस्पर्धेनें दिवसेंदिवस त्यांची संख्या कमी होत जाईल, परंतु शिल्लक राहणाऱ्या कारखानदारांचें मात्र भांडवल वाढत जाईल, व अशा रीतीनें समाजांतील सर्व भांडवल कांहीं थोड्या व्यक्तींच्या हातांत सांठविलें जाईल. विद्यमान उद्योगपद्धतींतला भांडवलाचा हा एकीकरणाचा धर्म मार्क्सनें फार जोरानें प्रतिपादन केला आहे. एक एक धंदा या रीतीनें एकएका व्यक्तीच्या ताब्यांत जाईल असें त्याचें मत असल्याचें त्याच्या ग्रंथावरुन दिसतें. कारखानदार एक होऊन आत्मसंरक्षणासाठीं 'ट्रस्ट' सारख्या संस्था काढतील, हें त्यानें भविष्य केलें होतें. उद्योगधंद्याप्रमाणें शेतकींतही लहान लहान शेतकरी नाहींसें होऊन मोठमोठे जमीनदार निर्माण होतील असें त्यानें अनुमान केलें आहे. अर्थातच अशा रीतीनें कारखानदारांची संख्या जशी जशी अल्प होत जाईल, तशी तशी त्यांच्या संपत्तीची अन्याय्यता, व भांडवलीपद्धतीची सदोषता, जास्त प्रखरपणें जाचक होऊं लागेल, व अंतीं ती उलथून पडेल.

(३) **वर्गकलह** – समाजांत सांपत्तिक कारणांनीं पूर्वीपासून एका वर्गाचा दुसऱ्या वर्गाशीं कलह होत आला आहे. किंबहुना समाजाचा इतिहास म्हणजे हा

वर्गकलहाचाच इतिहास होय. मार्क्सनें हल्लींच्या समाजांत एक कामकऱ्यांचा व दुसरा भांडवलवाल्यांचा वर्ग करुन, त्यांच्या हितांत शाश्वत विरोध असल्याचें दाखविलें आहे. त्याच्या मतें समाजांतील प्रत्येक व्यक्ति या किंवा त्या वर्गांत आली पाहिजे, किंवा आज येत नसली तर कालांतरानें येईल; येण्याशिवाय तिला गत्यंतर नाहीं. हल्लींच्या उद्योगपद्धतीचा हा धर्म आहे. या रीतीनें समाजांत दोन वर्ग होतील, व त्यांच्यांत शाश्वतिक विरोध असल्यानें सारखा कलह सुरु होईल. या कलहांतच या उद्योगपद्धतींच्या नाशाचें बीज आहे. हल्लीं भांडवलवाले प्रबल आहेत. पण कामकऱ्यांत जागृति झाली, शिक्षण पसरलें, म्हणजे त्यांचे प्रथम राष्ट्रांतील राष्ट्रांत, व नंतर आंतरराष्ट्रीय संघ निर्माण होतील. आणि मग त्यांस या कलहांत विजय आल्याशिवाय राहाणार नाही. नंतर देशांतील सर्व जमीन व सर्व कारखाने देशाच्या मालकीचे होतील; संपत्तिमानांचा इतरांवरील जुलूम नाहींसा होईल; एकाच्या श्रमाचें फळ दुसऱ्यानें उपटणें बंद होईल; समाजांतील सर्वच लोक कामकरी होऊन, वर्गभेदाचें मूळ नाहींसें होईल. वर्गकलह नाहींसा होईल, व समाजाच्या खऱ्या इतिहासाला तेव्हां प्रारंभ होईल.

याप्रमाणें, भौतिक वाद, भांडवलाचा एकीकरणाचा धर्म, व वर्गकलह अशीं मार्क्सच्या एकंदर विचारांचीं तीन सूत्रें आहेत.

मार्क्सच्या वरील मतांचें व्यावहारिक कार्य त्याच्या हयातींत व नंतर दोन संस्थांच्या द्वारें घडलें. • एक आंतरराष्ट्रीय संघ, व दुसरा जर्मनींतला प्रजासत्ताक-सामाजिकवादी पक्ष. यांपैकीं पहिलीचा मार्क्स हा प्रथमपासून मुख्य चालक व प्रवर्तक असून, तिची संघटना, नियम, व पहिल्या बैठकींतलें प्रास्ताविक भाषण त्यानेंच तयार केलें होतें. अर्थातच तिचें सर्व श्रेय त्यालाच होतें.

दुसरी संस्था मूळ लॅसेलनें स्थापन केली. पण तिच्या स्थापनेनंतर अवघ्या पंधरा महिन्यांनीं तो मरण पावला. आणि पुढें तिला मुख्य स्फूर्ति मार्क्सच्या पक्षाकडून मिळत गेली, व तिचें धोरण आणि कार्यक्रम त्याच्या मतानुसार राहत गेले. राष्ट्रांत कामकरी वर्गाचा स्वतंत्र पक्ष निर्माण करुन, त्याचे प्रतिनिधि पार्लमेंटांत पाठवावेत, व त्यांच्या जोरावर इष्ट सुधारणा घडवून आणाव्यात असें मार्क्सचें मत होतें, त्याला अनुसरुन त्याच्या हयातींत मुख्यत्वेंकरुन जर्मनींत वरील पक्षानेंच कार्य केलें. व त्याचा कामकऱ्यांच्या स्थितीवर पुष्कळ इष्ट परिणाम घडला. अशा रीतीनें मार्क्सच्या शिकवणींचेंच तें एकप्रकारें अप्रत्यक्ष फल आहे. म्हणून या पक्षाच्या कार्यासंबंधी प्रथमतः दोन शब्द सांगून, नंतर मार्क्सच्या प्रत्यक्ष प्रयत्नांनीं स्थापन झालेल्या आंतरराष्ट्रीय संघाचें वर्णन करुं.

लॅसेलनें सन १८६३ त Universal working Mens association स्थापन केल्याचें मागील प्रकरणांत वाचलेलें वाचकांस आठवत असेल. ही संस्थाच जर्मनींतल्या प्रजासत्ताक-सामाजिकवादी पक्षाची जननी होय. हिच्या स्थापनेनंतर पंधराच महिन्यांनीं लॅसेल वारला, पण तरीही त्या वेळीं तिच्या सभासदांची संख्या ४६१० होती. लॅसेलच्या मरणोत्तर या संस्थेनें आपल्या मतांच्या प्रसारार्थ Social Demo-crat नांवाचें पत्र काढलें. त्याच्या लेखकांत मार्क्स व एंजल्स हे मुख्य होते. या पत्राच्या योगानें सामाजिक वादाचा जर्मनींतील कामकऱ्यांत पुष्कळ प्रसार झाला, व त्यांच्यांत जागृति उत्पन्न झाली. सन १८६७ त जर्मनींतील उत्तरेकडील संस्थानांचा संघ कायम झाला; व त्यांचा सूत्रधार जो बिस्मार्क त्यानें त्या संस्थानांतून लोकांना सार्वत्रिक मतदानाचा हक्क दिला. यामुळें या कामकरी वर्गाला जर्मन पार्लमेंटांत आपल्या संख्येनुरुप प्रतिनिधि पाठविण्याची आशा उत्पन्न झाली. व या वर्गाच्या पार्लमेंटांतील चळवळीला नवीन जीवन प्राप्त झालें.

पण जर्मनींत यावेळीं कामकरी वर्गांत दोन पक्ष होते. एक वर वर्णन केलेला लॅसेल मतानुयायांचा, व दुसरा लीबनेक्त, बेबेल वगैरे इतर पुढाऱ्यांचा. या दोन पक्षांत नुक्त्याच स्थापन झालेल्या जर्मनसंघासंबंधांत व इतर किरकोळ मतभेद होता. पण दोन्ही पक्षांचे प्रतिनिधि जर्मन पार्लमेंटांत होते. सन १८७०-७१ च्या फ्रँको-जर्मन युद्धांचें वेळीं लॅसेल पक्षानें युद्धाला अनुकूल मत देऊन, त्यासाठीं खर्च मंजूर केला होता; कारण एरवीं नेपोलियनची सत्ता सर्व युरोपभर पसरेल, जर्मनीचें स्वांतत्र्य नष्ट होईल, व कामकरी पक्ष हतवीर्य होईल अशी त्यांना भीति वाटत होती. पण बेबेल-पक्षाला नेपोलियन व बिस्मार्क हे दोघेही सारखेच जुलमी अतएव त्याज्य वाटत होते, म्हणून त्या पक्षानें मत देणेंच नाकारलें. या बेबेल-लीबनेक्त-पक्षाला मार्क्सचीं मतें पूर्णपणें मान्य होतीं. या पक्षांतील कामकऱ्यांचे आपापल्या गांवीं संघ Unions असत, व त्यांची दरवर्षी काँग्रेस भरत असे. सन १८६८ त या पक्षाच्या काँग्रेसनें मार्क्सच्या आंतरराष्ट्रीय संघाचीं मतें आपणांस मंजूर असल्याचा ठराव पसार केला, व पुढील वर्षी त्या संघाच्या बैठकीला आपले प्रतिनिधि पाठविले.

सन १८७५ त या दोन्ही पक्षांचा समेट होऊन त्यांची गोथा येथें संयुक्त काँग्रेस भरली; व तींत नवीन संयुक्त पक्षाचें 'जर्मन-सामाजिकवादी कामकरी-पक्ष' असें नांव ठेवण्यांत आलें. या वेळीं या पक्षाचे उद्देश व कार्यक्रमही ठरविण्यांत आला. त्यांत कामकऱ्यांच्या मुक्ततेसाठीं, श्रमाची साधनें जे कारखाने ते राष्ट्राच्या मालकीचे केले जाऊन, कामकऱ्यांच्या सहकारी संस्थांना चालविण्यासाठीं दिले जावेत; व हल्लींची रोजमुऱ्याची पद्धत बंद करुन, रोजमुऱ्याच्या अबाधित नियमाला समाजोंत स्थान मिळूं देऊं नये, असे उद्देश जाहीर केले आहेत. या उद्देशाच्या सिद्धीसाठीं पुढील मागण्या प्राप्त करुन घेण्याचें त्या पत्रानें ठरविलें होतें :-

(१) सार्वजनिक व समान मतदानाचा हक्क मिळावा.
(२) युद्ध व तहाचें प्रश्न लोकांच्या मतानें निश्चित व्हावेत. कायदे लोकांनी करावेत.
(३) हल्लींच्या खड्या पगारी सैन्याऐवजीं लोकांचें स्वयंसेवक सैन्य असावें. लष्करी शिक्षण सार्वत्रिक सक्तीचें व्हावे.
(४) स्वातंत्र्य-विघातक कायदे रद्द व्हावेत.
(५) न्याय फुकट मिळावा. न्यायाधीश लोकनियुक्त असावे.
(६) शिक्षण सार्वत्रिक, सक्तीचें व मोफत असावें.
(७) कामकऱ्यांना संघ स्थापण्याला अनियंत्रित स्वातंत्र्य असावें.
(८) समाजाच्या परिस्थित्यनुरुप कामाचें तास नियमित व्हावेत. रविवारीं विश्रांति असावी.
(९) मुलांकडून व स्त्रियांकडून आरोग्याला व नीतीला अपायकारक श्रम घेण्याची बंदी असावी.
(१०) कामकऱ्यांचें जीवित व आरोग्य यांच्या संरक्षणासाठीं कायदे व्हावेत.
(११) राज्यांत एकच प्रत्यक्ष, व वाढता, प्राप्तीवर कर घेतला जावा.

वरील कार्यक्रम अगदी स्थूल आहे. पण त्यावरुन मार्क्सच्या मताची छाप दृग्गोचर होते. दोन्ही पक्षांचें ऐक्य झाल्यानंतर, त्यांच्या कार्याला खूप जोर आला, व त्यांच्या अनुयायांची संख्या भराभर वाढत गेली. सन १८७७ तील निवडणुकींत या पक्षाचीं पांच लक्ष मतें पडलीं व बारा सभासद जर्मन सभेंत निवडून आले.

या प्रसारामुळें राज्यकर्त्यांला या पक्षाचें वैषम्य वाटणें साहजिक होतें. त्यांतच या पक्षाचें आंतरराष्ट्रीय ऐक्यतेचें व युद्ध-विरोधक धोरण असल्यानें तो पक्ष बिस्मार्कसारख्या साम्राज्यवादी मुत्सद्याला फार अप्रिय होता. सरतेशेवटीं बिस्मार्कनें अनुकूल संधि पाहून, वाक्स्वातंत्र्य नियंत्रित करणारे व कामकऱ्यांना प्रतिकूल असे इतर कायदे मंजूर करुन घेतले, व त्यांची कडक अंमलबजावणी सुरु केली. त्या योगानें प्रथम प्रथम या पक्षाचा जोर पुष्कळ कमी झाला. पण कामकऱ्यांत एकदां उत्पन्न झालेली जागृति व चैतन्य कायमचें मिटणें अशक्य होतें. त्या पक्षानें पुन: उचल घेतली. त्याचा प्रसार पुन: सुरु झाला, व सन १८९० त या पक्षाचीं १४ लक्ष २७ हजार मतें पडलीं. जर्मन रैकस्टॅग (पार्लमेंट)मध्यें हा सर्वांत प्रबळ पक्ष होता. अर्थातच त्या पक्षाला प्रतिकूल असलेले कायदे यावेळीं नाहीसे झाले.

असा या पक्षांचा थोडक्यांत इतिहास आहे. जर्मन कामकऱ्यांत ऐक्य, स्वावलंबन व स्वार्थत्याग उत्पन्न करुन, त्यांना मार्क्सच्या मतांप्रमाणें, पार्लमेंटांतून

प्रतिनिधिद्वारा आपल्या सिद्धीसाठीं प्रयत्न करण्यास या पक्षानें शिकविलें हे त्याचें अत्यंत-मोठें कार्य आहे. सामाजिकवाद्यांची चळवळ ही जिवंत चळवळ आहे. त्यामुळें पहिली परिस्थिति प्राप्त झाल्यावर नवीन उपाय योजिले जातील व जावेत हें योग्यच आहे व त्याप्रमाणें जर्मनींच्या विद्यमान लोकसत्ताक राज्यपद्धतींत सामाजिकवादी पक्षानें नवीन धोरण कायम केलें यांत नवल नाहीं. परंतु कामकरी वर्गातील जागृतीच्या प्रारंभिक अवस्थेंत त्याला पार्लमेंटांतील चळवळीचा योग्य मार्ग दाखवून देण्यांत वरील प्रजासत्ताक सामाजिकवादी-पक्षानें मोठें कार्य केलें यांत संशय नाहीं.

आतां आंतरराष्ट्रीय संघाचें वर्णन करुन हें प्रकरण संपवूं.

युरोपांतील कामकऱ्यांचा आंतरराष्ट्रीय संघ स्थापन करण्याला त्या खंडाची भौगोलिक स्थिति व पूर्वपरंपरा हीं फार अनुकूल होतीं. त्या खंडांतल्या बहुतेक सर्व राष्ट्रांतून ग्रीको-रोमन संस्कृति पसरलेली असल्यानें, त्याच्यांत एकप्रकारची परस्परसहानुभूति व साधर्म्य वास करीत असते. त्यामुळें कोणत्याही देशांत एकादा नवा शोध, नवी चळवळ, किंवा नवें तन्त्व प्रचलित झालें असतां त्याचा प्रभाव त्या एकाच देशांत थांबून न राहतां, आसपासच्या सर्व देशांतून पसरुं लागतो. यूरोपच्या इतिहासांत याचीं अनेक उदाहरणें आढळतात. प्रथमत: इटलींत ख्रिश्चन धर्माचा प्रसार झाला. तेथें त्याचें बीज एकदां नीट रुजल्यावर, त्याच्या शाखा सर्व यूरोपभर पसरण्यास फार काळ लागला नाहीं. पुढें जर्मनींत ल्यूथरनें प्रोटेस्टंट पंथ काढला, वर अर्ध्याहून अधिक यूरोप त्या पंथाचे अनुयायी बनलें. अठराव्या शतकाच्या अखेरीस फ्रान्सांत राज्यक्रान्ति होऊन समता, स्वतंत्रता व बंधुता या तन्त्वांचा जयजयकार होऊं लागला. लवकरच त्याची लाट सर्व यूरोपभर अशा जोरनें पसरली कीं, कित्येक राजांचीं आसनें तिनें वाहून नेलीं, व बाकीच्यांचीं खिळखिळीं करुन टाकलीं. लोकशाहीच्या उदयाला या काळापासूनच खरा आरंभ यूरोपांत झाला. या व दुसऱ्या अनेक उदाहरणांवरुन यूरोपखंडांतील सर्व देश परस्परांशीं एकप्रकारें संबद्ध झालेले आहेतसें दिसून येईल. दळणवळणाच्या वाफेच्या व विजेच्या नवीन साधनांनीं हा त्यांचा संबंध जास्त निकट झाला. यांत्रिक शोधांनीं प्रचलित झालेल्या नवीन उद्योग व व्यापारपद्धतीनें त्यांत भर घातलीं. पूर्वी प्रत्येक देशाचे उद्योग व व्यापार आपांपल्यां देशापुरते असत. नवीन पद्धतींत प्रत्येक देश सर्व जगाला माल पुरविण्याची हांव धरुं लागला. त्यामुळें निरनिराळ्या देशांत परस्परांत व्यापार तर सुरु झालाच, पण त्याबरोबरच व्यापारी चढाओढही सुरु झाली. त्यामुळें निरनिराळया देशांतील कारखानदार व व्यापारी यांचा परस्परांशीं पुष्कळ संबंध येऊं लागला. प्रथम प्रथम परस्परांत खूप जोराची चढाओढ चालत असे; पण लवकरच अशा चढाओढीपासून सर्वांचेंच नुकसान होत असल्याचा त्यांना अनुभव येऊं लागला, व परस्परांच्या हितसंरक्षणासाठीं ऐक्यतेची व सहकारितेची आवश्यकता भासूं लागली. तेव्हां

कारखानदार लोकांच्या व व्यापाऱ्यांच्या आंतरराष्ट्रीय मंडळ्या व सभा स्थापन होऊं लागल्या. मालाचे दर सारखे ठेवण्यांत, मजूरीचे दर वाढूं न देण्यांत, मजूरांनीं संप केल्यास तो मोडून काढण्यांत, वगैरे या सभांचा अतिशय उपयोग होऊं लागला. तो पाहून कामकरी वर्गालाही आपला आंतरराष्ट्रीय संघ स्थापन करण्याची स्फूर्ति होत चालली. कारखानदारांप्रमाणेंच निरनिराळ्या देशांतील कामकऱ्यांतही परस्परांत चढाओढ चालू असे. एकाद्या देशांत मजूरी जास्त मिळत असली, तर तेथें इतर देशांतले मजूर जात व कमी दरावर काम करुं लागत, त्यामुळें लवकरच सर्वांनाच कमी मजूरी मिळूं लागे. एका देशांतील मजूरांनीं रोजमुरा वाढण्यासाठीं किंवा इतर मागण्या कबूल करुन घेण्यासाठीं संप केला, तर इतर देशांतील त्यांच्या जागीं काम करण्यास येत, व संप निष्फळ होई. कारखानदारांचें उदाहरण पाहून मजूरांनाही सहकारितेनें वागण्याची आवश्यकता पटली. निरनिराळ्या देशांतील हद्दपार झालेले बरेच उत्साही कामकरी यावेळीं पॅरिसला होते. त्यांनीं संघाच्या कल्पनेला दृश्यरुप देण्याचें ठरविलें, व इ. स. १८४४ त एका आंतरराष्ट्रीय मंडळाची स्थापना केली. या वेळीं या संघाचें नांव (communist's Manifesto) मार्क्सनें लिहिलें होतें. त्यांत त्यानें सामाजिक वादाच्या तत्त्वांचें व लीगच्या कार्यक्रमाचें अत्यंत जोरदार, आवेशयुक्त, सप्रमाण विवेचन केलें आहे. सामाजिक वादाच्या वाङ्.मयात हें पत्रक फार प्रसिद्ध असून, त्यांतील उपसंहारांत मार्क्सचे सुप्रसिद्ध उपदेशसूत्र , "Proletarians of all lands write." ('हे सर्व देशांतील कामकऱ्यांनो, एक व्हा') हें दिलेलें आहे. मार्क्सच्या मतांचें सार या जाहिरपत्रांत अत्यंत विशद व चित्ताकर्षक रीतीनें सांगितलें असून, सरतेशेवटीं मजुरवर्गास कळकळीचा व उत्साहजनक असा उपदेश केला आहे. यामुळें अजूनही कामकरी वर्गांकडून त्याचीं पारायणें करण्यांत येतात यांत नवल नाहीं. समाजाची रचना सांपत्तिक पायावर झालेली असून समाजाच्या राजकीय इतिहासाच्या मूळाशीं त्यांतील अर्थोत्पादनाची व्यवस्था आहे. हा इतिहास म्हणजे समाजांतील एका वर्गाचें दुसऱ्या वर्गाशीं झालेलें भांडण, व त्या भांडणांत यशस्वी झालेल्या वर्गानें दुसऱ्या वर्गावर अबाधित सत्ता चालू ठेवण्यासाठीं केलेले प्रयत्न यांचें वर्णन आहे. समाजांत आतांपर्यंत दोन वर्ग राहत आले, एक सत्ताधारी, लुटणारा वर्ग; व दुसरा त्या सत्तेनें आक्रांत झालेला, लुटला जाणारा वर्ग. परंतु आंतरराष्ट्रीय मंडळ व सामाजिक वाद यांनीं समाजांत क्रान्ति होऊन नवीन व्यवस्था झाल्यावर हा वर्गभेद समाजांत राहणार नाहीं. समाजांत खासगी मालमत्ता उरली नाहीं, सर्वांचे हक्क व दर्जा सारखा झाला, व सर्वांनाच त्यांच्या श्रमाच्या मानानें उत्पन्नाचा वांटा मिळूं लागला, म्हणजे समाजांत निरनिराळे वर्ग उत्पन्न होण्याचें, किंवा हल्लींचा हितविरोध व द्वेष राहण्याचें कारणच नाहींसें होईल. ही जी क्रान्ति घडवून आणावयाची ती मजूरवर्गानें स्वतःच्या विद्यमान अवनतस्थितीचीं कारणें समजावून घेऊन, ज्या दिशेनें समाजाची उत्क्रान्ति होत असेल त्या दिशेनेंच आत्मप्रयत्नानें आणली पाहिजे, व तिच्यासाठीं सर्व राष्ट्रांतील कामकऱ्यांनीं एकजुटीनें प्रयत्नास लागलें पाहिजे.

असा या उद्देशपत्रकाचा आशय होता. या लीगनें यूरोपांतील कामकरी वर्गांत थोडीफार जागृति केली, पण तिचे प्रयत्न यशस्वी होण्याला तो काळ बराच प्रतिकूल होता. सन १८४८ त यूरोपांतल्या बऱ्याच देशांत राज्यक्रान्तीची लाट पसरुन कांहीं काळ लोकसत्ता सिंहासनारुढ झाली होती. पण नंतर लवकरच तिची हकालपट्टी होऊन पुन: पूर्वीची बेजबाबदार एकतंत्रानुयायी राज्यपद्धति झाली. याच सुमारास यूरोपातील व्यापाराला तेजी आली. उद्योगधंदे भरभराटीला येऊन मजूरांना पूर्वीहून थोडा जास्त रोजमुरा मिळूं लागला. त्यामुळें दारिद्र्याची आंच किंचित् कमी झाली, व त्याच मानानें लीगच्या मतांचा प्रसार होण्याला अडचण पडूं लागली. त्यानें हळू हळू तिच्या कामांत शैथिल्य येत जाऊन अखेर सन १८५२ त ती अजीबात बंद पडली.

याप्रमाणें लीग बंद झाली, पण तिनें रुजत घातलेलें बीं नष्ट झालें नाहीं. तें जमिनीखालीं अनुकूल परिस्थितीची वाट पाहत कायम होतें. ती परिस्थिति थोड्या अंशानें सन १८६२ त आली. या सालीं लंडनला एक मोठें आंतरराष्ट्रीय प्रदर्शन भरलें होतें. तें पाहण्याला फ्रान्सहून कामकऱ्यांतर्फे बरेच प्रतिनिधि मुद्दाम आले होते. त्यावेळीं त्यांच्यांत व लंडनमधील कामकऱ्यांत बरीच वाटाघाट होऊन कामकऱ्याचा एक आंतरराष्ट्रीय संघ स्थापन करण्याचें नक्की ठरलें. त्याप्रमाणें पुढच्याच वर्षी म्हणजे सन १८६३ त या संघाची पहिली बैठक लंडनला झाली. या सर्व प्रयत्नांचा मुख्य चालक मार्क्स हा होता. त्यानें संघाच्या स्थापनेच्या वेळचें प्रास्ताविक भाषण लिहून काढलें व संघांतील कार्यकारी मंडळाच्या इच्छेवरुन त्याचे नियमही तयार केले. संघाच्या प्रास्ताविक भाषणांत मार्क्सनें प्रथमत: तीन मुद्दे सिद्ध केले होते. पहिला मुद्दा हा कीं, सन १८४८ त यूरोपांतल्या उद्योगधंद्याची व व्यापाराची भरभराट झाली, पण तिनें कामकऱ्यांचें दैन्य मात्र फारसें कमी झालें नाहीं. त्यांच्या स्थितींत किंचित् सुधारणा झाली, पण एकंदर भरभराटीच्या मानानें ही सुधारणा नांव घेण्यासारखी नव्हती. दुसरा मुद्दा हा कीं, आतांपावेतों अर्थशास्त्रज्ञ व राजकारणविशारदांचा असा सिद्धांत होता कीं, सरकारनें उद्योगधंद्यांच्या अंतर्व्यवस्थेंत हात घालूं नये; सरकारनें तटस्थवृत्ति ठवल्यानेंच उद्योगधंद्याची परस्परांत स्पर्धा लागून उन्नति होते. परंतु सरकारनें अलीकडे कायदा करुन कामकऱ्यांचे कामाचे तास दहांहून जास्त नसावेत असा निर्बंध घातला. त्यानें वरील सिद्धांताला अनुसरुन सरकारचें वर्तन नसून त्यांना तो सिद्धांत चुकीचा वाटत असल्याचें सिद्ध होतें. तिसरा मुद्दा हा कीं, सामाजिक वादाविरुद्ध सामान्यत: हा आक्षेप आणण्यांत येत असतो कीं कारखाना चालविण्यास लागणारें व्यवस्थाचातुर्य, दक्षता, टापटीप, कर्तबगारी इत्यादि गुण मजूरांत नसल्यानें, नुसत्या मजूरांना कारखानदारांच्या मदतीशिवाय कारखाने चालवितां यावयाचे नाहींत. परंतु सन १८४८ नंतर कामकऱ्यांनी कित्येक सहकारी कारखाने काढून यशस्वी करुन दाखविले. यावरुन कामकरी लोक कारखाने चालवूं शकतात हें तर सिद्ध झालेंच; पण त्याबरोबर भांडवलवाल्यांचा निराळा

वर्ग नसतांही कारखाने सुयंत्रित चालूं शकतात हें दिसून आलें. हे तीन मुद्दे सिद्ध करुन मार्क्सनें असें प्रतिपादन केलें कीं, ज्याप्रमाणें समाजांत एक वेळां गुलामांकडून काम घेण्याची पद्धत असे, ती जाऊन तिच्या जागीं स्वतंत्र कामकऱ्यांना त्यांच्या इच्छेनुसार रोजमुरा देऊन काम घेण्याची पद्धत प्रचारांत आली, तद्वत आतां ही रोजमुरापद्धतही नाहींशी होऊन तिच्या जागीं संभूयसमुत्थानाची ( associated labour ) पद्धत प्रचारांत येण्याची वेळ आली आहे. हल्लींच्या उद्योगपद्धतीचा उत्कर्ष झाला असतांही तिच्यांत समाजांतील बहुजनवर्गाचें दुःख व दैन्य दूर करण्याचें सामर्थ्य आलेलें नाहीं. यावरुन तिची अनुपयुक्तता व तिच्या जागीं दुसरी पद्धत सुरु करण्याची आवश्यकता सिद्ध होते. ही नवी पद्धत म्हणजे सामाजिक वादानें प्रतिपादिलेली, कामकऱ्यांना आपल्या श्रमाचें पूर्ण फळ देणारी, भांडवलवाल्यांचा वर्ग नाहींसा करणारी, सर्व कारखाने राष्ट्रीय मालकीचे करणारी पद्धत होय. परंतु हल्लींच्या कामकरी वर्गांत ऐक्य उत्पन्न होऊन, त्याचें या दिशेनें प्रयत्न झाले तरच ही नवी पद्धत अस्तित्वांत येईल. म्हणून निरनिराळ्या राष्ट्रांतील कामकरी वर्गांत हें ऐक्य घडवून आणण्याचा या संघाचा मुख्य उद्देश आहे. कारकरी वर्गाचें वर्तमान आर्थिक दास्य नाहींसें करण्यासाठीं संघानें निरनिराळ्या राष्ट्रांतील सरकारांच्या कृत्यांवर नजर ठेवून, राष्ट्राराष्ट्रांचे, खुद्द आपापल्या देशांतले व परस्परांतले व्यवहार सत्य, न्याय व नीति यांना धरुन होत जातील अशी काळजी घ्यावी. संघाचें हें ध्येय पाहिजें कीं, समाजांत श्रम केल्याशिवाय हल्लीं फळ मिळतें तें पुढें मिळणार नाहीं, कोणतेही विशेष हक्क उपभोगणारांना तदनुरुप कर्तव्येंही करावीं लागतील, व कर्तव्यें करणारांना तदनुरुप हक्क प्राप्त होतील. कोणत्याही एका राष्ट्राच्या एकाकी प्रयत्नानें ही व्यवस्था प्रचलित होणें कठिण आहे. यासाठीं आंतरराष्ट्रीय संघानें सर्व राष्ट्रांतील कामकरी वर्गाची इच्छाशक्ति व कार्यसामर्थ्य एकवटून, त्यांच्या जोरावर हें कार्य घडवून आणलें पाहिजे.

मार्क्सच्या सूचनेप्रमाणें या संघाचें एक कौन्सिल नेमलें जाऊन त्यांत सर्व राष्ट्रांतील कामकरी वर्गांचे प्रतिनिधि समाविष्ट करण्यांत आले. संघाची वर्षांतून एकदां बैठक होऊन त्यावेळीं झालेल्या ठरावांना अनुसरुन कौन्सिलनें सर्व वर्षभर काम करावें असें ठरविण्यांत आलें.

त्याप्रमाणें पुढें बरींच वर्षेंपावेतों संघाच्या वार्षिक बैठकी होत, व त्यांत मजूरवर्गाच्या हितसंबंधी प्रश्नांचा ऊहापोह होऊन ठराव पसार करण्यांत येत. या ठरावांवरुन संघाच्या उद्देशांचें व कार्याचें स्वरुप चांगलें व्यक्त होतें. पहिल्या बैठकींतच सर्व कामकऱ्यांना बौद्धिक व धंद्यांचें शिक्षण देण्याची व्यवस्था केली जावी, व हें शिक्षण घेण्यास वेळ मिळावा म्हणून कामाचे तास दररोज आठ केले जावेत असा ठराव पसार करण्यांत आला. पुढच्या बैठकीत देशांतील दळणवळणाचीं साधनें, (रेल्वे, कालवे, रस्ते,

वगैरे) सरकार-मालकीचीं असावींत, असा ठराव करण्यांत आला. त्याच्या पुढच्या बैठकीतून खाणी व जंगलें राष्ट्रीय मालकीचीं करुन, तीं त्यांतून माल काढण्यासाठीं व तयार करण्यासाठीं कामकऱ्यांच्या सहकारी संस्थांच्या स्वाधीन केलीं जावींत, देशांतील सर्व जमीन सरकारनें आपल्या मालकीखालीं घ्यावा. हल्लींची यंत्रसामग्री व अशींच इतर उत्पादन-साधनें कामकऱ्यांना विकत घेतां यावींत म्हणून त्यांच्या सहकारी संस्था व पतपेढ्या कायम केल्या जाव्यात; श्रम करणारांना श्रमाचें सर्व फळ मिळत जावें; भाडें, व्याज व नफा हीं अजिबात बंद केलीं जावींत; हे ठराव पसार झाले. सन १८६८ च्या सुमारास फ्रान्स व जर्मनी ह्यांच्यांत युद्ध जुंपण्याचा रंग दिसूं लागला. राष्ट्राराष्ट्रांतील युद्धें हीं सत्ताधारी वर्ग आपल्या हितासाठीं उकरुन काढतात, व त्यांत कामकरी वर्गांतले लोक मात्र व्यर्थ बळी पडतात, असें संघाचें मत असल्यानें त्यानें असा ठराव पसार केला कीं, या युद्धाचा सर्व देशांतील कामकऱ्यांनीं शक्य तितका प्रतिकार करावा, व इतक्यावरही युद्ध सुरु झाल्यास संप करावा.

सन १८७० पावेतों आंतरराष्ट्रीय संघाचें काम मोठ्या उत्साहानें व जोरानें चाललें. सर्व देशांतून कामकरी संस्था स्थापन होऊन त्या संघांत सामील होऊं लागल्या. संघाचीं तत्त्वें सर्वदूर मान्य होऊं लागलीं. परंतु सन १८७१ त संघाच्या कार्यांत मोठें विघ्न उपस्थित झालें. या सालीं संघाची वार्षिक बैठक पॅरिसला होणार होती, परंतु ती होण्याच्या पूर्वी प्रसिद्ध फ्रँको-जर्मन युद्ध सुरु होऊन फ्रान्सचा बादशहा दुसरा नेपोलियन हा जर्मनांना शरण गेला व खुद्द पॅरिसलाच जर्मनांचा वेढा पडला. बाहेरुन असा वेढा पडला असतां, आंत पॅरिसच्या कम्यूननें नेपोलियनच्या अधिकारीमंडळाला दूर करुन नवें प्रजासत्ताक राज्य स्थापिलें. या क्रान्तीशीं 'आंतरराष्ट्रीय'चा प्रत्यक्ष संबंध असा नव्हता. परंतु तींत आंतरराष्ट्रीयांतले बरेच सभासद सामील होते; व मागून मार्क्सनें तिच्या समर्थनार्थ एक अत्यंत जोरदार व सणसणीत विस्तृत लेख प्रसिद्ध केला. या क्रान्तीबद्दल आंतरराष्ट्रीय संघाची अंत:करणपूर्वक सहानुभूति होती यांत नवल नाहीं. कारण तिचे मुख्य चालक कामकरीवर्गांतले असून तिच्या योगानें पॅरिसची राजसत्ता त्या कालापुरती कामकरी वर्गाच्या हातीं आली होती. दुसरी गोष्ट अशी कीं, राज्यव्यवस्थेंत प्रत्येक शहर स्वतंत्र व स्वसत्ताक असावें असें मार्क्सचें तत्त्व होतें. त्याला अनुसरुनच या क्रान्तींत व्यवस्था करण्यांत आली होती. या सर्व कारणांमुळें, जरी ती क्रान्ती आंतरराष्ट्रीय संघानें प्रत्यक्ष घडवून आणली नव्हती, तरी तिचा व त्या संघाचा निकट संबंध जडला होता. त्याचा परिणाम असा झाला कीं थोड्याच काळानंतर जेव्हां फ्रान्सात प्रतिक्रान्ति होऊन पुन: पूर्वीची राज्यपद्धति कायम झाली, तेव्हां आंतरराष्ट्रीय संघाच्या कामांत साहजिक निरुत्साह व औदासीन्य आलें. प्रतिक्रान्तींत फ्रान्सांतले कामकरीवर्गाचे बरेच पुढारी नाहींसे झाले होते. जर्मनींतल्या कामकरी वर्गांत दुफळी माजली होती, आणि इंग्लिश कामकऱ्यांचें तर पहिल्यापासून वरील प्रश्नांकडे जास्त लक्ष असे व त्यांना

आंतरराष्ट्रीय चळवळीविषयीं तितकी कळकळ वाटत नव्हती. तरीही संघाचें काम शिथिलपणानें कां होईना पण चाललें असतें.

पण या सुमारास संघातच पूर्वीपासून चालत आलेल्या दोन पक्षांच्या मतभेदाला जास्त तीव्र रुप आलें. हे पक्ष म्हणजे एक मार्क्सचा व दुसरा प्रसिद्ध अराजकवादी बाकुनिन याचा. बाकुनिन व मार्क्स हे दोघेही थोर पुरुष होते, अत्यंत विद्वान् होते, व विशेष हें कीं, दोघेही आपल्या ध्येयासाठीं वाटेल तो स्वार्थत्याग व हालअपेष्टा सहन करण्यास तयार होते. पण त्यांचे स्वभाव व मतें परस्परविरोधी असून दुःखाची गोष्ट ही कीं, त्यांच्यांत पुष्कळ वर्षांपासून खासगी द्वेष व तिरस्कार नांदत होता. बाकुनिनें स्वतः एके ठिकाणीं लिहलें आहे कीं " But there was never any frank intimacy between us. Our temperaments would not suffer it. He called me a sentimental idealist, and he was right; I called him a vain man, perfidions and crafty, and I also was right." "परंतु आम्हां दोघांचा मोकळेपणा व दाट स्नेह केव्हांच नव्हता. आमचे स्वभावच त्याच्या विरुद्ध होते. तो मला विकारवश, कल्पनासृष्टींत वावरणारा म्हणत असे, आणि तें त्याचें म्हणणें बरोबर होतें. मी त्याला घमंडी, दगलबाज, धूर्त म्हणें, आणि माझेंही म्हणणें बरोबर होतें."

यावरुन दोघांच्या परस्परांविषयींच्या वृत्तींची कांहींशी कल्पना होईल. याच त्यांच्या वृत्ति आंतराष्ट्रीय संघांतही परस्परांविषयीं कायम होत्या. बाकुनिन हा प्रथम आंतराष्ट्रीय संघांत सामील झाला नव्हता. पण पुढें त्याचें वजन वाढत असलेलें पाहून, तो आपल्या अनुयायांसह त्यात शिरला. स्पेन, इटली, स्विट्झर्लंड वगैरे देशांतून त्याला पुष्कळ पाठिंबा मिळे. सन १८६९ त संघाची जी चौथी बैठक झाली तींत त्याचा पक्ष चांगला जोरकस होता. जर्मन व इंग्लिश कामकऱ्यांत मार्क्सचीं मतें बहुधा मान्य असत. सरकार या संस्थेचें स्वरुप सामाजिक क्रान्तींत बदलावें लागेल पण ती संस्था बदललेल्या स्वरुपांत पुढें कायम राहील, असें मार्क्सचें मत होतें. त्याचप्रमाणें हल्लीं जी चळवळ करावयाची ती निरनिराळ्या देशांत कामकरी पक्ष स्थापन करुन, त्यांचें प्रतिनिधि पार्लमेंटांत पाठवून त्यांच्या द्वारें करावी असें मार्क्सचें धोरण होतें. सामान्यतः क्रान्ति केल्याशिवाय कामकरी वर्गाच्या हातीं सत्ता येणार नाहीं, हें मार्क्सचें तन्त्व होतें. परंतु अमेरिका, इंग्लंडसारख्या देशांत, क्रान्ति न करतां, शांततेच्या उपायांनीं कामकऱ्यांना आपली इष्टसिद्धि करतां येईल हें त्याला कबूल होतें. म्हणूनच शक्य असेल तोंवर शांततापूर्वक व शक्य नसेल तेव्हां क्रांतिकारक उपायांनीं इष्टसिद्ध्यर्थ प्रयत्न करावे असें मार्क्सचें व त्याच्या इंग्लिश व जर्मन अनुयायांचें मत होतें. बाकुनिनच्या पक्षाला सरकार ही संस्थाच नको होती. प्रातिनिधिक किंवा इतर कोणतीही राज्यपद्धती सारखीच अनर्थावह आहे असें त्याचें मत होतें. अर्थातच त्याला पार्लमेंटांत कामकरी पक्षाचे

सभासद पाठवून चळवळ करणें पसंत नव्हतें. त्याचप्रमाणें प्रथम शांततापूर्वक व नंतर क्रान्तिकारक उपाय योजणेंही त्याला मान्य नव्हतें. आंतरराष्ट्रीय संघाची व त्याला जोडलेल्या निरनिराळ्या राष्ट्रांतील कामकरी संस्थांची व्यवस्था केंद्रवर्ती असलेली ही तत्त्वत: सर्व प्रकारच्या सत्तेला विरोध करणाऱ्या बाकुनिन–पक्षाला संपत नव्हती. अर्थातच या दोनी पक्षांचा सलोखा राहणें, किंवा त्यांच्यांत तडजोड होणें दोन्ही गोष्टी शक्य नव्हत्या. सन १८७२ तल्या बैठकींत या पक्षांचा मतविरोध फारच विकोपाला गेला, व मार्क्सच्या अनुयायांची संख्या त्यावेळीं जास्त असल्यानें त्यांनीं अराजक पक्षाला संघांतून कायमचें काढून लावलें; व संघाचें मुख्य ठिकाण जें लंडनला होतें तें न्यूयॉर्कला बदललें. परंतु या योगानें संघाचा अगोदरच कमी झालेला जोम अगदींच नाहींसा झाला, व पुढच्याच सालापासून संघाच्या बैठकी होणें बंद झालें.

यात्रमाणें संघ मोडला, पण त्याच्या अस्तित्त्वाच्या आठ दहा वर्षांच्या काळांत त्यानें मजूरवर्गांत एक नवें सामर्थ्य उत्पन्न केलें होतें. या सामर्थ्यापासून केवढें कार्य होण्यासारखें होतें याची कांहीं कल्पना फ्रँको-जर्मन युद्ध सुरु होण्यापूर्वी त्याला प्रतिकार करण्याचा जो ठराव संघानें मंजूर केला होता त्यावरुन होते. खरोखर कामकरी लोकांनीं एकचित्तानें हा ठराव अंमलांत आणला तर जगांत युद्ध होणें अशक्य होईल. युद्धसामग्री तयार करण्याचे कारखाने हे कामकरीच चालवतात; युद्धांत प्रत्यक्ष लढणाऱ्या लोकांपैकीं अधिकांश लोक हे कामकरीच असतात. मग त्यांनींच केवळ तनखेसाठीं परस्परांचे गळे न कापण्याचा निश्चय अमलांत आणला, तर युद्ध आपोआपच बंद पडेल यांत संशय कुठला! संघानें मजूरवर्गांत ही विचारजागृति केली. आपण निरनिराळ्या देशांत रहात असलों तरी आपणां सर्वांचें हित सारखेंच असून तें सर्वांनीं एकवटून प्रयत्न केलाच तर साध्य होणारें आहे ही भावना संघानें त्यांच्यांत जागृत केली; व ठरावांच्या रुपानें त्यांच्या हिताच्या प्रश्नांना व्यक्त रुप देऊन त्यावर सत्ताधारी व इतर लोकांचें लक्ष एकाग्र केलें. सर्वांत महत्त्वाची गोष्ट संघानें केली ती ही कीं, त्या काळपावेतों प्रत्येक देशांतल्या कामकरी वर्गाच्या चळवळी व प्रयत्न विलग विलग व निरनिराळ्या दिशेनें होत. त्या सर्वांना संघटित रुप देऊन एक धोरण लावून देण्यचा उपक्रम संघानें केला. कामकरी वर्गाचा प्रश्न हा येथून तेथून सर्वदूर सारखाच आहे. राष्ट्राची मर्यादा त्याला लागू नाहीं, हें व्यक्तरुपानें प्रथमत: संघानें लोकांपुढें मांडले, व यूरोपांत कामकऱ्यांचा संयुक्त पंथ निर्माण केला. या पंथाचीं बंधनें राष्ट्रीयत्वाच्या बंधनाहूनही जास्त जोरदार आहेत हें युद्धकालांत रशिया, जर्मनी, इंग्लंड इत्यादि परस्परांशीं लढणाऱ्या देशांतील कामकरी वर्गांत परस्परांविषयीं किती सहानुभूति नांदत होती यावरुन दिसून येतें. रशियांतील बोलशेव्हिस्ट सरकार हें बहुतांशीं कामकरी वर्गाचेंच आहे; व म्हणूनच इंग्रज सरकारनें त्याच्याविरुद्ध रशियांत सैन्य पाठवूं नये अशी इंग्लिश मजूरांची एक मागणी नुकत्याच झालेल्या संपाच्या पूर्वी होती. कामकरी लोकांचा हा अतिराष्ट्रीय पंथ निर्माण

करण्याचें अधिकांश श्रेय मार्क्स व त्याचा जिवलग मित्र आणि सहकारी एंजल यांना आहे. त्यांची विशाल बुद्धिमत्ता, दांडगा उत्साह, विलक्षण चिकाटी, अविश्रांत श्रम, व त्याहीपेक्षा सर्व पक्षांना बरोबर घेऊन चालण्याचें अलौकिक चातुर्य, यांच्याशिवाय कामकरी वर्गाच्या चळवळीला एवढें व्यापक रुप देऊन तिच्यांत असलें अद्भूत सामर्थ्य उत्पन्न करण्याचा उपक्रम होणें शक्य नव्हतें. संघ सन १८७३ त बंद झाला, पण त्यानें निर्माण केलेलें विचारैक्य व दाखवून दिलेला सहकारितेचा मार्ग नाहींसा होण्यासारखा नव्हता. सन १८७७ त आंतरराष्ट्रीयांचें पुनरुज्जीवन झालें. तेव्हांपासून आतांपावेतों मध्यें कांहीं काळ बंद होत, पुन: स्थापन होत, अशा रीतीनें संघाचें काम चालत आलें आहे. मध्यंतरीं सन १८९९ च्या सुमारास, नुकतेच राज्याधिकार सोडलेले केसर विल्यम यांच्या प्रयत्नानें निरनिराळ्या राष्ट्रांच्या सरकारतर्फेच्या प्रतिनिधींची कामकरी-परिषद ही दोन एक वर्षे भरविण्यांत येत असे. तिचा कारखान्यासंबंधांत निरनिराळे उपयुक्त कायदे करण्यांत मोठा उपयोग झाला. हल्लींचें युद्ध चालले असतां स्टॉकहोमला कामकरी वर्गाची आंतरराष्ट्रीय परिषद भरली होती व तिला इंग्लंडहून रॅमसे मॅकडोनाल्ड वगैरे प्रतिनिधि जावयाचे होते हें वाचकांना माहीत असेलच. ती परिषद् म्हणजे आंतरराष्ट्रीयाचें हल्लींचें स्वरुप आहे. प्रे. विल्सनच्या राष्ट्रसंघाच्या योजनेंत सर्व राष्ट्राचें एक ( International Labour commission ) आंतरराष्ट्रीय कामकरी कमिशन नेमलें गेलें असून, त्यानें कामकरी वर्गासंबंधाच्या प्रश्नांचा ऊहापोह करावा, व त्यानें मंजूर केलेले ठराव राष्ट्रसंघांतील सर्व राष्ट्रांनीं अंमलांत आणावेत अशी व्यवस्था झाली आहे. कमिशनची पहिली वार्षिक बैठक न्यूयॉर्कला झाली व तिला हिंदुस्थानांतून सरकारनियुक्त प्रतिनिधि गेले होते. या रातीनें कामकरी-प्रश्नांचें आंतरराष्ट्रीय स्वरुप सर्व मोठमोठ्या राष्ट्रांच्या सरकारांनीं मंजूर केलें असून, तो प्रश्न आंतरराष्ट्रीय पद्धतीनें सोडविण्याची व्यवस्थाही केली आहे. इकडे कामकरी वर्गांत तर आंतरराष्ट्रीयत्वाची जाणीव इतक्या वर्षांच्या प्रयत्नानें जास्त जास्त दृढ होत आली आहे व त्यांची आंतरराष्ट्रीय संस्था कायम आहेच. आतां कदाचित् राष्ट्र-संघांतील कमिशन व ही कामकरी वर्गाची आंतरराष्ट्रीय संस्था एकमेकांत सामील होण्याचा संभव आहे. सारांश, ज्या आंतरराष्ट्रीय संस्थेचें मूळ बीज मार्क्सने लावलें, त्याच आज प्रचंड वृक्ष झाला असून, सरकार व कामकरी वर्ग दोघांनाही त्याचा आज आश्रय केला आहे.

## प्रकरण ६ वें

# अराजक पंथ.

अराजक पंथ याचा सामान्य अर्थ त्याच्या नांवावरुनच स्पष्ट होतो. कोणत्याही प्रकारची वैयक्तिक किंवा प्रातिनिधिक राजसत्ता, किंबहुना कोणत्याच प्रकारचें शासन अथवा बाह्य नियंत्रण समाजांत नसावें असा या मताचा राजकीय बाबतींत मुख्य सिद्धांत आहे. अर्थातच हें मत किंवा सिद्धांत नवा नाहीं. मानवी समाजांतील परस्परयुद्धे बंद होऊन थोडीफार शांतता व सुधारणा झाल्यावर समाजाचा व त्यांतील राज्यकर्त्यांचा अंमल कांहीं स्वतंत्र वृत्तिच्या व विचाराच्या व्यक्तींस दु:सह वाटू लागावा हें अनिवार्य आहे. व तसें झालें म्हणजे त्यांतील कांहीं बुद्धिमान व विचारी पुरुषांनीं राजसत्ता नाहींशी करुन समाजव्यवस्था कशी ठेवतां येईल यासंबंधाचे उपाय सुचवावे हें साहजिक आहे. हाच अराजक मतांचा उगम आहे. सारांश, अराजक पंथ हा एकप्रकारें मनुष्याच्या अंत:करणांतील नैसर्गिक स्वातंत्र्यप्रियतेइतकाच जुना आहे. आणि म्हणूनच त्याचें बीजस्वरुप सर्वदूर आढळतें. बर्ट्रंड रसेलनीं आपल्या Roads to Freedom नामक ग्रंथात चांगझु नांवाच्या चिनी तत्त्ववेत्त्याच्या ग्रंथांतील पुढील उतारा दिला आहे:—

" घोड्यांना बर्फाच्छादित जमिनीवरुन जाण्यासाठीं खूर आहेत; थंडीवाऱ्याची बाधा होऊं नये म्हणून कैंस आहेत. ते घांस खातात आणि पाणी पितात, आणि मोकळया मैद्रानांतून स्वैर धांवतात. हा घोड्यांचा खरा नैसर्गिक स्वभाव आहे. मोठमोठ्या राजवाड्यासारख्या इमारती त्यांच्या उपयोगाच्या नाहींत.

एक दिवस पोलो आला आणि म्हणाला, 'मला घोडे कसे ठेवावेत हें समजतें!'

असें म्हणून त्यानें त्यांच्या शेंपट्या कापल्या, पुठ्ठ्यावर डाग दिले, खूर तासून काढले, आणि तोंडांत लगाम दिला. नंतर त्यांच्या गळ्यांत काढणी घालून त्यानें त्यांना तबेल्यांत नेलें व पाय बांधून टाकलें. परिणाम असा झाला कीं, प्रत्येक दहांत दोन-तीन मरण पावले. नंतर त्यानें त्यांना भुकेले व तान्हेले ठेवावें, मध्येंच बाहेर काढून कधीं भरधांव न्यावे, त्यांची मालिश करावी. सारांश, तोंडात काटेंरी लगाम व पाठीवर चामड्यांचा चाबूक यामुळे त्यापैकीं निम्मे घोडे यमसदनाला गेले.

कुंभार म्हणतो, 'मला मातीचें पाहिजे तें करतां येतें. तिचा गोल गोळा करावयाचा असेल तर कंपासनें करतों; चौकोनी तुकडा करावयाचा असेल तर चौकोनानें करतो!'

सुतार म्हणतो, 'मला लांकडाचें काय पाहिजे तें करतां येतें. मला त्याला गोल कापावयाचें असेल तर आर्कनें कांपतो, सरळ कापावयाचें असेल तर सरळ करवतीनें कापतों!'

परंतु मातीच्या आणि लांकडाच्या स्वभावाला हा कंपास किंवा चौकोन, गोल किंवा सरळ करवत आवडते हें मानण्यास आपणांस काय कारण आहे? परंतु असें असतांही प्रत्येक पिढी पोलोचे घोडे चांगले ठेवण्याबद्दल आणि कुंभाराची व सुताराची माती व लांकूड वापरण्याच्या कौशल्याबद्दल तारीफ करते! जे देशावर राज्य करतात त्यांचीही अशीच चूक होते.

तात्पर्य, ज्याप्रमाणें घोड्यांना त्यांच्या निसर्ग-जात स्थितींत स्वैर असूं देण्यांतच त्यांचें खरें हित आहे, आपली बुद्धि लढवून त्यांच्यावर आपणांस हितकारक वाटणारे उपाय लादण्यांत नाहीं, त्याप्रमाणेंच मनुष्यांना स्वैरपणें नांदू देण्यांतच त्यांचें कल्याण आहे, त्यांच्यावर राज्याचीं बंधनें घालण्यांत नाहीं, असा चांगझूचा मथितार्थ आहे. सामाजिक वादांतही फोरियरच्या फॅलँगमध्यें सर्व व्यवस्था स्नेहाकर्षणाच्या तत्त्वावर व्हावी, अर्थातच त्यांत बाह्य नियंत्रणाचें किंवा शासनसत्तेचें नांव नसावें, अशी योजना आहे. प्रौढननें तर, मागें सांगितल्याप्रमाणें, एका व्यक्तीच्या दुसऱ्या व्यक्तीवरील शासनाला शुद्ध जुलूम असें नांव दिलें आहे, व समाजाची खरी उन्नति तेव्हांच होईल असें म्हटलें आहे कीं जेव्हां 'अराजकता' व सुव्यवस्था एकत्र नांदूं लागेल.

अशा रीतीनें अराजकता पंथ हा त्यांतील राजकीय मतांपुरता फार प्राचीन

आहे. परंतु हल्लींच्या त्या पंथांच्या स्वरुपांत राजकीयांबरोबर कांहीं विशिष्ट सांपत्तिक मतेंही समाविष्ट आहेत. त्यांत मुख्य मत हें आहे कीं, समाजाच्या भावी व्यवस्थेंत जमीन व उद्योगधंद्याचीं साधनें हीं वैयक्तिक मालकीचीं न रहातां समाजाच्या समष्टि-मालकीखाली असावींत. अर्थातच या मतामुळेंच या पंथास सामाजिक वादांतील एक पंथ म्हणतां येतें.

वर सांगितल्याप्रमाणें या पंथांतील राजकीय मतांचें दिग्दर्शन पूर्वीच्या सामाजिकवाद्यांच्या ग्रंथांतून झालें आहे. परंतु एक स्वतंत्र पंथ-मतसंग्रह-या नात्यानें त्यांतील राजकीय व आर्थिक मतांचा उपदेश प्रथमतः बाकुनिन नांवाच्या रशियन पुढाऱ्यानें केला. त्याचीं मतें म्हणजे सामाजिकवादी मताचें पुरोगामी स्वरुप आहे. इतर मतांत व्यवहाराला जुळतें घेण्यासाठीं जी तडजोड केलेली असते, ती बाकुनिनच्या मतांत नाहीं. शुद्ध तर्काला जें इष्ट दिसेल त्याची पराकाष्ठ मर्यादा त्याच्या विचारांतून व्यक्त झालेली आहे. त्याच्या विचारांत सद्य:साध्य व अंतिमसाध्य असा अवस्थान्तर भेद नाहीं. अर्थातच त्याचीं मतें अव्यवहार्य म्हणून नापसंत करणें पुष्कळदां सोपें जातें.

अराजक मतांच्या विचाराला लागण्यापूर्वी त्यांच्या संस्थापकाच्या चरित्रांतील ठोकळ गोष्टी सांगणें इष्ट आहे. त्याचे चरित्रांत व मतांत एक विलक्षण साम्य आहे. तेंही त्याच्या मतांप्रमाणेंच अत्यंत धामधुमींत, प्रचलित शासनसत्तेशीं झगडण्यांत, व्यवस्थेच्या सुद्धा बंधनांनीं रहित असें गेलें. एक प्रकारें रशियासारख्या एकतंत्री अनियंत्रित राजसत्ता असलेल्या देशांत सर्व शासनसत्तेचा विरोध करणारांचा आचार्य उत्पन्न व्हावा हें निसर्गाला धरुन आहे. जेथें अत्यंत जोराची क्रिया होते तेथेंच तिची प्रतिक्रिया प्रथम सुरु होते. ज्या ठिकाणीं रोग उत्पन्न होतो तेथेंच त्याचें औषधही बहुधा निर्माण झालेलें सृष्टींत आढळतें.

बाकुनिनचा जन्म रशियांतील एका थोर सरदार घराण्यांत सन १८१४ त झाला. शिक्षण संपल्यानंतर फौजी खात्यांतील सरदारवर्गासाठीं राखून ठेवलेल्या एका अधिकाऱ्याच्या जागेवर त्याची नेमणूक झाली. पोलंडमध्यें नोकरीवर असतांना, रशियन सरकारकडून तेथील लोकांवर होत असलेला जुलूम व अत्याचार पाहून त्यास सरकारचा इतका तिटकारा आला कीं, नोकरीच्या रुपानें कां होईना, पण सरकारशीं संबंध असणें त्यास सहन होईना, व त्यानें आपल्या जागेचा ताबडतोब राजीनामा दिला. यानंतरचीं कांहीं वर्षें त्यानें विद्याभ्यासांत, व चिंतनांत घालविलीं. सन १८४७ त तो पॅरिसला गेला. तेथें प्रौढनचा व त्याचा स्नेह जमला, व त्यानें प्रौढनपासून सामाजिक वादाच्या व अराजक पंथाच्या मूलभूत तत्त्वांची दीक्षा घेतली. पुढें लवकरच १८४८ च्या

क्रान्तिकारक चळवळींनीं यूरोपखंडाला ग्रासून टाकलें. बाकुनिन अर्थातच या चळवळींत मनोभावानें सामील झाला. सॅक्सनींतील ड्रेस्डेन गांवच्या दंग्यांत त्याचें प्रमुखत्वानें अंग होतें. प्रथम या दंग्याला यश आलें. क्रान्तिकारकांनीं आपलें स्वतंत्र प्रजासत्ताक राज्यही कांहीं दिवस या गांवांत चालविलें होतें. पण पुढें लवकरच प्रशियन सरकारचें सैन्य गांवावर चालून आलें. बाकुनिनच्या प्रोत्साहनानें गांववाल्यांनीं कांहीं काळ त्याही सैन्याला तोंड दिले, पण अखेरीस त्यांचा निभाव लागेनासा होऊन शहर पडलें. त्या सपाट्यांत बाकुनिनला प्रशियन सैन्यानें कैद केलें. यापुढचीं सारखीं आठ वर्षे बाकुनिनला अत्यंत हालअपेष्टांत निरनिराळ्या तुरुंगांतून काढावीं लागलीं. प्रथमत: प्रशियन सरकारनें सन १८५० त त्याला फांशीची शिक्षा सांगितली. पण इतक्यांत ऑस्ट्रियन सरकारनें त्याची मागणी केली. तेव्हां पांच महिन्यानंतर त्याला ऑस्ट्रियन सरकारच्या स्वाधीन करण्यांत आलें. त्या सरकारनेंही त्याला प्रथम फाशीची शिक्षा सांगितली, पण नंतर ती बदलून तिच्या ऐवजीं जन्मठेपेची शिक्षा केली. ऑस्ट्रियन तुरुंगांतून त्याच्या हातापायांत वजनदार बेड्या घालण्यांत आल्या, व कित्येक वेळां तर त्याला तशाच स्थितींत भिंतीला जखडून बांधण्यांत येत असे. बाकुनिनला शिक्षा देण्यापासून काहीं विलक्षण पुण्यसंचय होणारा होता किंवा नकळे, कांहीं महिन्यांनंतर रशियानें त्याची मागणी केली. रशियन सरकारच्या स्वाधीन त्याला करण्यांत आल्यानंतर, त्या सरकारनें त्याला प्रथम यानंतर दुसऱ्या किल्ल्यांतून तुरुंगांत ठेवलें. येथें त्याचें अनन्वित हाल झाले. रोगानें त्याचे सर्व दांत पडून गेले; व कोणतेंच अन्न पचेनासें झालें. "परंतु याप्रमाणें जरी त्याचें शरीर दुर्बळ झालें होतें, तथापि त्याचें मन पूर्वीप्रमाणेंच खंबीर, निग्रही व अदम्य होतें. त्याला सर्वांत एका गोष्टीचें फार भय वाटत होतें. ती ही कीं, तुरुंगवासानें येणाऱ्या शारीरिक दुबळेपणानें नकळत आपल्या मनाची अवनति कोठें न होऊन जावो. त्याला अशी शंका, असें भय वाटे कीं, आपल्या अंत:करणांतील द्वेषवृत्ति कुठें लुप्त न होवो, ज्या शासनसत्तेच्या प्रदीप्त विरोधवृत्तिमुळें मी आजपर्यंत झगडत आलों ती विझून न जावो, दीनपणानें प्रारब्धावर हवाला ठेवून माझ्या अंत:करणांत छळ करणारांविषयीं कुठें क्षमा न उपजो. परंतु ही भीति व्यर्थ होती; त्याचा निश्चय एक दिवसही त्याला सोडून गेला नाहीं; आणि तुरुंगांत जातांना जसा तो होता तसाच तो त्यांतून परत बाहेर आला."

बाकुनिन तुरुंगांत असतांना, झार निकोलस मरण पावून, दुसरा अलेक्झांडर गादीवर आला. त्याचा स्वभाव कांहींसा उदार असल्यानें त्यानें बऱ्याच राजकीय कैद्यांना माफी दिली. परंतु या माफीच्या यादींतून बाकुनिनचें नांव त्यानें आपल्या हातानें खोडून टाकलें. तथापि आईची माया वेडी असते. बाकुनिनच्या आईनें अतिपरिश्रम करुन झारची भेट घेतली, व त्याला माफी देण्याबद्दल पुन: अर्ज केला. त्यावर झारनें एवढेंच उत्तर दिलें, "बाई, जोपर्यंत तुमचा मुलगा जिवंत आहे, तोंपर्यंत त्याला तुरुंगांतून बाहेर पडण्याचें नांव नको." या उत्तरानें बाकुनिनच्या मतांचीं उग्रता थोडीफार अनुमित करतां

येईल. आश्चर्य हें कीं, सरकारच्या द्वेषाबद्दल त्याला तुरुंगांत टाकण्यांत आलें, परंतु याप्रमाणें आठ वर्षे सरकारचा पाहुणा राहिल्यानंतरही त्याला सरकारविषयीं प्रेम वाटूं लागलें नाहीं ! १८५७ च्या सुमारास त्याला तुरुंगांतून काढून सैबीरियांत पाठविण्यांत आलें. भाग्यवशात् तेथील गव्हर्नर त्याचा नातलग होता. त्यामुळें तेथें त्याला बरीच स्वतंत्रता असे. तिचा उपयोग करुन घेऊन तो तेथून निसटला, तों अत्यंत कष्ट व संकटें सोसून सन १८६१ त अमेरिकेच्या मार्गानें लंडनला पोहोंचला. यानंतरचें पुढील आयुष्य त्यानें आपल्या मतांच्या प्रसारार्थ घालविलें, परंतु तुरुंगाची फेरी मात्र त्याला पुनः करावी लागली नाहीं. सन १८६७ त त्यानें International alliance at Socialist Democracy प्रजासत्ताक सामाजिक वादी आंतरराष्ट्रीय समिति स्थापन केली. मध्यंतरी तो कांहीं वर्षे इटलींत राहिला. तेथें तो माझिनीच्या विरुद्ध आंतरराष्ट्रीय ऐक्याचा उपदेश कामकऱ्यांना करीत असे. त्या उद्देशानें त्यानें तेथें एक संस्थाही स्थापन केली होती. सन १८६९ त तो मार्क्सच्या 'आंतरराष्ट्रीय' संघांत सामील झाला. त्याच्या पुढच्याच वर्षी फ्रँको-जर्मन युद्धांत दुसऱ्या नेपोलीयनच्या बादशहातीची इतिश्री झाली. त्यावेळीं त्यानें लियॉन्स येथें पॅरिसच्या कम्यूनच्या धर्तीवर स्वतंत्र प्रजासत्ताक राज्यपद्धति स्थापण्याचा प्रयत्न केला, परंतु तो अगदींच फसला. आंतरराष्ट्रीय संघांतही त्याचीं ज्वलत्जहाल मतें इतरांच्या मतांशीं जुळेनात. सरते शेवटीं मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें सन १८७२ त त्यास मताधिक्यानें संघांतून काढून टाकण्यांत आलें. कारागृहांतील हालअपेष्टांमुळें त्याची शरीरप्रकृति बरीच खालावली होती. तथापि त्यानें स्वमतप्रसाराचें काम अगदीं अखेरपावेतों जारी ठेवलें. याप्रमाणें सरते शेवटपावेतों लोक-कल्याणाच्या प्रयत्नांत आपला देह झिजवून, यूरोपांतील सर्व क्रान्तिकारक व पुरोगामी पुरुषांची आश्रयभूमि जो स्विट्झर्लंड देश त्यांतील बर्न शहरी सन १८७६ त या थोर पुरुषानें आपली इहलोकाची यात्रा संपविली.

त्याच्या 'ईश्वर आणि राज्य' (Good and the state) या पुस्तकाच्या प्रस्तावनेंत त्याचे जिवलग स्नेही कॅफिरो व एलिसी रेक्ल्यूज यांनीं त्याच्या संबंधांत काढलेल्या उद्धारांवरुन त्याच्या स्वभावाची वाचकांस कांहींशी कल्पना होईल. "अचाट विचारशक्ति, दांडगा निश्चय, आणि चिकाटीचा कार्योत्साह हे गुण या थोर पुरुषांत अलौकिकरितीनें वास करीत होते, हें शत्रु आणि मित्र दोघांनाही सारखेंच माहित आहे. संपत्ति, प्रतिष्ठा, कीर्ति किंवा अशाच ज्या इतर क्षुद्र लाभाकरितां बहुजनसमाज लोभानें धडपडत असतो, त्याविषयीं तो किती उदासीन होता हेंही त्यांस अवगत आहे. रशियांतील एका अत्यंत थोर अशा सरदारकुळांत त्याचा जन्म झाला. तथापि तो आपण होऊन ज्या मानधनांनीं पूर्वपरंपरागत दुष्ट रुढि व दुराग्रहांपासून अलिप्त राहून, स्वज्ञातिहितापुरतीच संकुचित दृष्टि न ठेवतां, प्रचलित समाजदोषांविरुद्ध बंडाचा झेंडा उभारलेला असतो व या रीतीनें आजन्म स्वसुखावर तिलांजली दिलेली असते त्यांच्यांत

अग्रेसरत्वानें सामील झाला. त्याचें आयुष्य कारागृहवास, देशत्याग, व एकनिष्ठ पुरुषांवर येणारीं अशींच इतर संकटें व आपत्ति यांच्याशीं एकप्रकारचा दारुण संग्रामच होता. तो झगडत असतां, आपल्या आयुष्याच्या शेवटपर्यंत तो त्यांच्या संगतींत राहिला."

बाकुनिनचा बहुतेक काळ अत्यंत धामधुमींत व अस्वस्थतेंत गेल्यानें आपल्या मताचें विस्तृत व संगतवार विवेचन करण्यास त्यास अवकाशच मिळाला नाहीं. त्याचीं मतें निरनिराळ्या सामाजिकवाद्यांशीं झालेल्या पत्रव्यवहारांतून व्यक्त झालेलीं आहेत. त्याचा एकच ग्रंथ God and the State 'ईश्वर आणि राज्य' हा प्रसिद्ध झालेला असून तोही अपुरा आहे. 'माझें आयुष्यच अपुरें आहे' असें तो या ग्रंथाच्या आक्षेपकांस उत्तर देत असे.

बाकुनिनचीं मतें अत्यंत पुरोगामी व क्रान्तिकारक आहेत. सर्व प्रकारची बाह्य सत्ता व अधिकार यांचा त्यानें पूर्ण निषेध केलेला आहे. अधिकारांच्या बाबतींत ईश्वर किंवा समाजांतील बहुमत हीं दोन्ही त्याच्या मतें सारखींच त्याज्य आहेत. वर उल्लेख केलेल्या ईश्वर आणि राज्य या ग्रंथांत तो लिहतो कीं "केवळ सृष्टीचे नियम पाळणें यांतच मनुष्याची स्वतंत्रता आहे. कारण त्याच्यावर या नियमाचें नियंत्रण कोणत्याही मानवी किंवा ईश्वरी, वैयक्तिक किंवा सामवायिक, अशा बाह्य इच्छेमुळें घालण्यांत आलेलें नसून त्यानें तें स्वतःच्या इच्छेनेंच स्वतःस बंधक म्हणून मान्य केलेलें असतें." बाकुनिनच्या मतें व्यक्तिस्वातंत्र्याचा प्रश्न समाजांत वरील रीतीनें सहज सुटणारा आहे. सृष्टीच्या निरीक्षणानें आणि शास्त्राच्या अभ्यासानें प्रत्येकानें निसर्गाचे नियम अवगत करुन घ्यावेत. व नंतर इतरांना अवगत करुन द्यावेत. एकदां समाजांतील सर्व व्यक्तींना ते अवगत झाले म्हणजे त्यांच्या हातून त्याचें पालन झाल्याशिवाय राहणार नाहीं. कारण मनुष्य हा सृष्टीचाच एक भाग असल्यानें, हे नियम म्हणजे त्याच्या जीवनाचेच नियम होत, म्हणून ते पाळणें हा त्याच्या स्वभावाचाच एक धर्म आहे. याप्रमाणें नियमांचें पालन होऊं लागल्यावर सर्व प्रकारच्या नियंत्रणांचें, कायद्यांचें, व राज्यव्यवस्थेचें कारणच उरणार नाहीं. समाजांतील निरनिराळे दर्जे व त्या त्या दर्जाचे लोक उपभोगीत असलेले विशेष हक्क हे सर्व नाहींसे झालें पाहिजेत. अशा विशेष हक्कांनीं समाजांतील एका वर्गाला बाकीच्या वर्गांवर जुलूम करुन आपला लाभ करण्याची संधि मिळते, व त्यामुळें सर्वांच्याच बुद्धि व मनोवृत्ति दूषित होत जातात.

वर सांगितलेल्या प्रजासत्ताक सामाजिकवादी आंतरराष्ट्रीय समितीच्या कार्यक्रमावरुन या पंथाचें स्वरुप जास्त स्पष्ट होईल. ही संस्था नास्तिक मताची असून

तिचा उद्देश जगांतील सर्व धर्म नाहीसे करुन व मानवी अंत:करणांतील धर्मश्रद्धेची जागा शास्त्रीय ज्ञानाला, व पारलौकिक ईश्वरकृत न्यायाची जागा ऐहिक मनुष्यकृत न्यायाला, द्यावी असा होता. समाजांतून विवाहाचा प्रघात बंद करावा. सर्व निरनिराळे वर्ग आणि जाति पूर्णपणें नाहींशा कराव्यात. सर्व व्यक्तींचे व स्त्रीपुरुषांचे हक्क सर्व बाबतींत सारखे असावेत. वारशाची रीत बंद केली जावी. जमीन, द्रव्योत्पादनाचीं यंत्रें, व तीं चालविण्यास लागणारें भांडवल हीं समाजाच्या सामवायिक मालकीखाली राहून स्वेच्छेनें प्रेरित झालेल्या कामकऱ्यांच्या मंडळ्यांनाच त्यांचा उपयोग करुं द्यावा. प्रत्येक कामकऱ्याला आपल्या श्रमाचें पूर्ण फळ मिळत जावें. निरनिराळ्या राष्ट्रांतील कामकऱ्यांचे आंतरराष्ट्रीय संघ कायम केले जावेत, व त्यांच्याद्वारे परस्परांत स्नेहभाव व ऐक्य संवर्धित केलें जाऊन उद्योगधंद्याची वगैरे आवश्यक व्यवस्था करण्यांत यावी. स्वराष्ट्राविषयीं दुराभिमान किंवा परराष्ट्राविषयीं मत्सर यांस याप्रमाणें जागाच राहू देऊं नये.

हें उद्देश साधण्यासाठीं बाकुनिननें सुचविलेले उपायही तसेच क्रान्तिकारक आहेत. उद्देशसिद्धिच्या आड येणाऱ्या सर्व सामाजिक, राजकीय, व इतर संस्था एकदम नाहीशा करण्याचा प्रयत्न केला जावा. या कार्यास वाहिलेल्या व्यक्तीनें स्वत:चें खासगी हित, कोमल मनोभावना, धर्मविचार, राष्ट्राभिमान, किंवा नीतिकल्पना यांनीं परावृत्त होतां कामा नये. समाजांतील प्रचलित अन्याय्य व्यवस्था मोडणें हा एकच उद्देश त्याच्यासमोर असावा, व त्यानें प्रेरित होऊन निष्ठुरपणें सार्वत्रिक विध्वंसाचें कार्य त्यानें करावें. या विध्वंसानंतर समाजांतील नैसर्गिक चैतन्यापासून नवीन न्याय्य व योग्य व्यवस्था निर्माण होईल. पण ती कशी व कशा रीतीनें होईल हें पाहण्याचें काम आपलें नसून भावी पिढ्यांचें आहे.

बाकुनिनच्या वरील अराजक मतांना रशियांत पुष्कळ अनुयायी मिळाले. यूरोपांतल्या दक्षिण भागांत, विशेषत: स्पेनमध्यें या मतांचा पुष्कळ प्रसार झाला. त्यामुळें सन १८७३ त स्पेनमध्यें प्रचलित समाजपद्धतीच्या विरुद्ध पुष्कळ दंगे झाले. बाकुनिनच्या मरणानंतर त्याच्या अनुयायांनीं अराजक मतांचा प्रसार करण्याचा मोठ्या जोरानें फ्रान्सांत प्रयत्न केला. कांहीं खाणींवरील मजूरांत याच सुमारास दंगे झाले. तेव्हां त्यांचा व अराजक मतांचा संबंध सोडून फ्रेंच पोलिसानें बऱ्याच अराजकवाल्यांना पकडलें. त्यांत प्रसिद्ध प्रिन्स क्रोपोटकिन हा एक होता.

अराजक मतांसंबंधांत हल्लीं प्रिन्स क्रोपोटकिनचेच ग्रंथ प्रमाणभूत मानले जातात. त्याचे 'Anarchist Communism' ' Fields, Factories and Workshops' हे ग्रंथ प्रसिद्ध असून, त्यांतून या मतांची सुसंगत विशद व

चित्ताकर्षक मांडणी केलेली आहे. प्रिन्स क्रोपोटकिनचाही जन्म बाकुनिनप्रमाणेंच एका अत्यंत थोर रशियन सरदार घराण्यांत झाला. त्याचे निकट स्नेही तर असें म्हणतात कीं, रशियांतील सिंहासनावर झारपेक्षां त्याच्याच घराण्याचा जास्त हक्क होता. त्याचा स्वभाव प्रेमळ असून अंत:करण निसर्गत:च कोमल होतें. परंतु लहानपणीं राजदरबारांत राहून, तेथील प्रकारांनीं त्याला एकदंर राज्यपद्धतीविषयीं वीट व थोर म्हणविल्या जाणाऱ्यांविषयीं तिरस्कार उत्पन्न झाला होता. बाकुनिनच्या उपदेशानें त्यांचेंच पुढें अराजक मतांत रुपांतर झालें, व पुढील जन्म त्यानें त्या मतांच्या प्रसारांत घालविला. भौतिक शास्त्रांत त्याची उत्तम गति असे, शेतकीचें त्यास उत्तम ज्ञान होतें, कारखान्यांतील अंतर्व्यवस्थेची त्यास माहिती होती. यांना सुसंगत विचार, सरळ मांडणी व सोपी गोड भाषा यांची जोड देऊन त्याचे ग्रंथ लिहिलेले असल्यानें त्यांच्या वाचनाचा अनुकूल परिणाम झाल्याशिवाय राहत नाहीं.

या ग्रंथांतून प्रतिपादन केलेल्या मतांचे आरंभीं सांगितल्याप्रमाणें दोन भाग करतां येतील. एक आर्थिक व दुसरा राजकीय. त्यांतील पहिल्या भागाचा आपण प्रथम विचार करुं.

आर्थिक बाबतींत दोन प्रकारचें प्रश्न उद्भवतात. एक मालाच्या उत्पादनासंबंधांत, व दुसरा त्याच्या वांटणीसंबंधांत. त्यापैकीं पहिल्या म्हणजे उत्पादनाच्या प्रश्नासंबंधांत अराजकांचें व इतर सामाजिकवाद्यांचें कांहीं मर्यादेपावेतों मतैक्य आहे. दोघांच्याही मतें हल्लींची श्रमाची व भांडवलाची फारकत नाहींशी केली पाहिजे. कारखाने व जमीन सामाजिक मालकीचे केले पाहिजेत. कामकऱ्यांच्या औद्योगिक मंडळ्या स्थापन होऊन त्यांनीं हे कारखाने चालविले पाहिजेत. सारांश, भांडवलवाल्यांचीं सत्ता व मालकी नाहींशी झाली पाहिजे. येथपावेतों अराजकांत व इतर सामाजिकवाद्यांत मतभेद नाहीं. पण सामाजिक मालकीखालीं आलेल्या कारखान्यांत काम करण्यासंबंधांत, त्याचप्रमाणें तयार झालेल्या मालाच्या वांटणीसंबंधांत अराजकांची मतें निराळीं पुरोगामी आहेत. हल्लींची रोजमुऱ्याची पद्धत बंद केली पाहिजे हें सर्व सामाजिकवाद्यांना कबूल आहे. पण त्याचा अर्थ इतर सामाजिकवादी निराळा करतात. हल्लीं कारखान्यांतला नफा भांडवलदार लाटतात, तसें न होतां समाजाच्या व्यवस्थेसाठीं व पुढील उत्पादनासाठीं कांहीं अंश वेगळा ठेवून बाकीचा तयार झालेला सर्व मालकामकऱ्यांना वांटून दिला जात जावा; पण त्याबरोबरच जे काम करतील, निदान काम करण्यास तयार असतील, त्यांसच समाजांत उत्पन्न झालेल्या मालांतून हिस्सा मिळत जावा. जे काम करणार नाहींत त्यांस एक तर काम करावयास तरी लावावें किंवा उपाशीं तरी मरुं द्यावें. असें मार्क्सचें व इतर सामाजिकवाद्यांचें म्हणणें आहे. मालाची जी वांटणी करावयाची ती कांहींकांच्या मतें अनाडी व कुशल, हलकें व फार

वरच्या प्रतीचें, काम करणारांस सर्वांस सारखी व्हावी, तर दुसऱ्या कित्येकांच्या मतें ती कामाच्या प्रतीच्या मानानें व्हावी, हा गौण भेद त्यांच्यांतही आहे, पण काम केल्याशिवाय समाजांत कोणासही कांहीं मिळूं नये.हा सर्वांचा सिद्धांत आहे. परंतु याप्रमाणें प्रत्यक्ष बळजबरी करुन, किंवा अप्रत्यक्षपणें उपाशीं मारुन, कोणालाही काम करण्यास भाग पाडणें अराजकवाद्यांना मान्य नाहीं. ते म्हणतात कीं, रोजमुऱ्याची पद्धत बंद केली म्हणजे कोणालाही काम करण्याची सक्ति नसावी. ज्याला जितका वेळ जशा प्रकारचें काम करावेसें वाटेल तसें करण्याची पूर्ण मोकळीक असावी.

समाजांतील प्रत्येक व्यक्तीला जीवनासाठीं आवश्यक असणाऱ्या वस्तु मोफत व पाहिजे तितक्या दिल्या जात जाव्या, मग ती काम करो किंवा स्वस्थ पाय ताणून पडली राहो. चैनीच्या ज्या वस्तु हव्या तितक्या प्रमाणांत उत्पन्न होणार नाहींत, त्याही सर्वांना मोफतच दिल्या जाव्यात, पण त्यांची वांटणी वस्तु असेल त्या मानानें सर्वांत सारखी करुन दिली जावी. असें झालें म्हणजे खासगी किंवा वैयक्तिक मालमत्ता राहण्याचें कारण उरणार नाहीं, व ती राहूं देऊंही नये.

यावर साहजिकच असे प्रश्न उभे राहतात कीं, जर याप्रमाणें कोणालाच काम करण्याची सक्ति नसली, व काम न करतांही फुकट खाण्यापिण्याला मिळूं लागलें, तर कोणी तरी श्रम करण्याच्या खटाटोपांत पडेल काय? मग समाजाला लागणारें धान्य व इतर माल उत्पन्न तरी कसा होणार? दुसरा प्रश्न असा कीं, याप्रमाणें सर्वांना हवा तो जिन्नस हवा तितका व फुकट मिळूं लागला, तर आवश्यक वस्तुच का होईनात, पण त्या तरी पुरेशा उत्पन्न होऊं शकतील काय?

यांपैकीं दुसऱ्या प्रश्नाचें प्रथम समाधानकारक उत्तर मिळालें पाहिजे. कारण सर्वांना आवश्यक वस्तु मोफत व हव्या तितक्या मिळू लागल्यावर जर त्यांचा खर्च इतका होऊं लागला कीं, सर्व माणसांनीं काम केलें तरी त्या उत्पन्न करणें भौतिकदृष्ट्या अशक्य ठरलें, तर मग त्या तशा देऊं नयेत हें उघडच सिद्ध होईल, व अराजकांचें मत सृष्टि-विरुद्ध अतएव त्याज्य ठरेल. यावर क्रोपोटकिनचें असें म्हणणें आहे कीं, अन्नवस्त्र इत्यादि आवश्यक वस्तु कांहीं विशिष्ट प्रमाणाबाहेर मनुष्याला केव्हांच लागणार नाहींत. मनुष्याच्या उपभोगशक्तीनें त्यांच्या उपयोगाला मर्यादा घालून दिली आहे. त्यामुळें या वस्तु फुकट मिळूं लागल्या तरी मनुष्यें त्या विशिष्ट प्रमाणाबाहेर घेणार नाहींत. आतां त्या फुकट मिळतात म्हणून त्यांची नासधूस कांहींशी होईल, पण तीही फार होण्याची भीति नाहीं. हल्लीं सार्वजनिक पाण्याचे नळ फुकट असतात पण म्हणून त्यांच्या तोट्या कोणी खुल्या करुन ठेवीत नाहीं. प्रत्येक जण आपलें काम झालें कीं ती बंद करुन जातो.

क्रोपोटकिन व इतर अराजकांचें म्हणणें असें आहे कीं, हल्लींही धान्य व इतर आवश्यक वस्तु इतक्या उत्पन्न होत आहेत कीं, पृथ्वीवरील सर्व माणसांना त्या पुरुन उरतील. हल्लीं लोकांना खायला अन्न किंवा पांघरावयाला वस्त्र मिळत नाहीं, त्याला कारण अन्नवस्त्राची कमी नसून, लोकांजवळ अन्नवस्त्र विकत घेण्याला पैसा नाहीं. या वस्तु फुकट मिळूं लागल्या म्हणजे हल्लीपेक्षां त्यांचा खप जास्त होईल, पण तो खप होऊनही उरतील इतक्या प्रमाणांत या वस्तु हल्लीं उत्पन्न होत आहेत. याशिवाय शास्त्रीय ज्ञानाच्या सहायानें उद्योगधंद्यांत व शेतकींतही इतकी विलक्षण सुधारणा करतां येण्यासारखी आहे कीं, मनुष्यसंख्या हल्लींहून अनेक पटींनीं वाढली, तरी या वस्तु कमी पडण्याची भीति नाहीं. माल्थसचें या बाबतींतलें भविष्य शास्त्रानें खोटें ठरविलें आहे. क्रोपोटकिन म्हणतो कीं, हल्लींच फ्रान्समध्यें जे कांहीं शास्त्रज्ञ शास्त्रीय पद्धतीनें शेती करीत आहेत ते प्रतिज्ञा करतात कीं, कितीही खराब जमीन थोड्याफार प्रयत्नांनीं उत्तम सुपीक करतां येते. प्रत्येक जमिनींतून एकाच्या ऐवजीं पांच सहा पिकें दरवर्षीं घेतां येतील. हल्लीं पांच ते सहा टन (१७५ मण) घांस निघतो त्या जागीं ५० ते १०० टन घांस काढतां येईल. ते सांगतात कीं, एका चौरस मैल जमिनीवर एक हजार लोकांना पुरेसें धान्य सहज उत्पन्न करतां येईल, व हें त्यांनीं मोठ्या प्रमाणावर सप्रयोग सिद्ध करुन दाखविलें आहे. हल्लींही इंग्लंडमध्यें मि. चँपियन नांवाचे गृहस्थ एका एकरावर तीन गुरें पोसतात, तेंच इतर ठिकाणीं एका गुरामागें दोन ते तीन एकर जमीन लागते.

यावरुंन असें सिद्ध होतें कीं, हल्लीं व पुढेंही बऱ्याच लांब काळपावेतों समाजांत सर्वांना आवश्यक वस्तु फुकट देत गेलें तरी भौतिकदृष्ट्या उत्पन्नाची तूट पडणार नाहीं.

यानंतर पहिला प्रश्न उरतो कीं, अशा रीतीनें सर्वच वस्तु फुकट मिळूं लागल्या व खासगी किंवा वैयक्तिक मालमत्ता उरली नाहीं; तर काम करण्यासाठीं मनुष्यांना आर्थिक हेतुच उरणार नाहीं. व मग कामाची दगदग कोण करील? हल्लीं तनखा, मजूरी, किंवा नफा, यांच्या आशेनें सर्वजण काम करण्यास प्रवृत्त होतात, परंतु हें प्रवर्तक कारण पुढें नाहीसें झाल्यावर काम कोण व कशासाठीं करणार?

क्रोपोटकिनचें उत्तर या प्रश्नाला पुढीलप्रमाणें आहे. "मनुष्यस्वभावाला आवडत नाहींत ते अतिश्रम होत श्रम नव्हेत. कांहीं थोड्यांना चैनींत लोळावयाला सांपडावें म्हणून बाकीच्यांना अतिश्रम नापसंत होतील, सर्वांच्याच हितासाठीं परिमित श्रम करणें नव्हे. श्रम, काम, हे शारीरिक दृष्ट्या आवश्यक आहेत; शरीरांत उत्पन्न होणाऱ्या शक्तीचा व्यय करण्यासाठीं ते आवश्यक आहेत. त्यांतच आरोग्य व जीवनाचा आधार आहे. हल्लीं उपयुक्त कामापैकीं पुष्कळशा कामाला जर मनुष्य कंटाळत असला, तर

त्याला कारण एवढेंच होय कीं, त्यांत त्याला अतिश्रम होतात किंवा त्याची व्यवस्था नीट केलेली नसते. परंतु तुम्हां आम्हां सर्वांना हें माहीत आहे फ्रांकलिनला हें माहीत होतें कीं जर प्रत्येकानें रोज केवळ चार तास उपयुक्त काम केलें, व सर्व परस्परसंमतीनें उत्पादक काम करुं लागले व हल्लींप्रमाणें श्रमाची नासाडी न होत गेली, तर या चार तासांच्या श्रमानें समाजांतील सर्वांना समाधानानें, हल्लीं मध्यम वर्गांतील सुखवस्तु गृहस्थाप्रमाणें, राहतां येईल इतका माल उत्पन्न होईल. आतां 'किळसवाणें, त्रासदायक काम कोण करील?' हा जो पोरकट प्रश्न गेल्या पन्नास वर्षें सारखा विचारण्यांत येतो, त्याला उत्तर एवढेंच कीं, आमच्या शास्त्रज्ञांपैकी कोणाला एक दिवसच कां होईना तें करावें लागलें नाहीं याचा मला खेद वाटतो. जर हल्लीं खरोखरच कांहीं किळसवाणें किंवा त्रासदायक काम असलेंच तर त्याचें कारण एवढेंच कीं त्याचा किळसवाणेपणा काढून टाकण्यांत शास्त्रज्ञांनीं आतांपर्यंत कधींच प्रयत्न केला नाहीं. त्यांना खात्री होती कीं, चार पैसे फेंकले कीं पाहिजे तितके उपाशी मरणारे लोक हें काम करण्यास खुशीनें तयार होतील." (क्रोपोटकिन. Anarchist Communism).

परिमित त्रास न होणारें, किंवा आवडीचें काम प्रत्येकाला करावेसें वाटतें. मनुष्याला स्वस्थ बसणेंच आवडत नाहीं. हल्लीं सुद्धां सुखवस्तु लोकांना कांहींना कांहीं तरी उद्योग मागें लावून घ्यावासा वाटतो, व त्याप्रमाणें पुष्कळ लावून घेतात. कामच नसलें तर वेळ घालवावयाचा कसा? कांहीं थोडे आळशी पिंड अपवाद सोडून दिले तर बाकी सर्वांना कामाशिवाय चैन पडत नाहीं. हल्लीं पेन्शनर लोकांना कसें चुकल्या चुकल्यासारखें होतें व वेळ कंटाळवाणा होतो याचा पुष्कळांना अनुभव असेल. जास्त श्रम किंवा त्रासदायक काम करावेंसें वाटत नाहीं हें खरें, पण त्या उलट काम केल्याशिवायही राहवत नाहीं. क्रोपोटकिनचें असें म्हणणें आहे, व तें विचारी शास्त्रज्ञ मान्य करतात कीं, शास्त्रीय सुधारणेनें हल्लींचें किळसवाणें वाटणारें काम यंत्राच्या सहायानें करुन घेतां येईल, व त्रासदायक कामांतला त्रास नाहीसा करतां येईल. त्याचप्रमाणें हल्लींपेक्षां पुष्कळ कमी श्रमांत हल्लींच्या प्रमाणांत माल काढतां येऊं लागेल. असें झालें व अतिश्रमाचा बोजा न राहिला म्हणजे सर्वजण आनंदानें, स्वस्थ बसवत नाहीं एवढ्याच साठीं म्हणून, काम करुं लागतील. व ज्या ज्या मानानें जास्त लोक काम करुं लागतील त्या त्या मानानें सर्वांनाच कमी कमी काम करावें लागत जाईल. त्यांत यांत्रिक सुधारणेची भर पडत जाईल, व एकंदरींत कोणालाच कंटाळा येईल इतकें काम करण्याची आवश्यकता उरणार् नाहीं.

याशिवाय सामाजिक प्रतिष्ठा हा एक हेतु काम करण्यास राहीलच. जो जास्ती चांगलें, जास्त वरच्या दर्जाचें, किंवा इतरांपेक्षां जास्ती काळ केवळ

परोपकारबुद्धीनें किंवा सामाजिक कल्याणासाठीं काम करील, त्यास साहजिकपणें समाजांत जास्त मान मिळेल, व त्याची प्रतिष्ठा वाढेल. तेव्हां एक तर आंतरिक भावनेनें, व दुसरें, हा जो थोराच्या अंत:करणांतील अखेरचा दुबळेपणा-प्रतिष्ठालोभ-ह्यानें पुष्कळ जण जोखमीच्या, चातुर्याच्या, कल्पकतेच्या, विशेष श्रमाच्या कामास प्रवृत्त होतील. हल्लींही कित्येक विद्वान कीर्तिलाभासाठीं आपलें आयुष्य एकाद्या शास्त्रीय शोधांत किंवा ग्रंथाच्या रचनेंत घालवीत असतात, शास्त्रज्ञांपैकीं बहुतेकांस जिज्ञासातृप्ति किंवा तज्ज्ञांकडून प्रतिष्ठा या पलीकडे कशाचीच अपेक्षा नसते. हीच प्रवृत्ति भावी समाजांत वाढेल. हल्लीं खासगी मालमत्तेनें मनुष्याच्या स्वार्थवृत्ति बळावतात. पुढें एकंदर समाजरचनाच अशी राहील कीं, तींत स्वार्थप्रवृत्ति कमी होऊन परोपकारवृत्ति वृद्धिंगत होत जाईल. तेव्हां त्यावेळीं समाजसेवेच्याच बुद्धीनें काम करणारे हल्लीपेक्षां अनेक पटीनें जास्त निघतील यांत नवल कोणतें?

याप्रमाणें वरील दोन्ही प्रश्नांची होकारार्थी उत्तरें मिळतात. एक हें कां कोणालाही कामाची सक्ती नसली, केल्या कामाबद्दल तनखा किंवा रोजमुरा देणें बंद केलें, व एकंदर वैयक्तिक मालमत्तेचें अस्तित्वच नाहींसें केलें तरी कांहीं थोडे अपवाद वगळले तर, बाकीचे सर्व लोक परिमित श्रम केल्याशिवाय राहणार नाहींत. दुसरें हें कीं, शास्त्रीय ज्ञानाच्या सहायानें व यांत्रिक सुधारणांनीं, वरील परिमित श्रमाच्या द्वारेंच, समाजांतील सर्व लोकांना आवश्यक वस्तु फुकट व हव्या तितक्या पुरवितां येतील.

म्हणून अराजकांचें असें मत आहे कीं,

(१) समाजांत कोणालाही काम करण्याची सक्ती नसावी; व केल्या कामाबद्दल कोणालाही रोजमुरा, तनखा किंवा अन्य प्रकारचा मोबदला दिला जाऊं नये.

(२) समाजांतील प्रत्येक व्यक्तीला उदरनिर्वाहाला आवश्यक वस्तु फुकट व लागतील तितक्या दिल्या जात जाव्या. चैनीच्या ज्या वस्तु पुरेशा प्रमाणांत उत्पन्न होणार नाहींत, त्या मात्र सर्वांना असतील त्या मानानें सारख्या पण फुकट वांटून दिल्या जात जाव्या.

आतां अराजक पंथाचा दुसरा भाग जो राजकीय मतें त्याचा कांहींसा विस्तारानें विचार करूं.

मार्क्सनें आपल्या आदर्श-समाजावस्थेंत सरकारचें हल्लींचें स्वरुप व सत्ता नाहींशी होईल, व त्याच्याकडे फक्त निरनिराळ्या औद्योगिक संघांतील परस्परव्यवस्थेचें

निरुपद्रवी काम राहील असें प्रतिपादिलें आहे. पण त्यानेंच इतरत्र सरकारकडे जीं कामें ठेवावयाचें सुचविलें आहे त्यांवरुन सरकारची सत्ता कमी होण्याऐवजीं वाढणारीच आहे. उदाहरणार्थ, दळणवळणाच्या सर्व साधनांची व्यवस्था व अंमल सरकारकडे राहावा, सरकारनें मध्यवर्ती बँक काढून पत पुरविण्याची व्यवस्था करावी, अशा सूचना त्यानें कम्यूनिस्ट मॅनिफेस्टोंत केल्या आहेत. अर्थात् या योगानें सरकारची सत्ता किती तरी वाढणारी आहे.

यावर प्रजासत्ताक पद्धतीचे अभिमानी असें म्हणतात कीं, एक तर त्या वेळीं ती सत्ता वापरणारे कामकरीवर्गाचे प्रतिनिधि राहतील, व दुसरें असें की, समाजांत त्यावेळीं हल्लींप्रमाणें वर्गभेद न राहतां सर्व समाजांत एकच कामकरी वर्ग असेल. त्यामुळें हे प्रतिनिधि त्या सत्तेची सर्व समाजाला हितकारक अशा रीतीनेंच अंमलबजावणी करतील.

परंतु क्रोपोटकिन व इतर अराजक यांना हें मान्य नाहीं. ते म्हणतात कीं, अनुभव असा येत नाहीं. सत्ता एका प्रतिनिधि नसलेल्या राजाच्या हातीं असो, किंवा पुष्कळ प्रतिनिधिभूत अधिकाऱ्यांच्या हातीं असो, ती समाजाला सारखीच जांचकारक होते. अधिकारी कसेही असोत, ते अधिकारारुढ झाले कीं त्यांची दृष्टी तरळते, त्यांच्या मनोवृत्ति पालटतात, त्यांची निराळीच जात बनते. अगदीं प्रामाणिकपणें त्यांना असें वाटूं लागतें कीं लोकांचें खरें हित खुद्द लोकांपेक्षां आम्हांलाच जास्त कळतें. आम्ही करतों हेंच योग्य व समाजाच्या खऱ्या कल्याणाचें आहे. मतविरोध त्यांना खपेनासा होतो, व जो कोणी त्यांच्या मनाविरुद्ध बोलतो किंवा वागतो त्यास ते प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष प्रतिबंध करुं लागतात. प्रतिनिधींवर त्यांना निवडणाऱ्यांचा दाब असतो हें म्हणणें व्यर्थ आहे. व्यवहारांत आपण प्रत्यहीं पाहतों कीं, प्रतिनिधि मतदारांना धाब्यावर बसवून, आपणांला पाहिजे तसें खुशाल वागतात. हल्लीं प्रातिनिधिसत्ताक देशांतून ही स्थिति दृष्टीस पडते. व पुढें भांडवलदारांची सत्ता नाहींशी होऊन, ती कामकरीवर्गाच्या प्रतिनिधींच्या हातीं आली, तर स्थिति सुधारेल असें म्हणावयास कांहीं कारण नाहीं. हल्लींसुद्धां कामकरीवर्गाचे जे प्रतिनिधि पार्लमेंटांत जातात, किंवा त्यांच्या संघाचे अधिकारी असतात, त्यांच्या संबंधांतला अनुभव मोठासा समाधानकारक नाहीं. तेही कामकरीवर्गापासून फटकून वागूं लागतात, व त्यांचीही दृष्टि इतर कामकऱ्यांहून वेगळी होते. पुढें जेव्हां आदर्शस्थितींत या लोकांच्या हातीं पुष्कळ सत्ता येईल तेव्हां तर तिचा परिणाम कदाचित् हल्लीपेक्षां वाईटच होईल, पण चांगला होण्याचा संभव नाहीं.

क्रोपोटकिन आपल्या ग्रंथांत लिहितो : "प्रातिनिधिक पद्धतीला मानवी इतिहासांत जें कार्य करावयाचें होतें तें आतां घडून चुकलें आहे. तिच्या योगानें पूर्वीची

वैयक्तिक राज्यपद्धति नष्ट झाली असून, एकंदर जनतेचें सार्वजनिक प्रश्नांत लक्ष लागूं लागलें आहे. परंतु भावी सामाजिकवादी आदर्श समाज-स्थितिला ती पद्धत अनुरुप होईल असें मानणें ही घोडचूक आहे. समाजाच्या प्रत्येक आर्थिक अवस्थेला तदनुरुप राजकीय अवस्था असते, आणि हल्लींच्या आर्थिक समाजावस्थेचा पायाच जी वैयक्तिक मालमत्ता ती नाहींशी केल्यानंतर विद्यमान राजकीय अवस्थेंत रुपांतर न होणें अशक्य आहे. वर्तमान जीवनक्रमावरुन या रुपांतराच्या दिशेचा बोध होतो. या रुपांतरांत सरकारची सत्ता वाढणारी नाहीं, तर हल्लीं जें जें काम सरकारी सत्तेनें होत आहे तें तें पुढें स्वेच्छेनें व परस्परसंमतीनें निर्माण झालेल्या मंडळ्यांच्या व संस्थांच्या द्वारें होऊं लागेल."

समाजांत सरकार ही संस्थाच नसावी, कोणाचेंच बाह्य शासन किंवा नियंत्रण नसावें, असें अराजक प्रतिपादन करतात. याचा अर्थ असा नाहीं कीं, समाजांत सर्वदूर अव्यवस्था, गैरशिस्त, किंवा बेलगामपणा असावा. पण जी व्यवस्था किंवा शिस्त असावयाची ती कोणीं कोणावर सक्तीनें लादलेली नसून, सर्वांनीं यांतच आपलें हित आहेसें ओळखून, स्वेच्छेनें व परस्परसंमतीनें ठेवलेली असावी. ती तशी ठेवणें अशक्य नाहीं एवढेंच नाहीं, तर समाजाच्या वर्तमान भांडवलशाहींतही अशी व्यवस्था ठेवली जात आहे. क्रोपोट...नें या बाबतींत रेल्वेचें उदाहरण दिलें आहे. यूरोपखंडांतील निरनिराळ्या राष्ट्रांतील रेल्वे कंपन्या आपल्या रेल्वेची वेळ परस्परसंमतीनें एकमेकांना जुळतील असे ठरवितात, व ते बिनचूक पाळतात. यांत त्यांच्यावर कोणाची सक्ती नसते, व एकादी कंपनी जर नाकबूल झाली, तर तिला भाग पाडण्याचें इतरांपाशीं साधनही नसतें. तथापि अशी अडचण उद्‌भवत नाहीं, व सर्व काम सुरळीत चालतें. सारांश, परस्परसंमतीनें होणाऱ्या करारांचा उपयुक्तपणा इतका स्पष्ट आहे कीं, भावी स्थितींत खासगी मालमत्ता नाहींशी झाली व लोकांच्या स्वार्थप्रवृत्तिचें मूळच तुटलें, म्हणजे या करारांच्या द्वारें समाजाचें सर्व कार्य सुयंत्रित चालण्यास कांहींही अडचण पडणार नाहीं.

यावर काढण्यांत येणाऱ्या अनेक आक्षेपांत मुख्य हा आहे कीं, अशा रीतीनें राजसत्ता नाहींशी झाली, कोणी कोणाला दाबणारा उरला नाहीं, म्हणजे महाभारत शांतिपर्व अध्याय ६८ यांत वर्णन केल्याप्रमाणें, "कोणावरही कोणाचा अधिकार राहणार नाहीं. लोक दरवडेखोर बनतील. कृषि आणि वाणिज्य यांचा नाश होईल. विवाहाचें अस्तित्व नाहींसें होईल. धर्म व यज्ञ नाहींसें होऊन, चोंहोकडे हाहाकार माजेल..... सर्व लोक भीतीनें व्याकुळ होऊन भीतीनें पलायन करूं लागतील." सारांश, 'न हि पापात्परतरं अस्ति किंचित् अराजकात्.'

क्रोपोटकिन या आक्षेपाचें समाधान असें करतो. "आतां तिसरा व मुख्य

आपेक्ष हा कीं, समाजाचे कायदे किंवा निर्बंध तोडणारांस शिक्षा देण्यासाठीं सरकारची आवश्यकता नेहमींच राहील. यासंबंधांत इतकें सांगण्यासारखें आहे कीं, विषयानुरोधानें त्याचा त्रोटक उल्लेख करतां यावयाचा नाहीं. जों जों या प्रश्नाचा जास्त विचार करावा तों तों मनाची खात्री पटूं लागते कीं, समाजांत हल्लीं जीं समाज-विरोधक दुष्कृत्यें घडतात त्याची जबाबदारी स्वत: समाजावरच आहे. शिक्षा, तुरुंगवास, किंवा फांशी, यांनीं या कृत्यांची संख्या कमी होणार नाहीं. समाजाच्या पुनर्रचनेशिवाय कशानेंच तीं कमी होणार नाहींत. हल्लीं दरवर्षी कोर्टासमोर जे शेंकडो गुन्हे चौकशीसाठीं येतात त्यांतील तीन-चतुर्थांशांचे मूळ, प्रत्यक्षपणें किंवा अप्रत्यक्षपणें, समाजांतील द्रव्योत्पादनाच्या व द्रव्यविभागणीच्या घातक अव्यवस्थित पद्धतींत आहे; मनुष्यस्वभावाच्या दुर्वृत्तींत नाहीं. त्या मानानें जीं कांहीं थोडीं कृत्यें मानवी अंत:करणांतील दुर्वासनांमुळें समाजाला विघातक अशीं घडतात, त्यांची संख्याही तुरुंगाच्या, फार काय फांशीच्या भीतीनें कमी करतां यावयाचीं नाहींत. आपल्या तुरुंगानें आपण त्यांची संख्या मात्र वाढवितों, आणि त्यांचें स्वरुप जास्त वाईट करतों. आपले गुप्तपोलिस, आपले तुरुंग, आपली जीवाला जीव घेण्याची राक्षसी रीत, व आपल्या फांशीच्या शिक्षा यांच्या योगानें समाजांत सर्वदूर अशा नीच मनोवृत्तींचा व दुष्ट संवयींचा प्रसार केला जात आहे कीं, नीतिमत्ता कायम ठेवण्याच्या खालीं समाजांत हें जें कांहीं घडतें आहे त्याच्या परिणामाचा जो कोणी नीट विचार करील, त्याचें अंत:करण भीतीनें दडपून गेल्यावांचून राहणार नाहीं. याचे उपाय आपण दुसऱ्या दिशेनें धुंडले पाहिजेत, आणि ती दिशा आपणांस पूर्वीच दाखविण्यांत आली आहे." ( Anarchist Communism पृष्ठ ३१-३२)

हे उपाय म्हणजे वैयक्तिक मालमत्ता नाहींशी करुन, कोणालाही उदरनिर्वाहाची ददात न राहूं देणें हे होत. या योगानें समाजाचें एकंदर स्वरुपच बदलेल, स्वार्थाचें मूळ तुटेल, दुर्वासना उत्पन्न करणारी परिस्थिति नाहींशी होईल, आणि इतक्यावर एकाद्याकडून एकादें दुष्कृत्य घडलें तर त्याला शिक्षा न करतां, ज्याप्रमाणें रोगीमाणसाला त्या रोगावरचा उपचार करण्यांत येतो, त्याप्रमाणें सहानुभूतिपूर्वक वागवून, त्या दुष्कृत्यांचें कारण दूर करण्याची व्यवस्था होत गेली, तर असलीं दुष्कृत्यें थोड्याच काळांत अत्यंत विरळ होतील.

याप्रमाणें अराजक पंथांतील राजकीय व आर्थिक मतांचें स्थूल स्वरुप आहे. एका दृष्टीनें या पंथाचें आणि सर्व तत्त्वज्ञानाचें व धर्माचें साध्य एकच आहे. धर्मांतून व तत्त्वज्ञानांतून तरी हेंच सांगितलें असतें कीं, मनुष्यानें आपलें कर्तव्य केवळ कर्तव्यबुद्धीनें प्रेरित होऊन, बाह्य नियंत्रणाची भीति किंवा अपेक्षा न करतां, करीत राहावें. मनुष्यसमाजांत ज्ञान व आत्मसंयमन यांचा असा प्रसार व्हावा कीं, त्यांचे परस्परव्यवहार, कायद्याचें किंवा सरकारचें बंधन नसतांही, नीतीला व न्यायाला अनुसरुन व्हावेत.

सारांश, बाह्य बंधनाच्या जागीं आंतरिक स्वयंप्रेरणेची स्थापना करणें हेंच साध्य अराजक पंथाचें आहे. कोणत्याही प्रकारचे बाह्य नियंत्रण म्हणजे मनुष्याच्या नैसर्गिक स्वातंत्र्याचें अतिक्रमण आहे. याकरितां तें नाहींसें केलें जावें हा सिद्धांत दोघांनाही सामान्य आहे. दोघांत फरक एवढाच आहे कीं, तें साध्य साधण्यासाठीं अराजक पंथ समाजांतील सर्व प्रचलित संस्था एकदम मोडून टाकण्यास सांगतो. त्याउलट धर्म सांगतो कीं, या संस्थांपैकीं पुष्कळ इंद्रियदमनाला व स्वार्थनिरोधाला आवश्यक असल्यानें त्यांना कायम ठेवून त्यांच्या द्वारेंच हें साध्य मनुष्यांस प्राप्त होणार आहे. सारांश, दोघांतला फरक साध्यांत नसून साधनांत आहे.

वर सांगितलेंच आहे कीं, या पंथाचा सर्वांत जास्त प्रसार रशियांत झाला. सगळ्या यूरोपांत रशियाइतकी एकतंत्री राज्यपद्धति दुसऱ्या कोठेंही त्यावेळीं नव्हती, असें असतां तेथेंच या पंथाच्या प्रसारास जास्त अवसर मिळावा हें प्रथमदर्शनीं मोठेंच चमत्कारिक दिसतें. पण थोड्या विचारांतीं मानसशास्त्रांतल्या एका मोठ्या सिद्धांताची त्यावरुन प्रतीति येते. तो हा कीं, जेथें लोकांना अत्यंत कडक बंधन असतें तेथेंच त्यांना त्या बंधनाचा अत्यंत तिटकारा व वीट येऊन तें तें मुळापासून नाहीसें करण्याच्या उद्योगास लागतात. रशियांतल्या या पंथाच्या हकीगतीवरुन दुसरी गोष्ट दृष्टोत्पत्तीस येते ती ही कीं; जेथें लोकांना उघडपणें व कायदेशीर रीतीनें आपलें राजकीय ध्येय साध्य करुन घेण्याचा मार्ग नसतो, तेथें गुप्तपणानें, अत्याचाराने व क्रान्तिकारक चळवळीनें तें साध्य करुन घेण्याची त्यांची प्रवृत्ति होते.

रशियांत दोन संस्था फार प्राचीन असून, समाजस्थितीवर त्यांचा अत्यंत परिणाम झालेला आहे. पहिली संस्था म्हणजे झारची एकतंत्री राज्यपद्धति, व दुसरी 'मीर' म्हणून गांवढ्यांतली समाजपद्धति. रशिया देशाला तार्तार, तुर्क, पोल, स्वीड, लिथुनियन यांसारखे शत्रु चहूं बाजूंनीं होते. त्या सर्वांपासून देशाचें संरक्षण करण्यास एकतंत्री राज्यपद्धतिच आवश्यक होती. त्याप्रमाणें ती तेथें स्थापन होऊन जी एकदां बद्धमूल झाली ती कायमचीच राहिली. रशियांत या झारांच्या सत्तेला आळा घालणारी, तिला मर्यादेत ठेवणारी दुसरी कोणतीही सत्ता नव्हती. रशियांत यूरोपांतल्या इतर देशांप्रमाणें धर्माधिकाऱ्यांचें प्राबल्य नाहीं. ख्रिश्चन धर्माचा ग्रीक कॅथोलिक नांवाचा, सगळ्या यूरोपहून वेगळाच पंथ तेथें प्रचलित आहे. त्यांत रोमन कॅथोलिक पंथाप्रमाणें धर्माध्यक्षाची सत्ता राजाहून वरचढ व स्वतंत्र नाहीं. त्यामुळे तेथें धर्माधिकारी राजाच्या तंत्रानें वागत असत. देशांत राजाच्या सत्तेला प्रतिस्पर्धी असा, इंग्लंडांतल्याप्रमाणें, सरदारांचाही वर्ग नव्हता. झारांनीं तेथील सरदारांना केव्हांच हतबल करुन पूर्णपणें अंकित करुन ठेवलें होतें. इतर देशांतून श्रीमंत व्यापारी, कारखानदार वगैरे लोकांचा 'मध्यम' म्हणून एक वर्ग सामान्यत: असून, त्याचें राजकारणांत बरेंच वर्चस्व असतें.

परंतु रशियांत इतर देशांइतकी व्यापारी व औद्योगिक प्रगति झाली नसल्यानें तेथें हाही वर्ग अस्तित्वांत नव्हता. त्यामुळें झारची सत्ता तेथें पूर्णपणें अनिर्बंध व अमर्याद असे. पीटर धी ग्रेटसारख्या कांहीं झारांनीं या सत्तेचा उपयोग देशांत सुधारणा करण्याकडे करुन देशाचें फार हित केलें, व सामर्थ्य वाढवलें. परंतु सामान्यतः या सत्तेचा उपयोग लोकांची उन्नति करण्यापेक्षां, स्वतःचा अधिकार व सुख हीं अबाधित चालू ठेवण्याकडे जास्त होत असे.

रशियांतील दुसरी संस्था म्हणजे मीर. ही पुष्कळ अंशीं आपल्या इकडील ग्रामपंचायतीसारखी असे. प्रत्येक गांवाला एक एक मीर असे. गांवांतील सर्व जमीन या मीरच्या ताब्यांत असून, गांवांतील सर्व लोक मीरमध्यें सामील असत. मीरमध्यें सर्व गांवकऱ्यांचा दर्जा सारखा असून, आपल्या इकडील पंचायतीप्रमाणें गांवाची सर्व व्यवस्था मीर ठेवीत असे. प्रत्येक गांव व त्याची मीर हीं अंतर्व्यवस्थेंत स्वतंत्र असत; व त्यांच्या सर्व भौतिक गरजा गांवांतल्या गावांतच पूर्ण होण्याची व्यवस्था असे. जमीनीचा महसूल व सैन्यांत लागणारे शिपाई पुरविण्याचें काम मीरकडे असे. झारलाही हें सोइस्कर असे. गांवांतल्या शेंकडो व्यक्तींशीं संबंध ठेवण्यापेक्षां एका मीरला हातीं धरुन तिच्या द्वारें गांवची व्यवस्था ठेवण्यास त्यास फार सोपें पडे. त्यामुळें राज्यांत अनेक उलाढाली झाल्या तरी मीर ही संस्था अबाधित चालत राहिली. आपल्या इकडील ग्रामपंचायतीप्रमाणें तिच्या अंतर्व्यवस्थेंत हात घालण्याचें झारना कारण नव्हतें; व त्याप्रमाणें त्यांनीं तो घातलाही नाहीं. यामुळें एका दृष्टीनें रशियन शेतकऱ्यांना बाह्य उलाढालींचा उपसर्ग पोहोचूं न देण्यांत मीरचा फार उपयोग झाला. परंतु दुसऱ्या दृष्टीनें त्यांच्यांत यामुळें एकप्रकारचें शैथिल्य, चैतन्यराहित्य आलें. बाहेरील जगाशी संबंध न आल्यानें इतर ठिकाणीं होणाऱ्या सुधारणा व नवे नवे विचार यांना रशियन शेतकरी पारखे राहिले. राज्यव्यवस्थेशीं त्यांचा प्रत्यक्ष संबंध येत न गेल्यानें तिच्या बरेवाईटपणाविषयीं साहजिकपणें त्यांच्यांत अत्यंत औदासीन्य उत्पन्न झालें. 'कोई होऊं नृप, हमे क्या हानी' अशी सर्व शेतकरीवर्गाची शोचनीय स्थिति झाली. त्यांच्यांत एकप्रकारचें समाधान नांदत होतें, पण तें अज्ञान, दैववादीपणा व आकांक्षांचा अभाव यांनीं आलें होतें. सर्व यूरोपांत रशियाइतका अज्ञानी, चैतन्यशून्य, पंगु व दुबळा समाज दुसऱ्या कोठेंही नव्हता. व यास पुष्कळ अंशीं मीर ही संस्था कारणीभूत होती. झार अनेक युद्धें करीत, नानाप्रकारचे ऐषआराम भोगीत, त्यासाठीं लोकांना जबरदस्त कर बसवून पिळून काढीत, व त्यांची जबरदस्तीनें सैन्यांत भरती करीत. हें सर्व बिचारे रशियन शेतकरी निमूटपणें सहन करीत. कित्येक वेळां हा जुलूम असह्य झाला म्हणजे बडें होत. पण ती सुसंघटित नसल्यानें तेव्हांच मोडलीं जात, व त्यांत सामील झालेल्यांना भयंकर शिक्षा होत. या योगानें सर्व शेतकऱ्यांत एकप्रकारचें तीव्र नैराश्य व त्यापासून येणारा प्रारब्धवादीपणा पसरला होता.

अशी स्थिति होती, तरी रशियाचा यूरोपांतल्या इतर देशांशीं थोडाफार संबंध येतच होता. त्यामुळें त्या देशांतल्या कल्पनांचा रशियांत फार काळ प्रवेश न होणें संभवनीय नव्हतें. प्रथम रशियांतल्या वरच्या वर्गांतील ज्या लोकांचा संबंध इतर देशांशीं येत असे त्यांच्यांत आचार व विचारस्वातंत्र्याच्या कल्पना पसरुं लागल्या. थोड्या दिवसांनीं अशा प्रकारचीं उदार मतें असणें ही त्या वर्गांत एक फॅशनच झाली. याच सुमारास म्हणजे सन १८५५ त दुसरा अलेक्झांडर हा झार झाला. त्याचीं मतें उदार असून राज्यकारभारांत सुधारणा घडवून आणून लोकांना हक्क देण्याची इच्छा मनापासून होती. त्या काळपावेतों रशियन शेतकरी हा गुलाम मानला जात असे. अलेक्झांडरनें नवीन कायदा करुन त्यांस एकदम स्वतंत्र केलें. देशांत नवीन न्यायकोर्टें स्थापन केलीं; लोकांना स्थानिक स्वराज्य दिलें, व शिक्षणप्रसाराची व्यवस्था केली.

या सर्व सुधारणांनीं व त्यामुळे उद्‌भवलेल्या आकांक्षांनीं रशियन समाजांत थोडेंबहुत चैतन्य दिसूं लागलें होतें. अशा सुमारास यू.रोपांतील सामाजिक वादाच्या अत्यंत पुरोगामी व क्रांतिकारक मतांचा तेथें प्रवेश झाला. निराशा, अज्ञान व आकांक्षाशून्य स्थितींत कित्येक पिढ्या काढल्यानंतर, नुकतेंच जागा झालेल्या अनुभवशून्य, ज्ञानलवदुर्विदग्ध अशा रशियन समाजाला हीं क्रान्तिकारक मतें फार पटलीं. पूर्वीचीं बंधनें थोडीबहुत सैल होऊं लागतांच त्याला ती अजिबात तोडून टाकावींशीं वाटूं लागलें. रशियांतल्या क्रान्तिकारक चळवळीच्या या स्वरुपाला 'विध्वंसक' (Nihilist) असें नांव आहे. समाजांतील कोणतीही व कोणत्याही प्रकरची सत्ता या मतवाल्यांना मान्य नव्हती. कोणतेंही मत, सांप्रदाय किंवा पंथ केवळ विश्वासावर पूज्य मानण्यास ते तयार नसत. समाजांतील सर्व राजकीय आणि कौटुंबिक संस्था, धर्म आणि नीति हीं त्यांस अत्यंत दोषपूर्ण व त्याज्य वाटत. परंतु त्यांत क्रमशः सुधारणा करणें त्यांस पसंत नसून, समाजांतील सर्वच प्रचलित व्यवस्था, चांगलें आणि वाईट, एकदम नाहींसें करुन टाकावें असें त्याचें मत असे. पूर्वीचे तितकें सर्व वाईट, त्यास एकदम जलसमाधि देऊन अगदीं नव्यानें जगाच्या पुनर्रचनेस सुरुवात केली पाहिजे. कलाकौशल्य, काव्य, किंवा मनाचे कोमल विकार यांस ते अत्यंत तुच्छ लेखीत. त्यांच्या मतें जगांत भौतिक शास्त्रें व बुद्धि हींच आदराला पात्र होत. आतां एवढें मात्र खरें कीं, या ग्रंथांतील लोकांस समाजांतील दीन दुःखी लोकांविषयीं अत्यंत अनुकंपा वाटत असे. किंबहुना समाजांतील कोणतीच विद्यमान संस्था किंवा राजकीय पद्धत या लोकांचीं दुःखें दूर करीत नाहीं यामुळें चिडून सात्त्विक त्वेषाच्या भरांतच ते आपल्या सर्वविध्वंसनाच्या कार्यास प्रवृत्त झाले होते. समाजांतील सर्व व्यक्तींचा–स्त्रियांचा व पुरुषांचा–दर्जा सारखा असावा असेंही त्यांचें मत असे. दुसरा अलेक्झांडर गादीवर येण्याच्या सुमारास आपल्या मतांना अनुसरुन या लोकांनीं समाजांतील प्रचलित व्यवस्था उलथून पाडण्याचे प्रयत्न सुरु केले होते. त्यांच्याकडे विशेष लक्ष न देतां जर त्यानें आपलीं उदार मतें कायम ठेवून राजकीय व

इतर सुधारणा घडवून आणण्याचा क्रम कायम ठेवला असता, तर या लोकांच्या मतांचा प्रसार बंद होऊन लवकरच तीं नामशेष झालीं असतीं. कारण त्यावेळची शोचनीय परिस्थिति हीच त्या मतांच्या उदयाचें व प्रसाराचें खरें व मूलभूत कारण होतें; तेव्हां ती परिस्थिति नाहींशी झाली असती, तर ज्याप्रमाणें मूळ तुटल्यावर झाड आपोआपच वाळून जातें, तद्वत् हीं मतें लुप्तप्राय झालीं असतीं. परंतु झारच्या सुधारणा देशांतील जुन्या सरदारवर्गाला पसंत नव्हत्या. त्यांच्या स्वार्थाला त्यांनीं विरोध येत होता. म्हणून तो वर्ग झारनें आणखी सुधारणा करुं नयेत म्हणून मनापासून झटत होता त्यांनीं झारला असें भासवून दिलें कीं, समाजांतले विध्वंसकांचे अत्याचार झारच्या सुधारणांचेंच फळ होत. झारचेंही मन त्यामुळें द्विधा झालें. अशा प्रसंगीं लागणारी अत्यंत दूरदृष्टि, व त्या दृष्टीवर विश्वास ठेवून वागण्यास लागणारा मनाचा खंबीरपणा त्याच्यांत नव्हता, त्यामुळें त्याचा स्वत:चा कांहींच निश्चय होईना. इतक्यांत सन १८६६ त त्याचाच जीव घेण्याचा प्रयत्न कॅरोकॅझॉफ नांवाच्या माणसानें केला. या गोष्टीनें झारचें मत बदललें. इतक्या वेळ जो निश्चय होत नव्हता तो झाला, आणि त्यानें दडपशाहीला सुरुवात केली.

परंतु यूरोपांत इतरत्र चाललेल्या लोकशाहीच्या प्रयत्नांनीं रशियन तरुणांत या काळांत नवें चैतन्य संचरुं लागलें होतें. तें या दडपशाहीनें नाहींसें होणें दुर्घट होतें. मार्क्सचा आंतरराष्ट्रीय संघ कामकरी वर्गांत जोरानें काम करीत होता. जर्मनींत प्रजासत्ताक समाजवादी पक्ष आपल्या मतांचा उद्घोष करीत होता. सन १८७० त थोड्या काळापुरतेंच कां होईना पण पॅरीस कम्यूननें आपलें प्रजासत्ताक सामाजिकवादी राज्य स्थापन केलें होतें. या सर्वांचा परिणाम रशियावर होत होता. रशियांतले शेंकडो तरुण विद्यार्थी स्विट्झर्लंडांत, जर्मनींत, फ्रान्सांत विद्याभ्यास करीत होते. झारनें सन १८७३ त एक फर्मान काढून त्या सर्वांस देशीं परत बोलावलें. ते विद्यार्थी त्याप्रमाणें जेव्हां स्वदेशीं परत आले तेव्हां त्यांनीं बाहेरच्या जगांतील मतें व उत्साह हीं आपल्याबरोबर आणलीं. हीं मतें मुख्यत्वें बाकुनिनच्या अराजक पंथाचीं होतीं. तीं विध्वंसक पंथापेक्षां अर्थात् जास्त सौम्य व विधायक होतीं. त्यांत विशेष गोष्ट ही होती कीं, देशांतील सर्व लोकांत मिसळून त्यांच्यांत जागृति उत्पन्न करण्याचा उद्देश या सर्व विद्यार्थ्यांच्या डोळ्यासमोर होता. त्याप्रमाणें ते बुद्धिपुर:सर देशांतील निरनिराळ्या भागांतील खेड्यापाड्यांतून पसरले. तेथें अगदीं खालच्या प्रतीच्या शेतकऱ्यांत व धंदेवाल्यांत मोकळेपणानें मिसळून ते त्यांना आपलीं मतें समजावून सांगत. त्यांना आपल्याशीं बोलण्याचालण्यांत संकोच वाटूं नये म्हणून ते विद्यार्थी त्यांच्यासारखा जाडाभरडा पोषाख करीत, व त्यांचे धंदे स्वत: करुं लागत; फार काय, ज्यांना जन्मांत शारीरिक श्रम करण्याचा प्रसंग आला नाहीं असे मोठमोठ्या कुळांतील तरुण मजुरांप्रमाणें

काबाडकष्ट करीत. हेतु हा कीं, मजूरांना हे आपल्यांतलेच आहेतसें वाटावें आणि त्यांनीं मोकळ्या मनानें वागावें. रशियन तरुणांचे लोकजागृतीचे प्रयत्न याप्रमाणें जोरानें व अलौकिक स्वार्थत्यागानें चालले होते, परंतु रशियन सरकारकडून त्यांच्याकडे फार दिवस दुर्लक्ष होणें संभवनीय नव्हते. त्या तरुणांना अनुभव नसल्यानें असल्या कामांत जी सावधगिरी व दक्षता ठेवावी लागते तीही त्यांच्याकडून ठेवण्यांत आली नाहीं. त्यामुळें सरकारला या सर्व चळवळ्यांना धुंडून काढून तुरुंगांत टाकण्यास किंवा सैबीरियांत हद्दपार करण्यास मुळींच अडचण पडली नाहीं. सन १८७३ ते १८७६ ह्या तीन वर्षांत जवळ जवळ २००० लोक सरकारनें याप्रमाणें पकडून तुरुंगांत टाकले किंवा हद्दपार केले.

या दडपशाहीनें सर्वच प्रकार एकदम बदलला. आपल्याला काम करतां येत नाहींसें पाहून रशियन तरुणांनीं आपल्या कामाची पद्धत बदलली. ते या पुढें गांवढ्यांतून कायमचे रहावयास गेले, व लोकांचीं मनें हळू हळू वळवून झारच्या विरुद्ध एक मोठें बंड उभारण्याचा त्यांनीं निश्चय केला. परंतु कांहीं दिवसांच्या अनुभवानंतर त्यांस दिसून आलें कीं, अशिक्षित शेतकरीवर्गाला किंवा कामकऱ्यांना आपलीं मतें समजत नाहींत, किंवा बऱ्याच प्रयत्नांनंतर समजलीं तरी त्याच्यासाठीं बंड करण्यास त्यांची तयारी होत नाहीं, तेव्हां या बाबतींत आपल्याला यश येण्याचा संभव नाहीं. हा अनुभव आल्यानंतर या लोकांनीं आपलें धोरण पुन: बदललें. झारच्या व त्याच्या अधिकारीवर्गाच्या विरुद्ध अत्यंत सावधगिरीनें, शिस्तीनें, पद्धतशीरपणानें आणि गुप्त रीतीनें आपली चळवळ करण्याचा त्यांनीं निश्चय केला. बाकुनिननें समाजांत अमर्याद स्वातंत्र्य असावें असा उपदेश केला होता. परंतु या त्याच्या अनुयायांनीं, तें अमर्याद स्वांतत्र्य मिळविण्यासाठीं ज्या गुप्त मंडळ्या स्थापन केल्या, त्यांत आज्ञापालनाचे व शिस्तीचे अत्यंत कडक निर्बंध घातले. एक मुख्यवर्ती मंडळ कायम करुन त्याच्या आज्ञेंत इतर सर्व मंडळांनीं व सभासदांनीं निमूटपणें बिनतक्रार वागलें पाहिजे, असा कडक नियम केला व कार्यास सुरवात केली. मोठमोठ्या अधिकाऱ्यांचा व खुद्द झारचा खून करण्याचा त्यांचा बेत होता. त्याप्रमाणें त्यांनीं पोलिसचा मुख्य अधिकारी, प्रांताचे मुख्य अधिकारी, जनरल, इत्यादिकांचा उघड्या दिवसा खून करुन सरते शेवटीं, दोन चार वेळां बेत फसल्यानंतर प्रत्यक्ष झारचाही खून केला! (सन १८८१)

रशियांतल्या या क्रान्तिकारक पक्षाचीं मतेंच इतकी पुरोगामी व समाजविघातक होतीं कीं, कोणत्याहि सरकारला त्यांच्याकडे कानाडोळा करुन तटस्थ रहाणें योग्य झालें नसतें. परंतु तीं नाहींशी करण्याचा योग्य मार्ग म्हणजे लोकांना राज्यकारभारांत जास्त जास्त हक्क देत जाऊन त्यांना क्रान्तीपासून परावृत्त करणें हा होय. परंतु तो अमलांत न आणतां झारनें नुसती दडपशाही सुरु केल्यानें तिचा परिणाम एवढाच झाला कीं, पूर्वी हे लोक जी उघडपणें चळवळ करीत असत ती बंद होऊन तिच्याऐवजीं गुप्त कट होऊं

लागले, व त्यांत झारला स्वत:ला सरतेशेवटीं बळी पडावें लागलें. झारच्या खुनानंतर क्रान्तिकारक पक्षानें नवीन झारला पत्र पाठवून त्यांत लोकांनीं निवडलेली प्रतिनिधि-सभा स्थापून तिला अधिकार देण्यांत आले तर गुप्त कट व अत्याचार बंद करण्यास आपली तयारी असल्याचें कळविलें. देशांत सनदशीर राज्यपद्धति स्थापन झाल्यास आपण सनदशीर उपायांचाच अवलंब करुं अशीही त्यांनीं हमी दिली होती. यावरुन जरी या लोकांचे मार्ग जहाल व अत्याचारपूर्ण होते, तरी अगतिक झाल्यामुळेंच ते त्यांना स्वीकारावे लागले होते, व परिस्थिति बदलतांच ते बदलण्याची त्यांची तयारी होती, हें स्पष्टपणें सिद्ध होतें.

क्रान्तिकारक पक्षानें याप्रमाणें सनदशीर राज्यपद्धतीची मागणी करुन ती मिळतांच आपले अत्याचार बंद करण्याचें कबूल केलें, पण त्यांची ही मागणी पूर्ण होण्यास रशियन सरकारला अजून पुष्कळ कडु अनुभव यावयास पाहिजे होता. तिसरा अलेक्झांडर ह्याच्यानंतर आलेला तिसरा निकोलस याच्या कारकीर्दींत सनदशीर पद्धति देण्याऐवजीं जास्त जोराची दडपशाहीच सुरु राहिली. सन १९०३ सालांत एका वर्षांत १२००० लोक राजकीय खटल्यांत गोंवण्यांत आले. परंतु रुसो-जपान युद्धांत झालेल्या पराजयानंतर लोकांचीं मनें सर्व देशभर इतकीं क्षुब्ध झालीं कीं, तीं शांत करण्यासाठीं लोकसभा स्थापन करण्याशिवाय गत्यंतरच उरलें नाहीं. या पराजयानंतर रशियन सरकारांतही पूर्वीचा जोम व ताठपणा राहिला नव्हता. तेव्हां सन १९०५ त सरकारनें लोकांची ड्यूमा सभा स्थापन केली. परंतु यावेळींही या सभेला राज्यकारभाराची खरी सत्ता मुळींच देण्यांत आली नसून, केवळ राज्यकारभारावर टीका करण्याची मात्र परवानगी दिली होती. अर्थातच त्यामुळें लोकांचें तिनें समाधान होण्याचा संभव नव्हता. जर्मन युद्धांत रशियन लष्करांतील बेबंदशाही, रशियन सैन्याचे पराजय, झारचा पोंचटपणा, इत्यादिकांनीं झारविषयींच्या अप्रीतीचा कळस झाला, आणि ड्यूमा सभेनें अवघ्या चोवीस तासांत झारला रशियन साम्राज्याचा राजीनामा देणे भाग पडलें. यानंतर ड्यूमानें आपलें तात्पुरतें प्रधानमंडळ नेमलें, परंतु थोड्याच काळांत या मंडळाच्या किंवा खुद्द ड्यूमाच्या हातींही राजसत्ता राहिली नाहीं. कामकरी लोकांचे पुढारी लेनिन आणि ट्रोव्हट्स्की यांनीं ड्यूमा सभा व तिचे प्रधानमंडळ या दोघांनाही अर्धचंद्र देऊन आपल्या हातीं सर्व सत्ता घेतली. या लोकांचीं मतें 'बोल्शेव्हिझम' या नांवानें प्रसिद्ध असून सर्व देशांतील सरकारांना एकाद्या अत्यंत जहाल सांथीप्रमाणें या मतांच्या संसर्गभीतीने ग्रस्त करुन सोडलें आहे. या मतांच्या निश्चित स्वरुपाविषयीं प्रमाणभूत, नि:पक्षपाती, व विश्वसनीय माहिती अजून फारशी उपलब्ध नाहीं. इंग्रजी वर्तमानपत्रांतून जीं वर्णनें येतात तीं अतिशयोक्तिपूर्ण व पूर्वग्रहदूषित, कांहीं अंशीं बुद्धिपूर्वक विपर्यास करणारीं असतात. त्यामुळें त्यांच्यावर कितपत विश्वास ठेवावा ह्याविषयीं शंका येते. तथापि

त्यांतल्या त्यांत विश्वासयोग्य दिसणाऱ्या ग्रंथावरुन व वृत्तांतावरुन या पंथाची शक्य ती माहिती पुढील एका प्रकरणांत देण्याचा प्रयत्न केला आहे.

अराजक पंथांचीं मतें सामान्यतः कोणत्या परिस्थितींत उत्पन्न होतात, वृद्धिंगत होत जातात, किंवा विध्वंसकासारख्या पंथांत रुपांतर पावतात हें रशियाच्या उदाहरणावरुन फार चांगले प्रत्ययास येतें. म्हणून ती माहिती वर थोडी विस्तृत स्वरुपांत दिली आहे. वस्तुतः अराजक व विध्वंसक या दोन्ही पंथांचे मूलभूत सिद्धांत व उद्देश एकच असून त्यांच्यांत भेद कायतो साधनांत व उपायात आहे. व त्याला कारण बहुतांशीं परिस्थिति आहे. इतर सर्व सौम्य उपाय खुंटले, उघडपणें चळवळ करतां येईनाशी झाली, सनदशीर सुधारणेचे मार्ग बंद करुन टाकण्यांत आले, म्हणजे तीव्र नैराश्य गुप्त कट, जालीम सर्वनाशक क्रान्तिकारक उपाय हें झाल्याशिवाय रहात नाहीं हा इतर ठिकाणचाही अनुभव आहे.

## प्रकरण ७ वें

# संघवाद

संघवाद हें मार्क्सच्या सामाजिकवादी मतांविरुद्ध एकप्रकारचें बंड आहे. सरकारच्या अंतिम स्वरुप व सत्तेबद्दल मार्क्सचें मत थोडेंफार संदिग्ध आहे हें मागील प्रकरणांत आपण पाहिलेंच; पण कामकरीवर्गानें स्वोद्धारार्थ चळवळ करावयाची ती पार्लमेंटद्वारा करावी हें मार्क्सचें मत स्पष्ट आहे. या मतांपैकी पहिल्या संदिग्ध म्हणजे सरकारच्या अंतिम स्वरुपाबद्दलच्या मतांवरिद्ध अराजक पंथ हें बंड आहे, आणि दुसऱ्या म्हणजे पार्लमेंटद्वारा चळवळीच्या मतांविरुद्ध संघवाद हें बंड आहे. अराजकपंथ हा जुना, कांही अंशीं मार्क्सच्या पूर्वीपासूनचा, निदान समकालीन तर खास आहे; संघवाद मार्क्सच्या नंतर अलीकडे प्रचलित झालेला आहे. या वादाचा विशेष प्रसार फ्रान्स व अमेरिका या देशांत विशेष आहे. म्हणजे युद्धापूर्वी होता. युद्धानें या मतांत रुपांतर होण्याचा फ्रान्ससारख्या प्रबळ मनोवृत्तींच्या व युद्धांत अत्यंत जर्जर झालेल्या देशांत दाट संभव आहे. पण या रुपांतराचें स्वरुप हल्लींच कळणें दुरापास्त आहे. पुढें जीं या वादाचीं मतें दिलीं आहेत तीं अर्थात् युद्धापूर्वीची आहेत.

संघवादाचा मुख्य सिद्धांत हा आहे कीं, समाजाची आदर्शभूत सौख्यमय स्थिति प्राप्त होण्यास उद्योगसंघाचे हातीं राजशासन आलें पाहिजे. कामकरी लोकांस जर समाजांतली हल्लींची अन्यायमूलक स्थिति बदलून स्वत:ला न्याय मिळवावयाचा असेल, तर त्याला एकच उपाय आहे. त्यांनीं आपले उद्योगसंघ स्थापून त्यांच्या द्वारें स्वतंत्र व जबरदस्तीचे उपाय योजिले पाहिजेत. राजकारणांत पडून, प्रतिनिधिसभेंत या किंवा त्या

पक्षाचा आश्रय करुन, किंवा स्वत:चा वेगळा पक्ष निर्माण करुनही कांहीं उपयोग नाहीं. कामकऱ्यांचे स्त:च्या उन्नतीचे प्रयत्न स्वत:च्या संघांच्या द्वारानेंच, प्रतिनिधिसभेशीं संबंध न ठेवतां, झाले पाहिजेत.

सारांश, औद्योगिक संघाच्या प्रयत्नानें व त्यांची शासनसत्ता स्थापन करुन समाजांतील कामकरीवर्गाची स्थिति सुधारणारा हा वाद आहे. सामाजिक वादाप्रमाणें याचीही उत्पत्ति फ्रान्स देशांत झाली, व त्याचा सर्वांत अधिक प्रसार तेथेंच झालेला आहे.

फ्रान्स देशांत प्रथमत: सन १८८४ त सर्व धंद्यांतील कामकऱ्यांना आपापलें संघ स्थापन करण्याची कायद्यानें मोकळीक मिळाली. यापूर्वी वीस किंवा अधिक कामकऱ्यांनीं संघाच्या स्वरुपाची सभा भरविणें हा गुन्हा मानला जात असे. वरील सालीं संघ स्थापण्याची मोकळीक मिळाली; तेव्हांही प्रत्येक धंद्याचे निरनिराळे संघ किंवा एकमेकांशीं संबंध असलेल्या धंद्याचे संयुक्त संघच स्थापतां येत असत. तथापि एव्हांपासून कामकऱ्यांचें स्वत:च्या आर्थिक उन्नतीचे प्रयत्न फ्रान्स देशांत जाहीरपणें होऊं लागले. यापूर्वी सन १८६६ त मार्क्सनें स्थापिलेल्या 'आंतरराष्ट्रीय' मध्यें फ्रेंच कामकऱ्यांचे प्रामुख्यानें अंग होतें यांत संशय नाहीं. परंतु तेव्हांचे सर्व प्रयत्न फ्रान्स देशाच्या बाहेरुन चालले होते. खुद्द फ्रान्स देशांत कामकऱ्यांचे हातपाय जखडले होते. ते सन १८८४ त सैल होऊं लागले. यापूर्वी कांहीं वर्षे मजुरांचे संप कायदेशीर समजले जाऊं लागले होते. सन १८८४ चा हक्क मिळाल्यानंतर थोड्याच काळानें कामकरीवर्गाच्या संघटनांस प्रारंभ झाला. प्रथमत: मोठमोठ्या शहरांतून कामकरीवर्गानें Bours du Travail अथवा कामकरीमंडळें स्थापन केली. यांत शहरांतील सर्व धंद्यांच्या कामकऱ्यांचा समावेश केलेला असे. शहराचा सर्व कारभार आपल्या हातीं यावा अशी या मंडळांची महत्त्वाकांक्षा होती. पण ती साध्य होईपावेतों मध्यंतरीं त्यांनीं कामकऱ्यांच्या स्थितीसंबंधानें व्याख्यानें देण्याचें, शहरांतील बेरोजगारी कामकऱ्यांना मदत करण्याचें, व प्रसंग सांपडेल तेव्हां कारखानदारांच्या लोभी वृत्तीला आळा घालण्याचें काम हातीं घेतलें. हळू हळू एका जिल्ह्यातील व प्रांतांतील कामकरीमंडळांचे जिल्हा व प्रांत–संघ कायम होऊन सन १८९२ त सर्व फ्रान्स देशांतील कामकरीमंडळांचा एक निखिल–राष्ट्रीय–संघ स्थापन झाला.

या बूर्सबरोबरच गांवांतील प्रत्येक धंद्याचे निरनिराळे सिंडिकेट, अथवा संघ स्थापण्यांत आलें. या सिंडिकेटमध्यें त्या त्या धंद्याचेच कामकरी असत. अर्थातच सिंडिकेट ही बूर्सपेक्षां लहान संस्था असे. या सिंडिकेटांचीही प्रांतानिहाय, जिल्हानिहाय मंडळें स्थापून, सर्व फ्रान्स देशापुरतें एक संयुक्त मंडळ Confederation Generale du Travail या नांवाखालीं सन १८९५ त स्थापन करण्यात आलें.

याप्रमाणें प्रथम प्रथम फ्रान्स देशांत कामकऱ्यांच्या दोन वेगवेगळ्या संस्था होत्या. एक बूर्सचें फेडरेशन, यांत सर्व धंद्याचे कामकरी सामील होते; दुसरी, कॉनफीडरेशन जनरल यांत एकाच धंद्यातले लोक समाविष्ट असत. सन १९०२ त या दोन्ही संस्था एकत्र करण्यांत आल्या. अर्थातच या एकत्र झालेल्या संस्थेंत सिंडिकेटांना दोन वेळा प्रतिनिधित्व मिळालें. एकदां सिंडिकेटांची जिल्हानिहाय व प्रांतनिहाय मंडळें असत, त्यांचे प्रतिनिधि संयुक्त संस्थेंत असत; व दुसऱ्यांदा, याच सिंडिकेटचे सभासद त्या त्या गांवच्या बूर्समध्यें सामील असत. त्यांचींही जिल्हा व प्रांत-मंडळें असत, व त्यांतून संयुक्त संस्थेंत प्रतिनिधि येत. या संयुक्त संस्थेचें नांव ' कॉनफीडरेशन जनरल डु ट्रॅव्हेल ' असेंच कायम ठेवण्यांत आलें. त्याच्या रचनेंत सिंडिकेटांना याप्रमाणें दोनदां प्रतिनिधि मिळण्याचा स्पष्ट नियम केला आहे. त्याचा हेतु असा आहे कीं, सर्व धंद्यांतील कामकरी एकत्र झाल्यानें सर्वांचें सामवायिक व सामान्य हित पाहिलें जाईल; परंतु अशा प्रसंगी विशिष्ट धंद्यांतील कामकऱ्यांच्या वैयक्तिक हिताकडे दुर्लक्ष होण्याचा संभव असतो, तो प्रत्येक धंद्यातील सिंडिकेटचे प्रतिनिधि घेतल्यानें दूर होईल.

या एक झालेल्या संस्थेंतून संघवादाच्या तत्त्वांची उत्पत्ति हळूहळू झाली. या तत्त्वांत संघांच्या प्रयत्नांनीच कामकरी वर्गाची विपन्न स्थिति सुधारतां येणें शक्य असून, समाजांतील सर्व सत्ता कामकरी संघाच्या हातीं ठेवली पाहिजे असा मुख्य सिद्धांत असल्यानें 'संघ' शब्दाचा वाचक जो फ्रेंच शब्द Syndic त्यापासून Syndicalism हें नांव या वादाला मिळालें, व आम्ही त्यास 'संघवाद' असें मराठी रुप दिलें.

कामकरी लोकांच्या वरील संयुक्त संघानें प्रथमतः सन १९०६ मध्यें आपल्या इष्ट मागण्या कबूल करुन घेण्यासाठी बरेंच संप केले, परंतु त्यापैकीं कोणालाच म्हणण्यासारखें यश आलें नाहीं. बहुतेक सर्व संपांच्या वेळीं सरकारनें मध्यें पडून शिपायांच्या मदतीनें कामकऱ्यांना वठणीवर आणलें. यामुळें संघातील सभासदांच्या अंतःकरणांत सरकारविषयीं कायमचा तीव्र द्वेष उपजला. भांडवलवाले कारखानदार व सरकार यांच्या बाजूला शारीरिक सामर्थ्य असून, त्याला जेरीला आणण्याला शारीरिक सामर्थ्यच उपयोगांत आणावें लागेल. नुसत्या न्यायाच्या, तत्वज्ञानाच्या, किंवा माणुसकीच्या गोष्टी सांगून सरकार किंवा भांडवलवाल्यांच्या पाषाणहृदयावर कांहीं परिणाम होत नाहीं. म्हणून कामकरी संघानें आपल्या सामर्थ्याचा त्यांना प्रत्यय आणून दिला पाहिजे. भांडवलवाल्यांचें व कामकरी वर्गाचें हें निर्वाणीचें युद्ध आहे. त्यांत कोणत्या तरी एका पक्षाचा कायमचा निकाल–समूळ नाश– झाल्याशिवाय थांबतां कामा नये. या युद्धांत कामकरी वर्गानें आतांपावेतों संपाचा उपयोग केला, परंतु संप हे एका वेळीं एकाच धंद्यापुरते होत असल्यानें मोडण्यास सोपे जातात; व त्यांच्यापासून व्हावा तसा लाभ होत नाहीं. यासाठीं सर्व धंद्यांचा एक सामान्य संप केला पाहिजे. हें

'सार्वत्रिक संपा'चें शस्त्र संघवादानें फार जोरानें प्रतिपादिलें आहे; किंबहुना या वादांतील काम करण्याच्या विशिष्ट पद्धतीपैकीं ही मुख्य पद्धत आहे. इष्टप्राप्तीचें हें मुख्य साधन आहे. आधुनिक यांत्रिक सुधारणा व औद्योगिक पद्धति यांच्यामुळे हें साधन उपयोगांत आणतां येणें शक्य झालें आहे; व या संपाला शहरांतील सर्व धंद्यांच्या कामकऱ्यांची अनुकूलता व एकमत असण्याची आवश्यकता उरली नाहीं. हल्लीं कांहीं थोड्या मुख्य धंद्यांवर बाक़ीचे सर्व धंदे अवलंबून असतात, व ह्या मूलभूत धंद्यांतील कामकऱ्यांनी संप केला तर बाकीचे धंदे आपोआप बंद पडतात. उदाहरणार्थ, कोळशाच्या खाणींतील मजूरांनी आतां कांहीं दिवसांपूर्वी संप केला होता तेव्हां किती तरी इतर धंदेही बंद पडले होते. वीज उत्पन्न करण्याच्या कारखान्यातील मजूरांनीं संप केला तर त्या विजेच्या जोरावर चालणाऱ्या सर्व कारखान्यांना काम थांबवावें लागतें, व सर्व शहरभर, रस्त्यांतून व घरांतून अंधार होतो तो निराळाच. रेल्वेवरील कामगार अडून बसले, तर समाजांतला अर्धा व्यवहार बंद पडतो. हिंदुस्थानाची औद्योगिक स्थिति निराळी आहे. येथील धंदे अजून इतके परस्परावलंबी झालेले नाहींत. विजेचा व यंत्रांचा इतका उपयोग अजून होऊं लागला नाहीं. व एकंदरींत समाजाला यूरोपीय समाजाइतकी रेलवे, टेलिफोन, वीज इत्यादी शास्त्रीय व सुधारलेल्या सुखसोयींची संवय झालेली नाहीं, आणि आपली राहणी त्यांच्यावर इतकी अवलंबून नाहीं. म्हणून सर्वसाधारण संप करणें आपल्या इकडे इतकें सोपें नाही, किंबहुना शक्य कोटींतलें नाहीं. यूरोपांतही मागील शतकांत हीच स्थिति होती, पण आतां वर दर्शविल्याप्रमाणें लोकांची राहणी व उद्योगधंद्यांची स्थिति पूर्णपणें बदलली असल्यानें, असे संप सहजसाध्य झाले आहेत. समाजाचे सर्वच व्यवहार या संपानें बंद पडत असल्यानें त्यांचा परिणामहि फार मोठा होतो. या सर्व गोष्टी लक्षांत घेऊन संघवादानें असले संप हें आपलें मुख्य शस्त्र म्हणून ठरविलें आहे.

संघवादानें युद्धासाठीं शोधून काढलेलें दुसरें शस्त्र तर सर्वसाधारण संपापेक्षांहि सुलभ असून, शिवाय त्याचा कायद्यानें निर्बंध करणें जास्त कठिण आहे. या शस्त्राला एका धंद्यातले सुद्धां सर्व कामकरी अनुकूल असण्याची आवश्यकता नसते. या उपायाला Sabotage असें नांव असून, त्याचा अर्थ कोणतेंही काम, कारखाना किंवा व्यापार बंद पाडण्यासाठीं, किंवा त्यांत विघ्न आणण्यासाठी त्यांतील यंत्रें व इतर सामुग्री नष्ट, खराब किंवा निरुपयोगी करणें असा आहे. हल्लींच्या यांत्रिक कारखान्यांची ज्यास थोडी फार माहिती आहे त्यास यंत्रादि सामान खराब करुन किती सहज कारखाना बंद पाडतां येतो याची सहल कल्पना करता येईल. एकाद्या मोठ्या कारखान्याच्या ऑईल-एंजिनमधील एकादा मधला स्क्रू काढून टाकला किंवा मधल्या पोकळीत एकादी खुंटी ठोकून दिली, तर एंजिन व त्याबरोबर सर्व कारखाना फट्कन बंद पडतो, व मग त्याच्या दुरुस्तीत किती तरी वेळ जातो व कित्येक वेळां तर यंत्र कायमचें निरुपयोगी होऊन जातें. विजेची

पुरेशी शक्ति उत्पन्न होण्याला ती विशिष्ट लांबीच्या तारेंतून जावी लागते. म्हणून कारखान्यांतून बॅटरीचा विजेची तार चक्कर देऊन किंवा मध्यें वेंटाळी करुन, दुसऱ्या बॅटरींत आणला असतो. आतां कारखान्यांतील मजूरांना सहज कोणाला न समजतां दुसरी एकादी लहान तार घेऊन या दोन्ही बॅटरींतील तार मध्येंच जोडून देतां येतात. तसें झालें म्हणजे वीज लांबीच्या चक्करांतून न जाता मधल्या लहान तारांतून जाऊं लागतें. अर्थातच तिची शक्ति कमी होते. व कारखान्यांतील यंत्रांना पुरेशी शक्ति मिळून तीं बंद पडतात. लांकडें कांपण्याच्या कारखान्यांत एक गोल करवत यंत्रानें लांकडें कांपीत असते. आतां तर हळूंच ह्या लांकडांत खिळा ठोकून दिला, तर ती करवत ह्या खिळ्यावर धांसते व खराब होऊन जाते. अशा एक ना हजार प्रकारानें हें विघ्नकृत्य विशेष श्रम न पडतां, कोणीं केलें हें उघडकीस न येतां, कायद्याच्या तावडींत न सांपडतां अगदीं थोड्या व्यक्तींना उरकतां येतें. म्हणून संघवादाच्या अनुयायांनी या उपायाचा मोठ्या उत्सुकतेनें अवलंब केला आहे.

प्रचलित एकसत्ताक त्याचप्रमाणें लोकसत्ताक राज्यपद्धतीवर संघवादाचा अत्यंत कटाक्ष आहे. समाजांत आमच्या संघांशिवाय इतर कोणाचीही सत्ता असतां कामां नये, असा त्याचा आग्रह आहे. या बाबतींत सामाजिक वादांतल्या निरनिराळ्या पंथांत कसें परिवर्तन होत गेलें हें पाहण्यासारखें आहे. सेंट सायमन, ओवेन, फोरियर, यांच्या वेळीं प्रचलित राजसत्तेनेंच औद्योगिक पद्धतींत सुधारणा करुन कामकरी वर्गाला न्याय व सुख मिळवून द्यावें असें मत होतें. पुढें लुई ब्लँकच्या वेळीं असें धोरण होतें कीं, सरकार स्वत: होऊन कामकरी वर्गाची स्थिति सुधारण्याकडे लक्ष देणार नाहीं; यासाठीं प्रतिनिधिसभेंत आपला पक्ष निर्माण करुन मताधिक्य मिळविलें पाहिजे, व या मताधिक्याच्या जोरावर सरकार प्रतिकूल असतांही आपल्याला हव्या त्या सुधारणा घडवून आणल्या पाहिजेत. म्हणूनच देशांतील सर्व व्यक्तींना मतदाराचा अधिकार मिळविण्याची मागणी या वेळीं जोरानें करण्यांत येऊं लागली होती. लॅसेलच्या वेळीं सामाजिक वादाचें जर्मनींत हेंच धोरण होतें, व त्याला अनुसरुनच प्रजासत्ताक सामाजिकवादी पक्ष तेथील लोकसभेंत लॅसेलनें निर्माण केला होता. प्रौढनच्या वेळीं भावी आदर्शभूत समाजस्थितींत राजसत्तेची, किंबहुना कोणत्याच बाह्य नियंत्रणाची, जरुरत राहणार नाहीं असें मत प्रथमत: प्रतिपादन करण्यांत येऊं लागलें. मार्क्सनें समाजाच्या भावी स्थितीविषयीं स्पष्टपणें फारसें लिहिलें नाहीं, परंतु त्याचेंही मत समाजांत राजसत्तेची जरुरत पुढें उरणार नाहीं, व जी कांहीं औद्योगिक व्यवस्था समाजांत ठेवावी लागेल ती कारखान्यांच्या संघांच्या द्वारें ठेवण्यांत येईल असें होतें. तथापि चालू स्थितींत आंतरराष्ट्रीय संघावर मार्क्सचा विशेष भरंवसा होता. त्या संघाच्या द्वारानें निरनिराळ्या देशांतील सरकारवर वजन पडून, व त्या त्या देशांतील मजूरपक्षाला पार्लमेंटांत सहाय मिळून, आर्थिक सुधारणा घडून येईल

असा त्याचा विश्वास होता. परंतु फ्रान्स देशांतील कामकरी संघाला या बाबतींत निराळा अनुभव आला. सरकार प्रत्येक वेळेला भांडवलवाल्यांचा पक्ष घेई, त्यांना अनुकूल अशा रितीनें मध्यस्थी करी, व कामकरी वर्गानें ती मध्यस्थी मंजूर न केली, तर पोलिसांकडून संप मोडून काढी. यामुळें प्रचलित सरकारापासून न्याय मिळण्याविषयीं त्याची निराशा झाली होती. सार्वत्रिक मतदानाचा अधिकार मिळाल्यापासूनही विशेष कार्यभाग होईल असें फ्रेंच संघांना वाटत नसे. निवडणुकींत आपल्या पक्षाचें मताधिक्य होईल अशी खात्री नसते; याशिवाय पुष्कळ वेळां निवडणुकीचीं सूत्रें श्रीमंत भांडवलवाल्यांकडून हलविलीं जात असतात. म्हणून प्रथम मतदानाचा अधिकार मिळवावयाचा, मग आपलें मताधिक्य करावयाचें, व नंतर पार्लमेंटांतून आपल्याला अनुकूल कायदे करुन घेऊन आपली आर्थिक स्थिति सुधारुन घ्यावयाची हा द्राविडी प्राणायाम फ्रेंच संघवाद्यांना मान्य नाहीं. ते म्हणतात कीं, आम्हांला राजकीय हक्कांशीं कांहीं कर्तव्य नाहीं. वस्तुत: आम्हांला समाजांत क्रान्ति करुन प्रचलित राज्यव्यवस्था मूळापासून बदलावयाची आहे. हल्लीं ही सत्ता पार्लमेंटसारख्या लोकप्रतिनिधि-सभेकडे आहे, ती यापुढें आमच्या कामकरी-संघाच्या हातीं आली पाहिजे. ही क्रान्ति करण्याला आम्हांला काहीं काळ लागेल. त्या दरम्यान आमच्या स्थितींत जी कांहीं सुधारणा करावी लागेल ती आम्ही 'प्रत्यक्ष प्रयत्नां'नीं करुं. त्यासाठीं प्रतिनिधिसभेंत जास्त प्रतिनिधि मिळविण्याच्या किंवा सार्वत्रिक मतदानाचा अधिकार संपादन करण्याच्या भानगडींत आम्ही पडणार नाहीं. प्रत्यक्ष प्रयन हा संघवादांतला पारिभाषिक शब्द आहे. "Direct action is opposed to representative Government. The workman is to influence those in authority, not through M.P. s or delegates, but directly through the embattled strength of his associated union". 'प्रत्यक्ष प्रयत्ना'चा मार्ग प्रतिनिधिक राज्यपद्धतीच्या विरुद्ध आहे. या मार्गांत कामकऱ्यांनीं सत्ताधिकाऱ्यांवर जें वजन पाडावयाचें तें प्रतिनिधींच्या किंवा पार्लमेंटातील सभासदांच्या द्वारानें न पाडतां, आपल्या सुसंघटित संघाची शक्ति एकवटून तिच्या द्वारें प्रत्यक्ष पाडावयाचें असतें. सारांश,कामकरी संघांनीं स्वत: संप वगैरेच्या द्वारें सरकारावर दबाव टाकून इष्ट त्या सुधारणा सरकारकडून घडवून आणाव्यात अशी ही 'प्रत्यक्ष प्रयत्नाची' कार्यपद्धति आहे. याप्रमाणें ज्या सामाजिक वादास सेंट सायमनच्या वेळीं सरकारमदतीनें, प्रचलित राज्यपद्धतींत बदल न करतां, कामकऱ्यांची स्थिति सुधारण्याच्या मतापासून प्रारंभ झाला, त्याच वादाचें सरतेशेवटीं संघवादांत असें रुपांतर झालें कीं, समाजांत सरकार मुळींच न रहातां सर्व सत्ता कामकरी संघाच्या हातीं यावी, व ही क्रान्ति होईपावेतों, संघांनीं संपाच्या वगैरे मार्गांनी सरकारला भाग पाडून सुधारणा करवून घ्याव्यात अशीं मतें व कार्यपद्धति प्रचलित झाली. मुख्य साध्य एकच असूनही परिस्थितीच्या फेरफाराप्रमाणे साधनांत व उपायांत कसा बदल होत जातो याचें हें उत्तम उदाहरण आहे.

मागील भागांतील विवेचनावरुन सामाजिकवाद सरकारनें खडें सैन्य ठेवण्याविरुद्ध पुष्कळ काळापासून आहे असें दिसून आलेंच आहे. पण संघवादानें हा प्रश्न विशेष जोरानें हातीं घेतला. सन १९०६ च्या परिषदेंत कोणत्याही राष्ट्रानें सैन्यें ठेवूं नयेत, व तीं ठेवलीं जाणार नाहींत याबद्दल संघवादाच्या अनुयायांनीं प्रयत्न करावा असा ठराव प्रसार करण्यांत आला. फ्रान्स देशांत प्रत्येक पुरुषास कांहीं वर्षें लष्करी नोकरी करावी लागते. साहजिकपणें या सक्तीच्या नोकरीला बरीच मंडळी कंटाळलेली असतात. तेव्हां त्यांचीं मनें वळवून त्यांच्या मनांत सरकारविषयीं अप्रीति उत्पन्न करुन ठेवावी, म्हणजे संपाच्या वगैरे प्रसंगी सरकारी सैन्यांतील हे लोक कामकऱ्यांवर शस्त्र उचलणार नाहींत; व सरकारनें सैन्य न ठेवण्याच्या चळवळीलाही त्यांची मदत होईल. या दुहेरी हेतूनें सरकारी सैन्यांत अप्रीति उत्पन्न करणें हें संघवादाच्या कार्यक्रमांपैकीं एक कार्य असतें.

संघवादी हा स्वत:ला अराष्ट्रीय म्हणवतो. सर्वच राष्ट्रांत कामकऱ्यांना आर्थिक दृष्ट्या गुलामगिरी आलेली आहे. प्रत्येक राष्ट्रांत श्रीमंतांची सत्ता, त्यामुळें प्रत्येक राष्ट्रही श्रीमंतांचें, कामकऱ्यांना राष्ट्रच नाहीं ! त्यामुळें कोणत्याही राष्ट्रासाठीं लढण्याचें किंवा त्याची तरफदारी करुन अभिमान बाळगण्याचें कामकऱ्यांना कारण नाहीं. असा संघवादाचा कोटिक्रम आहे. १८७० च्या फ्रँको-जर्मन युद्धापूर्वी मार्क्सच्या आंतरराष्ट्रीय संघानें अशा धोरणावर ठराव पास केला होता हें वाचकांस आठवत असेलच.

इतर कोणत्याही पंथाप्रमाणें संघवादांतल्या मतांनाही निरनिराळ्या देशांत कमीजास्त तीव्रता आलेली आहे. वर जी मतें दिलीं आहेत ती मुख्यत्वें फ्रान्समध्यें प्रचलित आहेत. त्यांच्यांत एकप्रकारचा जहालपणा असून नैराश्याची व द्वेषाची छटा आहे. इंग्लंड, ऑस्ट्रेलिया या देशांत या वादांच्या मतांचें कांहींसें सौम्य स्वरुप असून सरकारविषयीं इतका तिटकारा व द्वेष त्यांत भरलेला नाही. पुढें ऑस्ट्रेलियांतील टॉमस मॅन नांवाच्या संघवादाच्या प्रमुख पुढाऱ्याच्या भाषणांतील उतारा दिला आहे. त्यावरुन या मतांचें त्या देशांतील स्वरुप व्यक्त होईल. टॉमस मॅन म्हणतो कीं, "माझी औद्योगिक व राजकीय मतें पुढीलप्रमाणे आहेत :—

१. आर्थिक सुधारणा घडवून आणण्याचें खरें सामर्थ्य कामकरी वर्गाच्या एकोप्यानेंच उत्पन्न होणार आहे. माझ्या म्हणण्याचा भाव असा आहे कीं, जरी सुधारणेबद्दलची एकादी मागणी पार्लमेंटात करण्यांत आली, तरी जर तिला कामकरी वर्गांच्या सुसंघटित व बुद्धिमान् संस्थांचे पाठबळ असेल तरच ती सफल होण्याचा संभव

असतो. फॅक्टरीसंबंधी कायदे, व इतरही असे लहान मोठे मजूरवर्गाच्या हिताचे कायदे अशाच रीतीनें आतांपावेतों मिळविण्यांत आले आहेत.

२. हल्लीं कामाचे तास कमी होतील ही मुख्य सुधारणा पाहिजे आहे. आतांपावेतोंचा औद्योगिक इतिहास पाहिला तर कामकऱ्यांतील नीतिमत्तेचें व संपन्नतेचें प्रमाण वाढविण्यास कामाचे तास कमी करणें हाच खरा उपाय असल्याचें अत्यंत स्पष्टपणें दिसून येतें.

३. याप्रमाणें सर्वदूर कडकपणानें कामाचें तास कमी केल्यानें हल्लीं बेरोजगार असलेल्यांना रोजगार मिळूं लागेल. हल्लीं क्रान्तिकारकांचा व सुधारकांचा बेरोजगारांना रोजगार मिळवून देण्याचा मुख्य उद्देश आहे. आणि त्यासाठीं सर्वांत सोपा, सहज व खात्रीचा उपाय हा आहे कीं, या बेरोजगाऱ्यांना रोजगाऱ्यांत सामील करुन घ्यावें, व असलेलें काम सर्वांना सारखें वांटून द्यावें.

४. हल्लीं रोजगारासाठीं जी चढाओढ सुरु आहे, ती यामुळें आपोआप बंद होईल, व मग कामकऱ्यांना आपला रोजमुरा वाढवून घेण्याचें सामर्थ्य येईल.

५. प्रत्येक कामकऱ्यानें कोणत्या तरी संघांत सामील झालें पाहिजे, व प्रत्येक संघानें आपल्या धंद्यांतील दुसऱ्या संघांशीं सूत्रबद्ध झालें पाहिजे.

६. समाजांत आर्थिक युद्ध चालू आहे. हें युद्ध करण्यासाठीं एकत्र व्हा; आर्थिक दास्यत्वांतून स्वत:ला मोकळें करुन घेण्यासाठीं युद्ध करा.

७. विद्यमान परिस्थितींत कोणत्याही औद्योगिक संस्थेचा सभासद होणसाठीं विशिष्ट प्रकारची राजकीय चळवळ केलीच पाहिजे असा निर्बंध घालण्यांत येऊं नये.

८. औद्योगिक संस्थांच्या द्वारें होणाऱ्या चळवळीपेक्षां पार्लमेंटांतली चळवळ ही गौण आहे. औद्योगिक संस्थांच्या चळवळीनें पार्लमेंटांतली चळवळ यशस्वी होते; परंतु पार्लमेंटांत चळवळ न केली तरी नुसत्या औद्योगिक संस्थांची एकजूट असली तर कामकऱ्यांना आर्थिक स्वातंत्र्य मिळवितां येईल, हल्लींची भांडवलशाही नाहींशी करतां येईल, व तिच्या योगानें आलेलें दु:ख व दारिद्र्य दूर करतां येईल."

ऑस्ट्रेलियांत जरी याप्रमाणें संघवादाला कांहींसें सौम्य व क्रान्तीला प्रतिकूल असें स्वरुप प्राप्त झालेलें असलें तरी खास फ्रान्सांत व अमेरिकेत त्याला दिवसेंदिवस

अधिकाधिक जहालपणा येत होता. फ्रान्सांत याला मुख्यत्वेंकरुन सॉरेल नांवाच्या पुढाऱ्याचें लेख कारणीभूत झाले. हे गृहस्थ हल्लीं पाऊणशें वर्षांचे असून, विलक्षण स्वतंत्र व निर्भीड वृत्तीचें आहेत. सन १८९९ पासून त्यानीं फ्रेंच भाषेंतील (Le Movement socialiste) 'सामाजिक वादाची चळवळ' नामक मासिकांतून लेख लिहिण्यास सुरुवात केली. त्यापूर्वी त्याचा एकच लेख 'कामकरी संघाचें सामाजिक वादाप्रमाणें भविष्यत् स्वरुप' (The socialist future of Trade union) हा प्रसिद्ध झाला होता. त्यांतही त्याचीं मतें थोडीं फार व्यक्त झालीं होतीं. कामकरी वर्गानें आपले स्वतंत्र स्वयंसत्ताक संघ निर्माण करावेत, राजकीय हक्क मिळविण्याच्या भानगडींत पडूं नये, आपल्या संघाचें कार्यक्षेत्र केवळ सहकारी वर्गाची सर्वांगीण उन्नति इतकें व्यापक करावें, अशीं हीं मतें होतीं. तींच पुढें जास्त व्यवस्थित, प्रमाणशीर, व सांगोपांग रीतीनें सॉरेलनें मांडलीं.

सॉरेलच्या वरील उपदेशाला त्या वेळचा काळ फार अनुकूल होता. त्यावेळीं फ्रान्समधील अधिकारी मंडळ अगदीं नीतिभ्रष्ट झाले होतें. मध्यंरीं कांहीं काळ सामाजिक पक्षाचें प्रधानमंडळ झालें होतें, पण त्याच्या हातूनही कामकरीवर्गाला अनुकूल अशा महत्त्वाच्या कांहींच सुधारणा झाल्या नाहींत. त्यामुळें कामकरी वर्गांत सरकारविषयीं अत्यंत तीव्र निराशा उपजली होती. अशा वेळीं स्वतःचे संघ स्थापून त्यांच्या द्वारें समाजांतील सर्व सत्ता हस्तगत करुन घेण्याचा सॉरेलचा उपदेश कामकरी वर्गाला साहजिकपणें जास्त जास्त मानवूं लागला, एथपावेतों इतर संघवाद्यांत व सॉरेलच्या उपदेशांत एकवाक्यता होती. पण वरील उद्देश साधण्याला सॉरेलनें जो उपाय सुचविला तो संघवादाच्या इतर पुढाऱ्यांना पसंत होण्यासारखा नव्हता. इतर संघवादी सार्वत्रिक संपाचा उपदेश करीत, पण तो संप कांही विशिष्ट सुधारणा घडवून आणण्यासाठींच करावा असें त्यांचें मत असे. उदाहरणार्थ, कामाचे तास कमी-आठाचे सात- करुन घेण्यासाठीं, किंवा रोजमुरा वाढवून घेण्यासाठीं, सार्वत्रिक संप करावा, पण ती मागणी पुरी होतांच संप बंद केला पाहिजे असें त्याचें म्हणणें असे. पण सॉरेलनें सार्वत्रिक संपाचा उपदेश केला, तो कांही ही किंवा ती विशिष्ट मागणी पुरी करुन घेण्यासाठीं नसून, समाजांत सर्वांगीण क्रान्ति घडवून आणण्यासाठीं, हल्लींची समाजव्यवस्था समूळ नाहींशी करण्सासाठी केला आहे. सॉरेल हा स्वतःला मार्क्सचा अनुयायी म्हणवतो, पण एका बाबतींत मार्क्सची विचारसरणी चुकली आहे असें त्यांचें म्हणणें आहे; मार्क्सच्या मतें समाजांत औद्योगिक उत्क्रान्ति आपोआप घडून येत आहे; व कामकरी वर्गाचें काम फक्त तिची दिशा समजून घेऊन तिला मदत करण्याचें आहे. छोट्या कारखान्याचे मोठे कारखाने होत आहेत; मोठ्या कारखान्याचे त्याहून मोठे जगड्व्याळ कारखानें बनताहेत; हा क्रमच असा आहे कीं, कारखान्यावरील सत्ता व मालकी एका किंवा थोड्या व्यक्तींची न राहतां सर्व समाजाची व्हावी. कामकरीवर्गाचें कर्तव्य एवढेंच आहे कीं, त्यांनीं स्वतःचें

संघ स्थापून परस्परांत ऐक्य व सहानुभूति उत्पन्न करावी, व भावी स्थितींत आपणांवर येणारी जबाबदारी पार पाडण्यास शिक्षणानें स्वतः पात्रता आणावी. सॉरेल म्हणतो कीं, मार्क्सचा हा आशावादीपणा भ्रममूलक आहे. समाजांत कामकऱ्यांवर अनुकूल अशी उत्क्रान्ति किंवा परिवर्तन आपोआप घडून येणार नाहीं. त्यासाठीं कामकऱ्यांनी अत्यंत कष्ट सोसून समाजक्रान्तिच केली पाहिजे. मार्क्सच्या वेळीं ही उत्क्रान्ति होत जाण्याला एक गोष्ट अनुकूल होती, तीही आतां नाहींशी झाली आहे. त्यावेळीं कामकरी व मालक दोघांतही बाणेदारपणा होता. त्यामुळें दोघांत भांडण झाल्यास कांहीं तरी कायमचा सोक्षमोक्ष होत असे. पण हल्लीं भांडण सुरु होतांच तडजोडीला प्रारंभ होतो, कांहीं थोडीशी क्षुल्लक सुधारणा मालक कामकऱ्यांच्या तोंडावर टाकतात, ते संतुष्ट होतात, भांडण मिटतें, व शेवट परिणाम असा होतो कीं, कामकऱ्यांत सुस्त समाधानवृत्ति येऊन ध्येय साधण्यासाठी अव्याहत प्रयन्त होईनासे होतात. म्हणून सॉरेल म्हणतो कीं, आपली स्थिति आपोआप सुधारत जाईल, असला निराधार आशावादीपणा खोटा व घातुक आहे. तो सोडून देऊन ध्येयस्थिति मिळविण्यासाठीं कामकऱ्यांनी सार्वत्रिक संप केला पाहिजे, व समाजांतली विद्यमान व्यवस्था पार नाहींशी होईपावेतों तो कायम ठेवला पाहिजे.

याप्रमाणें सॉरेल व इतर संघवादी यांच्या ध्येयांत व उपकरणांत भेद नाहीं. दोघांनाही संघाच्या द्वारेंच प्रयत्न करुन अखेर समाजांत संघसत्ता स्थापन करावयाची आहे. पण इतर संघवादी सॉरेलइतकें एकदम पुढें जाण्यास तयार नाहींत. एका धंद्याचे किंवा ठिकाणचे संप, सार्वत्रिक संप, विघ्नकृत्य, इत्यादि उपायांनी एक एक इष्ट सुधारणा संघानें समाजांत घडवून आणावी असें त्यांचें मत आहे. सॉरेलला हें पसंत नाहीं. तो म्हणतो कीं, एकदांच पहिला व अखेरचा सार्वत्रिक संप करावा, आणि प्रचलित समाजव्यवस्थेचा उच्छेद होईपावेतों तो मोडूं नयें.

परंतु प्रचलित व्यवस्था मोडून सर्वत्र अनवस्था झाली, नंतर काय ? मागलें मोडलें म्हणजे नवें होईल तें सर्व चांगलें व सुखाचेंच होईल अशी खात्री काय ? या प्रश्नांचें उत्तर देतांना सॉरेलनें प्रसिद्ध तत्त्ववेत्ता बर्गसन याच्या विचारसरणीचा व सिद्धांताचा अवलंब केला आहे. सॉरेल म्हणतो कीं, क्रान्तीनंतर समाजाला कोणतें स्वरुप प्राप्त होईल याची कल्पना हल्लींच करुन देणें आवश्यक नाहीं, व शक्य नाहीं. सगळें ज्ञान बुद्धीच्या द्वारेंच होतें असें नाही. बुद्धि सांत व मर्यादित आहे, व तिनें होणारें ज्ञानही तशाच स्वरुपाचें, अर्थात् मर्यादित व एकांगी असतें. या बुद्धीपेक्षां स्फूर्ति, अंतर्बोधक शक्ति, (Intution) जास्त श्रेष्ठ आहे; व त्या शक्तीपासून होणाऱ्या ज्ञानाची जेव्हां बुद्धिजात ज्ञानांत भर पडते तेव्हांच ज्ञान पूर्ण व सर्वांगीण होतें. म्हणून नुस्त्या बुद्धीच्या सहायानें क्रान्त्युत्तर समाजस्थितीची कल्पना आपणांस करतां येणें शक्य

नाहीं. म्हणून त्या प्रयत्नाला लागणेंच योग्य नाहीं. हल्लीं समाजिक वादांतील ध्येयांना सार्वत्रिक संपाइतका खात्रीचा दुसरा साधक उपाय नाहीं इतकी आपण आपली खात्री करुन घेतली म्हणजे पुरे आहे. साध्या संपाच्या योगानेंही कामकरीवर्गांत आपल्या ध्येयाविषयीं जागृति, तत्प्रीत्यर्थ वाटेल ते कष्ट सोसण्याची तयारी, बंधुभाव, इत्यादि उच्च मनोविकार उत्पन्न होतात, व उच्च भावनेनें प्रेरित होऊन कार्य करण्याची प्रवृत्ति बळावत जाते. प्रत्येक संपाच्या मागें अशी एकादी उच्च मनोवृत्ति व उदात्त कल्पना असतें. परंतु सार्वत्रिक संपांत या सर्व उदात्त कल्पना व मनोवृत्ति एकत्रित झालेल्या असतात. यावरुनच सार्वत्रिक संपाची कल्पना अंत:करणास पटणारी आहे.

वरील विचारसरणींत दिसून येणारा बुद्धीविषयींचा अनादर हा सॉरेल व इतर संघवादी यांच्यांतील दुसरा मतभेद आहे. सॉरेल, व त्याच्याच वर्गांतले बर्थ, लॅगरडेला, हे बुद्धीला गौणत्व देऊन अंत:स्फूर्तीला प्राधान्य देतात. प्रत्येक गोष्ट बुद्धीला व तर्कशक्तीला पटली तरच योग्य असें त्यांचें मत नाहीं. अंतस्फूर्ति हें योग्यायोग्य ठरविण्याचें खरें साधन आहे. या स्फूर्तीनें सर्व गोष्टींतलें, बुद्धीला अगम्य असणारें रहस्य कळतें. म्हणून सॉरेल व त्याचे अनुयाची धर्माविषयीं फार आदरयुक्त उद्गार काढतात. कारण धर्माचा विषयही बुद्धीच्या पलीकडचा असून, त्याचीही भिस्त अंत:स्फूर्तीवरच व श्रद्धेवरच जास्त असते.

सॉरेलचा व इतर संघवाद्यांचा तिसरा मतभेद विघ्नकृत्याबद्दल आहे. सॉरेल हा विघ्नकृत्याच्या उपायाच्या अत्यंत विरुद्ध आहे. तो म्हणतो कीं, कामकऱ्यांनीं आपलें काम रेंगाळत रेंगाळत करुन नासून टाकावें किंवा लबाडी करुन यंत्रांची व हत्यारांची नासाडी करावी, या योगानें त्यांची नीतिमत्ता खराब होते व अंगीं वाईट संवय जडते. भावी कालांत जेव्हां कामकरी-संघच समाजांत सत्ताधारी होतील, व कामकऱ्यांना स्वत:च्या जबाबदारीवर कारखानें चालवावे लागतील, जेव्हां या वाईट संवयी व हिणकस नीतिमत्ता फार अपायकारक होईल. यासाठीं हा उपायच प्रचारांत आणूं नयें असें सॉरेलचें म्हणणें आहे.

याप्रमाणें संघवादाचीं सामान्य तत्त्वें आहेत. त्याची मूळ उभारणी मार्क्सच्या वर्गकलहाच्या तत्त्वावरच आहे. समाजांत भांडवलवाले व कामकरी हे दोनच वर्ग राहणार असून, त्यांचा आपसांतील विरोध केव्हांही मिटण्यासारखा नाहीं. म्हणून भांडवलवाल्यांचा उच्छेद करुन हल्लींची भांडवलशाही नष्ट केली पाहिजे असें या पंथाचेंही मत आहे. पण मार्क्सची राजकीय चळवळीची पद्धत या पंथाच्या अनुयायांना बिलकुल मान्य नाहीं. प्रातिनिधिक पद्धतीचा त्यांना फार कटु अनुभव आलेला आहे. त्यांचे

स्वत:चेच प्रतिनिधि जेव्हां प्रधानमंडळांत प्रविष्ट होऊन अधिकारारुढ होत, तेव्हां त्यांचा दृष्टिकोन एकदम उलटा होई, व कामकऱ्यांचे संप मोडण्यासाठी तेच शिपाई धाडूं लागत. फ्रान्समध्यें सन १८९९ मध्यें सामाजिकवादी पक्षाचा पुढारी मिलेरँड हा प्रधानमंडळांत सामील झाला. लागलींच त्याची मति फिरली, व त्याने पूर्वीचीं मतें सोडून दिलीं. अधिकाराचा मद असा आहे कीं, त्यानें सत्याचा व प्रामाणिकपणाचा विसरच पडतो. म्हणून संघवादक पार्लमेंटात प्रतिनिधि धाडून त्यांच्या द्वारें चळवळ करण्याच्या विरुद्ध आहेत. संघवादाचा विशेष हा आहे कीं त्यांत व्यक्तीचा कामकरी–मालाचा उत्पादक–या नात्यानेंच विचार केलेला आहे. व्यक्तीच्या मालाचा उपभोगक या नात्याकडे त्यानें लक्ष नाहीं. त्याचप्रमाणें कामकऱ्यांची विद्यमान गुलामगिरी नाहींशी करण्यावर या पंथानुयायांचा कटाक्ष असून, त्यांची आर्थिक स्थिति सुधारणें हा गौण मुद्दा आहे. सार्वत्रिक संप, विघ्नकृत्य, वहिष्कार, ही त्यांचीं मुख्य साधनें आहेत. भांडवलशाही नाहींशी होईपर्यंत सारखें झगडण्याचा त्यांचा कृतनिश्चय आहे. त्यांना स्वदेश असा कोणताच नाहीं. सरकारनें खडें सैन्य ठेवूं नये असें त्यांचें मत असून, असलेल्या सैन्याला फितवून तें प्रसंगीं सरकारला निरुपयोगी होईल असें करण्याचे त्यांचे प्रयत्न आहेत. थोडक्यांत ते राजकारण-निषेधक, अराष्ट्रीय, असैन्यक, 'प्रत्यक्ष कार्य' वादी आहेत.

अराजकांत व संघवादकांत दोन बाबतींत मुख्य भेद आहेत. अराजकांचा सर्व प्रकारची शासनसत्ता नाहींशी करण्याचाच मुख्य उद्देश आहे. संघवादी विद्यमान सरकार नाहींसे करावें एवढेंच विघातक ध्येय पुढें ठेवतात. हें सरकार नाहींसे झाल्यावर भावी समाजस्थिति कशी राहील, त्यांत शासन कोण कसें करील, याविषयीं तें उदासीन आहेत. त्यांच्या मतें या गोष्टीचा हल्लीं विचार करणें निरर्थक आहे. दुसरा मतभेद हा कीं, संघवादी हे सार्वत्रिक संपाच्या द्वारें इष्टसिद्धि करुं चाहतात. सशस्त्र दंगा करुन जबरदस्तीनें सत्ता हातीं घेण्याचा त्यांचा उद्देश नाहीं. पण अराजकांना हाच मार्ग पसंत आहे. त्यांना सार्वत्रिक संपाचा मार्ग दुबळा व दिरंगाईचा वाटतो. तथापि विद्यमान सरकाराचें उच्चाटन हें दोघांचें सामान्य ध्येय असल्यानें अराजकांना संघवादकांविषयीं साहजिकपणें जास्त सहानुभूति वाटतें. सन १९०७ त ॲमस्टरडॅमला झालेल्या अराजक-काँग्रेसच्या ठरावांतून ही सहानुभूति स्पष्ट व्यक्त करण्यांत आली आहे. 'सर्व देशांतील बंधूंनी कामकरी वर्गाच्या स्वयंप्रेरित चळवळींत सामील व्हावें, आणि संघवादी संस्थांतून, अराजक पंथाचीं मूलभूत तत्त्वें जी-बंड, वैयक्तिक प्रेरणा व ऐक्य, यांचा प्रसार करावा, अशी या ठरावांत सूचना केली आहे. दुसऱ्या एका ठरावांत असें मत प्रदर्शित केलें आहे कीं, "समाजांतील वर्तमान भांडवलशाहीचा व शासनसत्तेचा नाश सशस्त्र दंगे करुन बलात्कारानें मालमत्तेचें हरण केल्याशिवाय केव्हांही नाही, असें अराजकांचे मत आहे. सार्वत्रिक संप व संघवादाचें इतर उपाय यांनी सरकारच्या लष्करी सत्तेशी झगडण्याच्या वरील सरळ मार्गाचा विसर पडतां कामा नयें."

संघवादाचा अमेरिकेंत पुष्कळ प्रसार झालेला आहे. तेथील उद्योगधंद्यांची विशिष्ट परिस्थिति याला कारणीभूत झालेली आहे. इतर सर्व देशांपेक्षां कारखान्यांचा जगड्व्याळपणा अमेरिकेंत जास्त दृष्टोत्पत्तीस येतो. तेथील ट्रस्टसारख्या अफाट भांडवलांच्या संस्था दुसऱ्या कोठेंही नाहींत. प्रचलित उद्योगपद्धतीच्या वाढीबरोबर भांडवल हें दिवसेंदिवस अफाट होत जाऊन कमी कमी व्यक्तींच्या हातांत सांठविलें जात जाईल हें मार्क्सचें भविष्य अमेरिकेंतच खरें झाल्याचें निदर्शनास येतें. त्यामुळे तेथें भांडवलशाहीची सत्ता फार प्रबल आहे. अर्थातच त्या मानानें कामकरी वर्गाला आपली इष्टसिद्धि करण्याला जास्त अडचण झालेलो आहे. यामुळें कामकरी वर्गांतील असंतोष, इतर वर्गांविषयींचा द्वेष, संताप जास्त तीव्र स्वरुपानें नांदत आहे. दुसरी गोष्ट ही कीं, अमेरिकेंतील मजूरांतच दोन वर्ग झालेले आहेत. एक जुना, पुष्कळ दिवस अमेरिकेंतच राहत असलेल्या, तेथेंच जन्मलेल्या, कुशल कारागिरांचा. हा स्वतःला वरच्या प्रतीचा समजतो, व इतरांहून फटकून वागतो. दुसरा वर्ग, दरवर्षी बाहेरुन येणाऱ्या हजारों गैरवाकबगार, गरीब मजूरांचा. पहिल्या वर्गाला मजुरी जास्त मिळते, आणि संपांत तो बहुधा कारखानदारांच्या पक्षाला चिकटून असतो. या सर्व कारणांमुळें अमेरिकन सीनेटमध्यें आपलें मताधिक्य करुन इष्ट सुधारणा घडवून आणणें या दुसऱ्या वर्गांतील कामकऱ्यांना जवळ जवळ अशक्यसें झालें आहे. त्यांच्यांतल्या पुष्कळशांना तर मतदानाचाही अधिकार नाहीं. तेव्हां संघवादाचा स्वावलंबनाचा मार्ग त्यांना रुचणें साहजिकच होतें. त्यांनीं सन १९०५ मध्यें आपली एक संस्था स्थापून तिला Industrial workers of the world ( I.W.W.) 'जगांतील औद्योगिक कामकरी' असें नांव दिलें. समाजाची अंतिम आदर्शस्थिति कशी असावी याविषचीं या संस्थेतील निरनिराळ्या सभासदांची निरनिराळीं मतें आहेत. कित्येक मार्क्सचें अनुयायी आहेत, तर कित्येक अराजक, व दुसरे कित्येक संघवादी आहेत. परंतु सद्यःकार्याविषयीं त्यांचें पूर्ण ऐकमत्य आहे. वर्तमान समाजस्थितींत कामकरी व भांडवलवाले यांचा शाश्वतिक विरोध आहे. वर्गकलहाचें हें बीज नाहींसें करुन कामकरी वर्गाचें दास्यमोचन करण्यासाठी कामकरीवर्गानें आपल्या संघाच्या द्वारें औद्योगिक प्रयत्न केले पाहिजेत, विशेषतः सार्वत्रिक संपाचा अवलंब केला पाहिजे. हें मत सर्वांना पूर्णपणें मान्य आहे. औद्योगिक कामकरी कारखानदारांबरोबर एकाच शर्तीवर बोलणें करावयास तयार होतील, शर्त ही कीं कारखान्यावरील सर्व सत्ता त्यांनीं कामकरी संस्थांच्या स्वाधीन करावी; असें या संस्थेच्या सेक्रेटरीनें जाहीर केलें आहे. या संस्थेच्या परिषदेनें आपले उद्देश पुढीलप्रमाणें व्यक्त केले आहेत. " कामकरीवर्ग आणि कारखानदार-वर्ग यांना कोणतीच गोष्ट सामान्य नाहीं. जोंपर्यंत कामकरीवर्गाचें लाखों लोक भुकेनें आणि सर्व प्रकारच्या दैन्यानें गांजलेले आहेत आणि कारखानदारांचा मूठभर लोकांचा वर्ग समाजांतल्या सर्व चांगल्या वस्तु बळकावून बसला आहे, तोंपावेतों शांतता होणें शक्य नाहीं. या दोन वर्गांत झगडा हा सुरु

राहणारच. जोंपावेतों जगांतील कामकरी लोक स्वत:ची संघटना करुन देशांतील जमीन व उत्पादक-यंत्रसामग्री आपल्या ताब्यांत घेत नाहींत, आणि रोजमुऱ्याची पद्धत नाहींशी करीत नाहीत."

या संस्थेनें अमेरिकेंत अनेक संप घडवून आणलें आहेत. या संपांच्या प्रसंगीं वर्गकलहाचें खरें स्वरुप दृग्गोचर होतें. जगांतल्या कोणत्याच भागांत तें इतकें तीव्र झालेलें नाहीं. कारखानदार व मजर दोन्ही पक्ष तेव्हांच हातघाईला येतात. कित्येक कारखानदारांनीं तर यासाठींच फौजेसारख्या पलटणीच नोकरीला ठेवल्या आहेत. व प्रसंगीं संस्थानांतील मिलिशिया सुद्धां त्यांना मदतीला बोलावतां येतो. संघवादाचें जें म्हणणें आहे कीं, हल्लीचें सरकार म्हणजें कारखानदारांचें पाठीराखें, किंबहुना त्यांच्या हातांतलें बाहुलें आहे, त्याचा प्रत्यय या संपांत येतो. या गोष्टीचा बभ्रा इतका झाला कीं, अमेरिकन सरकारनें सरतेशेवटीं एक कमिशन नेमलें. कारखानदार व कामकरी यांच्यांतील परस्परसंबंधाची चौकशी करण्याचें काम त्याच्याकडे दिलेलें होतें. त्यानें केलेल्या रिपोर्टांत असें नमूद केलें आहे कीं, कारखानदारांच्या व कामकऱ्यांच्या या भांडणांत जे हे अतिप्रसंग घडतात व दंगे होतात त्याचें खरें कारण हें आहे कीं, त्यावेळीं सरकारी संस्था आपल्या कर्तव्यापासून च्युत होतात, व मनुष्यांच्या नैसर्गिक हक्कांचें अतिक्रमण होतें. त्यावेळीं न्यायाधीश लष्करी अधिकाऱ्यांच्या तंत्रानें वागूं लागतात, गवर्नर करील ती पूर्वदिशा होऊन, प्रत्येकाचें जीवित व मालमत्ता त्याच्या मर्जीवर अवलंबून राहते, स्टेटचे शिपाई संप मोडण्यासाठीं उपयोगांत आणलें जातात. १९१४ मध्यें कोलरेडो संस्थानांतील लडलो गांवीं तर खाणींतील संपवाल्यांची व मिलिशियाची चांगली लढाई झाली. या वर्णनावरुन हे संप, व त्या प्रसंगीं होणाऱ्या एकंदर प्रकारांनी कामकरीवर्गांचा कसा विलक्षण क्षोभ व संताप होत असेल याची कल्पना होईल. अर्थातच भांडवलशाहीचा पूर्ण नाश केल्याशिवाय संपशस्त्राचा न्यास करावयाचा नाहीं, ही दृढ प्रतिज्ञा या अमेरिकन कामकरीसंस्थेनें केली असल्यास नवल कोणतें ?

परंतु अमेरिकेंतील हें तीव्र स्वरुप येण्यास तेथील जुन्या स्थायिक व परदेशी मजूरांच्या आपसांतील चुरसीनें व परस्परद्वेषानें पुष्कळ सहाय झालें आहे. युरोपियन देशांत हा नव्या-जुन्या मजूरांचा प्रश्न नाही. इंग्लंडची तर प्रत्येक गोष्टीत तडजोड करण्याविषयीं प्रसिद्धि आहे. त्याप्रमाणें तेथें संघवाद व मार्क्सचा सामाजिकवाद यांची तडजोड करुन एक नवा मध्यवर्ती पंथ 'Guild socialism' म्हणून काढला आहे. वस्तुत: Guild या शब्दाचा अर्थ संघ असून, फ्रेंच भाषेंतील Syndic o bafXy'A Hk"sarhy Trade Union या शब्दांच्या अर्थांत व त्याच्यांत भेद नाहीं. या पंथाचें असें मत आहे कीं, प्रत्येक धंद्यातील फॅक्टरीला आपले मॅनेजर निवडून त्यांच्या द्वारें माल तयार करण्याची जी पद्धत ठीक वाटेल ती अंमलांत आणण्याची मोकळीक रहावी.

एकएका धंद्यांतील सर्व फॅक्टरींचा एक राष्ट्रीय 'गिल्ड' – समिति–कायम करण्यांत यावा. या गिल्डनें त्या धंद्यासंबंधी ज्या सामान्य हिताच्या गोष्टी असतील, उदाहरणार्थ मालाच्या विक्रीची, व्यवस्था पाहावी. देशांतील सर्व निरनिराळ्या धंद्यांच्या गिल्डांची मिळून गिल्डकाँग्रेस स्थापन केली जावी. या काँग्रेसकडे देशांतील एकंदर उद्योगधंद्यांसंबंधी व्यवस्था राहावी. समाजांतील व्यक्तीचा उत्पादक या नात्यानें परस्परांशी येणारा संबंध या काँग्रेसच्या अंमलांत राहील. एकंदर उत्पादन-कार्याची देखरेख व तत्संबंधांत कराव्या लागणाऱ्या गोष्टी या काँग्रसनें कराव्या. देशाच्या संरक्षणासाठीं व एकंदर व्यवस्थेसाठीं कांहीं खर्च लागेल त्याच्यासाठीं प्रत्येक धंद्याच्या गिल्डकडून एक ठराविक कर घेतला जात जावा. कारखान्यांचा खर्चवेंच व हा कर दिल्यानंतर जें उरेल तें गिल्डनें आपल्या सभासदांत, म्हणजे त्या धंद्यांतील सर्व कामकऱ्यांत, योग्य वाटेल त्या रीतीनें वांटून द्यावें ही रीत ठरविण्याची प्रत्येक गिल्डला स्वतंत्रता असावी; वांटणी सर्वांना सारखीच असली पाहिजे असा निर्बंध नसावा. ही उत्पादन-कार्याची व्यवस्था झाली.

समाजांतील व्यक्तींच्या उपभोगक या नात्यानें येणाऱ्या संबंधाची व्यवस्था पाहाणारें एक निराळें पार्लमेंट असावें. त्याकडे औद्योगिकशिवाय इतर व्यवहारांची व्यवस्था राहावी.

याप्रमाणें समाजांत दोन प्रधान संस्था राहाव्यात; एक गिल्ड काँग्रेस व दुसरी पार्लमेंट. पहिली समाजांतील उत्पादक व्यक्तींच्या प्रतिनिधींची व दुसरी उपभोगक व्यक्तींच्या प्रतिनिधींची. या दोहींच्या वर एक संयुक्त कमिटी असावी, व तिनें उपभोगक व उत्पादक यांच्या सामान्य हिताच्या गोष्टींची देखरेख व व्यवस्था करावी. ही कमिटी समाजांतील सर्वांत श्रेष्ठ सत्तास्थान, सर्वांचें वरिष्ठ अपिलेंट कोर्ट राहावें. गिल्ड काँग्रेस व पार्लमेंट यांच्यांतील वादाच्या प्रश्नाचा निकाल या कमिटीनें लावावा. तिनें प्रत्येक गिल्डकडून येणारी कराची रक्कम ठरवावी, निरनिराळ्या वस्तुंच्या किंमती ठरवाव्यात, आणि समयानुरुप त्यांच्यांत बदल करीत जावा. समाजांतील एकंदर कारखाने निरनिराळ्या गिल्डकडे समाजाचें ट्रस्टी या नात्यानें चालविण्यासाठी सोंपवलेले असतील. परंतु जर एकाद्या गिल्डनें स्वतःला जास्त फायदा होण्यासाठीं त्यांची व्यवस्था एकंदर समाजाला अपायकारक रीतीनें ठेवली, तर ट्रस्टीच्या कर्तव्यापासून तो गिल्ड च्युत झालासें समजून, संयुक्त कमिटीनें त्याचें योग्य निवारण केलें पाहिजे. गिल्ड-सामाजिक-वादकांना संघवादाचें हें तत्त्व मान्य आहे कीं, सरकारच्या हातीं कारखान्याची व्यवस्था दिल्यानें कामकऱ्यांना हल्लीपेक्षां जास्त स्वतंत्रता मिळणार नाहीं. " कारखानदार या नात्यानें जेव्हां जेव्हां हल्लीं सरकारला किंवा म्युनिसिपालिटीला वागावें लागतें, तेव्हां त्यांच्यांत व इतर खासगी भांडवलवाल्यांत कोणताही विशेष फरक दिसून येत नाहीं." म्हणून कारखान्यांची व्यवस्था त्या त्या कारखान्यांतील कामकऱ्यांकडे, व त्यांनींच निवडलेल्या

गिल्डकडे व गिल्डकाँग्रेसकडे राहिली पाहिजे. एरवीं स्थानिक व औद्योगिक स्वतंत्रता राहत नाहीं. पण समाजांत ज्याप्रमाणें माल उत्पन्न करणारे कामकरी आहेत, त्याप्रमाणें त्या मालाचा उपभोग घेणारे इतर लोक आहेत. गिल्ड-सामाजिकवादी म्हणतात कीं, "प्रश्न या दोन्ही नात्यांचा, दोन वेगवेगळ्या दृष्टिकोनांचा मेळ कसा घालावा हा आहे. राष्ट्रीय गिल्डच्या समर्थकांचा हा मेळ घालण्याचा प्रयत्न आहे. संघवादकांची दृष्टि उत्पादकांच्या औद्योगिक संस्थांवरच खिळली असून केवळ त्यांच्याच हिताची ते मागणी करतात; इतर सामाजिकवादी उपभोगकांच्या राजकीय किंवा देशांतील निरनिराळ्या विभागानुसार स्थापलेल्या संस्थांच्याच हिताकडे पाहतात. दोघांनाही एकच आक्षेप लागू पडतो; दोन दृष्टिकोनांचा मेळ घालावयाचा असेल तर त्यांच्यापैकी एक नाहींच असें मानून तो घातला जाणार नाहीं." हा मेळ घालण्यासाठीं उपभोगकांचें पार्लमेंट व उत्पादकांची काँग्रेस, व त्या दोघांवर एक संयुक्त कमिटी या मतप्रवर्तकांनीं सुचविली आहे.

असो तर याप्रमाणें संघवाद, अमेरिकेंतील त्याचीच शाखा 'जगांतील औद्योगिक कामकरी' संस्था, व त्याचें इंग्लिश तडजोड केलेलें स्वरुप ग्रिल्ड-सामाजिक वाद, यांचीं मतें आहेत. या वादानें केलेल्या कार्याचें प्रसिद्ध इंग्लिश 'रागद्वेषविवर्जित' तन्त्वज्ञ बर्ट्रंड रसेलनें पुढीलप्रमाणें वर्णन केलें आहे.

'They (syndicalists) have revived the quest for liberty, which was growing some what dimmed under the regime of parliamentary socialism, and they have reminded men that what our modern society needs is not a little tinkering here and there, nor the kind of minor adjustments to which existing holders of power may readily consent, but a fundamental reconstruction, a sweeping away of all the sources of oppression, a liberation of men's constructive energies, and a wholly new way of conceiving and regulating production and economic relations. This merit is so great that, in view of it, all minor defects become insignificant, and this merit syndicalism will continue to possess even if, as a definite movement, it should be found to have passed away with the war! (Roads to freedom PP. 95)

'पार्लमेंटद्वारा चळवळीच्या पुरस्कर्त्या (मार्क्सच्या) सामाजिक वादाच्या वर्चस्वाखालीं स्वतंत्रतेचे प्रयत्न जे शिथिल होऊं लागले होते, त्यांच्यांत त्यांनीं (संघवादकांनीं) नवीन जीवनाचा संचार करुन दिला. त्यांनीं जनतेची स्मृति जागृत करुन दिली कीं, हल्लीं समाजाला आवश्यक असलेली सुधारणा इकडे तिकडे दोन-चार ठिगळें

लावून, किंवा सत्ताधीशांनीं खुशीनें कबूल केलेल्या किरकोळ बदलांनीं घडून येणारी नाहीं. तिच्यासाठीं समाजाची मूळापासून पुनर्रचनाच झाली पाहिजे, हल्लींचीं जुलुमाची सर्व साधनें नष्ट झालीं पाहिजेत, मनुष्यांच्या विधायक शक्ति स्वतंत्र झाल्या पाहिजेत, आणि उत्पादनकार्य व व्यक्तींचा आर्थिक परस्परसंबंध यांचें अगदीं नवीन दृष्टीनें पर्यालोचन व व्यवस्था झाली पाहिजे. संघवादाचें हें कार्य इतकें मोठें आहे कीं त्या दृष्टीनें त्यांतील किरकोळ दोष व व्यंगें क्षुल्लक दिसूं लागतात, आणि वर्तमान युद्धकालानंतर संघवादाला जरी कदाचित् विशिष्ट स्वतंत्र चळवळीचें स्वरुप राहिलें नाहीं, तरी त्यांतील वरील कार्य-प्रेरक गुण कायम राहील.' (स्वतंत्रेचे मार्ग, पृष्ठ ९५ ).

---

## प्रकरण आठवे

# बोल्शेव्हिक पंथ

बोल्शेव्हिझम हा शब्द ज्यानें ऐकिला नाहीं, असा सुशिक्षित मनुष्य हल्लींच्या काळात सांपडणें विरळा. कोणत्याही इंग्लिश वर्तमानपत्राचा वाटेल तो अं घ्या, त्यांत मोठामोठ्या ठळक अक्षरांचा या शब्दाचा मथळा हटकून सांपडायचाच. या शब्दाचा प्रयोग मात्र त्या पत्रांतून शास्त्रशुद्ध किंवा कांहीं विवक्षित मतांचा निदर्शक म्हणून केलेला असतो असें नाहीं. सामान्यत: कोणत्याही प्रकारचा जुलम, लुटालूट, अत्याचार यांना बोल्शेव्हिझम हें नाव हल्लीं देण्यांत येतें. वर्तमानकाळीं इंग्रजी भाषेंत बोल्शेव्हिझम हा शब्द सर्व प्रकारचा राजद्रोह, देशद्रोह, दंगेखोरपणा व अराजकता यांचा समानार्थक झाला आहे. इंग्रजी पत्रांतली वर्णनें व एकंदर लिहण्याचा झोंक पाहिला म्हणजे बोल्शेव्हिक मतें स्पर्शजन्य किंवा श्रवणजन्य आहेत असें या लेखकांना वाटत असतें. त्यांना सदा अशी भीति वाटत असलेली दिसते कीं, या मतांत काय जादू असेल ती असो, ती एकदां ऐकली कीं, ऐकणारा लागलीच त्या मतांचा बनतो. म्हणून ती मतें खरोखरी काय आहेत हें शक्य तोंवर वाचकांच्या कानीं न पडेल अशाबद्दल हीं पत्रें खबरदारी घेत असतात. परंतु जर खरोखरच हीं मतें इतकीं दुष्ट, अनीतिमूलक, व अत्याचार-प्रवर्तक असती, तर त्यांच्या प्रसाराविषयी भीति बाळगण्याचे कारण नव्हतें. यावरुन एकतर ही भीति तरी निष्कारण असली पाहिजे, किंवा त्या मतांचें स्वरुप तरी हल्लीं वर्णन करण्यात येतें त्याहून निराळें असलें पाहिजे. कसेंही असलें तरी एक गोष्ट निर्विवाद आहे. ती ही कीं, नोव्हेंबर १९१७ पासून जानेवारी १९२१ पर्यंत तीन वर्षे बोल्शेव्हिक पंथ रशियांत अधिकारारुढ आहे. देशांत पराकाष्ठेची धुमाळी, अव्यवस्था, माजलेली

असतां, शत्रूचे सैन्य छातीवर उभें राहिलेलें असतां, दुष्काळ, फाटाफूट, बेलगामीपणा पसरलेला असतां, लोक निस्त्राण झालेले, कारखाने उध्वस्त झालेले, सैन्य खच्ची होऊन गेलेलें असतां, या मतांच्या पुढाऱ्यांच्या हातीं राज्यसूत्रें आलीं, किंवा तीं त्यांनीं आपल्या हातांत घेतलीं ; आणि अवघ्या तीन वर्षांच्या अवधींत इतक्याही विपत्तींना तोंड देऊन, त्यांनी यूडेनिच, डेनिकिन, रँगलसारख्या हां हां म्हणणाऱ्या समशेरबहाद्दर अंतःशत्रूंचा फन्ना उडविला व दोस्तराष्ट्रांसारख्या बलाढ्य बहिःशत्रूंना नामोहरम केलें. इतकेंच नव्हे, देशांतील जनतेंत नवीन जीवनाचा संचार केला, अव्यवस्थेंतून व्यवस्था निर्माण केली, सर्वत्र शांतता स्थापन केली, कारखाने सुरु केले, राज्यकारभाराला इष्ट स्वरुप दिलें, व आपल्या तात्त्विक मतांना दृश्यरुप देण्यास प्रारंभ केला. रशियांत इतर गोष्टी कशाही असोत, तेथे हल्लीं शांतता व सुव्यवस्था नांदत आहे व राज्ययंत्र नवीन उत्साहानें, चोखपणानें काम करीत आहे, हें शत्रूंनाही नाखुषीनें कबूल करावें लागतें. हें कार्य सामान्य नाहीं. यावरुन हें स्पष्ट आहे कीं, बोल्शेव्हिक सरकाराला रशियन जनतेचा चांगला पाठिंबा मिळालेला असला पाहिजे; अर्थातच त्यांच्या मतांचा जनतेंत बराच प्रसार झालेला असला पाहिजे. दुसरी गोष्ट ही कीं, या मतांत आपल्या अनुयायांत उत्साह व कर्तृत्वशक्ति निर्माण करण्याचें विलक्षण सामर्थ्य असलें पाहिजे. अशा स्थितींत हीं मतें सर्वस्वी दुष्ट, दुराचारी किंवा त्याज्य असणें संभवनीय नाहीं. कोणत्याही मतांचा मोठ्या प्रमाणावर प्रसार होण्यास किंवा त्यांच्यांत अद्भुत प्रेरणाशक्ति येण्यास, त्यांच्यांत चांगुलपणाचा, चिरकालीन सत्याचा, परिस्थितीशीं अनुरुपत्वाचा, बराच मोठा अंश असावा लागतो. व हा अंश समजण्यास त्या मतांच्या अनुयायांच्या व प्रवर्तकांच्या दृष्टिनें त्याच्याकडे पाहणें आवश्यक असतें. नुस्त्या द्वेषानें किंवा हेटाळणीनें तो समजत नाहीं. त्यासाठीं तटस्थपणा, किंबहुना सत्याच्या जिज्ञासेनें येणारी अनुकूल मनोवृत्ति लागते. त्याच वृत्तीनें व तटस्थपणानें पुढें या मतांचें विवेचन करण्याचें योजिलें आहे. तें करतांना वर्तमानपत्रांतील अत्युक्तिपूर्ण वर्णनें किंवा स्वार्थप्रेरित ग्रंथकारांचे द्वेषमूलक लेख जमेस न धरतां, लेनिनसारखे बोल्शेव्हिक पुढारी किंवा खुद्द बोल्शेव्हिक सरकार यांनीं प्रसिद्ध केलेले ग्रंथ व लेख यांच्यावरच भिस्त ठेवण्यांत आली आहे. दुसरी गोष्ट ही कीं, या विवेचनांत सदर मतांचा तात्त्विक दृष्ट्याच विचार करावयाचा आहे. सामाजिकवादी सरकार सगळ्या जगांत आतांच काय तें पहिल्याप्रथम बऱ्याच काळपावेतों प्रस्थापित राहिलेलें आहे. तेव्हां त्या वादाच्या तत्त्वांना व्यवहाराची कसोटी लावण्याची ही जी संधि आलेली आहे तिचा तें सरकार काय उपयोग करतें याकडे सर्वांचे डोळे लागावेत हें साहजिक आहे. सामाजिक वादाची भविष्यत्‌स्थिति या संधीच्या उपयोगावर अवलंबून राहणारी आहे हेंही उघड आहे. या दृष्टिनें बोल्शेव्हिक सरकारचें राजकार्य व त्यांनी रशियांत घडवून आणलेली राजकीय, सामाजिक, व सांपत्तिक क्रान्ति अत्यंत महत्त्वाची आहे. जगाच्या भावी इतिहासांतला तो अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. पण या बाबतींत

या ग्रंथाला घालून घेतलेल्या मर्यादेमुळें बोल्शेव्हिक सरकारच्या या व्यावहारिक कार्याच्या विचाराचा मोह दूर सारणें आवश्यक आहे.

मार्क्सचा असा सिद्धांत आहे कीं, समाजाची एकंदर मन:स्थिति, त्यांतीत कायदे, धर्म, राज्यपद्धति हीं सर्व सांपत्तिक कारणांवर अवलंबून असतात. त्याच्या स्वत:च्या ग्रंथांचा व मतांचा नंतरच्या अनुयायांनी जो निरनिराळा अर्थ केला आहे त्यावरुन ह्या सिद्धांताचें एक उदाहरण मिळतें. मागें एका प्रसंगीं मार्क्सच्या Das Capital या ग्रंथाला आम्ही सामाजिक वादाचा प्रमाणभूत ग्रंथ या दृष्टिने गीतेची उपमा दिली आहे. ती दुसऱ्या एका दृष्टीनेंही सार्थ आहे. ज्याप्रमाणें एकाच गीतेचा, द्वैतपर, अद्वैतपर, विशिष्टाद्वैतपर अर्थ करण्यांत येतो, एवढेंच नव्हें तर कोणी त्यांतील कर्मपर भागाला तर इतर कोणी ज्ञानमार्गाला व भक्तिमार्गाला प्राधान्य देतात, त्याचप्रमाणें मार्क्सच्या सिद्धांताचा त्याच्या पुढील अनुयायांनी निरनिराळा अर्थ केला असून, कोणी त्याच्या एका सिद्धांताला, तर दुसऱ्यांनीं दुसऱ्या सिद्धांताला प्रधानभूत मानलें आहे व याला बहुतांशी त्या त्या अनुयायांची राष्ट्रीय परिस्थिति कारण झाली असें म्हणण्यास हरकत नाहीं. जर्मनींतील बर्नस्टैन पक्षाचे 'सुधारक' (Revrsionist), फ्रान्सातील सॉरेलचे मतानुयायी संघवादी, अमेरिकेंतील 'जगांतील औद्योगिक कामकरी' व सर्वांत अलीकडचे रशियांतील बोल्शेव्हिक, हे सर्व स्वत:स मार्क्सचे अनुयायी म्हणवितात, व आपल्या मतांना त्याच्या ग्रंथांतून आधार देतात. परंतु त्यांच्या परस्परांच्या मतांत पुष्कळ वैचित्र्य आहे, इतकेंच नाहीं तर विरोध आहे. जर्मनींत मार्क्सच्या काळानंतर पुष्कळ औद्योगिक भरभराट झाली व कामकऱ्यांची स्थिति बरीच सुधारली. त्याचा साहजिकच परिणाम बर्नस्टैनच्या सौम्य, मवाळ मतांत दिसून येतो. मार्क्सच्या मतांतीत तीव्रता, भांडवलवाल्याविषयींचा उग्र संताप, अंत:करणांतील पीळ बर्नस्टैनमध्यें सपशेल नाहींसा झाला आहे. 'क्रान्ति' हें मार्क्सचें सूत्रवाक्य होतें. परंतु बर्नस्टैननें आपल्या मुख्य ग्रंथासच 'उत्क्रान्तिपर सामाजिक वाद' (Evolutionrry Socialism) असें नांव दिलें आहे. सामाजिकवाद्यांनीं उदारमतवादी पक्षाचा व्यर्थ द्वेष न करतां, त्यांच्याशीं मिळून काम करावें असा बर्नस्टैनचा उपदेश आहे. मार्क्सची मुख्य भिस्त कामकऱ्यांच्या आंतरराष्ट्रीय संघावर होती. कामकऱ्यांना स्वदेश असा नाहींच, असें तो म्हणत असे. परंतु बर्नस्टैन म्हणतो कीं, कामकऱ्यांना नागरिकांचे हक्क मिळाले असल्यानें त्यांना स्वदेश आहे, एवढेंच नाहीं, तर त्या स्वदेशाबद्दल त्यांच्यांत अभिमान व प्रेमही वसत असलें पाहिजे. इतका विरोध दिसत असतांही बर्नस्टैनला मार्क्सचा अनुयायी म्हणविण्यास दिक्कत वाटत नाहीं.

ही मार्क्समताच्या रुपांतराची पराकाष्ठा झालेली आहे. सॉरेलच्या संघवादांत मार्क्सच्या एकाच–वर्गकलहाच्या–सिद्धांतावर जोर दिला असून, इतर भाग गौण मानला

आहे. सॉरेल म्हणे कीं, मार्क्सच्या तन्त्वरचनेंत वर्गकलह हाच मध्यवर्ती सिद्धांत आहे. या वर्गकलहाचें मूळ नाहींसें करण्यासाठीं मार्क्सनें सांगितलेले उपाय गौण होते. म्हणून त्यानें मार्क्सहून निराळा स्वत:चा सार्वत्रिक संपाचा मार्ग प्रतिपादिला याचें कारणही मागें संघवादाच्या प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें, परिस्थितिजन्यच होतें. फ्रान्समध्यें पार्लमेंटद्वारा चळवळीचा इतका कटु अनुभव आलेला होता, संप मोडून काढण्यांत राज्यकर्त्यांनीं पोलिसाचा व सैन्याचा असा वारंवार उपयोग केला होता, कीं एकंदर राजकीय चळवळीच्या सफलतेविषयीं तेथील कामकऱ्यांस निराशा वाटूं लागली, यांत नवल नाहीं. याशिवाय फ्रान्समधील औद्योगिक उन्नति या मर्यादेला पोंचली होती कीं, सार्वत्रिक संप, विघ्नीकरण यांसारखे उपाय तेथें शक्य व सुलभ होते.

परंतु रशियाच्या औद्योगिक परिस्थितींत हे उपाय शक्त नव्हतें. औद्योगिक कामकऱ्यांची संख्या त्या मानानें अल्प होती, त्यांच्यांत इतकें संघटन नव्हतें, व कारखान्यांची रचनाही या उपायांना अनुकूल नव्हती. अशा स्थितींत तेथें संघवादाचें बीज रुजण्यासारखें नव्हतें. शिवाय रशियांत झारचा अंमल इतका करडा, दीर्घ कालचा व सर्वव्यापी होता की, त्याच्या विरुद्ध कोणतीहि चळवळ करावयाची झाल्यास ती गुप्त रुपान, शस्त्रसहायानें, करण्यावांचून गत्यंतर नव्हतें. 'क्रमश:' 'हळूहळू' या शब्दांस तेथें वाव नव्हता. जें काय करावयाचें तें तडकाफडकीनें, एका घावासरसें, घडवून आणलें पाहिजे होतें. क्रान्ति व तीही सशस्त्र हाच एक मार्ग कामकऱ्यांच्या उद्धाराचा होता. सनदशीरपणाची चळवळ शक्य नव्हती. म्हणूनच रशियांत मार्क्सच्या मतांतील वर्गकलहाचें व सशस्त्र क्रान्तीचे सिद्धांत जास्त पटण्यासारखें होतें. तेच बोल्शेव्हिक पंथानें उचलले व त्यांच्यावर आपल्या पंथाची उभारणी केली.

लेनिनने एकें ठिकाणीं (The state and Revolution पृष्ठ ८४) म्हटल्याप्रमाणें या पंथाला 'बोल्शेव्हिझम' हें नांव अगदी आगांतुक कारणानें मिळालें. हा शब्द 'Bolshinstvo' या शब्दापासून तयार झालेला असून, त्याचा अर्थ रशियन भाषेंत मताधिक्य असा आहे. सन १९०३ मध्यें रशियांतील सामाजिकवादी पक्षाची ब्रुसेल्सला जी परिषद् भरली तींत अंतर्व्यवस्थेसंबंधाच्या कांही मतभेदावरुन निरनिराळे पोटभेद झालेले होते. त्यांत लेनिनच्या पोटभेदाला मताधिक्य असल्यानें त्याला 'बोल्शेव्हिक' असें नांव त्यावेळीं देण्यात आहें. पुढें या निरनिराळ्या व सामाजिकवादी पक्षाच्या मुख्य संस्थेंतील त्यांच्या अनुयायांची संख्याही कमीजास्त होत गेली. मध्यंतरी एके वेळीं या मध्यवर्ती संस्थेंत लेनिनच्या मतानुयायांची संख्या फारच कमी झाली होती. तरी पण एकवेळां या उपपक्षाला व त्याच्या विशिष्ट मतांना 'बोल्शेव्हिक' व 'बोल्शेव्हिझम' अशीं जी नावें देण्यांत आलीं तीं कायम राहिली. व आतां तर त्यांचा मूळ शब्दार्थ विसरल्यासारखाच झाला आहे.

बोल्शेव्हिझम हें नांव उच्चारल्यावरोबर लेनिनची मूर्ति अंतश्चक्षुसमोर उभी राहते. त्या दोघांचा आमच्या आठवणींत नित्यसंबंध झालेला आहे; आणि तो योग्यही आहे. या मतांचें प्रवर्तन व संचालन मूळ लेनिननें केलें, त्याच्या कर्तृत्वशक्तीमुळें व साहसामुळें त्या मतांचा प्रसार झाला, त्याच्या धुरीणत्वाखालीं तो पक्ष अधिकारारुढ झाला, व आजही त्या मतांतलें कार्यसामर्थ्य, अंत:स्फूर्ति, लेनिनमध्यें एकवटलेली आहे. ट्रॉट्स्की, झीनॉफीफ, वगैरे या पक्षाचे इतर पुढारी आहेत. कोणताच पक्ष केवळ एकाच पुढाऱ्यानें बनत नाहीं, पण हे इतर पुढारी लेनिनचे सहायक आहेत. मुख्य आत्मा लेनिन आहे.

लेनिनचें खरें नांव लाडिमिर यूलेनॉफ आहे. रशियांत मागें झारशाहीशीं चालू असलेल्या झगड्यांत प्रजापक्षाच्या लेखकांस स्वसंरक्षणासाठीं निरनिराळीं उपनांवें धारण करावीं लागत असत. त्याप्रमाणें यूलेनॉफनें निकोलाय लेनिन हें नांव धारण केलें होतें; तेंच आतां जगप्रसिद्ध झालेले आहे. लेनिनचा जन्म सन १८७० त झाला. त्याचे वडील रशियन विद्याखात्यांत एक अधिकारी असून, त्यांनीं लेनिनला लहानपणीं उत्तम शिक्षण दिलें. त्या काळच्या इतर रशियन तरुणांप्रमाणें लेनिनमध्येंही अगदी तारुण्यापासून स्वातंत्र्यप्रीति व स्वार्थत्याग उत्कटपणानें नांदत होता. प्रचलित राज्यपद्धतीविषयीं चिरस्थायी द्वेष उत्पन्न होण्यासारखें एक कारणही इटलीतील रिएंझीप्रमाणें, त्याला घडलें होतें. तो कॉलेजमध्यें असतांना त्याला वडील भाऊ राजद्रोहाच्या एका गुप्त कटांत सांपडून, फांशीं देण्यांत आला होता. स्वत: लेनिनला यावेळीं पकडून अटकेंत ठेवण्यांत आलें होतें, पण पुढें पुरेसा पुरावा न मिळाल्यानें त्याला सोडून देण्यांत आलें. पण त्याला युनिवर्सिटीतून काढून देण्यांत आलेंच. त्यानंतर देशत्यागाचा प्रसंग तर त्याच्यावर कित्येक वेळां येऊन गेला. कांहीं काळ सायवीरियांतही त्याला अटकेंत ठेवण्यांत आलें होतें. पण देशांत असो, किंवा देशाबाहेर असो, वेळोवेळीं अनेक लेख लिहून आपल्या मताच्या प्रसारांत व अनुयायांना प्रोत्साहन देऊन कार्यतत्पर ठेवण्यांत त्यानें केव्हांही खळ पडूं दिलेली नाहीं.

लेनिन स्वत:ला मार्क्सचा अनुयायी म्हणवतो. आपल्या मतांत वस्तुत: नवीन कांहींच नसून, आपण अक्षरश: मार्क्सच्या मतांचेंच परिपालन करीत आहोंत असा त्याचा बाणा आहे. हल्लींचे इतर सामाजिकवादी स्वत:स मार्क्सचे अनुयायी म्हणवतात. पण एक तर त्यांना मार्क्सचीं खरीं मतें कळत तरी नसावींत, किंवा कळत असून स्वार्थामुळें त्या मतांना ते विकृत तरी करीत असावेत. ते ढोंगी तरी असावेत, किंवा मूर्ख तरी असावेत. एरवी नि:पक्षपातानें व सत्यजिज्ञासेनें जो कोणी मार्क्सच्या ग्रंथाचें अध्ययन करील त्याचीं मतें आपल्यासारखी झाल्याशिवाय रहाणार नाहींत, अशी लेनिनची खात्री आहे. याचा 'The development of Capitalism in Russia'' (रशियांत

भांडवलशाहीचा उत्कर्ष ) म्हणून एक लहानसा ग्रंथ रशियांत फार प्रसिद्ध आहे म्हणतात. पण इकडे 'The state and the Revolution' ( सरकार आणि क्रान्ति ) या नांवांचे त्याचें एकच पुस्तक उपलब्ध आहे. त्यांत त्यानें मार्क्सचे व एंजल्सचे उतारे देऊनच आपल्या एकंदर मतांचें व कार्यक्रमांचें समर्थन केलें आहे. 'नामूलं लिख्यते किंचित्' या प्रतिज्ञेप्रमाणें मार्क्सच्या सिद्धांताचा आधार नसलेलें या पुस्तकांत कोणतेंही मत प्रतिपादन किंवा आक्षेप-निरसन नाहीं.

ह्रा लहानसा ग्रंथ अपुरा आहे. १९१७ च्या ऑगष्टमध्यें, म्हणजे बोल्शेव्हिक क्रान्ति होण्यापूर्वी तीन महिने त्याची प्रस्तावना लिहिली आहे. तींत मार्क्सच्या मतांवर आलेलें भ्रमपटल दूर करण्याचा उद्देश व्यक्त केला आहे. तेवढांच या ग्रंथाचा भागही पण लिहून प्रसिद्ध झालेला आहे. त्याच्या पुढील भागांत रशियांतील १९०५ तील क्रान्तीची व १९१७ तील झारशाहीच्या उच्छेदाची मीमांसा करण्याचा ग्रंथकाराचा विचार होता. पण तो अंमलांत येण्याच्या पूर्वीच बोल्शेव्हिक क्रान्तीला सुरुवात झाली, व ग्रंथलेखनापेक्षा जास्त महत्त्वाचें व सद्य:कर्तव्याचें—राज्यशासनाचें कार्य लेनिनच्या अंगावर पडून हा ग्रंथ अपूर्ण राहिला. नोव्हेंबर ३० ला लेनिननें त्यांत पुढील शेवटलें वाक्य लिहिलें आहे. "It is more pleasant and more useful to live through the experience of a revolution than to write about it."

लेनिनच्या मतांचे खरें स्वरुप कळण्यासाठीं या ग्रंथासारखें साधन नाहीं. म्हणून त्याचा सारांश अगदीं थोडक्यांत पुढें दिला आहे.

लेनिनचा अगदीं पहिला सिद्धांत हा आहे कीं, समाजांत जेव्हां दोन निरनिराळे वर्ग उत्पन्न होऊन, त्यांच्या हितांत शाश्वत विरोध उपजतो, जेव्हां एकाचें हिंत तेंच दुसऱ्याचे अहित, व दुसऱ्याचें अहित तेंच पहिल्याचें हित, अशी स्थिति येते, जेव्हां या विरोधामुळे त्या दोन वर्गांत भयंकर कलह लागून, त्यांचा मेळ घालणें अशक्य होतें, तेव्हा 'सरकार' ही संस्था जन्मास येते. तिच्या रुपानें समाजानें आपल्यांतील चिरस्थायी दुहीची कबूली दिलेली असते. या वर्गकलहांत त्या दोन्हीं वर्गांचा व त्याबरोबरच समाजाचा नाश होऊं नयें, म्हणून वरपांगी त्या दोहोंहून वेगळी, त्यांच्या वरची सरकार ही शक्ति समाज स्वत: निर्माण करतो, तिचा उद्देश त्या दोन्ही वर्गांना कह्यांत ठेवून, त्यांच्या घर्षणाला सर्वांनाच जाळून टाकण्याइतकें उग्र स्वरुप येऊं नये, व समाजांत बाह्य शांतता राहावी हा असतो.

पण याप्रमाणें वरपांगी जरी 'सरकार' ही संस्था दोन्ही वर्गांहून निराळी असते, तरी तिचा हेतु सद्य:स्थिति कायम ठेवण्याचा असल्यानें, ती साहजिकपणेंच जो वर्ग जास्त

बलिष्ट, जास्त समर्थ असतो, त्याला अनुकूल असते. आपल्या स्वत:च्या संरक्षणासाठी, व सद्य:स्थिति कायम ठेवण्यासाठीं ही 'सरकार' संस्था पोलिस व सैन्य, न्यायखातें व तुरुंग, निर्माण करतें; व त्यांच्या सहायानें बलिष्ठ वर्गाचा निर्बल वर्गावरील जुलूम चालू ठेवते.

जर 'सरकार' ही संस्था याप्रमाणें वर्गकलहाचा परिणाम असून, त्या कलहांतील बलिष्ठांचा निर्बलांवरील जुलूम चालू ठेवण्यासाठींच जन्माला आलेली आहे, जर ती शक्तिसंपन्न असून बलिष्ठाला अनुकूल आहे, तर त्या बलिष्ठांच्या जुलूमानें गांजलेल्यांना स्वत:च्या दु:खमोचनास सशस्त्र उपायांनी त्या सरकारला उलथून टाकणें हा एकच उपाय उरतो हें उघड आहे. म्हणूनच मार्क्स म्हणतो कीं, समाजांत जेव्हां एक अवस्था जाऊन दुसरी अवस्था जन्माला यावयाची असतें, तेव्हां ह्या जननकर्मांत जबरदस्ती, बलात्कार सशस्त्र उपाय, हें दायीप्रमाणे उपयोगी पडतात.

म्हणून समाजांतील कामकरी वर्गानें सशस्त्र उपायांनीं भांडवलशाही व त्याबरोबरच हल्लींचें सरकार उलथून पाडलें पाहिजे. यासाठी दुसरा मार्ग नाहीं, दुसरें साधन नाहीं.

सरकारला याप्रमाणें उलथून पाडल्यावर पुढें काय? या प्रश्नाच्या उत्तरांत लेनिननें आपला, प्रसिद्ध व प्रखर टीकेचा विषय झालेला Dictatorship of the Preletariat `कामकरी वर्गाच्या अनियंत्रित सत्तेचा सिद्धान्त मांडला आहे. तो सांगण्यापूर्वी कामकरी वर्गाची लेनिनची कल्पना स्पष्ट केली पाहिजे. त्याच्या मतें या वर्गांत त्याच कामकऱ्यांचा, श्रमानें उदरनिर्वाह करणाऱ्यांचा, समावेश होतो, ज्यांना वर्गकलहाची जाणीव आहे. ज्यांना अशी जाणीव नाहीं, किंवा जाणीव असून जे कामकरी पक्षाला न मिळतां भांडवलवाल्या वर्गाला मिळतात, अशा अज्ञानी किंवा वर्गद्रोही लोकांचा लेनिन कामकरी वर्गांत समावेश करीत नाहीं. समाजांत भांडवलवाल्यांत व कामकऱ्यांत युद्ध जुंपलें आहे. दोघांचीं सैन्यें दोन बाजूला उभीं आहेत, अशा स्थितींत जे श्रमजीवी कामकरी सैन्यांत येऊन दाखल होतील तेच वास्तविक त्या वर्गांतलें मानले पाहिजेत. वस्तुस्थितींत सामान्यत: पेट्रोगाड, मास्को वगैरे मोठमोठ्या शहरांतील औद्योगिक कामकरीच याप्रमाणें युद्धांत–वर्गकलहांत– सामील झालेले आहेत. अर्थात् लेनिन त्यांनाच खरें कामकरी म्हणतो. इतरांनाही जसजशी आपल्या स्थितीची जाणीव होत जाईल व खरें स्वहित कळूं लागेल, तसतसे तेहि युद्धयमान औद्योगिक कामकऱ्यांना येऊन मिळतील यांत संशय नाहीं. पण ते असे मिळत नाहींत, तोंपर्यंत शब्दार्थानें जरी ते कामकरी असले, तरी त्या वर्गांत ते मोडत नाहींत हें उघड आहे. लेनिनची कामकरी वर्गाची ही व्याख्या त्याची एकंदर विचारसरणी समजण्यास आवश्यक आहे.

लेनिन म्हणतो कीं, भांडवलशाही व तिचें सरकार नाहींसें केल्यानंतर कामकरी वर्गानें स्वत:चें सरकार कांहीं काळ स्थापिलें पाहिजे. कामकरी सरकार ही कांहीं समाजाची आदर्श अवस्था नाहीं, परंतु ती येण्याला मधील संकमणावस्थेंत या सरकारची जरुरत आहे.

सरकार म्हणजे बलात्कार व जुलूम करण्याची संस्था होय हें खरें, व कामकरीवर्गाचा–सामाजिकवादी लेनिनपक्षाचा–अंतिम हेतु समाजांत पूर्ण स्वातंत्र्य, बलात्काराचा पूर्ण अभाव, स्थापन करण्याचाच आहे. पण तें एकदम स्थापन होऊं शकत नाहीं. भांडवलशाही सरकार मोडलें, तरी वैयक्तिक भांडवलवाल्यांचा विरोध कायम राहीलच, व तो ते सशस्त्र व ससैन्य करतील यांत तिळमात्र शंका नाहीं. हा विरोध पूर्णपणें नाहींसा करण्यासाठीं, समाजांतील इतर तटस्थ लोकांना – उदाहरणार्थ शेतकरी, लहानसहान दुकानदार, एंजिनियर, डॉक्टर, बरा रोजमुरा मिळणारे वरच्या प्रतीचे कामकरी, यांना–खऱ्या कामकरीवर्गांत सामील करुन घेऊन, नवीन समाजरचना करण्यासाठीं, कामकरी–सरकार स्थापन करणें जरुर आहे.

मार्क्सनें या सरकारचें वर्णन The state, that is, The proletariat organised as the ruling class असें केलें आहे. हें सरकार स्ववर्गाची जाणीव असलेल्या सुसंघटित कामकरी वर्गाचें बनलेलें असलें पाहिजे असा मार्क्सचा भावार्थ आहे. लेनिनला हल्लीं असा दोष देण्यांत येतो कीं, त्याच्या राज्यपद्धतींत कामकरी वर्गालाच व त्यांतही शहरांतील औद्योगिक कामकऱ्यांनाच, मताधिक्य मिळण्याची व्यवस्था केलेली आहे. लोकशाहीचा पुरस्कर्ता म्हणविणाऱ्या, सार्वत्रिक मतदानाची मागणी करणाऱ्या, या पुढाऱ्यानें स्वत:च्या हातीं राजसूत्रें येतांच, भांडवलवाल्यांना व कारखानदारांना मतदानाचा अधिकार दिला नाहीं. परंतु लेनिनच्या मतांप्रमाणें या त्याच्या वागण्यांत किंचित्‌ही विसंगतपणा नाहीं. लेनिनचें म्हणणें असें आहे कीं, सरकार ही संस्थाच मुळीं एका वर्गाची सत्ता दुसऱ्या वर्गावर चालविण्यासाठीं जन्माला येते, व कायम राहते. भांडवलशाही सरकारची सत्ता नाहींशी करण्यासाठीं कामकरी सरकारची स्थापना केली पाहिजे. अर्थातच जे खरे, स्ववर्गाभिमानी कामकरी असतील त्यांचेंच हें सरकार बनूं शकतें. हें सरकार बनविण्यांत इतरांना हक्क देणें म्हणजे युद्धांत आपल्या छावणींत शत्रूचे लोकांना जागा देण्यासारखेंच आत्मघातकी आहे. आतां पूर्वीच्या भांडवली सरकारांत व हल्लींच्या कामकरी-सरकारांत फरक इतकाच कीं, हें दुसरें सरकार कायमचें नसून, कांहीं कालपुरतेंच राहावयाचें आहे. इतर वर्गापेक्षां कामकरीवर्गाचा हा विशेष धर्म आहे कीं, वाटेल त्याला या वर्गांत सामील होतां येतें. त्याप्रमाणें समाजांतील इतर लोकांना कामकरी-पक्षाची सामाजिकवादी मतें पटूं लागलीं, त्यांचा अंतर्गत नैसर्गिक चांगुलपणा प्रत्ययाला येऊं लागला, व कामकरी सरकारनें त्या मतानुरुप सुरु केलेली

समाजाची पुनर्रचना अनुभवानें सुखकर वाटूं लागली, म्हणजे ते आपोआपच खऱ्या व जागृत कामकरीवर्गांत सामील होत जातील. कालांतरानें समाजांत एकच-कामकऱ्यांचा-वर्ग राहील. मग सरकारच्या अस्तित्वाचें मूळ कारण जें वर्गभेद व वर्गकलह तेंच नाहींसें झाल्यानें, सरकार हें नामशेष होईल, सुकून जाईल. ( Wither away, " The authority of the Government over persons will be replaced by the administration of things and the direction of the processes of production ( Engals). हल्लीं समाजांत सरकारची जी व्यक्तीवर सत्ता असते, तिच्या ऐवजीं पुढें त्याच्याकडे सामाजिक गोष्टींची व्यवस्था व उत्पादन-कार्यांतील उपाड्.गांची देखरेख एवढेंच काम राहील.

परंतु ही इष्ट अवस्था प्राप्त होईपावेतों मधल्या संक्रमणावस्थेंत समाजांत अनियंत्रित कामकरी-सरकारच ( Dictator–ship of the Proletariat ) राहिलें पाहिजे. याचा स्पष्टार्थ असा कीं, स्वाभिमानी युध्यमान कामकरी वर्गाशिवाय इतरांना हें सरकार निवडण्याचा हक्क नसावा, व या सरकारला आपल्याविरुद्ध वागणाऱ्यांना शारीरिक दंडानें ताळ्यावर आणण्यास अनिरुद्ध अधिकार असावेत. हें कामकरी सरकार हल्लींच्या जुलमी व लुटारु भांडवलवाल्यांना व त्यांच्या सहायकांना निरनिराळीं बंधनें घालील व त्यांचें वाक्स्वातंत्र्य व आचारस्वातंत्र्य अत्यंत मर्यादित करील. मजूरांची विद्यमान गुलामगिरी नाहींशी करण्यासाठीं असें करणें अनिवार्य आहे. प्रजासत्तावादी याला नांवें ठेवतील. परंतु ते हें ध्यानांत घेत नाहींत कीं, हल्लींच्या प्रजासत्ताक पद्धतींत तरी वस्तुस्थिति काय आहे ? हल्लीं मूळभर श्रीमंत प्रजेची मात्र सत्ता समाजावर गाजत आहे, तिच्या ऐवजीं पुढें पुष्कळशा गरीब प्रजेची मूठभर इतरांवर सत्ता चालेल. आणि वास्तविक पाहिलें तर प्रजासत्ताक सरकाराच्या मीमांसेत तरी काय निष्पन्न होतें ? या सरकाराचा तरी हेतु हाच असतो कीं, जरुर तर जबरदस्ती करुन अल्पमताला बहुमताप्रमाणें वागण्यास भाग पाडावें. सारांश काय, प्रजासत्ताक सरकार म्हणजे एका वर्गाची-बहुमताची-सत्ता दुसऱ्या म्हणजे अल्पमतावर जबरदस्तीनें लादण्याची संस्था होय. जर असें आहे तर या सरकारांत व कामकरी-सरकारांत कोणता फरक राहिला ?

याप्रमाणे समाजांत कामकरी सरकार स्थापन झाल्यावर, त्यानें समाजाची पुनर्रचना करण्यास लागावें. या रचनेचा आदर्श म्हणून लेनिननें सन १८७०-७१ त पॅरिसच्या कम्यूननें जी राज्यव्यवस्था केली होती तिचें मार्क्सनें वर्णन दिलें आहे. सन १८७०-७१ च्या फ्रँको-जर्मन युद्धांत पॅरिसला वेढा पडला असतां, सामाजिकवादी पक्षानें क्रान्ति करुन ही व्यवस्था कायम केली होती, ती फारच थोडा काळ टिकली, पण सामाजिकवादी राज्यव्यवस्थेचा प्रयोग या दृष्टिनें तिचें फार महत्त्व असून, मार्क्सनेंही त्याच दृष्टिनें तिची मीमांसा केली आहे. मार्क्स म्हणतो कीं, कम्यूनच्या या प्रयोगावरुन

हें दिसून आलें कीं नवीन रचनेंत कामकरी वर्गानें भांडवली सरकाराची राज्यपद्धत जशीच्या तशीच पुढें चालवून कार्यभाग होणार नाहीं. कामकरी वर्गाच्या हातीं सत्ता येतांच, पहिलें काम ही पद्धत सपशेल मोडून टाकण्याचें पहिला राज्यशकट छिन्नभिन्न करुन टाकण्याचें असलें पाहिजे. हें विध्वंसनाचें कार्य झाल्यानंतर रचनेच्या कामास सुरुवात केली जावी. कम्यूननें प्रथमत: जुन्या सरकारचें खडें सैन्य खारिज केलें, आणि त्याच्या जागीं राष्ट्रीय सशस्त्र स्वयंसेवकांची योजना केली. कम्यूनचीं सूत्रें एका कौंसिलाच्या हातीं देण्यांत आलीं. या कौंसिलात पॅरिसच्या निरनिराळ्या भागांतून निवडून आलेले प्रतिनिधि असत. ते आपापल्या मतदारसंघांना जबाबदार असत, व सर्व संघांना आपल्या प्रतिनिधींची मतें किंवा कृत्यें नापसंत पडतांच त्यांस परत बोलावून दुसरा प्रतिनिधि निवडण्याचा अधिकार असे. राज्यकारभारांतील इतर सर्व अधिकारीही लोकनियुक्त करण्यात आले होते. कौंसिलच्या सभासदांपासून तों कारखान्यांतील कनिष्ठ प्रतीच्या कामकऱ्यांपर्यंत सर्वांचा पगार सारखा करण्यांत आला. मोठ्या अधिकाराला मिळणारा लठ्ठ पगार व इ..र सवलती बंद करण्यांत आल्या. जुना धर्माधिकाऱ्यांचा वर्ग व त्यांना राज्यांतून मिळणारा आश्रय काढून टाकला गेला. न्यायाधीशही लोकनियुक्त व अयोग्य दिसतांच लोकांनीं काढून टाकण्यास पात्र करण्यांत आले.

या रीतीनें कम्यूननें हल्लींच्या सरकारचीं भरभक्कम खर्चाची दोन खातीं कमी केलीं, एक सैन्य व दुसरें अधिकारीवर्ग. तिसरा मोठा बदल कम्यूननें केला तो हा कीं, हल्लींचे प्रतिनिधि पांच पांच सहा सहा वर्षें कायम राहणारे असल्यानें एकदां निवडून आल्यानंतर आपल्या मतदारसंघाचीं मतें व इच्छा प्रामाणिकपणानें व्यक्त करण्याचें त्यांस तितकें कारण उरत नाहीं. ते आपल्या मतदारांना तितके जबाबदार राहत नाहींत. सामान्यत: आपल्या मतदारांची इच्छा समजून घेण्याची व त्याप्रमाणें वागण्याची त्यांस तादृश पर्वा राहत नाहीं. म्हणून कम्यूननें मतदारसंघांना आपला प्रतिनिधि वाटेल तेव्हां परत बोलाविण्याचा अधिकार दिला होता.

सारांश, कम्यूननें राजशकटांतील प्रत्येक घटक लोकनियुक्त, मतदारांना वाटेल तेव्हां काढून टाकण्याजोगा, व सारखा पगार मिळणारा केला.

कम्यूननें पॅरिसला जी कौंसिलची व्यवस्था केली, तशीच व्यवस्था देशांतील लहानापासून मोठ्या गांवापर्यंत सर्वांत करण्याची तिची इच्छा होती. प्रत्येक गांवाला त्या त्या गावापुरते स्वायत्त लोकनियुक्त कौंसिल स्थापण्याचा तिचा विचार होता. या कौंसिलाचेंच नांव 'कम्यून' असून, या ग्रामकम्यूनांच्या प्रतिनिधिंचें 'राष्ट्रीय मंडळ' स्थापन करण्याची तिची योजना होती.

लेनिन म्हणतो कीं, मार्क्सच्या मतांप्रमाणें समाजाचें पूर्ण रुपांतर होण्यास कांहीं काळ लोटावा लागतो. या मधील संक्रमण काळांत समाजाची व्यवस्था त्याच्या अंतिम स्वरुपाहून बरीच निराळी राहील. क्रान्ति झाल्याबरोबर प्रथमतः जमीन व कारखाने व्यक्तींच्या ताब्यांतून काढून घेऊन राष्ट्राच्या मालकीचे केले जातील. उत्पादनाचीं साधनें राष्ट्रीय मालमत्ता समजलीं जातील. समाजांतील प्रत्येक व्यक्तीला समाजाला उपयुक्त असें काम करावें लागेल. त्यानें केलेल्या अशा कामाबद्दल त्याला सर्टिफिकेट दिलें जात जाईल. तें दाखविलें म्हणजे सार्वजनिक कोठारांतून त्याला सर्टिफिकेटांत दाखविलेल्या कामाच्या मानानें हवा तो माल मिळत जाईल. या पद्धतींत प्रत्येक व्यक्तीला आपल्या कामाचा, सार्वजनिक व्यवस्थेला लागणाऱ्या खर्चांसाठी थोडा अंश वगळून, बाकीचा पुरा मोबदला मिळत जाईल हें उघड आहे.

या समाजव्यवस्थेंत सामाजिक वादाचें पहिलें तन्त्व ' जो काम करणार नाहीं त्यास खावयासही मिळणार नाहीं ' हें अंमलांत येईल. ज्या मानानें श्रम त्याच मानानें फळ मिळूं लागेल. उत्पादनकार्यांत याप्रमाणें समता स्थापन होईल. समाजांत हल्लीं प्रचलित असलेला एक अन्याय–भांडवलवाल्यांची–लूट दूर होईल.

परंतु ही खरी समता नाहीं; किंवा या योगानें समाजांत खरा न्यायही प्रस्थापित होणारा नाहीं. कारण मनुष्यमात्र सारखा नाहीं; एक अशक्त तर दुसरा दणगट, एक विवाहित तर दुसरा अविवाहित, एक चलाख तर दुसरा मंद, एक बहुपुत्रिक तर दुसरा निपुत्रिक अथवा अल्पसंतान, अशी समाजांत सर्वत्र विषमता पसरलेली आहे. अशा स्थितींत जर कामाच्या मानानेंच योग्य वस्तु दिल्या जाऊं लागल्या, तर एकास त्या आवश्यकतेहून जास्त मिळूं लागतील, तर दुसऱ्यास त्या पुरेशाही मिळणार नाहींत. एकंदरींत, या समतेनें वास्तविक विषमताच निपजेल. परंतु सगळीच विषमता, सगळाच अन्याय, एकदम नाहींसा करतां यावयाचा नाहीं. मागील भांडवलशाहींतले कांहीं दोष व अन्याय संक्रमणकाळांत समाजांत कायम राहणारच; व त्यापैकींच ही श्रमानुरुप वांटणीनें येणारी विषमता एक दोष होय.

समाजाच्या या पहिल्या व संक्रमणावस्थेंत वर सांगितल्याप्रमाणें सरकार ही संस्था कायम राहील. प्रथम प्रथम भांडवलवाल्यांचा विरोध मोडून काढण्यासाठीं या संस्थेची जरुर लागेल. नियंत्रणाशिवाय काम करण्यासही लोक हळू हळूच शिकतील. श्रमानुरुप वांटणी मान्य करण्याचीही त्यांस एकदम संवय लागणार नाहीं. म्हणून ही वांटणी अंमलांत आणण्यासही सरकार लागेल.

कालांतरानें लोक स्वेच्छेनें काम करुं लागतील, श्रमानुरुप वांटणीचा त्यांना

अभ्यास होईल, भांडवलवाले नाहींसे होतील, समाजांत एकच कामकरीवर्ग उरेल, तेव्हां समाजाचा संक्रमणकाल संपून त्यास सर्वोत्तम अवस्था प्राप्त होईल. मार्क्सनें या अवस्थेचें मोठें रसभरित वर्णन केलें आहे. " समाजाच्या सर्वोत्कृष्ट सामुदायिक (Communist) अवस्थेंत, हल्लींच्या श्रमविभागाच्या तन्त्वानें मनुष्याला आलेली गुलामगिरी नाहींशी होईल. बौद्धिक व शारीरिक कामांतील हल्लींचा विरोध व फारकत नष्ट होईल. श्रम हें केवळ उदरनिर्वाहाचें साधन न राहतां, जीवनांतील इतर आवश्यक भोग्यवस्तूंप्रमाणेंच एक आवश्यक वस्तु होतील; मनुष्याची सर्वांगीण उन्नति होऊन उत्पादक-साधनांची पूर्ण वाढ झालेली असेल, आणि समाजांतील शक्तींच्या विकासानें संपत्तीचा ओघ अव्याहत वाहूं लागेल. समाजाला अशी स्थिति प्राप्त होईल, तेव्हांच भांडवलशाही कायद्याच्या संकुचित क्षेत्रापलिकडे पूर्णपणें व सर्वांगानें दृष्टि देणें शक्य होईल; तेव्हांच समाजाच्या निशाणावर हें आदर्श-वाक्य झळकूं लागेल:— 'प्रत्येकाकडून त्याच्या शक्तीप्रमाणें, प्रत्येकाला त्याच्या आवश्यकतेप्रमाणें.'

या अवस्थेंत सरकारची जरुरत राहणार नाहीं. जर व्यक्तींना सामाजिक हिताची तन्त्वें कळून त्याप्रमाणें वागण्याचा अभ्यास झाला, जर प्रत्येक आपल्या शक्यनुरुप काम करुं लागून, आवश्यकतेनुसार भोग्य वस्तु घेऊं लागला, तर कोणत्याच नियंत्रणाची जरुरत राहणार नाहीं हें उघड आहे. अर्थातच सरकारला कार्यभाग न उरल्यानें, ज्याप्रमाणें फळ धरलें म्हणजे फूल सुकून जातें, त्याप्रमाणें तें सुकून जाईल. हल्लींच्या संकुचित भांडवलशाही दृष्टिकोनानुसार कोणीं किती काम केलें हें कांटेतोलपणानें जोखावें लागतें, व याला याच्याहून जास्त तर मजुरी दिली गेली नाहीं, ही खबरदारी ठेवावी लागते. परंतु उत्पादन-साधनें वाढलीं, माल हल्लीपेक्षांही जास्त भरपूर तयार होऊं लागला, व प्रत्येकजण अंग मोडून काम करुं लागला, म्हणजें या कांटेतोलपणाच्या वृत्तीची जरुरत लागणार नाहीं, व मग प्रत्येकाला त्याच्या आवश्यकतेनुसार देण्यास कोणताच प्रत्यवाय उरणार नाहीं.

या सर्वोत्कृष्ट अवस्थेला मार्क्सनें Communistic सामुदायिक असें नांव दिलें असून, त्यापूर्वीच्या संक्रमणावस्थेला Socialistic सामायिक असें नांव दिलें आहे. या अंतिम, सर्वोत्कृष्ट, 'सामुदायिक' अवस्थेच्या ध्येयाला अनुलक्षूनच लेनिननें आपल्या पक्षाचें नांव Communist party ( of the Bolsheviks ) असें ठेविलें आहे. लेनिनच्या मताचें याप्रमाणें सार आहे. त्यांतील प्रमुख सिद्धांत मोजके व स्पष्ट आहेत. सन १९१९ च्या मार्च महिन्यांत मास्कोला ' कम्यूनिस्ट' पक्षाची जी आंतरराष्ट्रीय परिषद् भरली होती, तिला लेनिननें एक निबंधवजा मतपत्रिका सादर केली होती. तिच्यांतही याच सिद्धांताचें स्वतंत्रपणें विवेचन केलें असून, कांही आक्षेपांचें निरसन केलें आहे; हल्लीं लेनिनच्या मताविषयीं व विचारसरणीविषयीं इतका गैरसमज

प्रचलित आहे कीं, पुनरुक्तिदोषाचा संभव पत्करुनही वरील मतपत्रिकेच्या आधारानें या सिद्धांताची थोडक्यांत पुन: एकवार मांडणी करणें योग्य वाटतें.

१. समाजांत वर्गकलह दिवसेंदिवस जास्त तीव्र होत जाणारा आहे. भांडवलशाहीच्या वाढीबरोबर, कारखान्यांना लागणाऱ्या भांडवलाचें प्रमाण अवाढव्य होत जाऊन, समाजांतील सर्व भांडवल दिवसेंदिवस थोड्या व्यक्तींच्या हातांत सांठवत जाईल. या योगानें कामकरीवर्गाची स्थिति अधिकाधिक शोचनीय होत जाऊन, त्यांचा व त्यांच्या मालकांचा कलह जास्त जास्त भयंकर होत जाईल.

२. ह्या स्थितींतून आपली सुटका करुन घेण्यास कामकरी वर्गास एकच मार्ग आहे. तो सशस्त्र क्रान्तीचा होय. जगाच्या इतिहासांत असें एकही उदाहरण नाहीं कीं, जुलुमाने गांजलेले, बलिष्ठांनीं पादाक्रान्त केलेले लोक सशस्त्र उपायांचा अवलंब केल्याशिवाय स्वतंत्र व दु:खमुक्त झाले. त्यांच्या आत्मोद्धाराच्या प्रयत्नांत त्यांचे जुलमी मालक अत्यंत नेटानें, आपल्या शक्तीच्या बाहेर, विरोध केल्याशिवाय केव्हांही राहिले नाहीत. कामकरी वर्गालाही अशाच विरोधांतून, निव्वळ जास्त शारीरिक बळानें, क्रान्ति घडवून आणावी लागेल.

३. या क्रान्तींत भांडवली उद्योगपद्धतीचा व भांडवली सरकारचा नाश करुन कामकरी वर्गानें आपलें निर्भेळ अनियंत्रित सरकार स्थापन केलें पाहिजे. कामकरी वर्गानें हें पक्के ध्यानांत ठेवावें कीं, पूर्वीचें भांडवलशाही सरकार नष्ट झाल्यावर, कामकरी वर्गाचें अनियंत्रित सरकार स्थापण्याशिवाय, दुसरा मधला तडजोडीचा उपाय नाहीं.

४. या पद्धतींत उत्पादनसाधनें–जमीन व कारखानें–राष्ट्रीय मालकीचें होतील. समाजांतील कोणाही व्यक्तीला काम केल्याशिवाय खावयास मिळणार नाहीं. प्रत्येकास त्याच्या कामाच्या मानानेंच भोग्य वस्तु दिल्या जातील व त्या देतांना प्रत्येकाला आपल्या कामाचा शक्य तितका पूर्ण मोबदला देण्याची खबरदारी घेतली जाईल.

या पद्धतींत जुन्या भांडवलवाल्या वर्गांना व त्यांच्या पृष्ठपोषकांना मताधिकार राहणार नाहीं. त्यांचें भाषण, लेखन व आचरणस्वातंत्र्य नियंत्रित राहील.

या पद्धतींत स्ववर्गाभिमानी कामकऱ्यांनाच सरकारला निवडण्याचा हक्क राहील. कामकऱ्यांनीं निवडलेलीं प्रत्येक गांवाचीं स्वायत्त कौंसिलें सोव्हियटें हीं या सरकारचीं उपकरणें राहतील. जुन्या भांडवलवाल्यांचा विरोध मोडून काढण्यासाठीं,

लोकांना निरुद्योगी राहूनही अन्नक्षय न करुं देण्यासाठीं, श्रमानुरुप वाटणी अंमलांत आणण्यासाठीं, या नवीन कामकरी-सरकारला अनिर्बंध सत्ता राहील.

५. हें सरकार लोकांना नवीन समाजरचनेचा अभ्यास होईपावेतोंच कायम राहील. नवीन रचनेला कोणाचा विरोध उरला नाहीं, सर्वजण स्वेच्छेनें काम करुं लागले, खासगी मालमत्ता उरली नाहीं, व समाज एकच कामकरी वर्गाचा बनला, म्हणजे सरकारची जरुरत राहणार नाहीं. मग प्रत्येकजण आपल्या शक्तीप्रमाणें काम करीत जाईल, व उत्पन्न झालेल्या मालांतून आपल्या आवश्यकतेप्रमाणें पदार्थ घेत जाईल.

बोल्शेव्हिक मतांचें प्रस्तुत विवेचन त्यांच्या कार्यक्रमांचा विचार केल्याशिवाय पुरें होणार नाहीं. हा कार्यक्रम या पंथाच्या मास्को येथील आंतरराष्ट्रीय परिषदेनें प्रसिद्ध केलेल्या जाहिरनाम्यांत दिलेला आहे. हा जाहिरनामा दोन-चार दृष्टींनीं महत्त्वाचा आहे. एक तर तो या पंथाचा अत्यंत प्रमाणभूत, अधिकारयुक्त, लेख आहे. बोल्शेव्हिक पंथावर हल्लीं सर्व प्रकारचीं मतें लादण्यांत येत असतां, सत्यान्वेषणाला हा लेख अत्यंत उपयुक्त होणारा आहे. त्यावर लेनिन, ट्रॉटस्की, झिनोफीफ, या रशियन बोल्शेव्हिक धुरीणांची तर सही आहेच, पण शिवाय एका स्विस, व एका बाल्कन बोल्शेव्हिक पुढाऱ्याचीही सही आहे. दुसरी गोष्ट ही कीं, सामाजिकवादी पक्षाला आपलीं मतें व्यवहाराला लागू करण्याची सल्ला व संधि या वेळींच प्रथम आलीं असल्यानें, त्यांच्या या कार्यक्रमाला तात्त्विकपेक्षां व्यावहारिक स्वरुप जास्त आलें आहे. तिसरी गोष्ट ही कीं, हा कार्यक्रम बोल्शेव्हिक पक्ष अधिकारारुढ झाल्यावर वर्ष-सवा वर्षानें निश्चित करण्यांत आलेला आहे. अर्थातच या काळांत आलेल्या राजकारणांच्या थोड्याबहुत अनुभवाचा परिणाम तो ठरविणारांवर झालेला आहे.

या जाहिरनाम्यांसंबंधांत पहिली लक्षांत येण्यासारखी गोष्ट ही आहे कीं, तो 'सर्व राष्ट्रांतील कामकऱ्यां'ना संबोधून लिहिला आहे. त्यांत प्रारंभींच " We Communists, representatives of the revolutionary proletariat of the different countries of Europe, America and Asia, assembled in soviet Moscow, feel and consider ourselves followers and fulfillers of the programme proclaimed seventy two years ago.'

अशी सलामी दिली आहे. संस्कृत नाटकांत ज्याप्रमाणें नांदीत पुढील सर्व कथानक बीजरुपानें येत असतें, त्याप्रमाणें या एका वाक्यांत एकप्रकारें पुढील सर्व जाहीरनाम्याचें सार आलें आहे. यूरोप, अमेरिका व एशियांतील निरनिराळ्या देशांच्या कामकऱ्यांचे आपण प्रतिनिधि असल्याचें अर्थात् त्यांचे हित आपल्या डोळ्यांसमोर

असल्याचें, प्रथम जाहीर करण्यांत आलें आहे. ' Communist ' या शब्दानें आपलें अंतिम ध्येय व्यक्त केले आहे. ' Revolutionary' क्रांतिकारक या विशेषणानें आपला मार्ग सूचित केला आहे. ' Fulfiller' ' सिद्धीला नेणारे' या शब्दानें यशाविषयींचा दृढ आत्मविश्वास प्रकट केला आहे. 'Programme proclaimed seventy two years ago' या पदानें आपली गुरुपरंपरा दाखविली आहे. आम्ही नवीन मत प्रतिपादन करणार नसून ७२ वर्षांपूर्वी ( सन १८४७ त ) मार्क्सनें काढलेल्या जाहीरनाम्यांतला कार्यक्रमच अनुसरणार व शेवटास नेणार आहोंत, असें आपल्या कार्यक्रमाचें सामान्य स्वरुप ध्वनित केलें आहे.

या जाहिरनाम्यांत कार्यक्रम सांगण्यापूर्वीं आपलीं मतें व सिद्धांत यांचें सामान्यरुपानें दिग्दर्शन व समर्थन केलें आहे. प्रथमारंभी नुकत्याच संपलेल्या युरोपियन युद्धाची मीमांसा करुन त्याचे परिणाम दर्शविले आहेत. सामाजिक वादाने या युद्धाचें भविष्य कित्येंक वर्षांमागेंच केलें होतें. भांडवलशाहीच्या व वसाहतीविषयींच्या हांवीचा हें युद्ध हा अनिवार्य परिणाम होता. यूरोपांतील भांडवलशाहीनें सर्व जगांतील देशांना आपल्या भोंवऱ्यांत ओढून घेतलें आहे. त्यामुळे मूळांत यूरोपांतच तिचा उच्छेद झाल्याशिवाय इतरांची सुटका नाहीं. कम्यूनिस्ट पक्ष या उच्छेदाची सर्व राष्ट्रांत तयारी करीत आहे. ती होऊन कामकऱ्यांची अनिर्बंध सत्ता यूरोपांत स्थापन झाली म्हणजे तीच घटका या वसाहतीच्या दास्यविमोचनाची होईल. Colonial slaves of Africa and Asia ! The hour of Proletarian Dictaorship in Europe will also be the hour of your liberation! ' असें आश्वासन या जाहीरनाम्यांत वसाहतींना दिलेले आहे.

या युद्धानें यूरोपांत दैन्य व दुष्काळ पसरविलाच आहे, वसाहतींतही खळबळ उडवून दिली आहे. व सर्वांत महत्त्वाची गोष्ट ही कीं, समाजांतील आर्थिक सूत्रें लष्करी सत्तेच्या हातांत सोंपविली आहेत. आतां क्रान्तीशिवाय उद्धाराचा उपाय नाहीं. तिला आतांच्यासारखी अनुकूल संधि यावयाची नाहीं.

या क्रान्तीचे कम्यूनिस्ट कामकरी हेच प्रवर्तक होण्यास समर्थ व योग्य होत. त्यांनी ही क्रान्ती घडवून आणिल्यानंतर, नवीन युगाला अनुरुप अशी नवीन शासनपद्धति सुरु करावी लागेल. ती सोव्हिएट–पद्धति होय.

या क्रान्तींत राष्ट्रांत अंतर्गत यादवी होणें अनिवार्य आहे. जुन्या भांडवलवाल्यांचें व कामकऱ्यांचें, शेतकऱ्यांचे व जमीनदारांचें, शिपायांचें व अधिकाऱ्यांचें आपसांत युद्ध जुंपेल. त्यांत स्वत:चें संरक्षण करण्यासाठीं व भावी समाज-रचना स्थिर

करण्यासाठीं, प्रतिपक्षी जे भांडवलवाले यांना नि:शस्त्र करणें व कामकऱ्यांना शस्त्रें पुरविणें, आवश्यक आहे. हे युद्ध होय, स्वातंत्र्याच्या रिकामपणाच्या गप्पा नव्हेत.

सरतेशेवटीं कामकऱ्यांनीं आपल्या चळवळींचें क्षेत्र एकाच राष्ट्रापुरतें संकुचित न ठेवतां, सर्व राष्ट्रांतील कामकऱ्यांचा एक संघ केला पाहिजे. या संघाचें कार्य यशस्वी होण्यास, भांडवलशाहीच्या युद्धांत त्याला यश येण्यास, प्रथमत: कामकऱ्यांपैकीच मवाळ, ( Centre ) शत्रूंशी तडजोड करणाऱ्या पक्षाचें निर्दलिन केलें पाहिजे. या सर्वासाठीं कम्यूनिस्ट कामकऱ्यांचा आंतरराष्ट्रीय संघ स्थापला पाहिजे. ' Under the standard of the workmen's Councils, under the banner of the third International, in the revolutionary struggle for power and the Dictatorship of the Proletariat, proletarians of all countries-unite ! ' मार्क्सच्या जाहीरनाम्याप्रमाणेंच, याही जाहीरनाम्यांत कामकऱ्यांना शेवटचा उपदेश हाच केला आहे की – एक व्हा !

हा आंतरराष्ट्रींय चळवळीचा उपदेश लेनिन व त्याचें सरकार किती उत्साहानें पाळीत आहे हें सांगावयाला नको.

यानंतर या पक्षाचा कार्यक्रम रेखाटण्यांत आला आहे. 'भांडवलाचें वर्चस्व नाहींसें करावें, युद्ध होणें अशक्य करावें, निरनिराळ्या राष्ट्रांतील मर्यादा नाहींशा कराव्या, सर्व जगाचें एक संयुक्त राष्ट्र बनवावें, व अशा रीतीनें मानवी समाजांत खरोखरचा बंधुभाव व स्वतंत्रता निर्माण करावी' असा आपला उद्देश जाहीर करुन, तत्प्रीत्यर्थ राजसत्ता प्रथम हातीं घेण्याची सूचना केली आहे. हातीं सत्ता आल्यावर पूर्वींची राज्यपद्धत मोडून गांवोगांवीं कामकरी-नियुक्त सोव्हिएटें स्थापन करावींत, या सोव्हिएटांत औद्योगिक कामकरी-वर्गाला जास्त सवलती व हक्क असावेत, कारण हा वर्गच सर्व कामकऱ्यांत जास्त सुसंघटित, स्वाभिमानी, कलहोद्यत आणि क्रान्ति करण्यास समर्थ आहे. त्याच्या नेतृत्वाखालीं इतर उदासीन कामकरी, व लहान लहान शेतकरी भांडवलवाल्यांशीं लढण्यास तयार होतील.

औद्योगिक बाबतींत नवीन कामकरी-सरकारनें मोठमोठ्या सर्व बँका आपल्या कबज्यांत घ्याव्या, ट्रस्ट व सिंडिकेटच्या स्वरुपाचे औद्योगिक कारखाने, त्याचप्रमाणें ज्या इतरही उत्पादक-कारखान्यांचें स्वरुप व प्रमाण सोइस्कर असेल ते कारखाने सरकारी मालकीचे करावेत, आणि मोठमोठ्या शेतकीच्या जमिनी अशाच सरकारी स्वामित्वाखालीं घेऊन सहकारी संस्थांकडून हांकवाव्या.

ही गोष्ट विशेष लक्षांत घेतली जावी कीं, लहान लहान खातेवाल्यांकडून त्यांच्या जमिनी काढून घेतल्या जाऊं नयेत, त्याचप्रमाणें जे लोक हाताखाली मजूर ठेवून, त्यांच्या श्रमाचा नफा लाटीत नाहींत त्यांची मालमत्ता जप्त केली जाऊं नये. इतरांचें उदाहरण पाहून, नवीन समाजरचनेंतील लाभ ध्यानांत येऊन, राष्ट्रीय कर्ज रद्द झाल्यामुळें, व खर्डे सैन्य खारिज झाल्यामुळें कराचा बोजा कमी झालेला पाहून ह्या लोकांना आपण होऊन कामकरी पक्षाला येऊन मिळण्याची संधि द्यावी.

कारखान्यांच्या व्यवस्थेसाठीं कामकऱ्यांचे लोकनियुक्त बोर्ड स्थापले जावेत.

नवीन पद्धतींत कुशल, अनुभविक, व शिकलेल्या तज्ज्ञांचा व निष्णातांचा उपयोग करुन घेतला जावा. मात्र ही खबरदारी घेतली जावी कीं, हे लोक राजकीय दृष्ट्या प्रतिकूल राहूं नयेत, व नवीन औद्योगिक व्यवस्थेंत मन:पूर्वक काम करण्यास त्यांनी तयार व्हावें. या व्यवस्थेंत खाणी, कारखाने, मोठमोठ्या इस्टेटी तर सरकारी कराव्यातच, परंतु जमीनदारांचे व कारखानदारांचे मोठमोठे वाडे सोव्हियटांच्या बैठकीला द्यावेत, व श्रीमंतांच्या घरांतून गरीबांना राहण्याला जागा द्यावी.

तयार झालेल्या मालाची श्रमानुरुप वांटणी करण्याची व्यवस्था करावी. यासाठीं लोकांच्या जुन्या सहकारी संस्था, व सरकारचीं आणि म्युनिसिपालिट्यांचीं अशा स्वरुपाचीं खातीं, यांचा उपयोग करुन घ्यावा.

अशी या कार्यक्रमाची स्थूल रुपरेषा आहे. आतां शेवटी वर दोन तीन वेळां उल्लेख केलेल्या सोव्हियटांची व कामकरी सरकाराची रचना कशा प्रकारची आहे हें सांगून हा भाग संपवूं. सन १९२० त झिनॉफिफ यानें आपल्या पक्षाच्या वतीनें प्रसिद्ध केलेल्या पत्रकांत ही रचना दिली आहे.

सोव्हिऐट हें या सरकाराचें सर्वांत लहान अंग आहे. प्रत्येक गांवाला एक एक सोव्हियट दिलेली आहे. ही सोव्हियट म्हणजे गांवांतील औद्योगिक कामकऱ्यांच्या, शेतकऱ्यांच्या व कामकरी पक्षाच्या शिपायांच्या प्रतिनिधींचें कौन्सिल होय. ही सोव्हियटें दोन प्रकारचीं आहेत; एक शहरांतील व दुसरीं खेडेंगांवातील. शहरांतील सोव्हियटांत प्रत्येक फॅक्टरींतील कामकऱ्यांचे संख्येनुरुप प्रतिनिधि असतात. कामकऱ्यांचे संघाकडूनही प्रतिनिधि यांत घेतले जातात. शिपायाचे प्रतिनिधि पलटणीवार घेतले जातात. खेडेंगांवाच्या सोव्हियटांत एकाच गांवांतील, किंवा प्रसंगी एकाहून अधिक गांवांच्या गटांतील, शेतकऱ्यांचे प्रतिनिधि असतात.

या सोव्हियटांच्या निवडणुकींत फक्त शेतकऱ्यांस व कामकऱ्यांसच मतदानाचा अधिकार असतो. पुढें दिलेल्या लोकांना हा अधिकार ठेवलेला नाहीं :—

(१) नफ्यासाठीं रोजीन्यावर मजूर लावणारे लोक.
(२) अकष्टार्जित उत्पन्नावर (unearned income) राहणारे लोक.
(३) खासगी व्यापारी.
(४) धर्मोपदेशक.
(५) माजी पोलिस-हस्तक.
(६) वेडे आणि अज्ञान.
(७) कांहीं विशेष गुन्ह्यासाठी कांहीं कालासाठीं मताधिकार काढून घेतलेले लोक.

राष्ट्रीय धोरणाला अनुसरुन या सोव्हियटांना गांवांची सर्व व्यवस्था करण्याचा पूर्ण अधिकार असतो. कायदे करण्याचें त्याचप्रमाणें त्यांच्या अंमलबजावणीचेंही काम सोव्हियटांनाच करावें लागतें.

गांव सोव्हियटांच्या प्रतिनिधींचे मध्यवर्ती कौंटी (परगणा) सोव्हियट असतें. व अशा कौंटी सोव्हियटांच्या प्रतिनिधींचे मिळून प्रांत-सोव्हियट तयार होते.

प्रत्येक सहा महिन्यांनी निरनिराळीं प्रांत सोव्हियटें व शहर सोव्हियटें निखिल-रशिया-सोव्हियट परिषदेसाठी प्रतिनिधि निवडून देतात. ही परिषद् देशांतील मुख्य शासनसंस्था होय. ती पुढील सहा महिन्यांसाठीं देशाचें राजकीय व इतर धोरण ठरविते. व तें अमलांत आणण्यासाठीं आपल्याचपैकी दोनशें जणांची एक मध्यवर्ती कार्यकारी कमिटी निवडते. ही परिषद् याच वेळीं कॅबिनेट किंवा प्रधानमंडळाचीही निवडणूक करते. या मंडळाला 'पीपल्स कमिसरीज' म्हणतात, व त्यांच्याकडे राज्यकारभाराचीं निरनिराळी खातीं सोंपविलेलीं असतात.

मध्यवर्ती कार्यकारी कमिटीला हे प्रधान वाटेल तेव्हां खारिज करता येतात, आणि प्रत्येक मतदारसंघाला गांव किंवा वरिष्ठ सोव्हियटमधला आपला प्रतिनिधि परत बोलावतां येतो.

याप्रमाणें सोव्हियटांच्या द्वारानें राजकीय व्यवस्था करण्यांत आली आहे. औद्योगिक व्यवस्थाही अशाच रीतीनें लोकसत्तेच्या तत्त्वावर केलेली आहे. रशियांतील सर्व कामकऱ्यांचे 'औद्योगिक' संघ कायम केले आहेत. अशा संघांत एका कारखान्यांतील

सर्व प्रकारच्या कामकऱ्यांचा एकच संघ बनतो. उदाहरणार्थ, पितळेच्या भांड्यांच्या कारखान्यांत, तेथील सुतार, चितारी व इतर कामकरी यांचा एकच संघ तयार होईल. प्रत्येक फॅक्टरीचा असा एक एक संघ बनतो. या संघाचे सभासद आपली कार्यकारी कमिटी निवडतात.

रशियांतील महत्त्वाच्या बहुतेक सर्व फॅक्टरी राष्ट्रीय मालकीच्या करण्यांत आल्या असल्यानें या संघाकडे आतां पूर्वीसारखें कारखानदार मालकांशीं भांडण्याचें काम उरलेलें नाहीं. कारखाना चालविण्यांतच आपल्या सर्व शक्ती त्यांना आतां लावितां येतात.

या संघाची दरवर्षी एक कनव्हेनशन भरते. तींत एक मध्यवर्ती कार्यकारी कमिटी व एक स्केल-कमिटी निवडण्यांत येते. ही स्केल कमिटी निरनिराळ्या धंद्यातील सर्व प्रकारच्या कामकऱ्यांच्या पगाराचें मान ठरवून देते.

सरकारच्या प्रधान मंडळात औद्योगिक विभागाचा प्रधान निवडतांना संघाचीं संमति घ्यावी लागते. या प्रधानाच्या सहायाला एक लोकनियुक्त कौन्सिल दिलेलें असतें. या कौन्सिलाचे विभाग करुन देशांतील निरनिराळ्या उद्योगधंद्यांची देखरेख त्यांच्याकडे दिलेली असते. संघाच्या संमतीनें आपल्या हाताखालीं तज्ज्ञ व निष्णात नेमून, हें कौन्सिल देखरेखीचें काम करतें.

कारखान्यांतील कामाची व्यवस्था तिघांजणांची कमिटी मिळून करते. या कमिटींत एक प्रतिनिधि कारखाना-संघाच्या कार्यकारी कमिटीनें, एक मध्यवर्ती कार्यकारी कमिटीनें, व एक वरील कौन्सिलानें निवडून दिलेला असतो.

याप्रमाणे आतापावेतों बोल्शेव्हिक पंथाचीं मतें, कार्यक्रम व त्यांचें राज्यव्यवस्थेचें मुख्य अंग जें सोव्हियट, यांचे थोडक्यांत वर्णन केलें. त्यावरुन सशस्त्र राजकीय क्रान्ति, कांहीं कालासाठीं कामकऱ्यांचीं अनिर्बंध सत्ता, व शेवटी शासनरहित सामुदायिक समाजव्यवस्था, ह्या तीन सूत्रवाक्यांत या पंथाच्या सर्व मतांचें व कार्यपद्धतीचें सार येतेंसें दिसून येईल. यापैकीं पहिल्या सूत्रवाक्यांत बोल्शेव्हिक पंथाचा व संघवादाचा मतभेद व्यक्त झाला आहे. संघवाद राजकारणापासून सर्वस्वी अलिप्त राहून, केवळ सांघिक चळवळीनें, सार्वत्रिक संपाच्या द्वारानें, क्रान्ति घडवूं चाहतो. बोल्शेव्हिक पंथाला सार्वत्रिक संपाची उपयुक्तता कांहीं विशिष्ट मर्यादे पावेतों मान्य आहे, पण प्रथम तर खरोखर परिणामकारक सार्वत्रिक संप घडवून आणण्यास देशांतील कामकऱ्यांत फारच चांगलें संघटन झालें पाहिजे, व ते कालावधीचें कार्य आहे; व असें संघटन होऊन,

संप घडला तरी त्यानें भांडवलशाही सरकारची लष्करी सत्ता उलथून पाडतां यावयाची नाहीं, असें त्यांस वाटतें. म्हणून त्यांस हा संपाचा मार्ग गौण वाटतो.

वरील दुसऱ्या सूत्रवाक्यांत बोल्शेव्हिक पंथ व अराजक पंथ यांच्यामधला मतभेद ग्रंथित झाला आहे. दोघांनाही सशस्त्र राजकीय क्रान्ति पाहिजे आहे. पण ती झाल्यानंतर लागलींच समाजांत शासनरहित सामुदायिक व्यवस्था केली जावी असें अराजकांचें मत आहे. बोल्शेव्हिकांनाही ही व्यवस्था केली जावी असें अराजकांचें मत आहे. बोल्शेव्हिकांनाही ही व्यवस्था इष्ट आहे, पण क्रान्तीनंतर लागलीच ती स्थापणें त्यांस शक्य वाटत नाही. समाजांत ती शक्य होण्यापूर्वी कांहीं काळ लोटावा लागेल, व त्या संक्रमण काळांत कामकऱ्यांचें अनिर्बंध शासन राहिलें पाहिजे, एरवीं पुनः प्रतिक्रान्ति होऊन पूर्वींचे भांडवलशाही सरकार स्थापन होईल अशी त्यांस खात्री वाटते.

बोल्शेव्हिकांच्या या कामकऱ्यांच्या अनिर्बंध शासन-सिद्धांतावर हल्लीं चोहोंकडून झोड उडविण्यात येते. परंतु ह्या संबंधांत ही गोष्ट ध्यानात घेण्यासारखी आहे कीं, हा सिद्धांत त्यांनीं नवा काढलेला नाहीं. ते स्वतः तर हा मार्क्सचाच सिद्धांत आहेसें म्हणतातच, पण मार्क्सच्या खऱ्या सिद्धांताविषयींचा कांहीजणांस शंका वाटत असल्यानें, त्याला बाजूला ठेवलें तरी, बोल्शेव्हिकांपूर्वीही हा सिद्धांत मांडला गेला होता, इतकेंच नव्हे तर अंमलातही आला होता. कोणतीही गोष्ट जुनी असली म्हणजे चांगलीच असते असें नाहीं, पण तेवढ्यावरुन तिचा दुष्टपणा किंवा वाईटपणा निदान अपूर्व तरी नाहींसे सिद्ध होतें. सन १७८९ मधील राज्यक्रान्ति कामकऱ्यांची नव्हती, ती त्यावेळच्या मध्यम वर्गातल्या चहात्यांनीं केली होती. पण त्यावेळींही, हल्लीं बोल्शेव्हिक जसे आपल्या पक्षाची अनिर्बंध सत्ता असवीसें म्हणतात, त्याप्रमाणेंच या क्रान्तिकर्त्यांनी आपली अनिर्बंध सत्ता समाजांत चालू ठेवली होती. सर्व क्रान्तिकारकांना असेंच वागावें लागतें. सन १८६९ त लुई ब्लँकी नांवाच्या सामाजिकवादी पुढाऱ्यानें याच्या कारणांची मीमांसा अशी केली आहे :– 'जर क्रान्तीनंतर लागलीच निवडणूक केली तर तिचा परिणाम दोहींपैकीं एक खास होईल. एक जबरदस्ती करुन आपल्या पक्षाला मताधिक्य मिळवावें लागेल, किंवा दुसरें, पूर्वीची राजसत्ता पुनः कायम तरी होऊं द्यावी लागेल. जर जबरदस्ती केली, तर मूळांत समाजांत आपली अल्पसंख्या होती असें कबूल केल्यासारखें होतें. पण वस्तुस्थिति अशी नसते. मागील राजसत्तेच्या दराऱ्यानें व दीर्घकालीन मुस्कटदाबीनें बहुतेक लोकांची अशी स्थिति झालेली असते की, त्यांना स्वतंत्र इच्छाशक्तिच उरलेली नसते. ते स्वतंत्र मतदार नसून, परतंत्र गुलामच असतात ! ' म्हणून अशा लोकांच्या मनावरचे दडपण नाहींसें होऊन त्यांना खरे इच्छास्वातंत्र्य येईपावेतों मताधिकारच देऊन उपयोगाचा नाहीं. त्यांच्या कल्याणासाठीं त्यांना या अधिकारापासून अलिप्त ठेवलें पाहिजे. एरवीं ते आपल्याच हातानें आपणाला पुनः बंधनांत घालून घेतील.

सारांश, बोल्शेव्हिकांचें हें मत पूर्वापार चालत आलें आहे; बहुतकरुन पुढेंही जेथें जेथें क्रान्ति घडेल, तेथे त्याचाच अवलंब करावा लागेल, असें इतिहासावरुन म्हणावें लागतें.

बोल्शेव्हिक सरकारवर दुसरा मोठा आक्षेप हा आहे कीं, ते आपल्याविरुद्ध मताची पूर्वींची वर्तमानपत्रें प्रसिद्ध होऊं देत नाहींत. या आक्षेपाला ह्या सरकारचे उत्तर अगदी साधें आहे. एक तर इतर सर्व राष्ट्रांनींही युद्धकाळांत वर्तमानपत्रांवर कडक नियंत्रण ठेवलें होतें. तोच कित्ता बोल्शेव्हिक सरकार हल्लीं गिरवीत आहे. कारण त्यांचेंहि भांडवलशाहीशीं युद्ध अजून संपलेले नाहीं. दुसरें व जास्त मूलभूत कारण असें की, वर्तमानकाळांत पाश्चात्य देशांत वर्तमानपत्राची संस्था देखील भांडवली झाली आहे. बरेंच मोठें भांडवल हाती असल्याशिवाय, आरंभी मोठा तोटा सोसण्याची तयारी असल्याशिवाय, हल्लीं तिकडे वर्तमानपत्र काढणें व चालविणें अशक्य झालें आहे. त्यामुळें इतर भांडवली संस्थांबरोबर ही पूर्वींची भांडवली वर्तमानपत्राची संस्थाही बंद करणें बोल्शेव्हिक सरकारचें एक कर्तव्यच झालेलें आहे.

बोल्शेव्हिक मतांचे व त्याबरोबर सामाजिक वादांतील निरनिराळ्या पंथांच्या रुपांचे विवेचन येथें संपलें. यापुढच्या व शेवटच्या प्रकरणांत हिंदुस्थानच्या सद्य:स्थितीवर एतद्विषयक मतांचा व चळवळींचा कोणता परिणाम होण्याचा संभव आहे याचा थोडक्यांत विचार करुं.

---

## प्रकरण ९ वें

# उपसंहार.

गेल्या आठ प्रकरणांत सामाजिक वादाच्या उत्पत्तींचीं कारणें, व त्यांतील निरनिराळी मतें, यांचा आपण विचार केला. आता या शेवटच्या उपसंहारात्मक प्रकरणांत या सर्व भिन्न मतमतांतरांचा निष्कर्ष काढून, हिंदुस्थानच्या विशिष्ट परिस्थितीच्या व पूर्वपरंपरेच्या दृष्टीनें त्याचा थोडक्यात विचार करण्याचें योजिलें आहे.

सामाजिकवादाचें स्वरुप मुख्यत: आर्थिक आहे हें सांगावयास नको. समाजाची सर्व रचना, त्यांतील कायदे, राज्यपद्धति, रीतिरिवाज, फार काय धर्म व तन्त्वज्ञान, यांच्याही मुळाशीं सांपत्तिक कारणे असतात असा सामाजिक वादांतील मतांचा सामान्य सिद्धांत आहे. म्हणून ज्याला समाजाची भौतिक सुधारणा घडवून आणावयाची असेल त्यानें हीं सांपत्तिक कारणे शोधून काढून त्यांच्यावर उपाय-योजना केली पाहिजे. वर्तमान स्थितींत समाजांतील बहुसंख्यांक वर्गाच्या दु:खाचें कारण हल्लींची उद्योगपद्धती आहे. या पद्धतींत एकाच्या श्रमाचे फळ दुसरा लुटतो. नफा, भाडें, व्याज, हीं या लुटीची निरनिराळी रुपें आहेत. ही लूट, ही चोरी चालूं दिल्यानें समाजांत संपत्तीची विषम वांटणी होते, व कलहाचें बीज पेरलें जाते. तिने समाजांत वर्गभेद माजून, एका वर्गाचा दुसऱ्यावर जुलून सुरु होतो, राष्ट्राराष्ट्रात युद्धे जुंपतात. सारांश, हल्लींच्या सर्व सामाजिक अनर्थपरंपरेचें मूळ कारण वर्तमान उद्योगपद्धति आहे याबद्दल सामाजिक वादांतील सर्व मतांत एकवाक्यता आहे.

अर्थातच ही अनर्थपरंपरा नाहींशी करण्यासाठीं हल्लींची उद्योगपद्धति मोडून टाकली पाहिजे असें यावरुन साहजिकच अनुमान निघतें. ती कशी मोडावयाची हा सामाजिकवादापुढचा मुख्य प्रश्न आहे. प्रथमदर्शनीं हल्लींची निरनिराळी यंत्रें व प्रचंड कारखाने हें या पद्धतीचें मुख्य व सारभूत अंग दिसतें. म्हणूनच सामाजिकवादी नसलेल्या परंतु वर्तमान उद्योग-पद्धतिला सर्व सामाजिक दु:खांचे आदिकरण मानणाऱ्या, कित्येक विचारी पुरुषांनीं हीं सर्व यंत्रें व कारखाने नाहींसे करुन टाकण्याचा उपाय सुचविला आहे. पुष्कळ इतर बाबतींप्रमाणें, याही बाबतींत Back to Nature पुन: मूळच्या निसर्गावस्थेकडे गेलें पाहिजे असें त्यांचें मत आहे.

परंतु सामाजिक वादाचें सामान्यत: असें मत नाहीं. यंत्रें व कारखाने यांच्यापासून मनुष्यांचे पुष्कळ श्रम वांचतात. हल्लींच्या उद्योग-पद्धतींतले विषबीज या यंत्रांत किंवा कारखान्यांत नाहीं, तर त्यांच्यांत उत्पन्न झालेल्या मालाची जी वांटणी होते तिच्यांत आहे. मालाच्या उत्पत्तीची पद्धत चुकीची नाही. त्याच्या वांटणीचा प्रकार अन्यायाचा आहे. म्हणून यंत्रें व कारखाने कायम ठेवून, ही अन्यायाची वांटणी तेवढी बंद करावी, असा सामाजिकवादाचा उपदेश आहे.

सामाजिक वादाचा हा विशेष ध्यानांत ठेवण्यासारखा आहे. यंत्रें व कारखाने जे एकदां निर्माण झाले ते आतां कायमचे राहिले पाहिजेत, व राहणार. इतकेंच नाही, तर हल्लीं हातांनीं होणाऱ्या पुष्कळशा किळसवाण्या कामासाठीं नवीन यंत्रें शोधून काढावीं लागतील. उद्योगधंद्यांना पूर्वीचें घरगुती व लहानगें स्वरुप पुन: येणे शक्य नाही व आवश्यकही नाहीं असें सामाजिक वादाचें म्हणणें आहे.

तेव्हां यंत्रें व माल तयार करण्याची विद्यमान पद्धत कायम ठेवून त्या मालाची हल्लीं होणारी अन्यायाची वांटणी मात्र बंद केली पाहिजे. त्यासाठीं कारखान्यांत व शेतांत काम करणारे निराळे व त्यांची मालकी असणारे निराळे, असा जो हल्लीं प्रकार सुरु आहे तो बंद झाला पाहिजे. कारखाने व जमीन सामाजिक मालकीची करण्यांत यावी, जे त्यांत काम करतील त्यांनींच त्याची संपूर्ण व्यवस्था ठेवावी, व जो माल तयार होईल तो आपसांत वांटून घ्यावा. समाजाच्या पुनर्रचनेस अशा रीतीनें सुरुवात केली जावी.

समाजाची एकंदर रचना सामवायिक ( Communistic) व्हावी हा सामाजिक वादाचा मध्यवर्ती सिद्धांत आहे. समाजांत हल्लीं प्रत्येक व्यक्तीची अलग अलग खासगी मालमत्ता असते, त्यानेंच स्वार्थ व दुही माजते, कलह सुरु होतो, व सर्व अनर्थमालिका उद्‌भवते. म्हणून हा खासगी–वैयक्तिक–मालमत्तेचा प्रकार, व तिलाच

चिकटून असणारा वारशाचा हक्क बंद करुन टाकला पाहिजे. सर्व समाज म्हणजे मोठें थोरलें संयुक्त कुटुंब मानलें जावें. सर्व कारखाने व जमीन या कुटुंबाच्या सामवायिक मालकीची असावी. त्या कारखान्यांत व जमिनींत सर्वांनी आपापल्या मगदराप्रमाणें काम करावें. ज्या भोग्य वस्तु तयार होतील त्यांवर कुटुंबाची सामवायिक मालकी रहावी; व त्यांतून ज्याला जें लागेल तें सवडीप्रमाणे व आवश्यकतेप्रमाणें दिलें जात जावें.

ह्याप्रमाणे समाजाची कौटुंबिक रचना करण्याचे समाजवादातील सर्व मतांचे सामान्य ध्येय आहे. तें ध्येय प्राप्त करुन घेण्याचे मार्ग व उपाय व तदंगभूत गोष्टी यासंबंधांतच या निरनिराळ्या मतांत भेद आहे. सेंट सायमन किंवा फोरियरप्रमाणें श्रीमंत लोकांच्या व राज्यकर्त्यांच्या द्रव्यानें व सहायानें ही सुधारणा घडवून आणण्याचें आतां कोणाच्या स्वप्नातही येत नाहीं हें खरें. तथापि राजकीय चळवळ करुन, पार्लमेंटातून आपले मताधिक्य करुन व अधिकार मिळवून, इष्ट सुधारणा घडवून आणाव्यात, असा पुष्कळ मार्क्सपंथाच्या जुन्या अनुयायांचा आग्रह आहे. सामाजिक वादांतले हे एकप्रकारें मवाळ पुराणमताभिमानी लोक आहेत. परंतु संघवादकांसारख्यांना ही राजकीय किंवा पार्लमेंटरी चळवळ पसंत नसून, कामकऱ्यांनीं आपले संघ स्थापून, सार्वत्रिक संपाच्या द्वारे समाजांत खळबळ उडवून देऊन इष्ट सुधारणा जबरदस्तीनें घडवून आणली पाहिजे असें वाटतें.

इष्ट स्थिति जबरदस्तीनें, सशस्त्र क्रान्तीनें, प्राप्त करुन घ्यावी, किंवा शांतपणें, सनदशीर उपायांनी क्रमशः सुधारणा करीत जाव्या; समाजांत आदर्शरुप रचना एकदम सुरु करावी, किंवा पायरीपायरीनें तिला जाऊन पोहोंचावें, हे दुसरे मतभेदाचें प्रश्न आहेत. बोल्शेव्हिकांसारख्या उत्साही, ताज्या रक्तांच्या, जहाल सामाजिकवाद्यांना सशस्त्र क्रान्तीशिवाय वर्तमान स्थिति बदलण्याला दुसरा उपायच दिसत नाहीं. कांहीं विशिष्ट मर्यादेपावेतों सनदशीर उपाय करण्याबद्दल त्यांची ना नाहीं, पण शेवटी केव्हांतरी सशस्त्र क्रान्तीचा अवलंब केल्याशिवाय हल्लींचे सत्ताधारीं विद्यमान समाजरचना बदलूं देणार नाहींत याविषयीं त्यांना तिळमात्र संशय वाटत नाहीं.

हा सशस्त्र क्रान्तीचा उपाय अराजकांना सर्वस्वीं मान्य आहे. क्रान्तीवरील त्यांचीही श्रद्धा तितकीच अढळ आहे. पण या क्रान्तीनंतर समाजांत एकदम आदर्शस्वरुप कौटुंबिक पद्धति सुरु करण्याचा त्यांचा आग्रह आहे. बोल्शेव्हिकांनाही ही पद्धति इष्ट आहे, पण ती एकदम सुरु करणें त्यांना व्यवहार्य वाटत नाहीं. जुन्या समाजरचनेच्या अभिमानी, तिच्यापासून फायदा असलेल्या, व्यक्तींचा विरोध पूर्णपणें नाहींसा करुन टाकण्यासाठी, व एकंदर समाजाची भावी आदर्श स्थितीला अनुरुप अशी पूर्व तयारी करण्यासाठीं, मध्यंतरीं कांहीं काळ लोटावा लागेल; व त्या काळांत पूर्ण आदर्शस्वरुप तर

नव्हे पण तत्सदृश अशी समाजरचना करणें आवश्यक होईल असें बोल्शेव्हिकांचें मत आहे.

समाजांत नियामक राजसत्ता असावी किंवा नाहीं ? असावी असें असल्यास ती कोणत्या स्वरुपाची असावीं ? या प्रश्नांवरही निरनिराळ्या मतांत बराच विरोध आहे. संघवादाचे सॉरेलसारखे पुढारी दूरवरच्या भविष्यत् काळाचा विचार करण्याचेंच अप्रयोजक व अनावश्यक म्हणून सोडून देतात; तर अराजकवादी समाजांत कोणत्याच प्रकारची शासनसत्ता किंवा व्यक्तींना त्यांच्या इच्छेविरुद्ध नियंत्रण करणारी शक्ति नसावी असें प्रतिपादितात. मार्क्स, लेनिन सारख्या पुढाऱ्यांना हें संमत आहे कीं समाजाच्या आदर्श स्थितींत सरकारची किंवा शासनसत्तेची जरुरत न राहून सर्व व्यवहार परस्परसंमतीनें चालावेत. राजसत्ता ही समाजांत वर्गभेद निर्माण झाल्यानंतर एका वर्गाचा दुसऱ्या वर्गावरील जुलूम चालू ठेवण्याला जन्माला आली; म्हणून जेव्हां भविष्यत् काळांत समाजांत सामवायिक कुटुंबपद्धति चालू होऊन वर्गभेद मोडतील, जेव्हा कलहाचें मूळ जी खासगी मालमत्ता तीच राहणार नाहीं तेव्हां राजसत्तेचें कारणच न उरुन ती आपोआप लयाला जाईल. कामकऱ्यांचे औद्योगिक संघ हे कारखान्याचे अंतर्गत व बाह्य व्यवहार परस्परसंमतीनें चालवितील. परंतु ही आदर्श स्थिति येण्यापूर्वीच्या संक्रमणकाळांत कामकरी वर्गाला राजसत्ता आपल्या हातांत ठेवून, प्रतिपक्षाचा विरोध नाहींसा करण्यांत व भावी स्थितीसाठीं समाजाची पूर्व तयारी करण्यांत, तिचा उपयोग करावा लागेल. या काळांत कामकरी वर्गानें प्रातिनिधिक राज्यपद्धति प्रचलित ठेवावी, पण समाजाची जशी जशी तयारी वाढत जाईल, तसें तसें राजसत्तेचें क्षेत्र संकुचित करीत जाऊन अखेरीस त्याची व्याप्ति शून्य बिंदूवर आणून ठेवावी.

याप्रमाणे अराजकवादी व मार्क्समतानुयायी बोल्शव्हिक या दोघांनाही समाजाचे सर्व व्यवहार शासनसत्तेशिवाय परस्परसंमतीने चालवण्याचें ध्येय मान्य आहे. पण एक तें लागलेंच अंमलात आणावेसें म्हणतो, तर दुसरा त्याला क्रमशः प्रचलित करण्याचे इच्छितो.

परंतु दुसऱ्या कित्येकांना सरकार किंवा शासनसत्ता केव्हांही अनावश्यक होईलसें वाटत नाहीं. मनुष्यस्वभावाचा विचार करतां, समाजांत नियंत्रण-शक्तीची सदाच जरुरत राहील. पण या शक्तीचें-सरकारचें-हल्लींचे स्वरुप त्यांना सदोष वाटतें. हल्लीं पार्लमेंटसारख्या एकाच संस्थेंत सर्व सत्ता एकवटली असून, तिच्यातील कांहीं मूठभर व्यक्ति समाजांतील सर्व व्यवहारांचें आपला प्रत्यक्ष हिताहितसंबंध असलेल्या व नसलेल्या दोन्ही व्यवहारांचे नियंत्रण करतात. हें अयोग्य आहे. म्हणून गिल्ड सामाजिकवादी

सुचवितात कीं समाजाचें औद्योगिक किंवा उत्पादक अंग इतर अंगाहून निराळे करावें; व त्याची संपूर्ण व्यवस्था त्यांतील कामकरी वर्गानें आपल्या प्रतिनिधींची गिल्ड-काँग्रेस नेमून तिच्या द्वारें ठेवावी. इतर अंगांची व्यवस्था समाजानें उपभोक्ता या नात्यानें एक पार्लमेंट-प्रतिनिधिसभा-निवडून तिच्या मार्फत करावी. दोन्ही अंगांना सामान्य असलेले, किंवा गिल्ड-काँग्रेस व पार्लमेंट यांच्यातील मतभेदाचे, प्रश्न दोन्ही संस्थांच्या संयुक्त कमिटीनें निकालांत आणावेत.

या शासनसत्तेच्या प्रश्नाला अनुलक्षूनच, समाजांत काम करण्याची सक्ति असावी किंवा नाहीं, हा प्रश्न उद्‌भवतो. बहुतेक सर्व सामाजिकवादी याचें होकारार्थी उत्तर देतात. ही सक्ति प्रत्यक्ष करावी असें ते म्हणत नाहींत; पण जो काम करील, निदान काम करण्यास तयार असेल, त्यालाच समाजांतील भोग्य वस्तु दिल्या जात जाव्या, अशी त्यांची योजना असल्यानें, काम करण्याची ही अप्रत्यक्ष सक्तिच होय. अराजकवाद्यांना एवढी सक्तीही पसंत नाहीं. कोणालाही उपासमारीच्या भीतीनें त्याच्या इच्छेविरुद्ध काम करण्यास लावणें हा जुलूम होय असें त्यांचें मत आहे. कोणीही काम करो वा न करो, त्याला आवश्यक भोग्य वस्तु समाजानें पुरवल्याच पाहिजेत. मनुष्यस्वभावच असा आहे कीं, त्याला काम केल्याशिवाय चैन पडत नाहीं. त्याला अनुसरुनच प्रत्येकजण बाह्य सक्तीशिवाय काम करील. बोल्शेव्हिकांनाही तें तत्त्व मान्य आहे. पण इतर बाबतींप्रमाणेंच तें एकदम अंमलांत आणतां येण्यासारखें त्यांस वाटत नाहीं. संक्रमण काळांत जो काम करील त्यालाच भोग्य वस्तु दिल्या जात जाव्या, पण पुढें आदर्शस्थितींत मात्र कोणावरही कसलीही सक्ति न ठेवतां, ज्याला जें हवे तें आवश्यकतेनुरुप पुरविलें जावें असें त्यांचें मत आहे.

ही एका समाजा किंवा देशापुरती व्यवस्था झाली. परंतु ती सुरळित चालण्यास त्या देशावर बाहेरुन आक्रमण न होणें आवश्यक आहे. एवढ्यासाठीं बाहेरच्या सर्व देशांतून या व्यवस्थेविषयीं एक तर सहानुभूति असली पाहिजे, किंवा परस्परांच्या चुरशीनें ते असें आक्रमण करण्यास असमर्थ तरी असले पाहिजेत. वस्तुतः कोणत्याही एका देशात सामवायिक पद्धत उत्तम प्रकारें प्रचलित होण्यास, ती इतर सर्व देशांतूनही प्रचलित होणें जरुर आहे. दळणवळणांच्या आधुनिक साधनांनीं जगांतले सर्व देश इतके परस्परनिगडित झालेले आहेत कीं अशी अर्पूव सामाजिक व सांपत्तिक क्रान्ति कोणत्याही एका देशात टिकून राहण्यास इतर सर्व देशांतून ती थोड्या-फार प्रमाणांत व्हावयाला पाहिजे. म्हणूनच अगदीं पहिल्यापासून सामाजिकवादाच्या प्रवर्तकांचें सर्व देशांचा एक एकतत्वानुयायी स्नेहसंबद्ध संघ निर्माण करण्याचे ध्येय व महत्त्वाकांक्षा राहत आली आहे. 'सर्व देशच्या कामकऱ्यांनो, एक व्हा ' या मार्क्सच्या प्रसिद्ध उपदेशांत हें ध्येयच प्रतिबिंबित झालें आहे. आपल्या मतांचा एवं जगभर प्रसार करण्याचा बोल्शेव्हिकांचा जो

आटोकाट प्रयत्न चालू आहे त्याचें हें रहस्य आहे. पूर्वी मार्क्सनें सुरु केलेला व हल्लीं बोल्शेव्हिकांनी पुन: उज्जीवित केलेला 'आंतरराष्ट्रीय' (संघ) याच हेतूनें प्रवर्तित झालेला आहे. राष्ट्राराष्ट्राच्या भौगोलिक मर्यादा या केवळ व्यवस्थेच्या सोयीसाठी कायम राहाव्यात. एरवी सर्व जगाचा एक सामवायिक कुटुंबसंघ निर्माण व्हावा. असा बोल्शेव्हिकांचा व सामान्यत: सर्व सामाजिकवाद्यांचा उद्देश आहे.

सारांश सामाजिकवादाचा सामान्य निष्कर्ष असा आहे कीं, समाजाची सामवायिक कुटुंबपद्धतीवर नव्यानें रचना व्हावी. हल्लींची औद्योगिक पद्धति व खासगी मालमत्ता नाहीशी होऊन, सर्व कारखाने, जमीन व भांडवल सामवायिक मालकीचे व्हावेत. समाजांत व्यक्तींवरील बाह्य नियंत्रण शक्य तितकें कमी केलें जाऊन सर्व व्यवहार परस्परसंमतीनें चालावेत. प्रत्येकानें आपापल्या शक्तीप्रमाणें समाजासाठीं काम करावें, व उपलब्ध वस्तूंतून जें ज्याला लागेल तें त्याला आवश्यकतेप्रमाणे व सोयीप्रमाणे दिलें जात जावें. जगांतील सर्व देशांतून याच तत्वांवर सामवायिक पद्धत सुरु करुन, त्यांचे एक फेडरेशन किंवा संघ कायम केला जावा. असें झाल्यानेंच समाजांतील अंतर्गत वर्गकलह व बाहय परस्परयुद्धें बंद होतील, स्वार्थवृत्ति नामशेष होत जातील, अंत:करणांतील उदार, उच्च स्नेहमूलक भावना विकास पावतील, व समाजांत सौख्य आणि शांतता नांदूं लागून मनुष्याची सर्वांगानें उन्नति होऊं लागेल.

सामाजिकवाद ही विचारसृष्टींतील नुसती सिद्धांतमालिका नसून, कार्यसृष्टींतील जिवंत चळवळ आहे. निरनिराळ्या देशांत व काळांत त्या त्या परिस्थित्यनुरुप तिचें स्वरुप बदलत आलें आहे हें तिच्या जिवंतपणाचें प्रमाण आहे. हल्लीं पाश्चात्य देशांत ती एक प्रचंड शक्ति आहे, किंबहुना तिच्या इतकी जोरदार दुसरी चळवळच नाहीं असें म्हणण्याला हरकत नाही. पाश्चात्य देशांचा, परंपरा सर्व जगाचा, भविष्यत्काळ तिच्या हातात आहे. समाजांत आमूलाग्र खळबळ उडवून देऊन, त्याची नव्यानें रचना करण्याचें सामर्थ्य तिच्या एकट्यांतच आहे. सर्व नव्या पंथाच्या अनुयायांत असणारा जोम, उत्साह, व कर्तृत्वशक्ति या वादाच्या अनुयायांतही मुसमुसत आहे. समाजांतील आजपर्यंत दु:खात, दारिद्र्यात, दैन्यांत गांजत आलेल्या बहुसंख्यांक वर्गांत तिनें नवें चैतन्य, नवें ऐक्य, नवी आशा निर्माण केली आहे. हा वर्ग म्हणजे एक थोरला राक्षस आहे. तो निद्रित होता तोंपावेतों बरें होतें. पण एकदां त्याला जागृति होऊन आपल्या सामर्थ्याची जाणीव झाली कीं, सर्व समाजाला उलथून पाडण्याला त्याला वेळ लागणार नाही. मग समाजाला हवें तसे वळण देणें हा त्याच्या तळहाताचा मळ आहे.

सामाजिकवादाची चळवळ आता थांबत नाही किंवा मरत नाही हें नि:संशय आहे. भांडवलशाहीनें सर्व जग आक्रमण केलें आहे, व त्याबरोबर कामकऱ्यांची

दैना, कारखान्यांची वाढ, नफ्याची हांव, व्यापारी चुरस, व युद्धें, इत्यादि तिचे अनिवार्य परिणाम सर्वदूर दृष्टोत्पतीस येऊं लागले आहेत. सर्व देशातून कामकरी वर्ग निर्माण झाला आहे व होत आहे; व आपल्या उद्धारार्थ आपण स्वत:च प्रयत्न करुं लागण्याची आवश्यकता त्यास पटू लागली आहे. अशा स्थितींत सामाजिकवादाइतका प्रभावशाली दुसरा उपाय त्यांच्या हाताशी नाहीं. पाश्चात्य जगांतील बहुतेक राष्ट्रांतून कामकरी वर्गानें या उपायाचा निरनिराळ्या स्वरुपांत अवलंब केला आहे. तिकडे एकही राष्ट्र असें नाहीं की, जेथें जोरदार सामाजिकवादी पक्ष नाहीं. फ्रान्स, जर्मनी, आस्ट्रिया, इटली, अमेरिका, वगैरे देशांच्या राजकारणांत या पक्षाचें वजन वाढतें आहे, व इंग्लंडसारख्या सापेक्षत: पुराणप्रिय देशांतही फार काळ लोटण्यापूर्वींच या कामकरीपक्षाच्या हातीं राज्यसूत्रें येतील असें सर्वांचें अनुमान आहे.

आशावादीपणाची, अंती जय होण्याच्या खात्रीची, सामाजिकवाद्यांत केव्हांच उणीव नव्हती. आज आपला पक्ष कितीही निर्बल असला, आज त्यावर कितीही संकटें कोसळत असलीं व उपमर्द होत असला, तरी तोच सत्पक्ष असून शेवटीं तोच यशस्वी होणार अशी उत्कट भावना असल्याशिवाय या वादाच्या पुढाऱ्यांनीं व अनुयायांनीं ज्या दुर्धर हालअपेष्टा सोसल्या त्या त्यांच्यानें सोसवल्या नसत्या, किंवा त्या सोसूनही स्वमतप्रसाराचें कार्य करता आलें नसतें. तथापि रशियांत बोल्शेव्हिक पक्षाला आज तीन वर्ष जें विलक्षण यश आलें आहे, व पीछेहाट होण्याऐवजीं त्याच्या मतप्रसाराच्या कार्याचें पाऊल दरदिवसागणिक पुढेंच पडत आहे, त्यानें सर्व सामाजिकवाद्यांत नवीन जीवनाचा संचार झाला आहे. आपल्या मतांच्या सार्वत्रिक अंतिम यशस्वितेचा हा पहिला हप्ता आहे असे त्यांस वाटत आहे. राजसत्तेचें पाठबळ त्यांस इतक्या दिवस नव्हतें तें आतां एका ठिकाणी त्यांस मिळालें आहे. आज बोल्शेव्हिकांचीं मतें पुष्कळ सामाजिकवाद्यांना मान्य नाहीत हे खरें; तथापि व्यावहारिक यशासारखें मतप्रसाराला किंवा मतांतर घडवून आणण्याला दुसरें सबळ साधन नाहीं ही गोष्ट विसरता कामा नये.

पाश्चात्य देशांतून या वादाचा जो सर्वत्र प्रसार होत आहे त्यावरुनच हल्लींच्या काळांत त्याची किती आवश्यकता आहे याची प्रतीति येते. एकप्रकारें या वादाचा नैतिकविजय हल्लींच झालेला आहे. कामकरी वर्गाची सद्य:स्थिति अत्यंत शोचनीय आहे, व तिचा सर्व दोष भांडवलशाहीकडे, तिनें सुरु केलेल्या व चालू ठेवलेल्या अन्याय्य वांटणीच्या पद्धतीकडे आहे, हें आतां कोणीही न्यायी व विचारी मनुष्य नाकबूल करीत नाहीं. वर्तमानस्थिति सुधारण्याला हल्लींची उद्योगपद्धति बदलून समाजाची आमूलाग्र पुनर्रचना केली पाहिजे हेंही या विषयाचा नि:पक्षपातपणानें व खोलवर विचार करणारांस पटूं लागलें आहे. सामाजिक वादानें हेंच सर्वांत मोठें कार्य केलें आहे. त्यानें सर्व समाजाला आत्मनिरिक्षण करण्यास लाविलें आहे. अठराव्या शतकांत फ्रेंच राज्यक्रान्तीनें

स्वतंत्रता, समत्वता आणि विश्वबंधुता या त्रयीचा घोष केला. परंतु एकोणिसाव्या शतकांत पाश्चात्य समाजांतील बहुसंख्यांक वर्ग आर्थिक पारतंत्र्यात खितपत पडला होता, विषमतेचें सर्वत्र साम्राज्य पसरलें होतें, आणि नफ्याच्या हांवेनें व व्यापारी चुरशी ने एक वर्ग दुसऱ्या वर्गाचा व एक राष्ट्र दुसऱ्या राष्ट्राचा गळा कापण्यास तयार झालें होते. आंतील ही खरी वस्तुस्थिति उदार तत्त्वांच्या शाब्दिक ढोंगाखाली झांकली जात होती. ती सामाजिक वादाने उघडकीस आणून तिचें खरें हिडीस स्वरुप सर्व जगाला पटवून दिलें. गेल्या पिढींतल्या सामाजिकवादी पुढाऱ्यांच्या तात्कालिक मागण्या-कामाचे तास आठ व्हावेत, कामकऱ्यांना मतदानाचा अधिकार असावा, लहान मुलांना कामावर लावूं नये– या आतां तत्वत: कोणीही अमान्य करीत नाही. कित्येक देशांतून त्यांपैकीं बहुतेक मागण्या यापूर्वीच पुऱ्या करण्यात आल्या असून सार्वत्रिक मतदानासारखी मागणीही हळू हळू पुरी होऊं पहात आहे. नुकत्याच झालेल्या तहांत युद्धमान राष्ट्रांना एक कायमचें आंतरराष्ट्रीय–कामकरी कमिशन नेमणें आवश्यक वाटलें यावरुनच कामकरी वर्गाच्या प्रश्नांना हल्लीं किती महत्व आलें आहे हें उघड होतें. हें महत्त्व आणण्याचें श्रेय सामाजिक वादाला आहे.

हा सामाजिकवादाचा इतर देशांबद्दलचा विचार झाला. पण हिंदुस्थानाविषयीं काय ? सामाजिक वादाचा येथें प्रसार होईल काय ? झाला तर त्याचें स्वरुप कसें राहील ? हे प्रश्न अत्यंत महत्त्वाचे आहेत खरे, पण उत्तर देण्यास तितकेच कठिण आहेत.

प्रथमत: हिंदुस्थान हा देश अद्यापि मुख्यत्वेंकरुन शेतकीवर अवलंबून आहे. येथील शेंकडा ऐंशी लोक शेतकीवर उदरनिर्वाह करतात. देशांतील फार मोठा वर्ग अजून गांवढ्यांतून राहतो. मुंबई, कलकत्ता, कानपूर, मद्रास, अशा मोजक्या शहरांशिवाय इतरत्र कामकऱ्यांचा असा स्वतंत्र वर्गच अस्तित्वांत आलेला नाहीं. व या शहरांतल्या कामकरी वर्गापैकींही कित्येकांची आपल्या मूळच्या खेडेगांवांतून शेतें अद्याप कायम आहेत. मुंबईच्या गेल्या वर्षीच्या गिरणी-कामऱ्यांच्या, व त्याहून जास्त पोस्टमनच्या संपातून चांगली चिकाटी व एकजूट दिसून आली हें खरें; तथापि एकंदरीत कामकरी लोकांत नवीन जागृति, स्ववर्गाभिमान, ऐक्य, किंवा सुसंघटितपणा अजून आलेला नाहीं. त्यांच्यांत शिक्षणाचा तितका प्रसार झाला नाहीं हें याचें एक कारण नि:संशय आहे, तथापि त्याहून जास्त बलवत्तर कारण हे आहे कीं, या युगांची आवश्यकताच तितकी उद्‌भवली नाहीं. पाश्चात्य देशांइतकी येथील मजुरांची स्थिति विपन्नावस्थेला गेलेली नाहीं. उद्योगधंद्यांचा किंवा कारखान्यांचा तितका प्रसार झालेला नाहीं. समाजांत निरनिराळ्या वर्गांतील विषमता तितकी वाढलेली नाहीं. जीवनकलह

भयंकर झालेला नाहीं. त्यामुळेच श्रीमंतांविषयी गरीबांना संताप, द्वेष, किंवा तिरस्कार वाटूं लागला नाहीं. बोल्शेव्हिक जी सामवायिक पद्धत शेवटी प्रचारांत आणूं इच्छितात, ती लहान प्रमाणावर एकत्र कुटुंबपद्धतीच्या रुपानें येथें पूर्वीपासूनच प्रचलित आहे. तिच्या योगाने स्वार्थाला किंचित् तरी आळा बसला आहे. व कौटुंबिक प्रेमाचा तितका अभाव झालेला नाहीं. त्यामुळे गरीबांचें जीवन अजूनही इतकें कष्टमय झालें नाहीं. सर्वांत महत्त्वाची गोष्ठ ही कीं अजूनही येथील लोकांचें भौतिकावादाशीं तितकें तादात्म्य झालेलें नाहीं. त्यांच्या वृत्ति अजून अधिक अध्यात्मपर आहेत. किंवा पाहिजे तर ऐहिकसुखाविषयी उदासीन आहेत असें म्हणा. संपत्ति हेंच सर्व सुखाचें, सर्व चमत्कारांचें, आदिकारण आहे हा वाद येथें बळावलेला नाहीं. त्यामुळे मार्क्स-वादाला अनुकूल अशी येथील लोकांची वृतिच अद्याप झालेली नाहीं.

सारांश, पाश्चात्य औद्योगिक चक्रांत जरी हिंदुस्थान सांपडलेलें आहे, तरी येथें तिकडल्या उद्योग-पद्धतीचा तितका प्रसार झालेला नाहीं, किंवा वर्गकलहही फारसा सुरु झालेला नाहीं. त्यामुळे एंजल्सनें एके ठिकाणीं म्हटल्याप्रमाणें, सामाजिकवादाला किंवा त्यांत उपदेशिलेल्या क्रान्तीला येथील परिस्थिति अजून योग्य झालेली नाहीं.

यावर ही शंका उद्‌भवते कीं, रशिया देशही हिंदुस्थानाप्रमाणेंच शेतकी-प्रधान होता व अजूनही आहे. तेथेंही शहरापेक्षा गांवढ्यातूनच फार जास्त लोक राहतात. पण तेथें सामाजिक वादाचा प्रसार झाला, इतकेंच नाहीं, तर त्याला तेथें अत्यंत उग्र रुप प्राप्त झालें, क्रान्तिही घडून आली. मग येथेंही ती घडण्याचा संभव कां नसावा ? तेथील परिस्थितीचें सूक्ष्मज्ञान असल्याशिवाय या प्रश्नाचें सांगोपांग उत्तर देणें कठिण आहे. तथापि वरवर पहाणारांलाही हा भेद दोन्ही देशांत दिसून येणारा आहे कीं, इतर पाश्चात्य देशांच्या मानानें जरी रशिया मागासलेला असला, तरी हिंदुस्थानच्या मानानें त्याच्या उद्योगधंद्यांचे प्रमाण पुष्कळ मोठें आहे. कामकऱ्यांचा स्वतंत्र वर्ग तेथे विद्यमान असून सुसंघटित आहे. संपांचे शिक्षण कित्येक वर्षांपासून त्यांस मिळत आलें आहे. शिवाय रशियाची एकंदर संस्कृति हिंदुस्थानपेक्षा यूरोपशीं जास्त मिळती आहे. या सामाजिकवादाच्या एकंदर खळवळीला तो देश जास्त निकट व जास्त संलग्न आहे. सर्व अनुकूलतेला झारच्या करडया अंमलाची व जुलुमाची मदत मिळालेली होती, हें ध्यानांत घेतलें म्हणजे वरील प्रश्नाचे अंशतः तरी उत्तर मिळतें.

यानंतर असा प्रश्न साहजिक उभा राहतो कीं, आज जरी हिंदुस्थानाची परिस्थिति सामाजिकवादाच्या प्रसाराला योग्य नसली, तरी कालांतरानें पाश्चात्य भांडवलशाहीची व त्याबरोबर वर्गकलहाची वाढ झाल्यानंतर हा प्रसार होणे अनिवार्य नाही कां ? हल्लींही पूर्वीपेक्षा अधिक संप होऊं लागले आहेत. कामकरी-संघ स्थापन

होत आहेत, व कामकरी-काँग्रेसही भरुं लागली आहे. या चिन्हांवरुन लवकरच हा प्रसार होऊं लागणार हें उघड नाहीं काय ? जगांतल्या या अत्यंत जोरदार व दिवसेंदिवस जास्त यशस्वी होत जाणाऱ्या चळवळीपासून हिंदुस्थान कसें अलिप्त राहणार ?

या प्रश्नाचे उत्तर एवढेंच आहे कीं हिंदुस्थान पूर्णपणें अलिप्त तर राहूं शकतच नाहीं; तरीही पण सामाजिकवादाचा निदान आतांपावेतों प्रचलित असलेल्या त्यांतील पंथांचा हिंदुस्थानांत फारसा प्रसार होण्याचा संभव कमी दिसतो. याहून जास्त निश्चित उत्तर देणें कठिण आहे. गेल्या महायुद्धानें युरोपांतील भांडवलशाहीची सत्ता कमी झालेली नाहीं, तथापि तिच्या विषयींचा द्वेष व संताप अधिक तीव्र झाला आहे. एकपक्षी या युद्धानें स्वराष्ट्राभिमान वृद्धिंगत केला आहे, तर दुसऱ्या पक्षी त्यानें हल्लींच्या समाजस्थितीचा हिडिसपणा व ती बदलण्याची आवश्यकता जास्त प्रत्ययाला आणून दिली आहे. तेथील बाह्यसृष्टीप्रमाणें अत:सृष्टींतही विलक्षण खळबळ झालेली आहे. तिनें सामाजिकवादाच्या स्वरुपातही फरक होण्याचा संभव आहे. पण एकंदरीत त्याच्या प्रसाराला तिनें तेथें सहाय्यच मिळणारें आहे. तसें होऊन, कामकरीपक्षाच्या हातीं जास्त जास्त सत्ता येत गेली, तर त्यायोगानें हल्लींची उद्योग-पद्धति बदलून ती कामकऱ्यांना जास्त सुखावह, समाधानकारक, व न्यायमूलक होत जाईल हे तर्कसंमत दिसतें. सामाजिकवाद्यांची सामवायिक पद्धत जरी बराच काळपावेतों कोठेंच प्रचलित न होऊं शकली किंवा आंतरराष्ट्रीय संघ कायम होऊन व्यापारी चढाओढ पूर्णपणें बंद न झाली, तरी यापुढें उद्योगपद्धतींत कामकऱ्यांना अनुकूल असें जबरदस्त परिवर्तन होईल असें अनुमान करण्यास हरकत नाहीं. तसें झाल्यास हिंदुस्थानांत भविष्यत् काळांत ज्या उद्योगपद्धतीचा प्रसार होणार ती या परिवर्तित स्वरुपाची राहील हे उघड आहे. त्यायोगानें अर्थातच पाश्चात्य देशांतून जो भांडवलदार वर्गाविषयीं मागच्या पिढ्यांतून संताप व तिरस्कार उपजला, व जो नंतरच्या पिढ्यांतून संक्रांत होत गेला, तो उद्‌भवझयाचेंच येथें तितकें कारण उपजणार नाहीं. जर उद्योगपद्धतींतल्या अन्यायाचें प्रमाणच पुष्कळ कमी होत गेलें, तर तिनें उद्‌भवणाऱ्या संतापाची तीव्रता कमी राहत जाईल हे उघड आहे. वर्गकलहाचें बीज अशा रीतीनें नि:सत्व होत जाईल असें दिसतें. अर्थातच त्याला उपायभूत असलेल्या सामाजिकवादाच्या प्रसाराचें क्षेत्रही तितकें कमी राहील हें ओघालाच येतें.

हिंदुस्थानांतली विशिष्ट राजकीय परिस्थितिही या प्रश्नाच्या विचारांत ध्यानांत घेतली पाहिजे. हा देश युरोपांतील बहुतेक देशांपम्राणें स्वतंत्र नाहीं. तो परतंत्र आहे, इतकेंच नाहीं तर त्यांच्यात स्वातंत्र्याची लालसा उत्पन्न झाली असून, त्यासाठी झगडाही त्यानें सुरु केला आहे. हा झगड़ा आतां लवकर थांबत नाहीं हे उघड आहे. आयर्लंड सारख्या देशावरुन आपणांस असें दिसून येतें कीं, एकदां का देशांत असा निकराचा झगड़ा

सुरु झाला कीं देशांतल्या सर्व शक्ति त्यांतच सहाय करण्यांत किंवा विरोध करण्यांत लागून जातात. सर्व चळवळी त्यांत विरुन जातात. येथेंही हा झगड़ा जसा जसा वाढत जाणार तसतशी ही स्थिति होत जाणार हें नि:संशय आहे. हल्लींही तशीं चिन्हें दृष्टिस पडूं लागलीं आहेत. उद्योगधंद्याच्या उत्कर्षावर याचा अनिष्ट परिणाम होईल, व त्याबरोबरच सामाजिकवादाकडे लक्ष देण्यास समाजास कमी वेळ व इच्छा राहील हें सांगावयाला नको.

परंतु या सर्व कारणांहून बलवत्तर कारण येथील संस्कृति भिन्न आहे हें आम्हांस वाटतें. नुकतेंच वर सांगितल्याप्रमाणे संसाराकडे पहाण्याची येथील दृष्टीच निराळी आहे. ती जास्त अंतर्मुख आहे म्हणा, किंवा प्रारब्धवादी आहे म्हणा, किंवा जन्मांतरांवर विश्वास ठेवून एकंदर आयुष्य स्वकर्मसूत्रग्रंथित मानणारी आहे असें म्हणा, येथील जनतेची मनोरचना पाश्चात्यांहून पूर्वपश्चिमेइतकीच विरुद्ध आहे. येथील समाजव्यवस्थाही तिकडच्याहून अशीच भिन्न आहे. अनेक कारणांनी तिचें स्वरुप हल्लीं पुष्कळच अवगत झालेलें आहे. दुसरें हेंही आहे की, अतिपरिचयामुळें तिच्यांतले दोषांची आम्हांस तीव्र जाणीव झाली असून, गुणांकडे त्या मानानें दुर्लक्ष झालें आहे. परंतु भाग्यवशात् येथील लोकांची दृष्टि आतां निवळत चालली असून, आपल्या जुन्या संस्थांचें व संस्कृतीचें प्रेमानें व आदराने परीक्षण करण्याची बुद्धि त्यांच्यात उत्पन्न होत आहे. त्याचा परिणाम जुन्या समाजव्यवस्थेंत हल्लींच्या काळाला अनुरुप असे फेरफार करुन ती दृढमूल करण्यांत होईल असें वाटतें. या व्यवस्थेंत सामाजिक वादाच्या प्रसाराला वाव नाहीं. याचें कारण भांडवलशाहीप्रमाणे ती विरोधी आहे असें नाही, तर सामाजिक वाद जे दोष दूर करण्यास जन्माला आला ते हिच्यांत लक्षांत घेण्याइतके उद्भवत नाहींत.

समाजवादाचा बर्ट्रंड रसेल सारख्या ज्या तज्ज्ञांनीं रागद्वेषरहित विचार केला आहे. त्यांस त्या वादानें आदर्श म्हणून पुढें ठेविलेल्या समाजस्थितीत दोन-तीन मौलिक दोष वाटतात. एक, या स्थितींत शासनसत्ता मुळींच न राहिल्यानें मानवी अंत:करणांतील नैसर्गिक दुष्टवृत्तींना कह्यात ठेवण्याचें, कामक्रोधादिक अनावर झाल्यामुळे घडणारे अपाय न घडूं देण्याचें किंवा कांहीं महत्त्वाकांक्षी दुष्टलोकांनी ही आदर्शस्थिति उलथून टाकण्याचे मनांत आणल्यास त्यांस नियंत्रण करण्याचें, साधन उरत नाहीं. मानवी अंत:करणाच्या चांगुलपणावर, व नीच आणि दुष्ट वृत्ति निर्मल होण्यावर, या स्थितिकरितां झटणाऱ्यांनी फाजील विश्वास ठेवला आहे. दुसरा दोष असा कीं, या स्थितींत खासगी मालमत्ता नाहींशी करुन स्वार्थ-मूलक वृत्तींना आळा घातला आहे हें खरें, पण त्याबरोबर व्यक्तींना आत्मविकासासाठीं झटण्यास, किंवा समाजसेवेंत आपली पराकाष्ठा करण्यास, उद्युक्त करणारें प्रवर्तक-कारण निर्माण केलेलें नाही. समाजांतले कांही थोडे लोक हल्लींप्रमाणेंच या आदर्शस्थितींतही केवळ सत्यजिज्ञासेनें, बौद्धिक

श्रमाच्या आवडीनें, नैसर्गिक परोपकारवृत्तीनें, किंवा समाजसेवेंने मिळणार या प्रतिष्ठेच्या लोभाने, आपलें आयुष्य शास्त्रीय शोधांत, कलाभ्यासात किंवा समाजसेवेंत घालविण्यास प्रवृत्त होतील, तथापि वरील करणें समाजांतील अधिकांश लोकांना पुरेशी होतील, व शैथिल्य किंवा औदासिन्य न येतां आत्मोन्नतिसाठी ते पराकाष्ठा करीत राहतील, हें संभवनीय दिसत नाही. सारांश, सामाजिकवादाचा सर्वांत मोठा दोष हा आहे कीं, त्याचें ध्येय मनुष्याच्या नैसर्गिक मनोरचनेला अनुरुप नाही.

हिंदुस्थानांतल्या वर्णाश्रमव्यवस्थेंत हें आनुरुप्य जास्त आहे असें समाजशास्त्रज्ञांचे मत होत आहे. बट्रँड रसेलनें आपल्या Principles of social Reconstruction o Roads to Freedom नावाच्या ग्रंथांतून आदर्श समाजरचनेचीं जी तत्त्वें सांगितलीं आहेत ती वर्णाश्रमव्यवस्थेशी बहुतांशी जुळतात. समाजातील सर्व व्यक्ती मानसिक उन्नतींत एकाच दर्जावर असणें असंभवनीय नाही. सर्वांच्या स्वभावांत एकच वृत्ति प्रधान असलेलीही आढळत नाहीं. म्हणून त्यांना स्वोत्कर्षासाठी प्रवृत्त करण्यास, त्यांच्या त्यांच्या वृत्तींना व मानसिक दर्जांना अनुरुप असे निरनिराळे प्रवर्तक हेतु धुंडून काढले पाहिजेत. सामान्यत: मनुष्याचे त्यांच्या स्वभावांवरुन Men of thought, men of action, ment of desire, ndunspecialised अथवा विचारप्रधान, क्रियाप्रधान, इच्छाप्रधान व अविकसितवृत्ति असे भेद करता येतात. पहिल्या प्रकारच्या पुरुषांना अध्ययन, अध्यापन व मानसिक श्रम प्रिय असतात; दुसऱ्या प्रकारच्या मनुष्यांना अधिकाराची हौस असते, व तत्प्रीत्यर्थ सर्व आयुष्य खर्चावेसे वाटतें; तिसऱ्या वर्गातल्यांना संपत्तीची आवड असून निरनिराळ्या उपभोगाची लालसा असते; चौथ्या वर्गांत अजून कोणतीच वृत्ति विकसित झालेली नसल्यानें, निव्वळ शरीरसुख व तात्कालिक आनंदलाभ यापलीकडे त्यांची दृष्टि जात नाहीं. अर्थातच या त्यांच्या वृत्तींना अनुसरुन समाजकल्याणाला आवश्यक असलेल्या कार्यांपैकीं भिन्न भिन्न कार्यें त्यांच्याकडे सोंपविलीं पाहिजेत; व ती कार्ये ते तत्परतेनें करतील यासाठी निरनिराळे प्रवर्तक हेतु-आमिषें-ठेवलीं पाहिजेत. हिंदुस्थानातील वर्णव्यवस्था या तत्वांना अनुसरुन केलेली आहे. पहिला विचारप्रिय लोकांचा ब्राह्मणवर्ग; यांच्याकडे समाजातील अध्ययन-अध्यापनाचे काम दिलेलें असून, त्यासाठीं समाजप्रतिष्ठा हा प्रवर्तक हेतु ठेवला आहे. ब्राम्हणाने संपत्ति जमवावयाची नाहीं, किंवा राज्याधिकार ग्रहण करावयाचा नाहीं. समाजानें त्याच्या उदरनिर्वाहाची व्यवस्था करावी, व त्याला सर्वोच्च मान द्यावा. व यांतच ब्राम्हणानें संतुष्ट असावें. ही त्यागवृत्ति ब्राम्हणांना आवश्यक सांगितलेली असल्यानेंच, त्यांच्याकडे समाजाचें एकंदर नियंतृत्वही दिलेलें आहे. बुद्धिमान्, विचारप्रधान् व समाजांतील व्यवहारांपासून ते निरपेक्ष असल्यानें, समाजासाठी कायदे करण्यास त्यांच्या इतकी पात्रता दुसऱ्यांत असणें शक्य नव्हतें. म्हणून हेंहि कार्य त्यांच्याकडे देण्यांत आलें. दुसऱ्या वर्गावर समाजांच्या रक्षणाचा भार टाकण्यांत आला; तदनुरुप राज्याधिकारहि त्यांच्याकडे ठेवण्यांत आला.

राज्यकारभारांतील राजापासून लहान कामगारापर्यंतची सर्व कामें व शिपाईगिरी ही या वर्गाचीं कृत्ये ठरविण्यात आली; व त्याबद्दल त्यांना योग्य वेतन व अधिकार दिला गेला. पहिल्या वर्गापेक्षां यांच्या त्यागाचे प्रमाण कमी; ब्राम्हणाहून स्वसुखाकडे त्यांचे लक्ष जास्त; तथापि विषयोपभोग किंवा संपत्तीची लालसा हें त्याचें प्रवर्तक कारण नाहीं. अधिकारानें हा वर्ग संतुष्ट असतो. तिसरा वर्ग वैश्यांचा वर्ग. कृषि, वाणिज्य, गोरक्षा, इत्यादी विहित साधनांनी यथेष्ट संपत्ति मिळवावी व धर्माला न सोडतां तिचा मनसोक्त उपभोग घ्यावा हें या वर्गाचें कार्य ठेवलेलें आहे. समाजाच्या निर्वाहाला आवश्यक वस्तु उत्पन्न करण्याचें व पुरविण्याचें काम या वर्गाकडे देण्यांत आलें. संपत्ति मिळविण्याचा व तिचा उपभोग घेण्याचा या वर्गाला प्रतिबंध नाहीं; अर्थात्च समाजाला कल्याणप्रद होईल अशा प्रकारें या संपत्तीच्या कांहीं अंशाचा विनियोग त्यानें करणें आवश्यक आहे. स्वसुखाविषयीं पहिल्या दोन वर्गांहून याची प्रवृत्ति जास्त असते. चौथा वर्ग शूद्रांचा. या वर्गानें शारीरिक श्रमाचीं कामें करावीत; व शरीरसुख भोगावें. त्याला आवश्यक भोग्य वस्तूंची अडचण पडणार नाहीं अशी व्यवस्था करण्याचें समाजाचें कर्तव्य होय.

अशी ही वर्णव्यवस्था आहे. तिच्या गुणदोषांचे सांगोपांग विवेचन करणे अप्रस्तुत आहे. परंतु वरील वर्णनावरुन इतकें दिसून येईल की, तिच्यांत उत्तम प्रकारचा श्रमविभाग झालेला आहे; स्पर्धेचे कारण उरलेलें नाही. आणि प्रत्येक वर्गाला त्याच्या त्याच्या मनोरचनेनुरुप कर्तव्य घालून दिलें आहे, व प्रवर्तक कारण लावून दिलें आहे. कोणत्याही एका वर्गात समाजांतील सत्ता एकत्र झालेली नाहीं. एका वर्गात कायदे घालून देण्याची शक्ति तर दुसऱ्या वर्गांत राज्याधिकार, तिसऱ्या वर्गात संपत्ति. अशा रीतीनें तिची विभागणी झालेली आहे. क्षत्रियांच्या अधिकार-सत्तेला ब्राह्मणांचे नियंत्रण ठेवलेलें आहे, तर त्या दोहोंच्याही आवश्यकतापूर्तीचें साधन जें संपत्ति तें तिसऱ्या वर्गाच्या हातांत ठेवलें आहे. या व्यवस्थेंत शासनसत्ता नाहीशी केलेली नाही. परंतु तिचें स्वरुप अमुकच प्रकारचें असावें असेंही ठरवून दिलेलें नाहीं. ती प्रातिनिधिक बहुतंत्री असूं शकते, किंवा वैयक्तिक एकतंत्रीही असूं शकते. म्हणून प्राचीन काळी हिंदुस्थानांत लोकसत्ताक व राज्यसत्ताक, दोन्ही प्रकारच्या पद्धति या व्यवस्थेंत प्रचलित होत्या. या व्यवस्थेंत सर्व समाज हा एक विराट देह असून निरनिराळे वर्ग त्याचें हस्तपादादि निरनिराळे अवयव आहेत ही भावना दृढ होते. हक्काबरोबर कर्तव्याची जबाबदारी प्रत्येक वर्गावर टाकली जाते; व सर्वांचे धुरीणत्व व नियंतृत्व त्यागसंपन्न, निरपेक्ष, व बुद्धिमान अशा वर्गाकडे दिलें जातें.

या वर्णव्यवस्थेपासून हल्लीं जे दोष उद्‌भवले आहेत त्याची मुख्य कारणे दोन आहेत. ही व्यवस्था सर्वस्वी जन्मसिद्ध करण्यांत आली आहे हें एक व दुसरें हें कीं, निरनिराळ्या वर्गांत उच्चनीच हा तीव्र भाव उपजून परस्पर द्वेष माजला आहे. ही दोन्ही

कारणें थोड्या प्रयत्नांनी दूर करता येण्यासारखीं आहेत. बापांचे गुण मुलांत उत्पन्न होतात हा अनुभव सामान्य रीतीनें कोणीही नाकबूल करणार नाहीं. पण त्याबरोबरच कधीं कधीं बापाहून मुलाच्या वृत्ति अगदीं निराळ्या आढळून येतात हेंही निरपेक्ष माणसाला अमान्य करतां येणार नाहीं. तेव्हां या दोन्ही प्रकारच्या अनुभवांना विचारांत घेऊन, बहुतांशी जन्मसिद्ध परंतु कांहीं अंशी गुणानुरुप, पूर्वपरंपरा पाहून व जन्मसिद्ध गुण लक्षात घेऊन, जर वर्ग किंवा जात ठरविण्याची व्यवस्था करतां आली व ती करतां येईल तर या व्यवस्थेवरील हल्लींचे पुष्कळ आक्षेप निर्मूल होतील. दुसरें उच्चनीच-भावाचें कारण तर शिक्षणानें व शरीराला सर्वच भागाची सारखीच आवश्यकता आहे या जाणीवेनें याहीपेक्षा लवकर नाहींसें होईल.

सारांश, वर्णव्यवस्थेंत सामाजिक वादांतल्या आदर्शस्थितींतले मुख्य दोष विद्यमान नसून, मानवी मनोरचनेला ती जास्त अनुरुप आहे म्हणून पूर्वसंस्कृतीचा व परंपरेचा योग्य अभिमान वृद्धिंगत होऊन ही व्यवस्था हिंदुस्थानात दृढमूल झाली, तर सामाजिक वादाच्या प्रसाराला तें एक निरोधक कारण होईल यांत संशय नाहीं.

पण सामाजिक वादाचा हिंदुस्थानांत प्रसार होवो किंवा न होवो, हल्लीं पाश्चात्य देशांत त्याचें प्राबल्य आहे; व हिंदुस्थानचा त्या देशांशी निकट संबंध-आहे. जवळच्या घरांत आगीचा डोंबाळा झाला असला, तर तेथे ती आग कां लागली हें समजून घेऊन, आपल्या घरांत ती न पसरेल याची तजवीज करुन ठेवणें आवश्यक आहे. यासाठीं सामाजिक वादाच्या सर्व अंगप्रत्यंगांची माहिती करुन घेऊन, आपल्या समाजाचें, संस्कृतीचें व संस्थांचे त्या दृष्टिने सूक्ष्म परीक्षण केले पाहिजे. तें या निमित्तानें होऊं लागलें म्हणजे हिंदुस्थान अखेरी मारील यांत संशय नाहीं.